गुरुवार
२
एप्रिल २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३८५
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत




## थोडक्यात

### जैन धर्म हा हिंदू संस्कृतीचाच भाग



**मुंबई** : भारतात विविध जाती धर्म अस्तित्वात असले तरी ते मुळात हिंदू सांस्कृतिक विचारधारेशी एकरूप आहेत. जैन धर्मियांची पूजा पद्धती वेगळी असली तरी ते हिंदुच असून आता अल्पसंख्यांकांमधून बाहेर पडण्याची वेळ आली असल्याचे प्रतिपादन कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे. मंत्रालयातील दालनात ते पत्रकारांशी बोलत होते. मंत्री लोढा पुढे म्हणाले की, आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांची जयंती असून त्यांचे विचार आजही राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहेत. जो पर्यंत हिंदू एकत्रित येत नाही, तो पर्यंत खऱ्या अर्थाने राष्ट्र निर्माण साध्य होणार नाही. अल्पसंख्यांक राहून हे उदिष्ट साध्य होणार नाही,असेही मंत्री लोढा म्हणाले.

### अनुदानित रासायनिक खतांचे वितरण 'फार्मर आयडी'वर



**मुंबई** : राज्यातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानित रासायनिक खतांच्या वितरणात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी आता 'फार्मर आयडी'चा वापर करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. अॅग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडीचा वापर करून देशातील पहिला पायलट प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्यात येणार असल्याचे दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. या उपक्रमामुळे खतांचे वितरण अधिक नियोजनबद्ध, अचूक आणि पारदर्शक पद्धतीने होणार असून, शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ थेट आणि योग्य पद्धतीने मिळणार आहे. तसेच बनावट व्यवहारांना आळा बसून प्रणाली अधिक विश्वासार्ह होणार आहे, अशी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली.

### भूकरमापकांना वाढीव वेतनश्रेणीसह पदोन्नती

**मुंबई** : राज्यातील भूकरमापकांना आता वाढीव वेतनश्रेणीसह पदोन्नती मिळणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने भूमि अभिलेख विभागाच्या सुधारित आकृतीबंधाला मंजुरी दिली आहे. यामुळे विभागातील पदरचना आणि वेतनश्रेणीत मोठे बदल होणार आहेत. विभागाच्या नवीन आकृतीबंधानुसार एकूण १०,६८३ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये ९,६३८ नियमित पदे असून १०४५ पदे कंत्राटी पद्धतीने भरली जाणार आहेत.

# 'समृद्धी'वर मृत्यूचे तांडव..!

## भरधाव ट्रकने ७ महिला मजुरांना चिरडले, महामार्गावर रक्ताचा सडा

**जालना: दि.१ प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर बुधवारी सायंकाळी भरधाव वाहनाने कामगारांच्या दुसऱ्या गाडीला दिलेल्या धडकेत सात मजुरांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये सातही महिला आहेत. तर अन्य दहा ते बारा मजूर जखमी झाले. नागपूरहून मुंबईच्या दिशेने वेगात निघालेले वाहन कडवंचीनजीक समृद्धीवर सफाईचे काम करून एका वाहनात बसत असतानाच हा अपघात घडला. समृद्धी महामार्गावर एका रांगेत मृतदेह पडून रक्ताचा सडा पडल्याचे चित्र होते.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जालन्यातील कडवंची शिवारात हा अपघात झाला. महामार्गाच्या कडेला काही महिला मजूर काम करत असताना नागपूरहून मुंबईकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत महिला मजूर अक्षरशः चिरडल्या गेल्या.



### जेवायला बसले असताना अपघात

दुपारी मजुरांनी जेवणाची सुटी झाल्याने काम थांबवले होते. एका ट्रकच्या सावलीत जेवण करत असतानाच मुंबईकडे सळ्या घेऊन निघालेला भरधाव ट्रक येऊन धडकला. यात दोघांचा जागेवरच, तर एकाचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) नेत असताना मृत्यू झाला.

### अपघातातील जखमींची नावे

कविता शिरसाठ, मंगल शिनगारे, प्रयाग वाघ व दिनेश गायकवाड हे अपघातात जखमी झाले असून, त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती महामार्ग पोलीस निरीक्षक किशोर चौधरी यांनी दिली.

अपघातानंतर महामार्गावर हृदयद्रावक दृश्य पाहायला मिळाले. काही मजुरांचे मृतदेह रस्त्याच्या कडेला पडलेले होते. अलकाबाई दादाराव आदमाने (वय ४५), मीना परमेश्वर आदमाने (४५), कांचनबाई प्रकाश आदमाने (५०), लक्ष्मीबाई संतोष मदन (३५), सुमनबाई कचरू आदमाने (७०, रा. सर्व निधोना) व कडुबाई रामदास मदन (३५) आणि ताराबाई गहेनाजी चौधरी (६०, दोघीही रा. केळीगव्हाण), अशी मृतांची नावे आहेत. हे सर्व समृद्धी महामार्गावर सफाईचे काम करत असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघातानंतर मृत व जखमींना तातडीने जालन्याच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ

**मुंबई : दि.१ वृत्तसंस्था**



## राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय!

राज्य सरकारची आज मंत्रिमंडळ बैठक पार पडली आहे. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्वाच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत सरकारने घेतलेल्या निर्णयात महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय झाला.

राज्यातील ५४ नदी प्रदुषित पट्ट्यांबाबत पूनरूज्जीवन प्रकल्प राबविण्यात येणार आहे. क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी अमरावती महानगरपालिकेला १६,७०८ चौरस मीटर जागा वाटप करण्याचा अहिल्यानगर जिल्ह्यातील साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १ हजार २३४ कोटी रुपयांच्या तरतूदीस मान्यता (पान २ वर)

### दिव्यांग विद्यार्थांना मोठा दिलासा

महत्वाच्या निर्णयात, राज्यातील हजारो दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे आठवी ते बारावीच्या दिव्यांग विद्यार्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. मंत्रिमंडळाने बुधवारी १२ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर इयत्ता ८ वी ते १२ वी मधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यास मंजुरी दिली. या वाढीमुळे शिष्यवृत्तीची रक्कम १००-२०० रुपयांवरून ५००-१,००० रुपयांच्या श्रेणीत जाणार आहे. याचा लाभ ९२,५८१ विद्यार्थ्यांना मिळेल. या वाढीसाठी २३.११ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

# अटारी-वाघा सीमेवरील रिट्रीटची वेळ बदलली


## आता संध्याकाळी ५:३० वाजता होणार सेरेमनी

**वाघा: दि.१ वृत्तसंस्था**

येथील भारत-पाकिस्तान अटारी सीमेवर होणा-या प्रसिद्ध रिट्रीट सेरेमनीच्या वेळेत बदल करण्यात आला आहे.

अटारी-वाघा सीमेवर दररोज होणारी ही देशभक्तीने भरलेली सेरेमनी पाहण्यासाठी मोठ्या संख्येने लोक येतात. नवीन निर्णयानुसार, आता रिट्रीट सेरेमनी संध्याकाळी ५:३० वाजता सुरू होऊन ६:०० वाजेपर्यंत चालेल.

यापूर्वी रिट्रीट सेरेमनी ५ वाजता सुरू होऊन ५:३० वाजता संपत होती. हवामान आणि दिवसाच्या कमी-जास्त होणाऱ्या प्रकाशाचा विचार करून प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. अधिका-यांचे म्हणणे आहे की, प्रेक्षकांना चांगला अनुभव देण्यासाठी आणि सुरक्षा व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वेळेत हा बदल आवश्यक होता. ही नवीन वेळ आज म्हणजेच १ एप्रिलपासून लागू करण्यात आली आहे.



### एक विशेष परंपरा

म्हणजेच, आता जे पर्यटक किंवा स्थानिक लोक ही सेरेमनी पाहण्याची योजना करत आहेत, त्यांना नवीन वेळेनुसारच पोहोचावे लागेल. बीटिंग रिट्रीट सेरेमनी ही भारत आणि पाकिस्तानच्या सैनिकांद्वारे केली जाणारी एक विशेष परंपरा आहे, ज्यात उत्साह, शिस्त आणि देशभक्तीची झलक पाहायला मिळते.

# ई केवायसी दुरुस्तीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ!

**मुंबई : दि.१ वृत्तसंस्था**



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या ई केवायसी दुरुस्तीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत वाढवत आहोत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. लाडकी बहीण योजनेच्या ई केवायसीसाठी यापूर्वी ३१ मार्चपर्यंत होती. आता ही मुदत एक महिन्याने वाढवण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सुचनेनंतर ही मुदतवाढ देण्यात येत असल्याचे तटकरे म्हणाल्या. राज्यातील लाडक्या बहिणींना ई केवायसीसाठी शेवटची संधी देण्यात येत असल्याचेही तटकरे म्हणाल्या. यामुळे लाडक्या बहिणींना ई केवायसी दुरुस्तीसाठी आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे. अदिती तटकरे यांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत वडील सुनील तटकरे यांच्या भूमिकेचे समर्थन केले. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाबाबत शरद पवार गटामध्ये संघटितपणे एकत्रितरित्या चर्चा झाली होती. तशी चर्चा आमच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झाली (पान २ वर)

# अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**मुंबई : दि.१ वृत्तसंस्था**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याला आज पुन्हा नाशिक जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयानी कोठडी सुनावली आहे. त्यानुसार त्याची पोलीस कोठडीतून न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात येणार आहे.

अशातच अशोक खरातविरोधात एक मोठी घडामोड घडली आहे. सरकारी वकील अजय मिसर यांनी अशोक खरातविरोधात एसआयटीची केस लढण्यास असमर्थता दाखवली आहे. एसआयटीने विशेष सरकारी वकील अजय मिसर यांना ही केस चालवण्यासाठी लेखी पत्राद्वारे विनंती केली होती. मात्र सरकारी वकील



अजय मिसर यांनी केस चालवण्यास नकार दिला आहे. २०११ मुंबई साखळी बॉम्ब स्फोट खटला, रवी पुजारी प्रकरणातील महाराष्ट्रातील सर्व खटले तसेच अन्य महत्वाच्या खटल्याच्या न्यायालयीन चौकशीच्या कामामुळे या प्रकरणाला वेळ व न्याय देता येणार नसल्याने कारण सांगत विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी केस लढण्यास नकार दिला असल्याची माहिती समोर आली आहे. अशोक खरातचा पाय दिवसेंदिवस खोलात चालला आहे. त्याच्याविरोधात महिलांचे लैंगिक शोषण, आर्थिक फसवणुकीस इतर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अनेक तक्रारी देखील त्याच्याविरोधात समोर येत आहेत. दरम्यान, जमीन व्यवहार प्रकरणी शिर्डीमध्ये गुन्हा दाखल झाल्यावर अशोक खरातची पत्नी कल्पना खरात फरार झाल्याची माहिती आहे. काल रात्री एसआयटीच्या पथकाने अशोक खरातचा मुलगा हर्षवर्धन खरात याला ताब्यात घेतले आहे. त्याची चौकशी केली जाणार आहे. तसेच एसआयटीकडून अशोक खरातचा पुण्याचा सीए, ईशान्येश्वर मंदिराचा पुजारी आणि एका सराफाला समोरासमोर बसवून चौकशी करण्यात आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे चौकशीतून कोणती नवीन माहिती समोर येते याकडे लक्ष असणार आहे.

# पंजाब भाजप कार्यालयाबाहेर जोरदार स्फोट

## शहरात हाय अलर्ट घोषित

**चंदीगड: दि.१ वृत्तसंस्था**

पंजाब आणि हरियाणाची राजधानी असलेल्या चंदीगडमध्ये बुधवारी संध्याकाळी खळबळजनक घटना घडली. सेक्टर ३७ मधील पंजाब भारतीय जनता पार्टीच्या (भाजप) प्रदेश कार्यालयाबाहेर एका जोरदार स्फोट झाला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, संपूर्ण शहरात तातडीने 'हाय अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

बुधवारी संध्याकाळी पाच वाजेच्या सुमारास भाजप कार्यालयाचे कामकाज सुरू असताना अचानक हा स्फोट झाला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, रस्त्याच्या कडेला





उभ्या असलेल्या एका स्कूटीजवळ हा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की तो दूरपर्यंत ऐकू आला. यामुळे परिसरात गोंधळ उडाला आणि लोक सुरक्षित ठिकाणी धावू लागले. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही; मात्र कार्यालयाबाहेर (पान २ वर)

### नाकाबंदी; वाहनाची झडती

शहराच्या मुख्य चौकांमध्ये आणि येण्या-जाण्याच्या मार्गांवर नाकाबंदी करण्यात आली असून, प्रत्येक संशयास्पद व्यक्ती आणि वाहनाची झडती घेतली जात आहे. प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. पोलीस सध्या घटनास्थळावरील आणि आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासत आहेत. स्फोटाच्या वेळी तिथे कोण उपस्थित होते किंवा कोणी संशयास्पद वस्तू तिथे ठेवली होती का, याचा शोध घेतला जात आहे.





## राजकारण

## नेतृत्व कोणाचे यावरुन पेटला संघर्ष

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वर्चस्वाची लढाई सुरु!

**मुंबई : दि.१ वृत्तसंस्था**







जेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकसंध होता, तेव्हा अजित पवार शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष चालवत होते. कोणत्याही पक्षनेत्याने त्यांना आव्हान देण्याचे धाडस केले नाही; मात्र अजित पवार यांच्या निधनानंतर, पक्षाची संपूर्ण निर्णय प्रक्रिया त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि मुलगा पार्थ यांच्या हाती आली आहे. पक्ष शरद पवार यांच्या नियंत्रणाखाली येऊ नये म्हणून, सुनेत्रा पवार यांनी अजित यांच्या निधनानंतर तिसऱ्या दिवशी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. आणि राज्यातील राजकारणाचा नवा अध्याय सुरु झाला.

अजित पवारांच्या निधनानंतर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी पुढाकार घेतला. शपथविधी सोहळा सायंकाळी पार पडला, परंतु त्याच दिवशी दुपारी तटकरे आणि पटेल यांनीच सुनेत्रा पवार यांना विधानसभेत पक्षनेत्या म्हणून निवडण्यासाठी आमदारांची बैठक बोलावण्याचा पुढाकार घेतला होता. तेव्हा आमदारांना प्रश्न पडला, की हे नेते पक्षाचे अपहरण करत आहेत का? जेव्हा तटकरे आणि पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, तोपर्यंत आमदारांनी सुनेत्रा यांना पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडण्याची मागणी करणारे पत्र आधीच तयार केले होते. यामुळे तटकरे आणि पटेल यांच्या विरोधात अविश्वासाची लाट उसळली. विलिनीकरणाच्या मुद्द्याने या चर्चेला आणखी खतपाणी घातले. पक्षाचे अनेक मंत्री आणि आमदार विलिनीकरणाच्या बाजूने बोलले, परंतु तटकरे आणि पटेल यांनी काहीही ठरलेले नाही असे सांगितले. दरम्यान, भाजपने त्यांच्याशी चर्चा केल्याशिवाय विलिनीकरण होणार नाही असे म्हटले. या मुद्द्यावर तटकरे आणि पटेल गप्प राहिले. हा पक्षांतर्गत मामला आहे असे त्यांनी सांगितले. यामुळे भाजप आता आपल्या मर्जीनुसार पक्षावर नियंत्रण ठेवत आहे, अशी अटकळ बांधली जाऊ लागली. पक्षांतर्गत अशा अविश्वासाच्या वातावरणामुळे, ढोंगी बाबा अशोक खरात प्रकरणात पक्षनेत्या रूपाली चाकणकर यांचे नाव समोर आल्यावर पक्षाच्या प्रतिष्ठेला धक्का बसला. पक्षाने कारवाई करण्यास विलंब केल्याने त्यांची कमजोरी उघड झाली. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्यास भाग पाडले गेले. रूपाली चाकणकर यांना (पान २ वर)

### निवडणूक आयोगाला पत्र

अजित पवार यांच्या निधनानंतर, तटकरे आणि पटेल यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून कळवले की पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांना निर्णय घेण्याचा एकमेव अधिकार देण्यात आला आहे. पण आता, सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला कळवले आहे की, अजित पवार यांच्या निधनानंतर पक्ष आणि निवडणूक आयोग यांच्यातील कोणताही पत्रव्यवहार अवैध मानला जाऊ नये, म्हणजेच निवडणूक आयोगाने तटकरे आणि पटेल यांची पत्रे वैध मानू नयेत.

## पान 1 वरुन...

### दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत...

देण्यात आली आहे. यापासून सुमारे ३२ अवर्षणग्रस्त गावांना लाभ होणार आहे. तसेच, ९ हजार ६०० हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा मिळणार आहे. अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील १६७०८ चौ.मी.जागेसाठी मंजूरी देण्यात आली आहे. भूमि अभिलेख विभागात आता भूकरमापक पदाऐवजी परिरक्षण भूमापक पद असणार आहे. हे पद पदोन्नती व विभागीय भरतीद्वारे भरता येणार आहे. यामुळे राज्यातील भूकरमापक संवर्गातील कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाबाबत निवेदन, तसेच अर्जांबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन होणार आहे.

### ई केवायसी दुरुस्तीसाठी...

नव्हती. अजितदादा असताना आणि अजितदादांच्या पश्चात विलीनीकरण या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत, सुनील तटकरे यांनी हीच भूमिका घेतली होती. अजितदादांच्या अपघातानंतर लगेच या गोष्टी घडल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. ज्यावेळी विलीनीकरणाची चर्चा सुरु होती, तेव्हा कोणीही सुनेत्रा पवार यांना राष्ट्रीय अध्यक्ष करुन त्यांच्या नेतृत्वात काम करु, असे बोलत नव्हते, असे तटकरे म्हणाल्या.

### पंजाब भाजप कार्यालयाबाहेर...

उभ्या असलेल्या काही दुचाकी आणि चारचाकी गाड्यांचे किरकोळ नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच चंदीगडचे वरिष्ठ पोलीस अधिकारी मोठा फौजफाटा घेऊन घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या गाड्या आणि बॉम्ब शोधक पथकानेही तातडीने धाव घेतली. खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी संपूर्ण परिसराची नाकेबंदी केली असून, नागरिकांना तिथून हटवण्यात आले आहे. हा स्फोट नेमका कशामुळे झाला आणि त्यात कोणत्या प्रकारच्या स्फोटकांचा वापर करण्यात आला, याचा शोध घेण्यासाठी फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले आहे. स्फोटाच्या घटनेनंतर प्रशासनाने संपूर्ण चंदीगड शहरात हाय अलर्ट जाहीर केला आहे. या घटनेवर भाजपच्या स्थानिक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. शहराची शांतता बिघडवण्यासाठी आणि दहशत निर्माण करण्यासाठी हे जाणीवपूर्वक केलेले कृत्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या कटामागे असलेल्या दोषींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. पंजाब आणि चंदीगडमधील संवेदनशील राजकीय परिस्थिती पाहता, राजकीय पक्षाच्या मुख्य कार्यालयाबाहेर असा स्फोट होणे हे सुरक्षा यंत्रणांसमोर मोठे आव्हान मानले जात आहे. पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत आहेत.

### राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये वर्चस्वाची...

महिला राज्य अध्यक्षपदावरून हटवण्याचा निर्णय घेण्यासाठी चार दिवस लागले, त्यामुळे प्रश्न निर्माण झाला आहे: सुनेत्रा पवार यांना हा निर्णय घेण्यापासून कोणी रोखत आहे का? संशयाचे बोट तटकरे आणि पटेल यांच्याकडे आहे. रायगड जिल्ह्यातील एका कार्यक्रमातील बॅनरवर पवार कुटुंबातील एकाही सदस्याचा फोटो नव्हता. यामुळे तटकरे यांच्यावर संशय निर्माण झाला आहे.

# गडचिरोलीत ९ जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण

## शस्त्रसाठा जप्त; छत्तीसगडच्या सुकमा २ मुली नक्षलवादी आल्या शरण

**गडचिरोली , दि. ०१ वृत्तसंस्था**



गडचिरोली पोलीस दल च्या संयुक्त मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. मंगळवार ३१ मार्च रोजी ९ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. यामध्ये ३ वरिष्ठ एसीएम स्तरावरील माओवाद्यांचा समावेश असून, या सर्वांवर मिळून ३० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते. या कारवाईत विशेष बाब म्हणजे दोन महिला माओवाद्यांनी अत्याधुनिक शस्त्रांसह शरणागती पत्करली. शांती वंजा वड्डे हिने एके-४७ रायफल आणि ३० जिवंत काडतुसांसह आत्मसमर्पण केले, तर सुक्की बामी कुंजाम हिने कार्बाईन रायफलसह हिंसेचा मार्ग सोडला.

आत्मसमर्पणानंतर मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेजवळील कुमनार व गुंडापुरी जंगल परिसरात पोलिसांनी मोठी कारवाई करत शस्त्रसाठा जप्त केला. यात एसएलआर रायफल, वॉकीटॉकी, डेटोनेटर आणि पेनड्राइव्ह यांचा समावेश आहे. गडचिरोली प्रमाणे छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात नक्षलविरोधी अभियानांतर्गत जानिला उर्फ मडकम हिंडमे (३०) आणि सोनी उर्फ मडवी कोसी (२४) या दोन महिला नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली आहे, ज्यांच्यावर प्रत्येकी ८ लाख रुपयांचे बक्षीस होते. हे आत्मसमर्पण नक्षलमुक्त बस्तर मोहिमेचा भाग असून यामुळे स्थानिक नक्षल चळवळीला मोठा धक्का बसला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळ आता मोठ्या प्रमाणात कमकुवत झाली असून ती केवळ भामरागडच्या सीमावर्ती भागापुरती मर्यादित राहिली आहे. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या मोठ्या आत्मसमर्पणानंतर चळवळीला मोठा धक्का बसला होता. २०२५ पासून आतापर्यंत १३२ माओवाद्यांनी मुख्य प्रवाहात प्रवेश केला असून, एकूण आत्मसमर्पितांची संख्या ८०५ वर पोहोचली आहे. आत्मसमर्पित माओवाद्यांच्या पुनर्वसनासाठी केंद्र व राज्य सरकारकडून ४.५ ते ५.५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. याशिवाय, गटाने आत्मसमर्पण केल्यास अतिरिक्त ४ लाख रुपयांचे प्रोत्साहन दिले जाते.

**९ जहाल आत्मसमर्पित माओवादी :**

- दसली ऊर्फ पिडे सन्नु वेको (एसीएम) — बक्षीस ६ लाख
- रामजी अडमा पोटाम (एसीएम) — बक्षीस ६ लाख
- शांती वंजा वड्डे (एसीएम) — बक्षीस ६ लाख
- मनकु मासो पोडाम — बक्षीस २ लाख
- सरिता रामा वेलकम — बक्षीस २ लाख
- लखमी आयतु कुंजाम — बक्षीस २ लाख
- नंदे जोगा मडे — बक्षीस २ लाख
- राकेश कोरके मज्जी — बक्षीस २ लाख
- सुक्की बामी कुंजाम — बक्षीस २ लाख

# नरहरी झिरवळांचा 'तो' व्हिडीओ धनंजय मुंडेंनी केला व्हायरल?

**मुंबई, दि. ०१ वृत्तसंस्था**



मंत्री नरहरी झिरवळ यांचा काही दिवसांपूर्वी व्हायरल झालेला वादग्रस्त व्हिडिओ अद्याप चर्चेत असतानाच या प्रकरणाला नवा ट्विस्ट मिळाला आहे. या व्हिडिओबाबत करुणा मुंडे यांनी खळबळजनक दावा करत थेट धनंजय मुंडे यांचे नाव घेतले आहे.

नरहरी झिरवळ यांनी यापूर्वीच हा व्हिडिओ बनावट असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, करुणा मुंडे यांनी दावा केला आहे की, हा व्हिडिओ धनंजय मुंडे यांनीच व्हायरल केला. मंत्रिपद मिळवण्याची घाई असल्यामुळे त्यांनी हा प्रकार केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

"हा माझा ठाम दावा आहे. पण त्यांचे स्वप्न मी पूर्ण होऊ देणार नाही," असे म्हणत त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. तसेच, धनंजय मुंडे यांच्यावर एसआयटी चौकशी, नार्को टेस्ट आणि सीबीआय चौकशी करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केल्याचेही सांगितले.

यावेळी करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडेंवर आणखी काही गंभीर वैयक्तिक आरोपही केले. त्यांनी आर्थिक व्यवहार, कुटुंबीयांची संपत्ती आणि इतर बाबींची चौकशी करण्याची मागणी केली. २०१९ नंतर अचानक वाढलेल्या संपत्तीबाबतही प्रश्न उपस्थित करत संबंधित सर्व व्यक्तींची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, या आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली असून या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# साखर कारखान्यांकडे ४८९८ कोटी एफआरपी थकीत

**पुणे, दि. ०१ वृत्तसंस्था**

यंदाचा २०२५ -२६ चा ऊस गाळप हंगाम आता जवळपास संपला असून मोजकेच १० ते १२ कारखाने अद्याप सुरु आहेत. तरीसुध्दा साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांच्या एफआरपीची सुमारे ४ हजार ८९८ कोटी रुपये थकीत ठेवण्यात आलेले आहेत. शेतकऱ्यांनी घेतलेले पीक कर्ज वेळेवर परतफेड करण्याची बँकांची ३१ मार्च ही अखेरची तारीख आहे. कारखान्यांनी संपूर्ण रक्कम न दिल्यामुळे विशेषतः ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे पीक कर्ज थकीत राहण्याची दाट शक्यता असून साखर आयुक्तालयाने संबंधित कारखान्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

थकीत एफआरपीप्रश्नी संबंधित कारखान्यांच्या वेळोवेळी सुनावण्या घेण्यात आल्या असून ३१ मार्चअखेरचा थकीतचा आकडा कमी होणे अपेक्षित आहे. कारखान्यांनी सुनावण्यांमध्ये रक्कम देण्याचे कबूल केले होते.

एफआरपीची रक्कम वेळेत देण्याचे कारखान्यांवर बंधनकारक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेतही साखर उद्योगाच्या विविध प्रश्नांवर मागील आठवड्यात संयुक्त बैठक झालेली आहे.

# अजिंठा लेणीत मधमाशांचा पुन्हा धुमाकूळ

## ११ पर्यटक जखमी, सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**संभाजीनगर, दि. ०१ वृत्तसंस्था**



जागतिक कीर्तीच्या अजिंठा लेणी परिसरात पर्यटकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. बुधवारी मधमाशांनी दोन वेगवेगळ्या सत्रांत पर्यटकांवर अचानक हल्ला चढवला, ज्यामध्ये देशी-विदेशी मिळून ११ पर्यटक जखमी झाले आहेत. या घटनेमुळे लेणी पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांमध्ये मोठी घबराट पसरली होती. गेल्या दोन महिन्यांत मधमाशांच्या हल्ल्याची ही पाचवी घटना असून, वारंवार घडणाऱ्या या प्रकारांमुळे प्रशासनाच्या उपाययोजनांवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

अजिंठा लेणीत बुधवारी पर्यटकांना मधमाशांच्या भयावह हल्ल्याचा सामना करावा लागला. पर्यटकांची मोठी वर्दळ असताना एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी हे हल्ले झाले. पहिली घटना सकाळी लेणी क्रमांक १० जवळ घडली, जिथे मोहळातून अचानक बाहेर पडलेल्या मधमाशांनी पर्यटकांना लक्ष्य केले. या घटनेचा थरार संपत नाही तोच, तासाभराच्या अंतराने लेणी क्रमांक २६ परिसरात दुसऱ्यांदा मधमाशांनी हल्ला चढवला. या दुहेरी संकटामुळे पर्यटकांची प्रचंड धावपळ उडाली आणि अनेक पर्यटकांना मधमाशांनी चावा घेतल्याने ते जखमी झाले.

गेल्या अवघ्या ६० दिवसांत मधमाशांच्या हल्ल्याची ही पाचवी वेळ असून, वारंवार होणाऱ्या या घटनांमुळे पर्यटकांमध्ये, विशेषतः महिला आणि बालकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. दररोज हजारो पाऊले पडणाऱ्या या पर्यटनस्थळी सुरक्षेसाठी तैनात असलेली यंत्रणा या मधमाशांसमोर हतबल ठरत आहे. जागतिक दर्जाचे केंद्र असूनही भारतीय पुरातत्व विभाग आणि पर्यटन विभाग कायमस्वरूपी उपाययोजना का करत नाही? असा संतप्त सवाल आता पर्यटकांकडून विचारला जात आहे. केवळ थातूरमातूर उपाय न करता, या मोहळांचा सुरक्षित बंदोबस्त करण्यासाठी तातडीने तज्ज्ञांची मदत घेण्याची गरज आहे.

# देशभरातील कापूस तज्ञांची उपराजधानीत मांदियाळी

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**अकोला, दि. ०१:** देशभरातील कापूस संशोधन क्षेत्रातील तज्ञांची मांदियाळी उपराजधानी नागपुरात जमणार असून, अखिल भारतीय समन्वित कापूस संशोधन प्रकल्पाच्या वार्षिक आढावा बैठकीचे आयोजन दिनांक २ व ३ एप्रिल २०२६ दरम्यान वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर येथे करण्यात आले आहे.

ही महत्वाची बैठक कापूस संशोधन विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला आणि केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. देशातील २१ समन्वित कापूस संशोधन प्रकल्पांमधील सुमारे ३०० हून अधिक शास्त्रज्ञ, संशोधक, शासकीय व खाजगी बियाणे कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच विविध कृषी संस्थांचे अधिकारी या बैठकीस उपस्थित राहणार आहेत.

बैठकीचे उद्घाटन २ एप्रिल रोजी वनामती येथे होणार असून, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे. यावेळी भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्लीचे पीक विज्ञान विभागाचे उपमहानिदेशक डॉ. डी. के. यादव, सहायक निर्देशक डॉ. पी. के. दास, केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक डॉ. विजय वाघमारे, कृषी वैज्ञानिक भरती बोर्डाचे माजी अध्यक्ष व प्रकल्पाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. चारुदत्त मायी, केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एस. के. शुक्ला आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

याशिवाय, विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शामसुंदर माने, वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ व आयोजन सचिव डॉ. संतोष गहुकर, प्रकल्पाचे नोडल अधिकारी डॉ. जी. टी. बेहरे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, शिक्षण संचालक डॉ. डी. एम. पंचभाई तसेच कृषी महाविद्यालय नागपूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश कडू यांचीही प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. दोन दिवसीय या बैठकीत देशभरात कापूस पिकावर चालणाऱ्या संशोधन कार्याचा सविस्तर आढावा घेतला जाणार असून, नवीन वाण, आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक उपाययोजनांवर सखोल चर्चा होणार आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रात सन २०२४ नंतर प्रथमच अशा प्रकारची राष्ट्रीय पातळीवरील आढावा बैठक आयोजित होत आहे.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवार जाहीर

## शिवाजीराव कर्डिलेंच्या निधनानंतर कोणाला मिळाली संधी?

**मुंबई, दि. ०१ वृत्तसंस्था**



दिवंगत आमदार शिवाजीराव कार्डिले यांच्या निधनानंतर राहुरी विधानसभा पोटनिवडणुक होणार आहे. यासाठी भाजपकडून उमेदवाराचे नाव जाहीर करण्यात आले आहे.

शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा अक्षय कार्डिले यांना राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

या पोटनिवडणुकीसाठी सुरूवातीपासूनच अक्षय कर्डिले यांच्या नावाची चर्चा होती. शेवटी भाजपाने अक्षय कर्डिले यांनाच तिकिट दिले. वडिलांच्या जागी आता अक्षय कर्डिले निवडणूक लढवतील.

शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राहुरी विधानसभेसाठी अनेकजण इच्छुक होते. माजी खासदार सुजय विखे पाटील या निवडणुकीसाठी इच्छुक होते. सुजय विखे पाटील यांनी आपल्याला तिकिट मिळण्याकरिता अनेक प्रयत्न केल्याची चर्चा आहे.

शिवाजीराव कार्डिलेंची राजकीय कारकीर्द

गेल्यावर्षी १७ ऑक्टोबर रोजी शिवाजीराव कार्डिले यांचे निधन झाले. अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणातील एक दिग्गज व्यक्तिमत्व म्हणून शिवाजीराव कर्डिले यांचे ओळख होती. दूध व्यवसाय हा त्यांचा मूळ व्यवसाय होता. बुऱ्हानगर गावचे सरपंच ते आमदार, माजी मंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप अशा पक्षातून त्यांनी काम पाहिले. राहुरी विधानसभा मतदारसंघातून त्यांनी सलग अनेक वर्षे आपले वर्चस्व कायम राखले होते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागातील विकासकामांना गती दिली.

शिवाजी कर्डिले हे २००९ मध्ये अपक्ष म्हणून प्रथम निवडून आले होते. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस कडून लोकसभा निवडणूक लढवली होती, त्यात त्यांचा पराभव झाला होता.

२०१४ ला पुन्हा आमदारकी लढवत विजय मिळवला, पण २०१९ च्या निवडणुकीत त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते.

दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाची व बारामती या दोन्ही ठिकाणी २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. तर ४ मेला मतमोजणी होऊन निकाल लागणार आहे.

**धाबे दणाणले** | २१ किलो गांजासह आरोपी जेरबंद

# घराच्या आवारात गांजाची लागवड करणारा अटकेत; गुन्हे शाखेची धडक कारवाई

**सोलापूर , दि. ०१ वृत्तसंस्था**




सोलापूर शहरात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. सहसा ग्रामीण भागात किंवा दुर्गम शेतात गांजाची बेकायदेशीर लागवड केली जाते, मात्र सोलापूर शहरात चक्क एका राहत्या घराच्या आवारात गांजाची लागवड करण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी सोलापूर शहर गुन्हे शाखेने धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात गांजाची झाडे जप्त केली असून एका आरोपीला अटक केली आहे.

सोलापूर शहर गुन्हे शाखेला शहरातील एका भागात राहत्या घराच्या आवारात आणि समोरील मोकळ्या जागेत अमली पदार्थांची (गांजा) झाडे लावल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी पोलिसांना घराच्या परिसरात लावलेली गांजाची ५९ हिरवीगार झाडे आढळून आली. ही झाडे पाहून पोलीस अधिकारीही चक्रावून गेले.

या छाप्यात पोलिसांनी तब्बल २१ किलो ४३९ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या या गांजाची बाजारपेठेतील अंदाजे किंमत ४ लाख ३९ हजार रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे. पोलिसांनी ही सर्व झाडे उपटून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी रजाक गफुर शेख या संशयित आरोपीला जागीच अटक केली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची गुन्ह्याची व्याप्ती लक्षात घेऊन ४ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

शहराच्या मध्यवस्तीत किंवा लोकवस्ती असलेल्या भागात अशा प्रकारे अमली पदार्थांची लागवड झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. हा गांजा केवळ स्वतःसाठी लावला होता की याची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात होती, याचा तपास आता गुन्हे शाखा करत आहे. सोलापूर पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अमली पदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 139 / 2025–26**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost in Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| TN1004 EM1 | 3000066843 | WORK OF PROVISION, INSTALLATION AND COMMISSIONING OF 70/75 WATT LED FLAME PROOF WELL GLASS LIGHTING FIXTURES ON REJECT BELT OF BC-1& BC-2 (UNIT# 1 &2) AND BC-3 & BC-4 (UNIT # 3 & 4) REJECT BELT TUNNEL AT 4 X 210 MW KHAPERKHEDA TPS. | 4300100.00 | 46501.00 |
| TN1006 CHP2 | 3000066925 | PROCUREMENT OF OIL COOLER FOR HYDRAULIC CLAMPING AND WAGON TIPPLER SYSTEM SUITABLE FOR BOSCH REXROTH MAKE POWER PACK INSTALLED IN CHP-II, TPS KHAPERKHEDA. | 1440000.00 | 17900.00 |
| TN1007 TM2 | 3000066926 | WORK CONTRACT FOR LRB/SPRAY THERMAL INSULATION /G.I. SHEETING TO PIPELINES / AUXILIARIES (AS & WHEN REQUIRED BASIS) AT UNIT NO. 5 (500MW), TPS KHAPERKHEDA FOR FY: 2025-26. | 687998.80 | 10379.99 |
| TN1008 TM1 | 3000066941 | FLAKE GLASS FILLED SYNTHETIC COATING TO INTERNAL PARTS OF CW PUMP TO IMPROVE EFFICIENCY AND ENERGY SAVING DURING COH#01. | 1987179.60 | 23371.80 |
| TN1009 TM1 | 3000066941 | APPLICATION OF FLAKE GLASS FILLED SYNTHETIC COATING TO INTERNAL PARTS OF CWC PUMP TO IMPROVE EFFICIENCY AND ENERGY SAVING DURING COH#01. | 1987179.60 | 23371.80 |
| TN1010 CHP2 Refloated | 3000066961 | PROCUREMENT OF MS GRILLS FOR WAGON TIPPLER HOPPERS FOR CHP-II, TPS KHAPERKHEDA. | 1247400.00 | 15974.00 |
| TN1011 TM2 Refloated | 3000066962 | PROCUREMENT OF SPARES FOR HP BYPASS SYSTEM VALVES AT UNIT NO.5 (500 MW) TPS, KHAPERKHEDA. | 679000.00 | 10290.00 |
| TN1012 CHP2 Refloated | 3000066965 | WORK OF PROVIDING AND REPLACEMENT OF EXISTING HYD. MOTOR SYSTEM OF APRON FEEDER AND REPAIRING OF SAME AT CHP-500 MW, KHAPERKHEDA TPS. | 9555555.00 | 99055.55 |
| TN1013 EM1 Refloated | 3000067013 | SUPPLY, INSTALLATION, TESTING & COMMISSIONING OF ESE TYPE L.CAT SYSTEM AT VARIOUS LOCATIONS OF 4X210 MW, KHAPERKHEDA TPS. | 5416925.56 | 57669.26 |
| TN1014 C&12 | 3000067053 | REFILLING AND SUPPLY OF CALIBRATION GASES REQUIRED AT C&I-II, UNIT 5, KHAPERKHEDA TPS. | 186205.00 | 5362.05 |
| TN1015 BM2 | 3000067059 | WORK CONTRACT FOR ONLINE FILTRATION OF LUBRICATING OIL OF COAL MILL (SP 320) & ID, FD & PA FANS (SP68) AT UNIT NO. 5, TPS KHAPERKHEDA. | 465080.00 | 8150.80 |
| TN1016 EM1 | 3000067060 | WORK CONTRACT FOR LIFTING, SHIFTING OF HT MOTORS ON AS AND WHEN REQUIRED BASIS AT 210MW TPS KHAPERKHEDA. | 455781.00 | 8057.81 |
| TN1017 FF1 | 3000067063 | ANNUAL WORK CONTRACT FOR MAINTENANCE & SERVICING OF PUMPS AT FIRE -SERVICE SECTION KHAPARKHEDA-TPS (210 MW). | 420960.00 | 7709.60 |
| TN1022 AHP1 | 3000067148 | WORK OF ERECTION, COMMISSIONING, DESIGN AND MODIFACATION OF HONEYCOMBS DURING COH OF U#1 FOR AHP-I. | 771200.00 | 11212.00 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda

महत्त्वाचे

## रशियन लष्करी विमानाचा अपघात!

**नवीदिल्ली :** सध्याच्या युद्धजन्य आणि तणावपूर्ण वातावरणात रशियन लष्कराला एका मोठ्या आणि हृदयद्रावक दुर्घटनेला सामोरे जावे लागले आहे. बुधवारी सकाळी काळ्या समुद्राच्या किनारपट्टीवर असलेल्या क्रिमिया प्रदेशात रशियाचे एक महत्त्वाचे लष्करी वाहतूक विमान एका उंच खडकावर आदळून कोसळले. या भीषण अपघातात विमानातील सर्व २९ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे केवळ रशियन लष्कराचेच नव्हे, तर संपूर्ण रशियाचे मोठे नुकसान झाले असून क्रिमिया परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 'अँटोनोव्ह एएन-२६' या लष्करी विमानाने आपले नेहमीचे उड्डाण भरले होते. रशियन लष्कराची रसद आणि जवानांची ने-आण करण्यासाठी या विमानाचा वापर केला जातो. मात्र, उड्डाणानंतर काही वेळातच रडारवरून हे विमान अचानक गायब झाले आणि एअर ट्रॅफिक कंट्रोलशी त्याचा संपर्क पूर्णपणे तुटला. काही काळानंतर हे विमान क्रिमियाच्या एका दुर्गम आणि खडबडीत भागातील डोंगराच्या कड्यावर आदळल्याची भयंकर बातमी समोर आली.

## 'ड्रोन तर वाचले, पण तुमचे काय?'

**नवीदिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील आंतरराष्ट्रीय सीमेवर पाकिस्तानच्या कुरापती थांबण्याचे नाव घेत नाहीत. काल रात्री जम्मूच्या कनाचक सेक्टरमध्ये पाकिस्तानी सैन्याने पुन्हा एकदा आपल्या 'नापाक' वृत्तीचे दर्शन घडवले आहे. भारतीय लष्कराच्या एका रिमोटली पायलेटेड एअरक्राफ्टवर म्हणजेच टेहळणी करणाऱ्या ड्रोनवर पाकिस्तानी चौक्यांमधून थेट गोळीबार करण्यात आला. या घटनेमुळे सीमेवर पुन्हा एकदा तणावाचे वातावरण निर्माण झाले असून भारतीय लष्कराने आपली सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, काल रात्री जेव्हा भारतीय लष्कराचे आरपीए ड्रोन आपल्या हद्दीत नेहमीप्रमाणे टेहळणी करत होते, तेव्हा अचानक पाकिस्तानी बाजूने गोळीबार सुरू झाला. पाकिस्तानी सैन्याच्या 'खेरी' चौकीतून ४ गोळ्या आणि 'अस्लम' चौकीतून १ गोळी अशा एकूण ५ गोळ्या भारतीय ड्रोनच्या दिशेने झाडण्यात आल्या. पाकिस्तानचा हेतू हा भारतीय ड्रोन पाडण्याचा होता, परंतु भारतीय तंत्रज्ञान आणि वैमानिकाच्या समयसूचकतेमुळे ड्रोनला कोणतीही इजा झाली नाही. हे ड्रोन यशस्वीरीत्या आणि सुखरूप आपल्या तळावर परतले आहे.

भारत आणि पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी लागू असतानाही पाकिस्तानकडून अशा प्रकारचे गोळीबार होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. कनाचक सेक्टरमधील ही कृती केवळ बेजबाबदारच नाही, तर भारताला उघडपणे चिथावणी देणारी आहे. लष्करी तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तान जाणूनबुजून भारताच्या संयमाची परीक्षा पाहत आहे. गेल्या वर्षी झालेल्या हिंसक संघर्षाच्या जखमा अजून ताज्या असताना, अशा घटनांमुळे शांतता प्रक्रियेला मोठा तडा बसत आहे.

# 'डिजिटल वॉर'! गुगल, मेटा अन् टेस्लासह १८ अमेरिकी कंपन्या इराणच्या टार्गेटवर

**नवीदिल्ली : दि.०१ वृत्तसंस्था**

### व्हाईट हाऊस संतप्त



मध्य-पूर्वेतील रणांगण आता केवळ जमिनीपुरते मर्यादित राहिले नसून ते आता जगातील सर्वात मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या दारापर्यंत पोहोचले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष आता एका अशा धोकादायक वळणावर आला आहे, जिथे केवळ सैनिकच नाही, तर सॉफ्टवेअर इंजिनिअर्स आणि कॉर्पोरेट कर्मचारीही दहशतीच्या छायेखाली आले आहेत. मंगळवारी, ३१ मार्च २०२६ रोजी इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने दिलेला इशारा हा केवळ राजकीय नसून तो जागतिक अर्थव्यवस्थेला खिळवून टाकणारा आहे.

**१८ कंपन्या आणि 'टार्गेट' लिस्ट**

इराणने अमेरिकेच्या १८ दिग्गज कंपन्यांची एक अधिकृत यादी जाहीर केली आहे. यामध्ये गुगल , मायक्रोसॉफ्ट ,आपल , मेटा, टेस्ला, एनव्हिडिया, इंटेल आणि बोईंग सारख्या बलाढ्य नावांचा समावेश आहे. इराणचा आरोप आहे की, या कंपन्या इस्रायल आणि अमेरिकेच्या लष्करी तसेच गुप्तचर यंत्रणांना तांत्रिक मदत पुरवतात. इराणमध्ये होणाऱ्या प्रत्येक लष्करी कमांडरच्या हत्येमागे या कंपन्यांचे तंत्रज्ञान कारणीभूत असल्याचे इराणचे म्हणणे आहे. "आमच्या प्रत्येक बलिदानाचा बदला या कंपन्यांची युनिट्स उद्ध्वस्त करून घेतला जाईल," असे आपल्या निवेदनात स्पष्टपणे म्हटले आहे.

**कर्मचाऱ्यांमध्ये घबराट: "प्राण वाचवायचे असतील तर जागा सोडा!"**

इराणच्या या धमकीमध्ये सर्वात धक्कादायक बाब म्हणजे कर्मचाऱ्यांना दिलेला थेट इशारा. या १८ कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना उद्देशून म्हटले आहे की, जर त्यांना आपले प्राण प्रिय असतील, तर त्यांनी तात्काळ या कार्यालयांमधून बाहेर पडावे. या धमकीमुळे आखाती देशांमधील अमेरिकन टेक हब्समध्ये काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सायबर हल्ल्यांपासून ते प्रत्यक्ष आत्मघाती हल्ल्यांपर्यंत कोणताही मार्ग इराण स्वीकारू शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**व्हाईट हाऊसचा सडेतोड पलटवार: "इराणची ताकद आता संपली आहे!"**

इराणच्या या धमकीनंतर अमेरिकेने अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्याने रॉयटर्सला दिलेल्या माहितीनुसार, "इराणने आता स्वतःची मर्यादा ओळखली पाहिजे. इराणकडून होणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांमध्ये आता ९० टक्क्यांहून अधिक घट झाली आहे, कारण अमेरिकन डिफेन्स सिस्टिमने त्यांचे प्रत्येक कारस्थान हवेतच मोडीत काढले आहे."

अमेरिकेने हे देखील स्पष्ट केले की, आपल्या टेक कंपन्या आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी अमेरिका कोणत्याही थराला जाण्यास तयार आहे. "इराणने 'पूर्वी' काय केले आणि 'आता' अमेरिका काय करू शकते, यातील फरक त्यांनी लक्षात ठेवावा," असा टोलाही व्हाईट हाऊसने लगावला आहे.

तज्ज्ञांच्या मते, इराण थेट क्षेपणास्त्र हल्ल्यांऐवजी या कंपन्यांवर मोठ्या प्रमाणावर 'सायबर अटॅक' करण्याची शक्यता जास्त आहे. गुगल किंवा मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्यांचे सर्व्हर हॅक करणे किंवा त्यांचा डेटा नष्ट करणे, हा इराणचा प्राथमिक प्लॅन असू शकतो. मात्र, ज्या प्रकारे १८ कंपन्यांची नावे जाहीर करण्यात आली आहेत, ते पाहता इराण आता 'आरपार'च्या लढाईच्या मूडमध्ये असल्याचे दिसते. या यादीत जेपी मॉर्गन आणि जनरल इलेक्ट्रिक सारख्या आर्थिक आणि पायाभूत सुविधा देणाऱ्या कंपन्यांचा समावेश असल्याने जागतिक शेअर बाजारातही मोठी पडझड होण्याची चिन्हे आहेत.

## ५४ वर्षांनंतर नासा रचणार इतिहास!

### नासाचे ४ वीर जाणार चंद्राच्या काळोख्या बाजूला

**नवीदिल्ली: दि.०१ वृत्तसंस्था**




मानवाच्या अंतराळ संशोधनातील सर्वात सुवर्णक्षण आज ओढवला आहे. १९७२ मध्ये 'अपोलो' मोहीम संपल्यानंतर तब्बल ५४ वर्षांनी पुन्हा एकदा मानवी पाऊल पृथ्वीच्या कक्षेबाहेर पडणार आहे. अमेरिकेची अंतराळ संस्था 'नासा' आज आपल्या महाकाय रॉकेटद्वारे 'आर्टेमिस-२' या ऐतिहासिक मोहिमेचे प्रक्षेपण करत आहे. फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून होणारे हे उड्डाण केवळ चंद्राचा प्रवास नसून मानवाच्या अनंत इच्छाशक्तीचे प्रतीक आहे.

आर्टेमिस-२ मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे यात समाविष्ट असलेली विविधता. या संघात अमेरिकन अंतराळवीर रीड वाईजमन (कमांडर), व्हिक्टर ग्लोव्हर (पायलट), क्रिस्टीना कोच (मिशन स्पेशालिस्ट) आणि कॅनेडियन अंतराळवीर जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. क्रिस्टीना कोच या चंद्रावर जाणाऱ्या पहिल्या महिला ठरतील, तर व्हिक्टर ग्लोव्हर हे पहिले कृष्णवर्णीय अंतराळवीर असतील. जेरेमी हॅन्सन यांच्या रूपाने प्रथमच एखादा गैर-अमेरिकन नागरिक चंद्राच्या कक्षेचा प्रवास करेल. हा संघ केवळ अंतराळवीर नसून संपूर्ण जगाचे प्रतिनिधित्व करत आहे.

ही मोहीम चंद्रावर उतरण्यासाठी नसून, ती एक 'चाचणी उड्डाण' आहे. १० दिवसांच्या या मोहिमेत अंतराळवीर पृथ्वीपासून तब्बल ४५०,००० किलोमीटर लांब जातील. चंद्राच्या दुसऱ्या बाजूला पोहोचल्यावर ते मानवी इतिहासातील सर्वात लांबचा प्रवास करणारे मानव ठरतील. ५० वर्षांपूर्वी प्रस्थापित झालेला अंतराचा विक्रम या मोहिमेमुळे मोडीत निघणार आहे. हे अंतराळवीर 'ओरियन' अंतराळयानातून चंद्राभोवती प्रदक्षिणा घालून पुन्हा पृथ्वीवर सुरक्षित परततील.

नासाच्या मते, चंद्र हा केवळ एक उपग्रह नसून मंगळावर पोहोचण्यासाठीचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. अंतराळवीर क्रिस्टीना कोच यांच्या मते, चंद्र हा आपल्या सूर्यमालेच्या निर्मितीचा साक्षीदार आहे. तिथल्या खडकांचा आणि पर्यावरणाचा अभ्यास केल्याने आपल्याला इतर सूर्यमाला कशा तयार झाल्या, हे समजण्यास मदत होईल.

## ड्रॅगनच्या उरात धडकी! जपानने रोखली १००० किमीची क्षेपणास्त्रे

**नवीदिल्ली : दि.१ वृत्तसंस्था**

### चीनच्या मुख्य भूमीवर थेट निशाणा



आशिया खंडातील दोन महाशक्ती, जपान आणि चीन यांच्यातील संबंध आता एका अत्यंत स्फोटक वळणावर येऊन ठेपले आहेत. पूर्व चीन समुद्रातील चीनच्या वाढत्या दादागिरीला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी जपानने एक अत्यंत मोठा आणि ऐतिहासिक लष्करी निर्णय घेतला आहे. जपानचे संरक्षण मंत्री शिंजीरो कोइझुमी यांनी अधिकृतपणे जाहीर केले आहे की, जपानने आपल्या नैऋत्य भागात लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे तैनात केली आहेत. ही हालचाल केवळ लष्करी सराव नसून, चीनला दिलेला एक स्पष्ट आणि कडक इशारा आहे.

जपानने दक्षिण क्युशूमधील कुमामोटो येथील तळावर आपले अद्ययावत 'टाइप-१२' क्षेपणास्त्र तैनात केले आहे. मित्सुबिशी हेवी इंडस्ट्रीजने डिझाइन केलेले हे क्षेपणास्त्र मूळतः जमिनीवरून जहाजावर मारा करण्यासाठी बनवण्यात आले होते. मात्र, आता त्याचे रूपांतर 'स्टँड-ऑफ' क्षेपणास्त्रात करण्यात आले आहे. यापूर्वी याचा पल्ला केवळ २०० किलोमीटर होता, जो आता वाढवून १,००० किलोमीटर करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, मंत्रालय आता या क्षेपणास्त्राचा पल्ला २,००० किलोमीटरपर्यंत वाढवण्यावर काम करत आहे. याचा अर्थ असा की, जपान आता आपल्या भूमीवरून चीनच्या मुख्य भूमीतील कोणत्याही लष्करी तळाला सहजपणे लक्ष्य करू शकतो. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने स्वीकारलेल्या शांततावादी संविधानानुसार, जपान केवळ स्वतःचे संरक्षण करण्यासाठी लष्करी बळाचा वापर करू शकत होता. 'केवळ आत्मसंरक्षण' हे जपानचे ७५ वर्षांहून अधिक काळचे धोरण होते. मात्र, चीन, रशिया आणि उत्तर कोरिया यांच्या वाढत्या लष्करी धमक्यांमुळे जपानने २०२२ मध्ये आपल्या धोरणात आमूलाग्र बदल केला. संरक्षण मंत्री कोइझुमी यांच्या मते, "जपान एका गंभीर आणि गुंतागुंतीच्या सुरक्षा परिस्थितीचा सामना करत असल्याने, आपली प्रतिबंधक क्षमता मजबूत करणे ही काळाची गरज आहे." आता जपानकडे शत्रूच्या हल्ल्याची वाट न पाहता, गरज पडल्यास त्यांच्या तळांवर दुरून हल्ला करण्याची क्षमता प्राप्त झाली आहे.

जपान सरकारचा हा निर्णय जरी संरक्षणासाठी असला, तरी देशांतर्गत पातळीवर त्याला मोठ्या विरोधाचा सामना करावा लागत आहे.

## इंडिगोच्या विमानातील शौचालयात 'डेंजर' लिहिलेला टिश्यू पेपर सापडला

**नवीदिल्ली : दि.१ वृत्तसंस्था**

### प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण




इंडिगोच्या विमानात शौचालयात 'डेंजर' असे लिहिलेला टिश्यू पेपर आढळल्याने गोंधळ उडाला. ही घटना मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर घडली. मिळालेल्या माहितीनुसार, इंडिगो फ्लाइट ९११ (मुंबई-अहमदाबाद) पुढील उड्डाणासाठी तयार होत असताना ही घटना घडली. यादरम्यान, विमानातील बहुतेक प्रवाशांमध्ये घबराट पसरली.

तपासादरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही

ही घटना विमानतळाच्या गेट क्रमांक ५ वर उभ्या असलेल्या विमानात घडली. घटनेची माहिती मिळताच, अग्निशमन दलाने मुंबई नियंत्रण कक्षाला विमानात बॉम्ब असल्याची धमकी देणारा संदेश पाठवला, ज्यामुळे काही काळासाठी घबराट पसरली. पोलिसांच्या सखोल तपासानंतर विमानात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. सुरक्षा कर्मचारी आणि प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

यापूर्वी, २९ मार्च २०२६ रोजी, इंडिगोच्या विमानातील एका प्रवाशाने विमान उतरण्यापूर्वी आपत्कालीन बाहेर पडण्याचा दरवाजा (इमर्जन्सी एक्झिट गेट) उघडण्याचा प्रयत्न केला होता. बंगळूरुहून वाराणसीला जाणारे विमान उतरणार होते, तेव्हा एका प्रवाशाने अचानक आपत्कालीन बाहेर पडण्याचे बटण दाबण्याचा प्रयत्न केला. परिस्थितीला प्रतिसाद देत, वैमानिकाने तात्काळ विमान उतरवण्याची प्रक्रिया रद्द केली आणि संभाव्य धोका टाळून विमानाने पुन्हा उड्डाण घेतले.

विमान उतरल्यानंतर, आरोपीला सुरक्षा यंत्रणांच्या ताब्यात देण्यात आले. सुरुवातीला त्याला एअरलाइनच्या सुरक्षा पथकाने आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने ताब्यात घेतले, त्यानंतर त्याला स्थानिक पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. चौकशीदरम्यान, आरोपीने सुरुवातीला आपल्यावर भूत संचारल्याचा विचित्र दावा केला, परंतु नंतर त्याने कबूल केले की आपत्कालीन बटण दाबल्याने दरवाजा उघडू शकतो हे त्याला माहीत नव्हते. पोलिसांनी या प्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

मुंबई पोलीस आता टिश्यू पेपरवर 'डेंजर' कोणी आणि का लिहिले, याचा शोध घेत आहेत. संशयिताला ओळखण्यासाठी विमानतळावर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील फुटेज तपासले जात आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून, विमानतळावरील सर्व सेवा सामान्यपणे सुरू आहेत. पोलीस लवकरच या प्रकरणाचा छडा लावतील, असे त्यांचे म्हणणे आहे.

## असे थांबले युद्ध! अमेरिका-इराण युद्धाच्या अर्धवट समाप्तीमागे दडली आहेत अब्जावधींची ५ गुपिते

**नवीदिल्ली : दि.१ वृत्तसंस्था**



२८ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरू झालेले अमेरिका-इराण युद्ध आज एका अशा वळणावर येऊन ठेपले आहे, जिथे विजयापेक्षा 'व्यापार' आणि 'रणनीती' जास्त महत्त्वाची ठरत आहे. जगभरातील राजकीय विश्लेषकांना धक्का देत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आता या युद्धातून बाहेर पडण्याचे संकेत देत आहेत. मात्र, विशेष म्हणजे यासाठी कोणताही अधिकृत शांतता करार करण्याची त्यांची इच्छा नाही. हे युद्ध अचानक का थांबवले जात आहे आणि यामागे अमेरिकेचा कोणता 'हिडन अजेंडा' आहे, याचे विश्लेषण करणारा हा विशेष रिपोर्ट.

१. शस्त्रास्त्र विक्री आणि 'प्रोफिटीअरिंग' अमेरिकेच्या या निर्णयामागील सर्वात मोठे कारण म्हणजे 'शस्त्रास्त्र व्यापार'. जर इराण आणि अमेरिका यांच्यात कायमस्वरूपी शांतता करार झाला, तर मध्य-पूर्वेतील धोक्याची भावना कमी होईल. मात्र, करार न करताच युद्ध थांबवले, तर अरब देशांना नेहमीच इराणची भीती वाटत राहील. परिणामी, सौदी अरेबिया, युएई आणि कतार यांसारखे देश स्वतःच्या सुरक्षेसाठी अमेरिकेकडून अब्जावधी डॉलर्सची शस्त्रे खरेदी करत राहतील. हे मॉडेल काहीसे 'नाटो' सारखे आहे, जिथे सुरक्षेच्या बदल्यात मित्र राष्ट्रांना अमेरिकन शस्त्रास्त्रांवर अवलंबून राहावे लागते.

२. विजयाचे 'नॅरेटिव्ह' आणि देशांतर्गत राजकारण : डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकन जनतेसमोर हे युद्ध एक 'ग्रँड व्हिक्टरी' म्हणून सादर करायचे आहे. व्हाईट हाऊसचा असा दावा आहे की त्यांनी इराणच्या प्रमुख अणुसुविधा उद्ध्वस्त केल्या आहेत आणि त्यांच्या सर्वोच्च नेतृत्वाला हादरा दिला आहे. जमिनीवर इराणचे 'प्रॉक्सी' गट अजूनही सक्रिय असले, तरीही ट्रम्प प्रशासन हे युद्ध 'मिशन अकम्प्लिश्ड' म्हणून जाहीर करू इच्छिते. यामुळे अमेरिकेला लष्करी खर्च वाचवता येईल आणि ट्रम्प यांची प्रतिमा एका 'शांतीदूत' पण 'शक्तिशाली' नेत्यासारखी तयार होईल.

३. 'फ्रोझन कॉन्फ्लिक्ट': युद्ध संपणार नाही, फक्त स्थिर होईल : अमेरिका या युद्धाला पूर्णविराम न देता त्याला 'गोठलेल्या संघर्षात' बदलू इच्छिते. याचा अर्थ असा की मोठ्या लष्करी कारवाया थांबतील, पण संघर्ष पूर्णपणे संपणार नाही. येमेन, सीरिया आणि लेबनॉनमध्ये सुरू असलेला तणाव असाच धगधगत राहील. यामुळे इराणवर आंतरराष्ट्रीय दबाव कायम राहील आणि अमेरिकेला हवं तेव्हा पुन्हा हस्तक्षेप करण्याची संधी मिळेल. हा संघर्ष पूर्णपणे संपला, तर अमेरिकेचा या प्रदेशातील हस्तक्षेप करण्याचा नैतिक अधिकार संपेल, जो त्यांना गमवायचा नाहीये.

४. गुंतवणुकीचा ओघ अमेरिकेकडे वळवणे : मध्य-पूर्वेत तणाव कायम राहिल्याचा आर्थिक फायदा थेट अमेरिकेला होतो. जेव्हा दुबई, दोहा किंवा रियाधमध्ये अस्थिरता जाणवते, तेव्हा तिथले मोठे गुंतवणूकदार आपला पैसा सुरक्षित ठेवण्यासाठी अमेरिकन बाजारपेठ निवडतात. अस्थिर मध्य-पूर्व म्हणजे अमेरिकेसाठी भांडवलाचा ओघ. ट्रम्प यांच्या मे २०२५ च्या सौदी आणि कतार दौऱ्यात त्यांना मिळालेले भव्य स्वागत आणि भेटवस्तू हे दर्शवतात की, हे देश सुरक्षेसाठी अमेरिकेवर किती अवलंबून आहेत.

५. इस्रायलचा नवा 'पाईपलाईन' मास्टरप्लॅन : होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगातील २०% तेल जाते आणि तिथे इराणचा मोठा प्रभाव आहे. या प्रभावाला शह देण्यासाठी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी एक क्रांतिकारी प्रस्ताव मांडला आहे. सौदी अरेबियापासून तांबड्या समुद्रातून थेट इस्रायल आणि तिथून युरोपपर्यंत तेल पाईपलाईन नेण्याचा हा प्रकल्प आहे. जर हे युद्ध अशाच स्थितीत थांबले, तर अरब देश या पाईपलाईनला प्राधान्य देतील. यामुळे होर्मुझचे महत्त्व कमी होईल आणि इस्रायल हा जागतिक ऊर्जेचा नवा केंद्रबिंदू बनेल. यामुळे इराणची आर्थिक नाकेबंदी आपोआप होईल.

**राजकारण**

## केरळ निवडणुकीसाठी भाजपचा जाहीरनामा प्रसिद्ध

# मोफत गॅस सिलिंडर, महिलांसाठी बेस कार्ड अन् ३,००० रुपयांची पेन्शन!

**नवीदिल्ली : दि.१ वृत्तसंस्था**




भारतीय जनता पक्षाने (भाजप) केरळ विधानसभा निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. पक्षाने पायाभूत सुविधा प्रकल्प आणि कल्याणकारी उपाययोजनांचे एक मिश्र पॅकेज सादर केले. या जाहीरनाम्यात केरळमध्ये एम्स स्थापन करणे, तिरुवनंतपुरम आणि कोझिकोडमध्ये मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरू करणे आणि तिरुवनंतपुरम ते कन्नूरपर्यंत हाय-स्पीड कॉरिडॉरची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले आहे. या आश्वासनांमध्ये गरीब कुटुंबांसाठी दरवर्षी दोन मोफत एलपीजी सिलिंडर, प्रत्येक कुटुंबाला दरमहा २०,००० लिटर मोफत पिण्याचे पाणी आणि निवृत्तीवेतनात ३,००० रुपयांपर्यंत वाढ यांचा समावेश आहे.

भाजपच्या जाहीरनाम्यात देवस्वम मंडळांची पुनर्रचना करण्याचे आणि शबरीमला सोने तस्करी प्रकरणाची सीबीआय चौकशी सुरू करण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. भाजप अध्यक्ष नितीन नवीन यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला. भाजपने 'हाच तो बदल, हेच ते विकसित केरळ' हे प्रचारगीतही प्रसिद्ध केले. या कार्यक्रमाला केरळ भाजपचे अध्यक्ष राजीव चंद्रशेखर आणि पक्षाचे इतर नेते उपस्थित होते.

**पूजास्थळांच्या संरक्षणाचे आश्वासन**

भाजपने लोकांच्या श्रद्धा आणि पूजास्थळांचे संरक्षण करण्याचे आश्वासन दिले आहे. भाजपच्या जाहीरनाम्यात शबरीमला, गुरुवायूर आणि इतर सर्व पूजास्थळांचे संरक्षण करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. पक्षाने म्हटले आहे की, धार्मिक विधींमधील भ्रष्टाचार आणि सरकारी हस्तक्षेप संपुष्टात आणला जाईल आणि या ठिकाणांचे व्यवस्थापन भाविकांच्या हातात राहील याची खात्री केली जाईल.

७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, गरीब कुटुंबांतील सर्व महिला प्रमुख आणि विधवा यांना ३,००० रुपयांची मासिक पेन्शन देण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. गरीब आणि बीपीएल (दारिद्र्यरेषेखालील) कुटुंबांतील प्रत्येक महिलेला 'भक्ष्य-आरोग्य सुरक्षा कार्ड' देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. हे कार्ड दरमहा ₹२,५०० ने रिचार्ज केले जाईल. हे कार्ड औषध दुकाने आणि किराणा दुकानांमध्ये वापरता येईल.

प्रत्येक घराला अखंडित आणि परवडणारी वीज देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. यामध्ये 'पीएम सूर्य घर' असलेल्या कुटुंबांसाठी विशेष अनुदानाचा समावेश आहे. सर्व गरीब कुटुंबांना दरवर्षी दोन मोफत एलपीजी सिलिंडर देण्याचे आश्वासन आहे. एक एलपीजी सिलिंडर ओणमच्या वेळी आणि दुसरा ख्रिसमसच्या वेळी देण्याचे आश्वासन आहे.

**सर्व घरांना मोफत पाणीपुरवठा**

भाजपने सर्व घरांना मोफत पाणीपुरवठा करण्याचे आश्वासनही दिले आहे. केरळमधील सर्व जलस्रोतांचे नूतनीकरण आणि संवर्धन करण्याचेही आश्वासन दिले आहे. तिरुवनंतपुरम ते कन्नूरला जोडणाऱ्या हाय-स्पीड रेल्वे नेटवर्कचेही आश्वासन देण्यात आले आहे.

या जाहीरनाम्यात भाजपाने म्हटलं आहे की, निलंबूर-नंजनगुड रेल्वे प्रकल्प पुन्हा सुरू करून त्याला गती देईल. ते त्रिशूर-गुरुवायूर रेल्वे मार्ग तिरूरपर्यंत वाढवेल, ज्यामुळे केरळमधील व्यापार आणि पर्यटनाला चालना मिळेल. विझिंजम बंदराच्या आसपास जागतिक दर्जाच्या लॉजिस्टिकल आणि औद्योगिक पायाभूत सुविधा विकसित करण्याचे आश्वासन दिले आहे. भाजपने म्हटले आहे की यामुळे केरळला बंदर-आधारित विकासाचे पूर्ण लाभ घेता येतील.

भाजपने केरळमधील सर्व महानगरपालिकांना आवश्यक मेट्रो कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करण्याचे आश्वासन दिले आहे. रोजगार-संलग्न अनुदानाच्या माध्यमातून राज्यातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांना पुनरुज्जीवित करून बेरोजगारी दूर करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच केरळच्या तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांना चालना देऊन कुशल मल्याळी तरुणांसाठी रोजगारात क्रांती घडवण्याचे आश्वासन दिले आहे.

**केरळच्या शिक्षण व्यवस्थेला प्रतिभेचे केंद्र बनवण्याचे आश्वासन :**

याव्यतिरिक्त १२वी पर्यंत मोफत ऐच्छिक इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्याचे आश्वासन दिले आहे. प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका इयत्ता १२ वी पर्यंत मोफत, सक्तीचे आणि उच्च दर्जाचे शिक्षण देईल, ज्यामध्ये इंग्रजी माध्यमाचा पर्याय उपलब्ध असेल. भाजपने केरळच्या शिक्षण व्यवस्थेला प्रतिभेचे केंद्र बनवण्याचे आश्वासनही दिले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी डी. बी. कॉर्पोरेशन लिमिटेड, दिव्य मराठी, एन.एच.६, बनारसी धाब्याजवळ, बोरगाव मंजू, अकोला - ४४४००१ येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन, बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला- ४४४००१ येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...

# नक्षलवाद संपुष्टात येण्याच्या मार्गावर!

देशाला विकासाकडून विनाशाकडे नेऊ पाहणारा नक्षलवाद संपुष्टात येण्याच्या मार्गावर असल्याचे दिलासादायक उद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काढले आहेत. मार्च २०२६ अखेर देश नक्षलमुक्त होईल, असे आश्वासन त्यांनी दिले होते आणि ते जवळजवळ पूर्ण केले आहे. नक्षलवादी गटांचा आदर्श सुभाषचंद्र बोस किंवा आदिवासींच्या प्रतिकार चळवळीतील देशी नेते नव्हते. त्याऐवजी त्यांनी माओ त्से तुंग यांच्यासारख्या परदेशातील क्रांतिकारी नेत्यांचे अनुकरण केले. त्यामुळे नक्षलवाद्यांची तुलना स्वातंत्र्यसैनिकांशी करणे गैर ठरते, हे शहा यांचे मत पटण्यासारखेच आहे. बिरसा मुंडा यांच्यासारखे झारखंडमधील स्वातंत्र्ययोद्धे हे वेगळे नेते होते. बिरसांना आपले वडील सुगन मुंडांचे जबरदस्तीने धर्मांतर केल्याबद्दल ख्रिस्ती मिशनऱ्यांचा व इंग्रजांचा मनस्वी राग येत असे. अशिक्षित आदिवासींवर इंग्रजांचे अत्याचार पाहून त्यांना धडा शिकवण्यासाठी बिरसा यांनी छोटा नागपूर क्षेत्रात जबरदस्त लढा उभारला. इंग्रजांनी त्यांना अटक केली व तुरुंगात अतोनात छळ केल्यानंतर दि. ९ जून १९०० रोजी त्यांचा रांची कारागृहात मृत्यू झाला; पण बिरसा यांना लोकांनी 'जननायक' हा किताब बहाल केला. १९७०च्या दशकात झारखंडमध्येच शिबू सोरेन हे आदिवासी नेते उदयास आले. त्यांचे वडील शिक्षक होते आणि त्यांची हत्या एका सावकाराने केली होती. शिबू यांनी आदिवासींना शिक्षित करण्याचे ठरवले. जमिनीची पाटी आणि त्यावर लिहायला दगडाची लेखणी, असे शिक्षण द्यायला सुरुवात केली. शिबू सोरेन या आदिवासींचे 'गुरुजी' बनले. आदिवासींच्या जमिनी हडप करून त्यावर सावकारांनी घेतलेली पिके कापून नेण्याची चळवळ शिबू यांनी सुरू केली. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी यांच्या न्याय्य हक्कांसाठी भारतात अनेक ठिकाणी लोकांनी जबरदस्त लढे उभारले; मात्र हे लढे या मातीतील होते. त्यामागे चिनी वा अन्य देशांतील नेत्यांच्या प्रेरणा नव्हत्या. भारतात नक्षलवादाची सुरुवात १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या गावातून झाली. चारू मुजुमदार आणि कनू सन्याल यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक आदिवासी आणि शेतकऱ्यांनी जमीनदारांविरुद्ध पुकारलेल्या सशस्त्र उठावातून या चळवळीचा उदय झाला. माओच्या विचारसरणीचा आधार असल्यामुळे त्यांना 'माओवादी' असेही म्हणतात; मात्र नक्षलवाद हा पहिल्यापासून हिंसकच होता. पश्चिम बंगाल मागोमाग, बिहार, ओडिशा, आंध, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात ही चळवळ पसरली. या राज्यांमधील कायदा आणि सुव्यवस्था ढासळली होती आणि याचा परिणाम सुमारे १२ कोटी लोकांवर झाला. या संघर्षात जवळपास २० हजार तरुणांना आपला जीव गमवावा लागला, हे कटू वास्तव आहे. खासकरून आदिवासी वा दुर्गम पट्ट्यात रस्ते, शाळा, दवाखाने, इस्पितळे उभारताना नक्षलवाद्यांकडून अडचणी उत्पन्न केल्या जात होत्या. रस्त्यावर सुरुंग पेरले जात होते. कारखान्यांसाठी जमिनी संपादन करू द्यायच्या नाहीत, उद्योगधंदे सुरू झाल्यास त्यांच्याकडून खंडणी मागायची, सरकारी अधिकाऱ्यांना धमकवायचे आणि पोलिसांवर सातत्याने हल्ले चढवायचे, हेच उद्योग वर्षानुवर्षे सुरू होते. लूटमार करून दारू वा अन्य चैनबाजीत पैसे उडवायचे, हाही काहींचा खेळ सुरू होता. लोकसभेत अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना नक्षलवाद संपुष्टात न येण्यामागे काँग्रेस व डावे पक्ष कारणीभूत असल्याची टीका शहा यांनी केली. काँग्रेसला १९७० नंतरच्या दशकांमध्ये हा प्रश्न का सोडवता आला नाही, हा सवाल आहेच; परंतु केवळ काँग्रेसलाच नव्हे, तर संबंधित राज्यांतील वेगवेगळ्या पक्षांनाही हा प्रश्न सोडवता आला नव्हता. अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारलादेखील या प्रश्नावर मात करता आली नव्हती, हेही लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय केंद्र आणि राज्ये यांच्यातील समन्वय पाहिजे तेवढा नव्हता. नक्षलवाद्यांमधील अपप्रवृत्तींमुळे त्यांच्याबद्दल जनतेत तिरस्कार निर्माण झाला आहे. एकेकाळी देशात क्रांती करू पाहणारे तरुण जेव्हा केवळ भ्रष्ट व्यवहार करू लागले, जनतेचे शोषण करू लागले, तेव्हा त्यांच्याबद्दल घृणा निर्माण होऊ लागली. केंद्रीय गृह खात्याने देखील सुरक्षा दलांना सर्वप्रकारची साधनसामग्री पुरवली आणि नेटाने व सर्व सामर्थ्यानिशी नक्षलवाद्यांविरुद्ध कडक कारवाई केली. महाराष्ट्रातही माओवाद आता जवळपास संपुष्टात आला आहे. ही लढाई लढताना २४४ पोलिसांनी बलिदान दिले. त्यांच्या बलिदानाची दखल घेत आणि हे कठीण काम करणाऱ्या पोलिसांचे मनोबल वाढवण्यासाठी, ज्यांनी सी-६० फोर्समध्ये किमान तीन वर्षे सेवा बजावली आहे, त्या सर्वांना पदक देऊन सन्मानित करण्याचा स्वागतार्ह निर्णय देवेंद्र फडणवीस सरकारने घेतला आहे. गेल्या ऑक्टोबरात गडचिरोलीतील नक्षलवादविरोधी लढ्याला मोठेच यश मिळाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तब्बल ६० नक्षलवाद्यांनी आपली शस्त्रे खाली ठेवली होती. त्यात महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या सीमेवर सक्रिय असलेला कुख्यात नक्षलवादी आणि नक्षल्यांच्या पॉलिटब्युरोचा सदस्य सोनू ऊर्फ भूपती याचाही समावेश होता. अनेक नक्षलवादी नेत्यांना घडवण्यात त्याची मोठी भूमिका होती. भूपतीने आपल्या इतर साथीदारांसह आत्मसमर्पण करण्याचा निर्णय घेतला होता. भूपतीच्या आत्मसमर्पणानंतर नक्षलमुक्त महाराष्ट्राच्या मोहिमेला खूपच बळ मिळाले. आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांच्या हातात मुख्यमंत्र्यांनी संविधानाची प्रतही सुपूर्द केली होती. त्यानंतर नक्षलवादी चळवळीची धुरा सांभाळणाऱ्या सीपीआय माओवादी या बंदी असलेल्या संघटनेचा सरचिटणीस थिप्पिरी तिरुपती ऊर्फ देवजी तसेच संग्राम १६ साथीदारांसह तेलंगणा पोलिसांसमोर शरण आले. यात केंद्रीय समितीचा सदस्य मल्लाराजी रेड्डीचाही समावेश होता. यामुळे नक्षलवाद्यांचा कणाच मोडला गेला असल्याचे अधोरेखित झाले. मूळचा करीमनगरचा रहिवासी असलेल्या देवजीवर महाराष्ट्र व तेलंगणासह विविध राज्यांत एकूण दहा कोटी रुपयांचे बक्षीस होते. नक्षलग्रस्त गडचिरोली आता पोलादनगरी म्हणून विकसित होत असून, तेथे स्थानिक तरुण-तरुणींना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ लागला आहे. हातात शस्त्र घेण्याऐवजी पुस्तक किंवा कॉम्प्युटर घेणे हाच प्रगतीचा खरा मार्ग आहे, हे सामान्यजनांच्या आता हळूहळू लक्षात येऊ लागले आहे.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### हनुमान



हो आज पुन्हा एकदा
गरजच आहे तुमची
माजले आता दादा
गदा दाखवा तुमची

हनुमान नावच नाही
भक्तीचे प्रतीक आहे
प्रभूचे प्रिय दास तुम्ही
रामायण सांगत आहे

संगम शक्ती युक्तीचा
अन्याय विरुद्ध भिडले
आदर्श घ्यावाच तुमचा
बजरंगी देवत्व आपले

### ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

कुणीही कुणाला
कधी नये ठेवू ।
अडवून ठेवू
कामास हो ॥

एखाद्याला असे
किती गरज हो ।
खावा तरस हो
त्याच्यावरी ॥

अडवणे काम
ही आसुरी वृत्ती ।
योग्य नाही निती
तुझी मित्रा ॥

मदतीस धावू
गरजुच्या नको ।
मात्र होऊ नको
अडथळा ॥

अडवणे योग्य
जर तो अयोग्य ।
पण जर योग्य
नडू नये ॥

# समाजातील अंधश्रद्धा आणि संतांचे विचार



### विचारायण

साधना काळबांडे
मो. 9767993827

भारतीय समाज हा परंपरा प्रिय आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या रूढी परंपरा आपण पाळतो आणि मानतो सुद्धा. पण आपण बदलत्या काळाचा कधी विचार केला का? कारणं काही अंधश्रद्धा ह्या समाजाला लागलेली कीड होत्या आणि त्या आजही आहेत. ह्या चुकीच्या चालीरितीतुन जेव्हा समाजाचे नुकसान होते तेव्हा या समजूतींना समाजातून उपटून टाकणे गरजेचे असते. पूर्वीची सामाजिक परिस्थिती आपण समजू शकतो. समाज सुशुक्षित नव्हता. त्यामुळे अनेक अंधश्रद्धा तो पाळायचा. तंत्रामंत्राच्या आहारी जायचा. बळी दिल्याने देव प्रसन्न होतो. ही पक्की समज समाजात रूढ झालेली होती. काही लोकांच्या आठवड्यातील वारानुसार देव अंगात यायचे. मग , अंगारे धुपारे, यांच्या माध्यमातून समाजातील लोकांची पिळवणूक केली जायची.अंगातले खोटे देव त्यांना जे हवे ते लोकांकडून मागून घ्यायचे. लोक त्यांच्या बोलण्याला बळी पडायचे. वर्षानुवर्षे ही समाजाची पिळवणूक सुरु होती. तेव्हा समाजातील समाजसुधारक, संत यांनी या समाजाला जागृत करण्यासाठी प्रयत्न केले. अंधश्रद्धा पाळून स्वतः चे जीवन अंधारात ढकलत होते. तेव्हा संतांनी या समाजाला जागृत केले.

**संत ज्ञानेश्वर**

संत ज्ञानेश्वर महाराज यांनी अध्यात्म सामान्य माणसाला समजेल अशा मराठी भाषेत उपलब्ध करून दिले. ते फार थोर तत्वज्ञानी होते. त्यांना सामाजिक समता अभिप्रेत होती. कर्मकांड त्यांनी नाकारले. जातीभेद न करण्याचा सल्ला दिला.

**संत तुकाराम महाराज :** संत तुकाराम महाराजांनी समाजातील ढोंगीपणावर, दांभीकपणावर ताशेरे ओढले. टीका केली. समाजातील अंधश्रद्धा आणि जातीयभेदाला विरोध केला. मानवी जीवन दुर्लभ आहे. त्यांनी आपल्या अभंगाच्या ओळीतून जन्माची किंमत सांगितली. "नरदेह दुर्लभ जाणा "या ओळीतून मानवी जीवन कसे अनमोल आहे. याची जाणीव करून दिली. अभंगाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. सामाजिक सुधारणांचा विचार मांडला. त्यात अंधश्रद्धा हा विषय मोठया पोटतिडकीने समाजाला समजावून सांगितला. ते आपल्या अभंगात सांगतात....

"अज्ञानाच्या पोटी अवघीच फजिती "
अंधश्रद्धा पाळू नका

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे ग्रामोन्नती, मानवतावाद, समता आणि अधश्रद्धा निर्मूलनाचे पुरस्कर्ते होते. त्यांचे विचार कर्मप्रधान, समाजसुधारक, शिक्षणप्रेमी आणि स्त्रीपुरुष समानतेवर आधारित होते. समाजाला बुवाबाजी, अंधश्रद्धा आणि जुन्या कर्मकांडातून मुक्त करण्याचा सल्ला त्यांनी दिला. "जीर्ण चालीरीती डोळे झाकून पाळू नका "असा सल्ला ते समाजाला देत असत. ज्या चालीरिती मानवी जीवनासाठी घातका आहेत. त्याचा मानवाने का करु नये? त्यांचा हा मोलाचा सल्ला म्हणजे आजही समाजाला अशा सल्याची गरज दिसून येते.

**संत गाडगेबाबा**

संत गाडगेबाबा म्हणजे चालत बोलत विद्यापीठ होते. ज्यांनी स्वच्छता, शिक्षण आणि मानवता या त्रिसूत्रीवर भर दिला. आपल्या कीर्तनातून अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या समाजाला प्रबोधन केले. सारे जीवन त्यासाठी भटकंती केली. अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार समाजात रुजवून ती दूर करण्यासाठी जीवाचे रान केले. देव दगडात नसून तो माणसात आहे. मंत्रतंत्र, नवस याला बळी पडू नका अशी शिकवण त्यांनी समाजाला दिली. सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी पुराण, मंत्र तंत्र, देवदेवस्की, चमत्कार या गोष्टीवर विश्वास ठेवू नका अशी कळकळीची विनंती ते करीत असत. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजूती, अनिष्ठ रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. देवाच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करु नका. देव दगडात नसून माणसात आहे. ते सांगत... "तिर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी " त्यांनी संगितलेली दससूत्री आजही मानवासाठी मोलाची आहे.

आज मात्र आपल्या समाजाची दशा ही फार टोकाची झाली आहे. एकीकडे आपण चांद्रयान मोहीम हाती घेतो आणि दुसरी कडे सुशिक्षित समाज अंधश्रद्देच्या आहारी गेला आहे. मंत्र तंत्र, अघोरीं पूजा, बळी देणे, मग त्यात मानवी, प्राणी यांचा बळी दिला जातो. वाईट या गोष्टीचे वाटते की शिकून सवरून आपण अडाणीच आहोत. मग गाडगेबाबा यांनी सर्व जीवन ज्या कार्यासाठी खर्ची घातले. त्याचा आजही काही उपयोग झालेला दिसून येत नाही. वैज्ञानिक दृष्टीकोन जणू आजही प्रत्येकात निर्माण झाला नाही. काय म्हणावे याला? कारणं समाज खरा सुशिक्षित केव्हा होईल? अशा अंधश्रद्धा जर आपण पाळत असू तर शिक्षणाचा काही फायदा झाला असे वाटतं नाही. असा आहारी गेलेला समाज येणाऱ्या पिढीला कोणती दिशा, विचार देणार हाही प्रत्येकाने विचार करण्याची गरज आहे.अंधश्रद्धा समाजात पसरविणाऱ्याला कडक शिक्षा झालीच पाहिजे. जो समाजाला योग्य दिशा देत नाही. समाजाला भरकटवतो.चांगले संत समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतात. जे समाजाला चुकीच्या मार्गाने नेतात त्यांना संत म्हणावे का? विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

# मजबुरी, विकृती आणि लालसा: अंधश्रद्धेचा पाया

### चर्चा



मोहन शेळके
मो. 9623117110

सध्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अंधश्रद्धा व त्यातून निर्माण झालेल्या भोंदूगिरीची जोरदार चर्चा सुरू आहे. वास्तविक पाहता अंधश्रद्धा निर्मूलनासाठी शासनाने कायदे केलेले आहेत. अंधश्रद्धा ही वाईटच आहे. अंधश्रद्धेचे संपूर्णतः निर्मूलन व्हायलाच हवे, याबाबत अजिबात दुमत नाही. परंतु फक्त कायदे करून अंधश्रद्धेचे समुळ निर्मूलन होणे शक्य नाही. अंधश्रद्धेच्या समूळ निर्मूलनासाठी अंधश्रद्धेचे मूळ नेमके कशात आहे, याचा अभ्यास केला पाहिजे आणि त्यानुसार उपाययोजना केल्या पाहिजेत. तर अंधश्रद्धेला थोडाफार आळा बसू शकतो. अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीमध्ये गुरफटलेले लोक पाहता अंधश्रद्धेचे समूळ निर्मूलन शक्य होईल की नाही याबाबत साशंकता आहे. परंतु अंधश्रद्धेचे मूळ असलेल्या बाबींवर विचार झाला तर बऱ्यापैकी निर्मूलन होऊ शकते. अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीच्या जाळ्यात अडकलेल्या लोकांचा, त्यांच्या वैचारिक आणि सामाजिक परिस्थितीचा विचार केला असता या जाळ्यामध्ये दोन प्रकारचे लोक अडकल्याचे दिसून येतात. त्यातील पहिला प्रकार म्हणजे जे लोक परिस्थितीला वैतागून एखाद्या गोष्टीसाठी अगदी मजबूर झालेले असतात आणि दुसऱ्या प्रकारातले लोक म्हणजे ज्यांच्याकडे सर्वकाही आहे, परंतु त्यांना आणखी काहीतरी मिळविण्याची लालसा आहे अशा प्रकारचे लोक. जे लोक परिस्थितीने मजबूर आहेत, त्यांच्याकडून शेवटचा उपाय म्हणून कधीकधी अंधश्रद्धेचा मार्ग अवलंबिला जातो. परंतु ज्यांच्याकडे सगळे काही आहे तरीही त्यांना आणखी काही मिळवायचे आहे, अशा लालची लोकांमुळे अंधश्रद्धा व भोंदूगिरी जास्त प्रमाणात फोफावते. कारण परिस्थितीने मजबूर असलेला माणूस भोंदूबाबांना फार काही देऊ शकत नाही, परंतु ज्यांच्याकडे भरपूर काही आहे ते मात्र अशा भोंदूबाबांना बरेच काही देऊ शकतात आणि त्याबदल्यात त्यांना हवे ते तंत्र-मंत्र करून घेऊ शकतात. अर्थात या सगळ्या गोष्टींचा कोणाला काय फायदा होतो, हे ज्याचे त्यालाच ठाऊक... पण यातून अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीला वाव मिळतो एवढे नक्की! काही लोक एखाद्या दुर्धर आजाराने ग्रस्त असतात, सर्व काही इलाज, उपचार करूनही आजार बरा होत नाही किंवा दवाखान्यातील महागड्या इलाजाकरिता त्यांच्याकडे पैसे नसतात. तेव्हा असे लोक मजबुरीने आपल्या आजाराच्या उपचारासाठी काही भोंदू बाबांकडे जाण्याचा मार्ग पत्करतात. याशिवाय काही लोक त्यांच्या जीवनात भरपूर मेहनत करतात, प्रयत्न करतात, खूप संघर्ष करतात, परंतु प्रामाणिकपणाने सर्वकाही करूनही त्यांना त्यांच्या जीवनात यश मिळत नाही, असे लोक शेवटी नाईलाजाने कुणाच्यातरी सांगण्यावरून एखाद्या भोंदू बाबाकडे आपली कुंडली दाखविण्यासाठी पोहोचतात आणि अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकून त्या मार्गाने वाहत जातात. प्रामाणिकपणाच्या मार्गाने सर्वकाही प्रयत्न व संघर्ष करूनही यश मिळत नाही, ही बाब ज्यांच्यावर असा प्रसंग आलेला नाही ते लोक कदाचित समजू शकणार नाहीत. परंतु अनेकांच्या जीवनात हे अनुभव आलेले आहेत आणि येत आहेत की त्यांनी खरोखर प्रचंड मेहनत करून, प्रामाणिकपणा जोपासून, खडतर संघर्ष करूनही त्यांना यश मिळालेले नसते. अर्थात त्यासाठी अंधश्रद्धेचा किंवा भोंदुगिरीचा मार्ग पत्करणे हा पर्याय असू शकत नाही. परंतु नाईलाजाने परिस्थितीला वैतागून आणि शेवटचा पर्याय म्हणून लोक त्या मार्गाने जातात. कुणाच्या जीवनात काही कारण नसतांना एकामागून एक अनपेक्षित संकटे येतात, कुणाला अपत्य होत नाहीत, कुणाचे आजार दुरुस्त होत नाहीत, कोणाला मानसिक आजार असतात, एखाद्या कुटुंबात एखादा व्यक्ती असा असतो की त्याला वैद्यकीय दृष्टीने पागल म्हणता येत नाही परंतु त्याची एकंदरीत वागणूक ही पागलासारखी असते, एखाद्या कुटुंबातील एखादी व्यक्ती वैद्यकीय, सामाजिक, शारीरिक, शैक्षणिक सर्व दृष्टिकोनातून अगदी सामान्य असते, पण तरीही ती व्यक्ती सामान्य माणसासारखी वागत नाही. अशा अनेक प्रकारच्या समस्या अनेक लोकांच्या जीवनात असतात. त्याचा इलाज वैद्यकीय उपचारातून होत नाही. तेव्हा काही लोक अशा भोंदूगिरीच्या मार्गाचा अवलंब करतात, ही गोष्ट नाकारता येत नाही. याशिवाय काही लोक हे नातेवाईकांच्या किंवा समाजातील काही विकृत लोकांच्या त्रासाला प्रचंड वैतागलेले असतात. अशा विकृत लोकांसोबत समोरासमोर लढणे काही गरीब लोकांना शक्य नसते. शिवाय पोलिसात जाणे आणि कोर्टकचेरी करणे या गोष्टी सुद्धा काही सामान्य व गरीब लोकांना शक्य नसतात. अशा परिस्थितीत सुद्धा काही लोक आपल्याला त्रास देणाऱ्या विकृत नातेवाईक किंवा बाहेरील लोकांचा बंदोबस्त व्हावा म्हणून भोंदूगिरी करणाऱ्या एखाद्या बाबा किंवा महाराजाजवळ उपाय शोधण्यासाठी जातात. अशा लोकांनी निवडलेला हा भोंदूगिरी चा मार्ग किंवा अंधश्रद्धेचा मार्ग हा चुकीचाच असतो, याबाबत दुमत नाही. परंतु अशा लोकांना कायद्याच्या मार्गाने न्याय मिळवून देण्यासाठीही कोणी पुढे येत नाही. मग अशा लोकांनी काय करायला पाहिजे, याचाही विचार होणे आवश्यक आहे. समाजात काही लोक तर असेही विकृत असतात की त्यांना कुणाचा काही त्रास नसतो, परंतु त्यांना दुसऱ्यांचे कोणत्याही प्रकारे, काहीही चांगले झालेले आवडत नाही किंवा खपत नाही. म्हणून कोणाचे तरी वाईट करण्यासाठी भोंदू बाबांजवळ जातात, अशा लोकांचे काय करायचे? परिस्थितीने मजबूर किंवा वैतागलेल्या लोकांनी शेवटचा पर्याय म्हणून भोंदूगिरी किंवा अंधश्रद्धेचा मार्ग अवलंबिला तर तो त्यांच्या परिस्थितीचा दोष आहे, असे आपण म्हणू शकतो.

# रील संस्कृती: स्क्रोलपासून समाजापर्यंत

### विचारमंथन



प्रा. राहुल माहुरे
मो. 9822278925

इंस्टाग्राम रील, यूट्यूब शॉर्ट्स आणि टिकटॉक सारख्या लघु-स्वरूपाच्या आता सध्या टिकटॉक जरी बंद असले तरी त्याचा उल्लेख होणे गरजेचे आहे. या सर्व व्हिडिओंनी गेल्या काही वर्षांत जगभरातील डिजिटल संवादाचे स्वरूपचं बदलून टाकले आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या समृद्ध देशात जिथे हजारो भाषा, असंख्य सांस्कृतिक परंपरा आणि जगातील सर्वात महान अशी लोकशाही आहे. तिथे रील्सनी केवळ मनोरंजनाचे साधन म्हणूनच नव्हे तर राजकीय प्रचार, सामाजिक बदल, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि शैक्षणिक प्रसाराचे एक प्रभावी माध्यम म्हणून काम करण्यास सुरुवात केली आहे. रील्स हे असं माध्यम आहे ज्यामुळे ज्या व्यक्ती मध्ये मुळात चं टॅलेंट आहे त्या टॅलेंट ला वाव मिळतो. जी कला, प्रोजेक्ट, कंटेट ते ३० ते १.०० मी. च्या कालावधीत सादर करतात त्याला देखील कल्पकता लागते. आपली कला सादर करण्याचे हे अत्यंत स्वस्त साधन आहे. यासाठी तुम्हाला स्मार्ट फोन आणि इंटरनेटची आवश्यकता असते. आजकाल तर डेटा चे इतके फॅड झाले की, एकदा घरी भाकर खायला नसली तरी चालेल पण मोबाईल मध्ये डेटा पॅक पाहीजे. भविष्यात चार मूलभूत गरजांपैकी पाचवी गरज मोबाईल डेटा ही असेल यात तिळमात्र शंका नाही. या रील्स च्या माध्यमातुन अनेक दुर्लक्षित परंतु दमदार कसदार कंटेट असणाऱ्यांना प्लॅटफॉर्म मिळाला हे विशेष त्यापैकी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे १)अर्शदीप सिंग भारतीय क्रिकेटपटू क्रिकेटसोबतच इंस्टाग्रामवर विनोदी रील्स करण्यासाठी प्रसिद्ध. २)सुरज चव्हाण मराठी अभिनेता, इन्फ्लुएंसर बिग बॉस मराठीचा विजेता. त्याची जस्टिन बीबरशी केलेली तुलना आणि त्याचे विनोदी रील्स यामुळे तो चर्चेत आला. ३)रियाज अली, फॅशन लाइफस्टाइल इन्फ्लुएंसर हा युवा कलाकार इंस्टाग्राम रील्सद्वारे फॅशन आणि लाइफस्टाइल कंटेंटसाठी ओळखला जातो. ४)फैसल शेख (मिस्टर फैसू) अभिनेता, इन्फ्लुएंसर सिनेमॅटिक स्टाईल आणि व्हायरल स्टोरीटेलिंगसाठी प्रसिद्ध. ५)शशिकांत गुप्ता, डिजिटल क्रिएटर, उद्योजक उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथील हा युवा क्रिएटर इंस्टाग्रामवर मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला. अलीकडेच त्याला देशातील टॉप २० डिजिटल क्रिएटर्समध्ये स्थान मिळाले. ६)अरुण तुपे, मराठी कॉमेडी इन्फ्लुएंसर या अकाउंटवर तो रोजच्या जीवनातील विनोदी व्हिडीओसाठी प्रसिद्ध होता. दुर्दैवाने नुकताचं २०२६ मध्ये त्याचे निधन झाले. त्याची शेवटची रील चांगलीच व्हायरल झाली होती. ७)पुजारिणी प्रधान, लाइफस्टाइल क्रिएटर आपल्या गोंधळलेल्या स्टोरीटेलिंगसाठी ओळखली जाते.वास्तववादी कंटेंटला महत्त्व देणाऱ्यांमध्ये तिची गणना होते. सध्या राजकीय पक्ष आणि नेते नविन तंत्रज्ञानाचा अवलंब करुन कमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडियो चा वापर सर्रास करताना दिसुन येतात सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याला ते प्राधान्य देत आहेत. मिशिगन विद्यापीठाच्या संशोधक जॉयोजित पाल यांच्या अभ्यासानुसार भारतातील राजकीय प्रभाव आता वृत्तवाहिन्यांपासून दूर जाऊन क्रिएटर-चालित जगामध्ये स्थलांतरित होत आहे . २०१४ च्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात सोशल माध्यमाचा वापर केला आहे. हे आपणा सर्वांना चं सर्वश्रुत आहे. २०२४ च्या झेफ्मो अहवालानुसार, ७८% प्रतिसादकर्ते (फॉलोअर) इन्फ्लुएन्सर मार्केटिंगला सार्वजनिक आणि राजकीय जागरूकता निर्माण करण्याचे प्राथमिक साधन मानतात. स्थानिक भाषा, विनोद आणि सांस्कृतिक संदर्भ वापरून सूक्ष्म-इन्फ्लुएन्सर (-) आपल्या समुदायांशी अधिक घनिष्ठ नाते निर्माण करतात. बिहार, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांमधील निवडणुकांमध्ये अशा स्थानिक क्रिएटर्सनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी सरकारने २३ क्रिएटर्सना राष्ट्रीय क्रिएटर पुरस्कार देऊन गौरवले.



डिकोडच्या तपासणीत असे आढळले की या पुरस्कारांच्या सोशल मीडिया प्रचारासाठी सरकारने २.४ कोटी रुपयांहून अधिक खर्च केला होता. काही राज्य सरकारांनी मोठ्या फॉलोअर्स असलेल्या क्रिएटर्सची नोंदणी करण्यासाठी धोरणे आखली होती. अकादमीया एडूवर प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात ५० रील्सचे परीक्षण करण्यात आले. या अभ्यासात असे आढळले की, व्हिज्युअल घटक धार्मिक विभाजनाला कारणीभूत ठरण्याच्या उद्देशाने तयार केले जातात. बऱ्याचदा खोटी माहिती सत्य म्हणून सादर केली जाते. आणि भारतीय राजकीय व्यक्तिमत्त्वांना धार्मिक विचारधारांशी जोडले जाते. राजकीय प्रचारापासून ते सामाजिक आणि सांस्कृतिक बदला सोबत अभिव्यक्तीपासून ते शिक्षणापर्यंत रील्सने भारतीय समाजाच्या सर्वचं स्तरावर अमीट ठसा उमटवला आहे. हे माध्यम अप्रतिम संधीही देते आणि गंभीर आव्हानेही उभी करते. रील्समुळे राजकीय आणि सामाजिक जागरूकता आणि शिक्षण प्रभावीपणे मांडता येते. स्थानिक संस्कृतींना जागतिक विचारपिठ मिळते. जसे फायदे तसेचं काही तोटे सुध्दा आहेत जसे चुकीची माहिती आणि दुष्प्रचार वेगाने पसरतो, सांप्रदायिक कंटेट मुळे सामाजिक तणाव निर्माण होऊ शकतो, पाश्चात्य संस्कृतीच्या वर्चस्वामुळे स्थानिक परंपरा मागे पडण्याची शक्यता असते, शैक्षणिक सामग्रीची गुणवत्ता धोक्यात येऊ शकते. यासाठी डिजीटल साक्षरते बरोबर चं माध्यम साक्षरतेची ( ) गरज आहे. सुजाण नागरिकांनी रील्समधील कंटेटचे समीक्षणात्मक मूल्यमापन करण्याची आवश्यकता आहे. शैक्षणिक संस्थांनी रील्स सारख्या नव्या माध्यमांचा शिक्षणासाठी कसा प्रभावी वापर करता येईल यावर संशोधन आणि प्रयोग करणे आवश्यक आहे.रील्स ही केवळ एक तांत्रिक सुविधा नसून ती समकालीन भारतीय समाजाचे प्रतिबिंब आहे. या माध्यमाचा वापर कसा केला जातो. यावरचं आपल्या लोकशाहीचे सामाजिक स्थैर्य, सांस्कृतिक विविधता आणि शैक्षणिक प्रगतीचे भवितव्य अवलंबून आहे.

# स्पर्धा परीक्षेचे व्यवस्थापन कौशल्य

### शैक्षणिक



प्रा. इस्माईलखान पठाण
वाशीम. मो. ७९७२१८८९८९

कोणतेही कार्य यशस्वी होण्यासाठी सर्वात पहिल नियम म्हणजे त्या कामाचे आयोजन, नियोजन आणि व्यवस्थापन करणे होय. मग ते साधे एखाद्या गावाला, लग्नाला किंवा अन्य छोट्या गोष्टी का असेना त्याचे व्यवस्थापन पाहिजेत म्हणजे पाहिजेत तर आणि तर च यशाची माळ गळ्यात पडते. आपण तर स्पर्धा परीक्षेचा खूप मोठा टप्पा पार करत आहोत आणि त्या साठी व्यवस्थापन करायलाच पाहिजेत कारण ती यशाची पहिली शिडी मानली जाते. स्पर्धा परीक्षा म्हणजे रणांगणात चालू असलेलं स्वतःशी ऐक युद्ध असते आणि त्यात हो सातत्य राखतो तोच युद्ध जिंकतो. तर या लेखात आपण स्पर्धा परीक्षेचे व्यवस्थापन कसे करावे हे पाहणार आहोत. स्पर्धा परीक्षा हे सरकारी नोकर मिळविण्याचे ऐक साधन असून दरवर्षी साधारपणे महाराष्ट्रात दहा लाख विद्यार्थी आपले नशीब विविध स्पर्धा परीक्षेचेच्या माध्यमातून अजमावत असतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यां गुणवत्ता असून देखील मार्गदर्शना अभावी मागे राहतात. हे मात्र लपून राहिले नाही. स्पर्धा परीक्षेचे स्वरूप, व्यापकता, संधी, अभ्यासक्रम, याबाबत परामर्श या चिंतनात घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्पर्धा परीक्षा हे ऐक आव्हान आहे ते जर पेलायचे असेल तर अपार कष्ट आणि मार्गदर्शन खूप महत्वाच आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यापूर्वी, त्या स्पर्धेचा अभ्यासक्रम, प्रशपत्रिका, समजून घ्या. कोणती पुस्तके वाचायची याची यादी बनवा जसे आणि राज्य महामंडळाच्या पुस्तकांपासून तयारीला सर्वात करा. आपण किती तास अभ्यास करणार त्याचे प्लॅन बनवा जसे पाच तास, आठ तास, दहा तास. दररोज नविन पुस्तके मिळवा, मार्गदर्शन सत्र असतात त्यात सहभाग घ्या . आपल्या शहरात स्पर्धा परीक्षा क्लास असेल तर तो जाईन करा जेणेकरून तुम्हाला अंकगणित, बुद्धिमत्ता चाचणी, इंग्लिश हा विषय सोपा जाईल आणि सक्सेस लवकर मिळेल. स्पर्धा परीक्षा केवळ पुस्तकी कॉलेज नाही तर ती एक, शिस्तबद्ध जीवनशैली आहे हे आपण समजून घेणे अत्यंत गरजेचं आहे. गैरसमजावर विश्वास ठेऊ नका नाही तर बरेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षा साठी पात्र असतात, टॅलेन्ट सुद्धा असतात पण कोणी तरी सांगितल असते की स्पर्धा परिक्षा आपल्या कामाची नाही खूप वर्ष लागतात



यश मिळवायला परंतू विद्यार्थी मित्रानो हा पक्का गैरसमज आहे कारण बरेच मुले पहिल्या प्रयत्नांत सरकारी नोकरीला लागतात. मग सर्वांनी असा नकारात्मक विचार केला तर ते शक्य आहे नाही. भारतातील सर्वांत अवघड स्पर्धा परीक्षा . . . . . आहे जे कलेक्टर होण्यासाठी घेतली जाते त्या परीक्षेत सुद्धा मूल सक्सेस झाली आहेत आणि होतात. सुध्दा स्पर्धा परीक्षा बद्दल अनेक मुलांना गैसमज आहे की, त्यासाठी क्लासेस लावावी लागता, ग्रामीण भागातील मुलांचं काम नाही, शहरी भागातील मुलं जास्त हुशार असतात, आपल्याला इंग्लिश जमत नाही अशी, नाकारत्मक दूषणे लावतात. परंतू कोणत्याही क्षेतात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक विचार, ऊर्जा, नियोजन अती महत्वाच असतो. जुन्या प्रश्न पत्रिका वाचणे, त्याचे विश्लेषण, वर्गीकरण करणे समजून घेणे, स्वतःच्या नोट्स काढणे काही महत्वाची संदर्भ पुस्तक असतात ती प्राप्त करणे या सर्व गोष्टी तुम्हाला तुमच्या यशाकडे घेऊन जात असतात. म्हणूनच काय डार्विनचा सिद्धार्थ सांगतो की जी माणसं जिवंत असतात ती स्वतःला जगण्यास लायक बनवतात ती मागे हटत नाही अपयश मानत नाही आपन सुद्धा हाडमसची जिवंत माणसं आहोत मग हार का मानायची कोणाला ऐक रुपया न देता क्लास वन ची नोकरी तुम्ही स्पर्धा परीक्षेतून मिळवू शकता हे मात्र खर आहे आणि आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आहे त्यात तुम्हाला टाकायचं असेल तर अपार कष्ट करावे लागतील मेहनत करावीच लागेल, नाहीत ध्येय सिद्दी होणार नाही. आज गरीब कुटुंबातील मूल स्पर्धा परीक्षेतून नोकरीवर लागत आहेत हे आपण अनुभवत आहोत पण त्यासाठी समर्पण, त्याग, जिद्द, मेहनत सहनशीलता, सकारात्मक दृष्टीकोन, आणि मेहनत करावीच लगेच कोणी तरी येईल आणि आपली मदत करेल हा भ्रम काढून टाका आणि अभ्यासच योग्य नियोजन व्यवस्थापन करा आणि ध्येय सिद्दी क्रिकेट पेटून उठा संघर्ष जे मैदान आपण आखलं आहे त्यात तुम्हीच वाटेकरी असाल . यात तिळमात्र शंका नसेल. प्रयत्न करिता वाळूचे तेलही गळे.. स्पर्धा परीक्षा म्हणजे मी, मी म्हणजे स्पर्धा परीक्षा ही भावना जागृत ठेवा.!

# उत्तम शुक्रवार : येशू ख्रिस्ताचे बलिदान!



प्रासंगिक

डॉ. संगीता साने,
अकोला,मो. ९९२१९७९५११



उत्तम शुक्रवार प्रभू येशू ख्रिस्ताच्या व्रुसावरील बलिदानाचा दिवस, त्यामुळे मृत्यू उत्तम कसा असू शकतो? असा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. माझ्या देखील मनात होता परंतु त्याचा उलगडा कालांतराने झाला. येशू ख्रिस्ताचे वधस्तंभावरचे मरण ही साधी घटना नव्हती आणि हे सर्वसाधारण मरण नव्हते. हे सर्व पूर्वनियोजित होते. अशी देवाची योजना व इच्छा होती, कारण मनुष्याच्या पापांकरिता पवित्र रक्त ओतण्यास देवपुत्र येशू हाच योग्य व्यक्ती होता. मृत्यू ही जरी दुःखद घटना असली तरी मानवाची पापापासून मुक्तता होण्यास हे बलिदान देवाच्या दृष्टीने आवश्यक होते. मानवाकरिता ही चांगली गोष्ट होती म्हणून हा उत्तम शुक्रवार आहे.

ख्रिश्चन धर्मियांचा पवित्र ग्रंथ बायबलमधील १ योहान १: ७ मध्ये म्हटले आहे, की येशूचे रक्त सर्व पापांपासून मुक्त करते. जुन्या काळात पाप क्षमे करिता पशू बळी देण्यात येत असे, परंतु आता २००० वर्षापूर्वी हे बलिदान येशू ख्रिस्ताने सर्व मानवजातीकरिता एकदाच दिलेले असल्यामुळे आता पशूबळी किंवा नरबळीची आवश्यकता नाही कारण मत्तय २६:२८ मध्ये लिहिलेले आहे की हे माझे (येशूचे) नव्या कराराचे रक्त आहे, पापांची क्षमा होण्याकरिता ओतले जात आहे.

येशूचे पवित्र रक्त मानवजातीच्या पापक्षालन करिता आवश्यक होते. लेवी १७:११ मध्ये लिहिले आहे, की शरीराचे जीवन तर रक्त आहे रक्तावाचून शरीर जिवंत राहू शकत नाही. येशूचा या जगात येण्याचा उद्देशच लूक १९:१० मध्ये सांगितल्याप्रमाणे मनुष्याचा पुत्र (येशू) हरवलेले शोधावयास व पाप्यांना तारावयास आला आहे. पृथ्वीवरील लोक भटकलेले, बहकलेले होते, ते देवापासून दूर गेलेले होते, त्यांना जिवंत देवाची ओळख करून देणे आवश्यक होते. लोकं पापात जगात होते. येशू या जगात पापीलोकांचा वध करण्यास नाही तर पापी लोकांना तारण देण्यास आला. त्याने देवाच्या प्रेमा विषयी लोकांना सांगितले. पवित्र जीवन कसे जगावे या विषयी मार्गदर्शन केले. मनुष्य जातीची सेवा त्याने केली कारण मनुष्याचा पुत्र (येशू) सेवा घ्यावयास नाही तर सेवा करावयास व बंधुतांच्या खंडणीस्तव आपला जीव द्यावयास आला. (मार्क १०:४५) या वाचनामध्ये स्पष्ट लिहिलेले आहे, की येशू ख्रिस्त या जगात सर्व मानवजातीच्या पापांची खंडणी भरुन देण्यास आला आणि वयाच्या ३३ व्या वर्षी निर्दोष असतांना त्याने आपल्या प्राणाचे वधस्तंभावर बलिदान केले. त्याचा वध करणाऱ्यांकरिता त्याने मरणयातना भोगत असतांना देवाजवळ प्रार्थना केली. हे बापा (देवा), तू यांना क्षमा कर कारण हे काय करीत आहेत हे यांना समजत नाही (लूक २३:३४).

येशूने देवाजवळ पाप्यांकरिता प्रार्थना केली कारण एक देव आहे आणि देव व मनुष्य यामधील ख्रिस्त येशू हा एकच मध्य आहे (१ तिमथी २:५) देवाकडे जाण्याचा मार्ग अनेकांनी या जगात सांगितला आहे. देव मूर्तीमध्ये वसत नाही तो सर्वव्यापी आहे. लोकांचे चांगले करणे हे पुण्य व वाईट करणे हे पाप आहे असे अनेक साधूसंतांनी सांगितले आहे. येशू ख्रिस्ताने देवाविषयी सांगितले. तसेच तो स्वतः मानव व देवाच्यामध्ये मध्यस्थ बनला. येशूने म्हटले, मार्ग सत्य व जीवन मीच आहे, माझ्या (येशू) वाचून पित्याकडे (देवाकडे) कोणीच जावू शकत नाही. बायबल हे सत्य वचन आहे आणि त्यामध्ये लिहिले आहे, की देवाने जगावर एवढे प्रेम केले, की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला यासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे (योहान ३:१६) येशू ख्रिस्ताचा मृत्यू हा शेवट नसून येशू तिसऱ्या दिवशी जिवंत झाला. ही अफवा किंवा अंधश्रद्धा नसून या सर्वांचे प्रमाण आजही यरुशलेममध्ये उपलब्ध आहेत. येशूची कबर आजही रिकामी आहे. येशू जिवंत झाल्यानंतर ४० दिवस विविध ठिकाणी शिष्यांना व त्याच्या विश्वासणाऱ्यांना दिसला. तो ४० व्या दिवशी स्वर्गारोहित झाला आणि या जगाच्या शेवटी पुन्हा येणार आहे. या गोष्टीवर जगातील २/३ लोक विश्वास ठेवतात. तुम्ही देखील ठेवावा आणि या घटनेला सामोरे जाण्याकरिता स्वतःला तयार करावे, ही प्रभूची इच्छा आहे.

# अशोक खरात प्रकरण: ही घाण साफ करण्याची गरज!- सोनाली कुलकर्णी



महाराष्ट्र सध्या अशोक खरात प्रकरणामुळे हादरून गेला आहे. सुशिक्षित वर्गातील लोकही भोंदूबाबांच्या भूलथापांना बळी पडून स्वतःचे आर्थिक आणि शारीरिक शोषण करून घेतात, हे भयंकर वास्तव या प्रकरणाने पुन्हा एकदा समोर आले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने एक सोशल मीडिया पोस्ट लिहिली आहे. तिची पोस्ट सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे. विज्ञानाच्या युगातही समाज अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकलेला पाहून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने संताप व्यक्त केला आहे. अशोक खरात प्रकरणानंतर महाराष्ट्रातील सुशिक्षित लोकही भोंदूबाबांच्या जाळ्यात कसे अडकतात, हे वास्तव समोर आलं आहे. यावर सोनालीने समजाला जागृत होण्याचे आवाहन केले आहे.''महिलांवर घृणास्पद अत्याचार, आर्थिक फसवणूक आणि भावनिक शोषण हे सगळं आपल्या अवतीभवती घडतंय, आपण ठगले जातोय,'' अशा शब्दात तिने मनातील भावना व्यक्त केल्या आहेत. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक वेळीच ओळखून समाजातील ही घाण साफ करण्याची गरज आहे, तिने या पोस्टमध्ये अधोरेखित केलं आहे.

आता तरी श्रध्दा आणि अंधश्रद्धा ह्यातला फरक समजून घेऊया..

महिलांवर घृणास्पद अत्याचार, लैंगिक खुळाचार, आर्थिक फसवणूक, ऐय्याशी, भावनिक शोषण.. दांभिकता..

किती संतापजनक, केवढी पिळवणूक..

अजूनही आपण म्हणणार का की आमच्याच धर्मातली अंधश्रध्दा का दिसते..

आपल्या उंबरठ्यावर पडलेली घाण स्वच्छ करायला नको..?

की माझी ती पवित्र अस्वच्छता आणि दुसऱ्याची ती दुर्गंधी..???

महाराष्ट्रात, आपल्या भवताली हे घडतंय..

आपण ठगले जातोय.. जागे होऊया, अशी पोस्ट सोनाली कुलकर्णीने फेसबूकवर केली आहे. सोनाली कुलकर्णीच्या या पोस्टवर नेटकऱ्यांनी विविध कमेंट्स केल्या आहेत. 'श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात कसलाही फरक नाही. श्रद्धा या शब्दातच आंधळेपणाने ठेवलेला विश्वास आहे. डोळस श्रद्धा हा प्रकारचं अस्तित्वात नाही. श्रद्धा ही अंधच असते,' 'शिव शाहू फुले आंबेडकर विचार परत रुजवण्याची गरज आहे,' 'श्रद्धा या शब्दाला सुंदर, अध्यात्मिक अर्थ आहे.. त्यामुळे अंधश्रद्धा हा शब्दच चुकीचा आहे..भंपक, खुळचट विश्वास.. अंधविश्वास असं म्हणा हवं तर..', अशा प्रकारच्या कमेंट्स या पोस्टवर आहेत.

## राशी-भविष्य

**मेष:** आजची भांडवली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला आदर मिळेल. व्यवसाय वाढीमुळे तुमच्या योजनांनुसार काम होईल. तुम्हाला श्वसनाच्या समस्या येऊ शकतात.

**वृषभ:** वेळेवर महत्त्वाची कागदपत्रे सांभाळा; सामाजिक कार्यात तुम्हाला आदर मिळेल. कायमस्वरूपी मालमत्ता खरेदी करण्यात घाई करू नका. कौटुंबिक समस्या सुटतील.

**मिथुन:** आजचा दिवस सर्जनशील असेल. नवीन करार आणि करारांमुळे तुमचा नफा वाढेल. दिवस दैवी कार्यात घालवला जाईल. सार्वजनिक कल्याणाच्या तुमच्या भावनेमुळे तुमची प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क:** धर्मादाय कार्यात पैसा गुंतवला जाईल. सामाजिक कार्यामुळे तुम्हाला चांगली प्रसिद्धी मिळेल आणि तुमचा प्रभाव वाढेल. व्यवसाय चांगला होईल. कुटुंबाच्या पाठिंब्याने कामे सहज पूर्ण होतील.

**सिंह:** कामाच्या मोठ्या ताणात यश तुमचे मनोबल वाढवेल. अनोळखी लोकांवर विश्वास ठेवू नका; तुमची फसवणूक होऊ शकते. कामाच्या ठिकाणी वाढ होण्याची शक्यता आहे.

**कन्या:** आनंद आणि समृद्धी वाढेल. आर्थिक गुंतवणुकीबाबत विचारपूर्वक निर्णय घेतल्यास फायदा होईल. कमी बोला आणि चांगले बोला. स्व-अभ्यासात तुमची आवड वाढेल. कुटुंब आणि समाजात तुमचे महत्त्व वाढेल.

**तूळ:** व्यवसायात सुरू असलेल्या गुंतागुंतीमुळे तुम्ही त्रस्त असाल. तुम्ही कुटुंबातील सदस्यासह एखादे विशेष कार्य पूर्ण करण्यासाठी पवित्र स्थळांना भेट द्याल.

**वृश्चिक:** दिवसाच्या सुरुवातीला राग येईल. जर गोष्टी तुमच्या इच्छेनुसार झाल्या नाहीत तर तुम्ही कुटुंबातील सदस्यांवर नाराज व्हाल. तुम्हाला नवीन नोकरीची ऑफर मिळेल. धार्मिक आवड वाढेल.

**धनु:** गुंतवलेल्या निधीतून मिळणारा नफा उशिरा होईल. तुमच्या मुलांसाठी निर्णय घेण्यास तुम्ही संकोच कराल. बिघडणारी आर्थिक परिस्थिती बांधकाम कामाच्या गतीवर परिणाम करू शकते.

**मकर:** कमी वेळात मोठ्या नफ्याच्या मागे लागू नका. कठोर परिश्रम करा. तुमचे पराक्रम वाढतील. व्यवसायात नवीन योजना सुरू केल्या जातील. घाई हानिकारक ठरेल.

**कुंभ:** आज, विशेष प्रगतीशील योग तुमच्या मनात आनंद आणतील. तुम्ही तुमचे मन भक्तीत गुंतवण्याचा प्रयत्न कराल. कामाच्या ठिकाणी अनुकूल परिणामांसाठी सक्रियता आवश्यक आहे.

**मीन:** आळस सोडून काम करा. रखडलेले प्रकल्प यशस्वी होतील. भांडवली गुंतवणुकीमुळे अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळेल. तुमच्या योजना आणि निर्णयांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तुम्ही एखाद्याकडे आकर्षित व्हाल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# दामिनी आणि धकधक गर्ल मध्ये खरेच स्पर्धा होती? अभिनेत्री मीनाक्षी शेषाद्रींनी जुन्या आठवणींना दिला उजाळा





८० आणि ९० ची लोकप्रिय अभिनेत्री म्हणून मीनाक्षी शेषाद्री ओळखली जाते. 'दामिनी', 'घातक', 'बडे घर की बेटी', 'जुर्म', 'आवारगी', 'औरत तेरी यही कहानी', 'माँ बेटी', 'यह रात फिर ना आएगी' अशा अनेक चित्रपटांतील मीनाक्षी शेषाद्री यांच्या भूमिका गाजल्या.

याच काळात माधुरी दीक्षितदेखील विविध भूमिका आणि चित्रपटांतून लोकप्रिय ठरली. तिला धकधक गर्ल म्हणून ओळखले जाऊ लागले. 'राम लखन', 'प्रेम प्रतिज्ञा', 'त्रिदेव', 'महासंगम', 'किशन कन्हैया', 'जमाई राजा', 'देवदास', 'हम आपके है कौन', 'हम तुम्हारे है सनम', 'घरवाली बाहरवाली', 'मृत्युदंड' अशा अनेक चित्रपटांतून अभिनेत्रीने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. दोघींचीही बॉलीवूडमधील लोकप्रियता मोठी होती. माध्यमे आणि प्रेक्षकांकडून त्यांची अनेकदा एकमेकांशी तुलना केली जायची.


याबरोबरच या दोघींमध्ये स्पर्धा असल्याचेदेखील म्हटले जायचे. मात्र, मीनाक्षी यांनी या चर्चा खोट्या असल्याचे वेळोवेळी सांगितले. दोघींची वेगळी ओळख आहे. तसेच, त्यांच्यात परस्पर आदर असल्याचे त्यांनी म्हटले. या दोन्ही अभिनेत्रींनी १९८६ साली प्रदर्शित झालेल्या 'स्वाती' या चित्रपटात एकत्र काम केले होते. क्रांती कुमार यांनी हा रोमँटिक चित्रपट दिग्दर्शित केला होता. चित्रपटात मीनाक्षी शेषाद्री यांनी प्रमुख भूमिका साकारली होती; तर माधुरी दीक्षितने मीनाक्षी यांच्या सावत्र बहिणीची भूमिका साकारली होती. मीनाक्षी यांच्या शास्त्रीय नृत्याचे कौतुक झाले, तर माधुरीने तिच्या भूमिकेतून लक्ष वेधले.

मीनाक्षी शेषाद्री व माधुरी दीक्षित यांच्यातील मतभेदांची चर्चा टिनू आनंद यांच्या 'शनाख्त' चित्रपटाच्या कास्टिंगदरम्यान झाली होती. सुरुवातीला या चित्रपटात मुख्य भूमिकेसाठी डिंपल कपाडिया यांची निवड करण्यात आली होती, तर मीनाक्षी दुय्यम भूमिकेत होत्या. मात्र, मानधनाच्या कारणामुळे डिंपल यांनी नकार दिल्यानंतर मुख्य भूमिकेसाठी माधुरी दीक्षितची निवड झाली आणि मीनाक्षी यांची भूमिका दुय्यम ठरली. या गोष्टीवर नाराज होऊन मीनाक्षी यांनी माधुरीबरोबर काम करण्यास नकार दिला असे म्हटले जाते, ज्यामुळे दोघींमध्ये तणाव निर्माण झाला. शेवटी चित्रपटाचे शूटिंग थांबवण्यात आले. त्यानंतर या दोघी अभिनेत्री कधीही एकत्र स्क्रीनवर दिसल्या नाहीत.

एकदा बॉम्बे टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत मीनाक्षी शेषाद्रीने माधुरी दीक्षितबरोबर होणाऱ्या तुलनेबाबत वक्तव्य केले होते. अभिनेत्री म्हणालेली, ''मी कधीच माधुरीसारखी होऊ शकत नाही, माधुरीसुद्धा माझ्यासारखी असूच शकत नाही, आमच्यात कोणतीही स्पर्धा नाही.''

दरम्यान, सध्या मीनाक्षी शेषाद्री अभिनय क्षेत्रापासून दूर असल्याचे पाहायला मिळते. मात्र, त्या सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येतात; तर माधुरी दीक्षित विविध चित्रपट, सोशल मीडिया, रिॲलिटी शो या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येते.

# ओळख पक्ष्यांची : मोर



या प्रतिमेमध्ये एक भारतीय मोर, विशेषतः सामान्यतः मोर म्हणून ओळखला जाणारा नर दिसत आहे. हा भारताचा राष्ट्रीय पक्षी असून, तो त्याच्या मनमोहक सौंदर्यासाठी आणि सांस्कृतिक महत्त्वासाठी ओळखला जातो. नरांची छाती आणि मान चमकदार निळ्या रंगाची असते, त्यांच्या डोक्यावर पंख्याच्या आकाराचा पिसांचा तुरा असतो आणि शेपटीच्या लांब पिसांचा एक भव्य पदर असतो, जो ते प्रणयराधना करताना पंख्यासारखा पसरवतात. हे पक्षी मूळचे दक्षिण आशियातील असून सामान्यतः मोकळ्या जंगलांमध्ये किंवा लागवडीयोग्य जमिनींजवळ जमिनीवर राहतात. मोर सर्वभक्षी असून ते बोरे, धान्य, साप आणि सरडे खाऊन जगतात.

(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 353



अहवाल
आगमन
आचमन
ईरसाल
कलदार
कलरव
कष्टसाध्य
कसरत
खडाष्टक
गालगुंड
जमानत
नवनीत
नातलग
परिचर
पुण्यवान
मनमानी
यमराज
रक्तदान
राजपूत
वरमाय
वरमाला
श्रीनगर
सदारत
हलाहल

**पाच अक्षरी**
अजरामर
अवलोकन
जय जगत
डाकबंगला
पुनर्विवाह
महाशिवरात्र
रोमहर्षक
श्रीरामपूर
समजदार

**सहा अक्षरी**
अहमहमिका
अहिल्यानगर
चरक संहिता
सिंहावलोकन
नरो वा कुंजरोवा

(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
कर
कर्ण
कल
कुंती
गीत
चर्म
जप
डक
तव
तमा
त्रय
दानी
नग
पाव
पैसा
भाता
मस
मका
रक्त
रथ
रात
रामा
रोम
लक
लादी
वग
वज
वात
वाला
शिव
सम
सर
सिंह
हर्ष
हाल

**तीन अक्षरी**
अभाव
असाध्य
आकर्ण
आकस
आदर
कमाल
गजरा
गरज
गारदी
गुंडाळी
जतन
जनक
जवान
डालडा
तगर
दलाल
दानव
नमाज
नरक
नवरा
पथक
पावन
पोंगल
प्रहर
मलई
महती
मिरगी
रमण
रवाना
रानवा
लकवा
लावण्य
वरदा
वाकडा
सकस
सालस
साहस


चार अक्षरी

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पु | न | र्व | सु | | पा | रि | जा | त | क | | त | क | ला | दू | |
| र | ग | | दा | न | व | ता | | र | | पो | ह | रा | | | |
| चुं | | ना | मा | व | ली | | अ | ल | ब | त | | र | हा | ट | |
| डी | | य | | स | | श | | | हू | | स्व | | य | | ज |
| | स्वा | ग | त | | म | नी | व | से | ते | स्व | प्नी | दि | से | | ग |
| झा | | रा | मा | य | ण | | ऱ्हा | | क | | न | या | | झो | त |
| ल | त | | | ज | ग | बु | डी | | | क | स | | लु | | पा |
| र | वा | | ट | मा | ट | र | | आ | का | र | णे | | ट | पा | ल |
| | | ज | वा | न | | शी | त | ल | | व | | सा | मा | ई | क |
| ज | प | मा | ळ | | अ | | ग | य | | ला | भ | का | र | क | |
| व | त | न | | म | धु | क | र | | मा | | ग | र | | | गो |
| ळ | | त | प | न | | रा | | ग | व | ग | वा | | पा | र | |
| ज | प्त | | | मो | रू | ची | मा | व | शी | | झें | ग | ट | | इ |
| व | | द | र | ड | | | हु | त | | ख | डा | वा | | खु | जा |
| ळ | | | ग | णे | श | वा | त | | ना | ला | | | सा | | बि |
| | स | ता | ड | | त | व | | द्वा | द | शी | | अ | ल | गु | जा |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 734



**—: आडवे संकेत :—**

1) दांडगाई, सामर्थ्याचा दुरुपयोग, जबरदस्ती
3) दूर करणे, निरसन
5) स्वातंत्र्य (उर्दू), अमिताभ बच्चन आणि श्रीदेवीने या चित्रपटात एकत्र अभिनय केला
10) कूळ
11) चेहऱ्यावरील हालचाल
13) तपश्चर्या
15) ओढा, झोक
16) श्रीकृष्णाचा निर्दयी मामा
17) विमानाची धावपट्टी (इं)
19) तोटा
21) अस्वल इ. प्राण्यांच्या तमाशावर पोट भरणारा
24) वस्त्र विणण्याचे यंत्र
25) ऐवज, द्रव्यसंख्या
27) आव्हान देणे
30) सोबती, मित्र
31) धातूची परीक्षा
33) उन्हाळयात थंडावा येण्यासाठी वापरण्यात येणारे एक सुगंधी तृण व त्याची मुळे
35) सहकारी संस्था सुरू करणारा प्रमुख
36) शिवपत्नी पार्वतीचे एक नाव
37) मशीन, उपकरण
38) ध्रुव व ध्रुववृत्ते यामधील प्रदेश
39) चिन्ह, गुणधर्म
45) ज्याचा चेहरा बघून भीती वाटेल असा, भयंकर चेहऱ्याचा
47) महाभारतात अज्ञातवासातील युधिष्ठीराने धारण केलेले नाव
48) ललाट, भाल
51) विश्वातील वस्तूंचे परस्पराकर्षण
52) शेतातील पिकांवर घेतलेली मेहनत
55) ज्ञान, ब्रह्मज्ञान
56) कमळासारखे सुंदर डोळे
61) राजीनामा
62) वेळ, अवधी
63) कारण, पुढील योजना
65) इतरांपेक्षा समोर जाणे, सरशी
67) शिजलेल्या भाताचा एकएक दाणा
69) पूर्वीचा होऊन गेलेला
70) मध्ये, मधल्या वेळात
72) शोभिवंत रचना
73) दिवा विझविणे
74) देश स्थळाचे चित्र
75) समान, सारखे

**—: उभे संकेत :—**

2) रांजण, मोठे पोठ
3) थट्टा, विनोद
4) सहाय्य, मदत
5) आकाशात रंगीबेरंगी दिसणारी धनुष्याकृती
6) एक अत्यंत ज्वालाग्राही पदार्थ
7) भाग, खंड
8) मौल्यवान वस्तू
9) विज्ञान शास्त्रात ज्याच्या मदतीने अतिशय लहान गोष्ट मोठी करून बघता येते असे यंत्र
10) वेलीप्रमाणे वाढणारा वंश
12) वनात रमणारा, श्रीकृष्ण
14) घ्राणेंद्रिय
15) सुवर्ण
18) गती
20) समान
22) चांगल्या वर्तनाचा
23) गमन, प्रस्थान करणे
26) माकडाचा खेळ दाखविणारा
28) एक रंगप्रकार
29) द्राक्ष
30) संपूर्ण, सर्व
32) अनेक दिवस चालणारा धार्मिक समारोह
34) कमळ
35) पदवीसाठी विद्यापीठास सादर केलेला विस्तृत निबंध
36) क्षुल्लक प्रतीचे
40) अल्पकाळ टिकणारे
41) भारतातील एक सर्वात मोठे प्रमुख धरण
42) समाविष्ट, आत शिरणे
43) लक्ष वेधणारे, ओढणारे
44) वरच्या टरफलासहित तांदूळ
46) गुरुवारी पुण्यनक्षत्र येणे हा शुभ योग
47) लहान लहान खडे (हिं)
49) लहान मुलांची लिहिण्याची फळी
50) प्रकाशणे
53) हिंदीत संध्याकाळ
54) गवताची काडी
55) नम्र
57) केवळ सांगितलेले काम करणारा
58) लायकी
60) मृत्यू देवता
64) काळजीपूर्वक रक्षण
65) मोठी करवत
66) तोंडात घातलेला अन्नाचा गोळा
68) तुझे (सं)
70) स्थिती, अवस्था
71) तपकीर

(उत्तर पुढील अंकी )

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नि | रा | शा | वा | दी | | प | रे | प | क्र | र | | तों | ड | ओ | ळ | ख |
| र | ब | | त | प | श्च | र्या | | ह्य | त | | ग | डी | | घ | | प |
| स | ता | र | | शि | | व | ऱ्हा | डी | | स | र | प | ण | | अ | |
| न | | च | र | खा | | र | | आ | द्य | | ज | री | | त | नु | ज |
| | अ | ना | थ | | प | ण | | वा | | उ | | क्षा | र | | क | |
| चे | व | | स | ख्य | | | उ | ज | ळ | णी | | | मा | | र | क्षा |
| | स | मा | प्त | | स | र्वो | च्च | | | व | च | क | | म | ण | |
| न | र | | मी | न | | | प | र | त | | | ल | की | र | | स |
| व | | अ | | त | र | तू | द | | बे | ल | गा | म | | ण | | मू |
| के | षा | ध्य | क्ष | | त | ट | स्थ | | ला | | ज | क | ड | | मा | ह |
| ट | | क्ष | त्रि | य | | पुं | | यु | | अ | र | स | | स | ल | गी |
| ना | ज | | य | | रा | जी | व | गां | धी | | | ई | | म | | त |
| रा | ख | | त | ल | म | | स | त | | क | | | त | क्ष | क | |
| य | म | | पी | | ज | वा | ह | र | ला | ल | ने | ह | रु | | ण | |
| ण | | धा | | ज | न्म | | त | | ड | र | | ज | त | न | | शु |
| | अ | व | धा | न | | | | डे | क्र | व | णे | | ल | व | ची | क |

Uday Munde - 8446302691

## महत्त्वाचे

### २४ कोटींचा सोने तारण घोटाळा

**नागपूर :** आयसीआयसीआय बँकेच्या ९ शाखांमध्ये सोन्याचे बनावट दागीने तारण ठेवून कर्जाची रक्कम उचलून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा चव्हाट्यावर आला. वार्षिक अंकेक्षण अहवालातून हे सत्य समोर आले. यात बँकेतले खातेदार, तारण सोन्याचा दर्जा ठरवण्यासाठी नेमलेले व्हॅल्युअर, अंकेक्षण अधिकारी आणि बँकेतले अधिकारीच सहभागी असल्याचेही उघड झाले. त्यामुळे बँकेची कर्जाच्या रकमेपोटी २३ कोटी १९ लाख ४१ हजार रुपयांची फसवणूक झाली. बँकेचे विभागीय व्यवस्थापक धनंजय रमेश थिटे (४९) यांनी केलेल्या तक्रारीवरून सचिन राऊत, व्हॅल्यूअर नंदू खरवडे, ऑडिटर राजेंद्र शिलनकर, प्रमोद टेटे, धनंजय ढोमणे, शाखा प्रमुख पंकज केकतपूरे या ठगबाजांवर गुन्हा दाखल झाला आहे.

### भांडे व्यवसायिकाचे १६ लाख बळकावले

**नागपूर :** भागीदारीतून सुरू केलेल्या भांड्यांच्या दुकानातील वादातून इतवारी येथील भांडे व्यावसायिक अक्षय लिल्हारे यांना पार्टनरनेच जीवे मारण्याची धमकी देत १६ लाख रुपये बळकावले. सतीश बालाजी कांद्रीकर असे लुटारू भागीदाराचे नाव आहे. सतिशने लिल्हारे यांच्यासोबत भागीदारीत भांड्याचे दुकान सुरू केले होते.
नंतर दोघांमध्ये वाद झाला. सतीश कांद्रीकर हा चोरीची भांडी आणत असे. मूळ दुकानदाराला ही माहिती कळाल्यावर त्याने ८० लाखांचा माल वसूल केला. यानंतर सतीशने उलट अक्षय यांच्यावरच संशय घेत, धमकावत १६ लाख रुपये घेतले. अक्षयने दिलेल्या तक्रारीवरून तहसील पोलिसांनी गुन्हा नोंदवला.
तिघांवर क्षुल्लक कारणाने हल्ला
कळमना बाजार समिती परिसरात पानठेला चालकावर तिघांनी हल्ला केला तर विजय नगर भागातही रात्री वाहनाचा धक्का लागला म्हणून झालेल्या वादाचे रूपांतर हिंसक हाणामारीत झाले. रात्री साडेबाराच्या सुमारास माजरी येथील रेल्वे पुल बोगदा महफील पान दुकानासमोर लक्की प्रल्हाद हरिणखेडे (१९), पीयुष उर्फ रोहित मनोज कांबळे आणि एक विधीसंघर्षग्रस्त बालकाने पानाचे दुकान चालवणारा मोहन यादव याच्यावर हल्ला केला.

### वर्धा मार्गावर पुन्हा प्राणांतिक अपघात

**नागपूर :** वर्धा मार्गावरील शुअरटेक रुग्णालयासमोरील पुलावर अज्ञात वाहन चालकाने दिलेल्या धडकेत मोटरसायकलस्वार गंगाधर राजेराम दुधकवर (४५, रा. धुटी, पोस्ट. डोंगरगाव) यांचा उपचारासाठी नेताने मृत्यू झाला. गंगाधर हे दुचाकीने खापरी येथून काम आटोपून घरी जात होते. पाठीमागून आलेल्या वाहनचालकाने धडक देत पळ काढला. विकेश दुधकवर यांनी दिलेल्या तक्रारीवरून हिंगणा पोलिसांनी हिट अँड रनचा गुन्हा दाखल केला.

### ज्येष्ठाकडील रोख हिसवणाऱ्या लुटारूला अटक

**नागपूर :** लिफ्ट देण्याच्या बहाण्याने ज्येष्ठ नागरिक धनराज नक्टुजी गेडाम (७४, रा. ओवाळा, ता. नागभिड) यांना निर्जनस्थळी नेऊन जीवे मारण्याची धमकी देत रोख ३ हजारांची रक्कम लूटणाऱ्या प्रज्वल गजानन गोळे (२१, रा. मेढा, भिवापूर) याला पोलिसांनी दुसरे सावज शोधताना अटक केली. प्रज्वलने उमरेड बसस्थानकावरून धनराज यांना लिफ्ट देण्याच्या बहाण्याने निर्जन स्थळी नेत हा प्रकार केला होता.

### तिघांवर क्षुल्लक कारणाने हल्ला

**नागपूर :**कळमना बाजार समिती परिसरात पानठेला चालकावर तिघांनी हल्ला केला तर विजय नगर भागातही रात्री वाहनाचा धक्का लागला म्हणून झालेल्या वादाचे रूपांतर हिंसक हाणामारीत झाले. रात्री साडेबाराच्या सुमारास माजरी येथील रेल्वे पुल बोगदा महफील पान दुकानासमोर लक्की प्रल्हाद हरिणखेडे (१९), पीयुष उर्फ रोहित मनोज कांबळे आणि एक विधीसंघर्षग्रस्त बालकाने पानाचे दुकान चालवणारा मोहन यादव याच्यावर हल्ला केला.

# धामणगाव (गवळी) शाळेची परसबाग नागपूर जिल्ह्यात अव्वल

***प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेत प्रथम क्रमांक**
***सेंद्रिय शेतीतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास**

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भिवापूर , दि. १ :** जिल्हा परिषद, शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत परसबाग उपक्रमात तालुक्यातील धामणगाव (गवळी) येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने उल्लेखनीय यश संपादन करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शाळेचे मुख्याध्यापक सतीश बाबुराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, विद्यार्थी, पालक, स्वयंपाकी व मदतनीस यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. परसबागेत सेंद्रिय पद्धतीने विविध पालेभाज्या व फळभाज्यांची लागवड करून शालेय पोषण आहारासाठी ताजा भाजीपाला उपलब्ध केला जात आहे.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सेंद्रिय शेतीची आवड, निसर्गप्रेम, जबाबदारीची जाणीव आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होत आहे. उरलेल्या भाजीपाल्याची विक्री करून विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञानाचाही अनुभव मिळत आहे.

परसबागेत गोलाकार पद्धतीने १४ वाफ तयार करून पालक, मेथी, कोथिंबीर, वांगी, मिरची, टमाटर, भेंडी, फुलकोबी, पत्ता कोबी तसेच आंबा, फणस, चिकू, पपई आदी विविध पिकांची लागवड करण्यात आली आहे. सांडपाणी, पावसाचे पाणी साठवण, ठिबक सिंचन व सेंद्रिय खतांचा वापर करून पर्यावरणपूरक शेतीचे उत्तम उदाहरण शाळेने घालून दिले आहे. जंगलालगत परिसर असल्याने माकडांचा उपद्रव असूनही मदतनीस वैशाली लोहंबरे व विद्यार्थी सुट्टीच्या दिवशी परसबागेचे रक्षण करत आहेत.या उपक्रमासाठी तालुका स्तरावर ११ हजार रुपये व जिल्हा स्तरावर २१ हजार रुपयांचे पारितोषिक शाळेला मिळाले.या यशाबद्दल शिक्षक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे विशेष योगदान असून विविध मान्यवरांनी शाळेचे अभिनंदन केले आहे



# पत्नी कमावती असली तरी पोटगी नाकारता येत नाही

## उच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. १ :** पत्नी काही प्रमाणात उत्पन्न मिळवत असली तरी ते तिच्या उपजीविकेसाठी पुरेसे आहे का, याचा विचार केल्याशिवाय पोटगी नाकारता येत नाही, असे स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पतीची पुनर्विचार याचिका फेटाळली. परिणामी, पत्नी व मुलाला प्रत्येकी दरमहा दोन हजार पोटगी देण्याचा कुटुंब न्यायालयाचा आदेश कायम ठेवण्यात आला. न्या. उर्मिला जोशी-फाळके यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

नागपूर येथील मुलाचा यवतमाळमधील मुलीसोबत १९ नोव्हेंबर २०१९ रोजी विवाह झाला होता. त्यांना एक मुलगा असून, वैवाहिक वादानंतर पत्नीने पतीकडून छळ व दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत पोटगीसाठी अर्ज दाखल केला होता. कुटुंब न्यायालयाने पत्नी व मुलाला प्रत्येकी दोन हजार पोटगी मंजूर केली होती. या आदेशाला



पतीने उच्च न्यायालयात आव्हान दिले.

पत्नी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी करत असून सुमारे ५४ हजार पेक्षा अधिक उत्पन्न मिळवत असल्याने ती स्वतःचा उदरनिर्वाह करू शकते, असा दावा पतीने केला. तसेच पत्नीच स्वतःहून घर सोडून गेली असल्याने पोटगी देण्याचा प्रश्नच येत नाही, असेही त्याने नमूद केले.न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, पत्नीची नोकरी ही तात्पुरत्या स्वरूपाची आहे. केवळ पत्नी काही उत्पन्न मिळवत आहे, या आधारावर तिच्या पोटगीच्या हक्कावर गदा आणता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा संदर्भ देत, 'पत्नी कमावती असली तरी तिचे उत्पन्न पुरेसे आहे का, हे तपासणे आवश्यक आहे,' असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच पतीने स्वतःचे उत्पन्न स्पष्ट केले नसल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आले. सक्षम पतीने पत्नी व मुलाच्या पालनपोषणाची जबाबदारी टाळता येत नाही, असे नमूद करत न्यायालयाने पतीचा दावा फेटाळला.

### महागाई गगनाला भिडली

महागाईचा विचार करता आवश्यक वस्तूंच्या किंमती झपाट्याने वाढत आहेत. अशा परिस्थितीत पत्नीला स्वतः चा तसेच मुलाच्या शिक्षण व संगोपनाचा खर्च भागवावा लागतो. त्यामुळे कुटुंब न्यायालयाने पत्नी व मुलाला प्रत्येकी दरमहा दोन हजार पोटगी मंजूर केली असली तरी ती रक्कम माफक असल्याचे न्यायालयाने नमूद केले. तसेच पोटगी निश्चित करताना पक्षकारांची सामाजिक स्थिती, जीवनमान, आर्थिक पार्श्वभूमी, पत्नी व मुलांच्या गरजा, तसेच शिक्षण, अन्न, निवारा आणि वैद्यकीय खर्च यांचा विचार करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. पत्नीच्या उत्पन्नाचा स्रोत असल्यास तो तिच्या उपजीविकेसाठी पुरेसा आहे का, याचेही मूल्यमापन करणे गरजेचे असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

# यवतमाळच्या महिला खेळाडूंची राज्य संघात निवड

## फ्लोअरबॉलपटूंची राष्ट्रीय भरारी, महाराष्ट्र संघात नऊ खेळाडू

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १ :**जिल्हा फ्लोअरबॉल असोसिएशन आणि आकाश चिकटे स्पोर्ट्स अकॅडमीच्या नऊ महिला खेळाडूंची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशा येथे २ ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान होणाऱ्या १९ व्या राष्ट्रीय खुल्या फ्लोअरबॉल अजिंक्यपद स्पर्धेत या खेळाडू राज्याचे प्रतिनिधित्व करणार असून, जिल्हा क्रीडा इतिहासात प्रथमच महिलांनी ही उतुंग भरारी घेतली आहे.
इंडियन फ्लोअरबॉल फेडरेशन आणि फ्लोअरबॉल फेडरेशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या १९ व्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये सुहानी गजानन चणेकर, खुशी विनोद गायकवाड, नेहा जगदीश वकलकर, टीना सुरज लामटे, पूनम महादेव खोडके, साक्षी राजेश राठोड, काजल देवराव खोडके, कार्तिका अशोक ठोकळ आणि रिया शंकर कानदे यांचा समावेश आहे. महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक म्हणून गजानन मुकणार यांची नियुक्ती झाली आहे. या खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय महाराष्ट्र फ्लोअरबॉल असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे, सचिव रविंद्र चौथवे, दीपक वाडे आणि आकाश चिकटे स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष मनोज इंगोले यांना दिले आहे.
तसेच जिल्हा असोसिएशनचे सुशील कोठारी, अमोल बोदडे, उपाध्यक्ष मनोज येंडे, सचिव तथा क्रीडा मार्गदर्शक जितेंद्र सातपुते, तांत्रिक सल्लागार प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे, उद्योगपती देवेंद्र भोयर आणि सहसचिव सचिन भेंडे यांचेही मार्गदर्शन लाभले. आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडू आकाश चिकटे, एम. एन. मिर, पियुष भुरचंडी, अविनाश लोखंडे, प्रा. डॉ. आनंद भुसारी, अजय मिरकुटे आणि जगदीश जागीड यांनी खेळाडूंचे कौतुक केले. प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी शिल्पा चाबूकस्वार, क्रीडा अधिकारी सचिन हरणे आणि चैताली राऊत यांनी या यशाबद्दल खेळाडूंचा गौरव केला. पंकज नानवाणी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या असून, हे खेळाडू आता राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरासाठी रवाना झाले आहेत. यवतमाळच्या क्रीडा विश्वात प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने महिला खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर मजल मारल्याने सर्वत्र जल्लोष व्यक्त होत आहे.

# नमो उद्यानाची निश्चित जागा बदलण्याची मागणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भिवापूर , दि. १ :** नगर पंचायतमधील उपनगराध्यक्ष व नगरसेवकांनी नमो उद्यानासाठी निश्चित करण्यात आलेली जागा बदलण्याची मागणी करत जिल्हाधिकारी व जिल्हा सहआयुक्त,नगरपालिका प्रशासन यांना सोमवारी (ता.३० मार्च) निवेदन सादर केले आहे.
सद्यस्थितीत नमो उद्यानासाठी गट क्रमांक ७५४ ही जागा निश्चित करण्यात आली असून ही जागा शहराच्या बाहेरील भागात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच या परिसरात पूर्वीपासून अतिक्रमण झाल्यामुळे आणि नागरिकांची वर्दळ कमी असल्यामुळे उद्यानाचा अपेक्षित उपयोग होण्याची शक्यता कमी असल्याचेही सांगण्यात आले आहे.यापूर्वीही काही शासकीय इमारती अनुचित ठिकाणी उभारण्यात आल्याने त्या सध्या वापरात नसून जीर्ण अवस्थेत उभ्या आहेत. निर्जन ठिकाणी अशा वास्तूंमध्ये अवैध प्रकार घडण्याची शक्यता असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांसाठी संगणक संच व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कोरपना , दि. १ :**तालुक्यातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात तसेच शाळांमध्ये मूलभूत गरजांची पूर्तता व्हावी यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. कोरपना तालुक्यातील पारडी येथील प्रियदर्शनी विद्यालयात संगणक संच उपलब्ध करून देण्यात आले असून विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचा लाभ मिळणार आहे.
तसेच कोरपना येथील वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच माथा येथील श्री शिवाजी विद्यालय येथे विद्यार्थ्यांसाठी थंड व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी आरो फिल्टर मशीन बसविण्यात आली आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळणार असून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही ही सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.
ही सर्व सुविधा नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांच्या स्थानिक विकास निधीतून करण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील शाळांमध्ये अशा सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळा प्रशासन, शिक्षक व पालकांनी या उपक्रमाचे स्वागत करत आभार मानले आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांच्या आरोग्याची काळजी घेणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

# गडचांदूर येथे १० कोटींचे भव्य बसस्थानक मंजूर!

## ७९ वर्षांची प्रतीक्षा संपली; औद्योगिक नगरीला मिळणार अत्याधुनिक बसस्थानक

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर , दि. १ :** गडचांदूर औद्योगिक नगरी म्हणून नावलौकिक असलेल्या गडचांदूर शहराच्या विकासातील एक अत्यंत सुवर्णक्षण आज उजाडला असून, आमदार देवराव भोंगळे यांच्या अथक पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मतदारांना दिलेला शब्द आमदारांनी केवळ एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करून दाखवला आहे. महाराष्ट्र शासनाने गडचांदूर येथे अत्याधुनिक सुविधांनी युक्त अशा नवीन बसस्थानकाच्या उभारणीसाठी १० कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर केला असून, यामुळे शहराच्या विकासाचा एक ऐतिहासिक टप्पा गाठला गेला आहे.
देशाच्या स्वातंत्र्याला ७९ वर्षे पूर्ण होऊनही गडचांदूरसारख्या महत्त्वाच्या शहरात हक्काचे एसटी




बसस्थानक नव्हते, ही मोठी शोकांतिका होती. आजवर अनेक लोकप्रतिनिधींनी या क्षेत्राचे नेतृत्व केले, मात्र या ज्वलंत प्रश्नाकडे नेहमीच दुर्लक्ष झाले. परिणामी, दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना, सिमेंट उद्योगातील कामगारांना, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना उन्हाळा-पावसाळ्यात उघड्यावर उभे राहून एसटीची वाट पाहावी लागत होती. विशेषतः लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या मातांची होणारी गैरसोय आणि पिण्याच्या पाण्यासह स्वच्छतेच्या सोयींचा असलेला अभाव यामुळे जनतेत मोठा असंतोष होता. जनसामान्यांची ही वर्षानुवर्षांची वेदना ओळखून आमदार देवराव भोंगळे यांनी निवडून आल्यानंतर पहिल्या दिवसापासून या प्रश्नाला निकाली काढण्याचा ध्यास घेतला होता. याठिकाणी बसस्थानक निर्मितीसाठी जागेचा प्रश्न होता; त्यामुळे त्यांनी यशस्वी पाठपुराव्याने तो प्रश्न निकाली काढून बसस्थानकासाठी हा निधी खेचून आणला. आमदार देवराव भोंगळे यांनी केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृतीवर भर दिला. त्यांनी विधानसभेच्या अधिवेशनात या प्रश्नावर जोरदार आवाज उठवत शासनाचे लक्ष वेधले. विविध संसदीय आयुधांचा प्रभावी वापर करत आणि शासन दरबारी सातत्याने मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस आणि परीवहन मंत्री ना. प्रतापजी सरनाईक, राज्यमंत्री ना. माधुरीताई मिसाळ यांच्याकडे पाठपुरावा करून त्यांनी या बसस्थानकाची कोंडी फोडली. याचीच फलश्रुती म्हणून राज्य शासनाच्या गृह विभागाने यासंदर्भात विशेष शासन निर्णय निर्गमित करून या कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान केली आहे. या निर्णयानुसार गडचांदूर येथे उभारले जाणारे बसस्थानक हे अत्यंत आधुनिक स्वरूपाचे असणार आहे. यामध्ये तळमजल्यावर प्रशासकीय कार्यालय, पहिल्या मजल्यावर कर्मचाऱ्यांसाठी विश्रांतीगृह, भव्य वाहनतळ, पेव्हर ब्लॉक, आकर्षक कुंपणभिंत आणि गेट अशा सुविधा असतील. तसेच, पर्यावरणाचा विचार करून रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि सुरक्षेसाठी अग्निशमन यंत्रणा व सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. विशेष म्हणजे, माता-भगिनींसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित कक्षाची तरतूद या इमारतीत करण्यात आली आहे.
या ऐतिहासिक यशाबद्दल माहिती देताना आमदार देवराव भोंगळे यांनी सांगितले की, गडचांदूर ही केवळ एक औद्योगिक नगरी नसून या भागातील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. येथे सुसज्ज बसस्थानक असणे ही काळाची गरज होती. या १० कोटींच्या निधीतून उभारल्या जाणाऱ्या बसस्थानकामुळे परिसरातील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होईलच, पण त्यासोबतच प्रवाशांना सन्मानाने प्रवास करता येईल. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरच या इमारतीचे भूमिपूजन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली आहे.

# वीज बिल वाढतेय? स्मार्ट मीटरला दोष देण्यापूर्वी घरातील अर्थिंग तपासा!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

थोडक्यात काय तर, तंत्रज्ञान बदलत असताना ग्राहकांनी देखील जागरूक होणे गरजेचे आहे. वाढीव वीजबिलाचे खापर केवळ नवीन स्मार्ट मीटरवर फोडण्याऐवजी, आपल्या घरातील वायरिंग आणि अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करणे हाच आर्थिक फटका टाळण्याचा प्रभावी मार्ग आहे. योग्य अर्थिंग म्हणजे केवळ सुरक्षा नव्हे, तर पैशांची बचत देखील आहे!

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी**
महावितरण, नागपूर

**नागपूर, दि. १ :**सध्या सर्वत्र स्मार्ट मीटरच्या संदर्भातील चर्चांना उधाण आले असून, अनेकांना आपले वीज बिल वाढून येत असल्याची तक्रार आहे. मात्र, वीज बिलात होणाऱ्या या वाढीमागे केवळ मीटर कारणीभूत नसून, घरातील सदोष अर्थिंग किंवा न्यूट्रल लीकेज हे मोठे तांत्रिक कारण असू शकते. तांत्रिक भाषेत सांगायचे तर, तुमच्या घरातील वीज गळती तुमच्या नकळत मीटरमध्ये युनिट्स वाढवत असते, ज्याचा भुर्दंड शेवटी ग्राहकालाच सोसावा लागतो. आपल्या घरातील विद्युत उपकरणे चालवण्यासाठी फेज आणि न्यूट्रल अशा दोन तारांची आवश्यकता असते. विद्युत प्रवाह फेजमधून उपकरणात जातो आणि न्यूट्रलद्वारे परत फिरतो. जेव्हा घराचे अर्थिंग कमकुवत होते किंवा न्यूट्रल वायरमध्ये दोष निर्माण होतो, तेव्हा वीज प्रवाहाचा काही भाग जमिनीकडे वाहू लागतो. स्मार्ट मीटर हे अत्यंत अचूक असतात. हे मीटर फेज आणि न्यूट्रल या दोन्ही वायरमधील विद्युत प्रवाहाची स्वतंत्रपणे नोंद ठेवतात. जर तुमच्या वायरिंगमध्ये दोष असेल आणि वीज गळती होत असेल, तर स्मार्ट मीटर ती नोंदवतो
वीज गळतीची मुख्य कारणे: अनेक वर्षांपासून न बदललेल्या वायर्सचे कोटिंग खराब होऊन भिंतीतून वीज गळती होऊ शकते. अर्थिंगचा खड्डा कोरडा पडणे किंवा तांब्याची पट्टी गंजणे यामुळे योग्य अर्थिंग मिळत नाही. फ्रीज, गिझर किंवा इस्त्री यांसारख्या धातूचे




आवरण असलेल्या उपकरणांमधून वीज गळती होण्याची शक्यता जास्त असते. शेजाऱ्याच्या किंवा इतर सर्किटच्या न्यूट्रल वायरशी तुमच्या वायरिंगचा संबंध आल्यास मीटर वेगाने फिरू लागतो.
प्रतिबंधात्मक उपाय: आपल्या घरातील पूर्ण वायरिंगची इन्सुलेशन रेझिस्टन्स टेस्ट परवानाधारक इलेक्ट्रिशियनकडून करून घ्यावी. घराच्या मेन स्विच बोर्डमध्ये अर्थ लीकेज सर्किट ब्रेकर किंवा बसवणे अत्यंत आवश्यक आहे. जर कुठेही वीज गळती झाली, तर हे उपकरण तात्काळ वीजपुरवठा खंडित करते, ज्यामुळे विजेचा धक्का बसण्यापासून बचाव होतो आणि बिलही वाचते. पावसाळ्यापूर्वी आणि उन्हाळ्यात अर्थिंगच्या खड्ड्यात पाणी व मीठ-कोळसा टाकून ओलावा टिकवून ठेवावा. स्मार्ट मीटर अचुक आहे तरी देखील जर अर्थिंग व्यवस्थित असूनही बिल जास्त वाटत असेल, तरच महावितरणकडे मीटर टेस्टिंगसाठी अर्ज करावा.

# समतापर्व २०२६: भव्य चित्रकला स्पर्धेचे थाटात उद्घाटन

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १ :**यवतमाळच्या ऐतिहासिक समता पर्वाच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येत असतात त्यातील महत्त्वाचा उपक्रम म्हणून जिल्हास्तरीय भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते चित्रकला स्पर्धेची जबाबदारी आदरणीय जेडी मनवर सर हे सातत्याने सांभाळत आले आहेत.
समता पर्व २०२६ च्या जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेचे उद्घाटन मा जिजाऊ नगरपरिषद शाळा क्रमांक २० या ठिकाणी दिनांक २८मार्च रोजी मोठ्या थाटात संपन्न झाले या स्पर्धेचे उद्घाटन नगरपालिका यवतमाळचे प्रशासन अधिकारी मा.डॉ विनोद डवले यांच्या हस्ते संपन्न झाले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका वंदना उईके ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून समतापर्वाचे विद्यमान अध्यक्ष मा नारायण थूल सर, मा. वैजयंती भेंडारकर आदी मान्यवर उपस्थित होते, या स्पर्धेमध्ये सुमारे ३०० शाळकरी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत प्रथम येणा?याला दिवंगत भीमराव लिंगे यांच्या स्मृती प्रीत्यर्थ्य मा शालू ताई लिंगे यांच्याकडून, द्वितीय येणाऱ्याला दिवंगत नानाजी तामगार्डगे यांचा स्मृति प्रित्यर्थ अनिकेत तामगाडगे यांच्यातर्फे तरतृतीय येणा?या स्पर्धकास दिवंगत भानुदासजी भवरे यांच्या स्मृती मा विजय भवरे यांच्यातर्फे रोख रक्कम आणि प्रमाण पत्र दिल्या जाणार आहे. या आयोजनाच्या यशस्वीतेसाठी स्पर्धेच्या मुख्य संयोजिका रेखा डफळे, संपूर्ण संयोजन मंडळ आणि यवतमाळ नगरपालिकेचे समस्त शिक्षक वृंद परिश्रम घेत आहेत.

महत्त्वाचे

## श्रेयस अय्यर बाहेर? : पंजाब किंग्जला आयपीएल मध्ये मोठा धक्का

**मुंबई :** काल गुजरात टायटन्सविरुद्ध पंजाब किंग्ज यांच्यात चंदीगडमध्ये सामना झाला. या सामन्यात पंजाब किंग्जने गुजरात टायटन्सचा ३ विकेट्सने पराभव केला. हातातोंडाशी आलेला सामना गुजरात टायटन्सने गमावला. कूपर कॉनलीच्या वादळी खेळीने पंजाबचा विजय झाला. मात्र त्या सामन्यात कर्णधार श्रेयस अय्यर जखमी झाला आहे. त्यामुळे आता तो पुढील सामने खेळू शकणार की नाही अशी चर्चा सुरू झाली आहे.
पंजाब किंग्ज १६३ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरली होती. त्यावळेस कर्णधार श्रेयस अय्यर आणि कूपर कॉनली एकतर फलंदाजी करत होते. कूपर कॉनलीचा एक शॉट समोर उभा असणाऱ्या श्रेयस अय्यरला लागला. त्यामुळे अय्यर जखमी झाला. लगेचच श्रेयस अय्यरवर उपचार करण्यात आले. दरम्यान आता यावर कर्णधार श्रेयस अय्यरने स्पष्टीकरण दिले आहे. सामन्यात झालेल्या दुखापतीवर बोलताना श्रेयस अय्यर म्हणाला, 'आता सर्व काही ठीक आहे, इतकेच मी तुम्हाला सांगू शकतो.

# इटली फुटबॉल संघाची मोठी नाचक्की! सलग तिसऱ्यांदा फिफा विश्वचषकातून बाहेर

## बोस्नियाकडून पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव

मुंबई : दि.१ वृत्तसंस्था



इटालियन फुटबॉल संघ पुन्हा एकदा फिफा विश्वचषकासाठी पात्र ठरण्यात अपयशी ठरला आहे. चार वेळा विश्वचषक विजेता असलेला इटली संघ २०२६ च्या फिफा विश्वचषकासाठी पात्र ठरणार नाही. प्लेऑफच्या अंतिम सामन्यात बोस्निया आणि हर्झेगोविनाने त्यांना पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभूत केले. फिफा विश्वचषकासाठी पात्र ठरण्यात इटलीला सलग तिसऱ्यांदा अपयश आले आहे.
यामुळे, सलग तीन वेळा विश्वचषकासाठी पात्र ठरण्यात अपयशी ठरणारा इटली हा पहिला माजी विश्वचषक विजेता संघ ठरला आहे. इतकेच नाही, तर सध्याच्या इटालियन फुटबॉल संघातील एकाही खेळाडूने यापूर्वी कधीही फिफा विश्वचषकात भाग घेतलेला नाही. इटली शेवटचा २०१४ मध्ये विश्वचषकात खेळला होता.
१५ व्या मिनिटाला मोईस कीनने इटलीसाठी गोल केला. ७८ व्या मिनिटापर्यंत इटली १-० ने आघाडीवर होता. ७९ व्या मिनिटाला हॅरिस ताबाकोविचने बोस्निया आणि हर्झेगोविनासाठी बरोबरी साधली. त्यानंतर सामना अतिरिक्त वेळेत गेला. ३० व्या मिनिटापर्यंत दोन्ही संघांनी एकही गोल केला नाही. त्यानंतर सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये गेला. बोस्निया आणि हर्झेगोविनाने पेनल्टी शूटआऊटमध्ये इटलीला ४-१ ने पराभूत करून, पुन्हा एकदा विश्वचषक खेळण्याचे इटलीचे स्वप्न भंगले. इटलीचा स्टार डिफेंडर, अलेसँड्रो बास्तोनी याला ४२ व्या मिनिटाला रेड कार्ड मिळाले.
इटलीने चार वेळा फिफा विश्वचषक जिंकला आहे. इटलीने शेवटचा विश्वचषक २० वर्षांपूर्वी २००६ मध्ये जिंकला होता. त्यापूर्वी, इटलीने १९३४, १९३८ आणि १९८२ मध्येही फिफा विश्वचषक जिंकला होता.

२०१० आणि २०१४ च्या फिफा विश्वचषकांमध्ये इटली गट फेरीतच बाहेर पडला. ते २०१८ आणि २०२२ च्या विश्वचषकांसाठी पात्र ठरू शकले नाहीत. दरम्यान, बोस्निया १२ वर्षांनंतर फिफा विश्वचषकात परतत आहे, त्यांनी २०१४ मध्ये पदार्पण केले होते. २०२६ च्या फिफा विश्वचषकासाठी त्यांना यजमान कॅनडा, कतार आणि स्वित्झर्लंड यांच्यासोबत गट 'ब' मध्ये स्थान देण्यात आले आहे. इटलीचा संघ फुटबॉल या खेळात तगडा मानला जात होता. क्वालिफायदेखील होऊ न शकल्यामुळे या संघाच्या नावे एक लज्जास्पद रेकॉर्ड निर्माण झाला आहे हे मात्र खरं!

मात्र, २००६ चा विश्वचषक जिंकल्यानंतर इटलीचा विश्वचषकातील प्रवास फारसा चांगला नव्हता.

# स्वतःला रोहित शर्मा समजत होता राहुल तेवतिया; पंचांनी बदलायला लावली बॅट

मुंबई : दि.१ वृत्तसंस्था



इंडियन प्रीमियर लीग २०२६ चा चौथा सामना अत्यंत रोमांचक ठरला. हा सामना शेवटच्या षटकापर्यंत रंगला, ज्यात गुजरात टायटन्सला पंजाब किंग्सकडून पराभव पत्करावा लागला. पंजाब किंग्सविरुद्ध गुजरात टायटन्सच्या डावाच्या शेवटच्या षटकांमध्ये नाट्यमय घडामोडी घडल्या. बॅटच्या आकाराचा नियम मोडल्याबद्दल त्यांचा फलंदाज, राहुल तेवतिया याला मैदानातील पंचांनी थांबवले. त्याला तात्काळ बॅट बदलण्यास सांगण्यात आले. रोहित शर्माची बॅटही तपासण्यात आली, पण त्याने पंचांकडून गेज घेऊन ती स्वतःच काढली आणि फलंदाजीसाठी योग्य असल्याचे जाहीर केले. तेवतियालाही तसेच करायचे होते, पण पंचांनी त्याला सुधारले.
ही घटना डावाच्या शेवटच्या षटकात घडली, जेव्हा वॉशिंग्टन सुंदर बाद झाल्यानंतर तेवतिया फलंदाजीसाठी मैदानात उतरला. स्ट्राईक घेण्यापूर्वी, पंचांनी त्याच्या बॅटचा गेज तपासण्यासाठी खेळ थांबवला. ही प्रक्रिया आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सामान्य झाली आहे आणि गेल्या वर्षापासून आयपीएलमध्ये लागू करण्यात आली आहे. तेवतियाची बॅट गेज चाचणीत अयशस्वी ठरली, त्यामुळे पंचांनी त्याला बॅट बदलण्याचे निर्देश दिले. हा क्षण नंतर प्रसारकांनी सोशल मीडियावर शेअर केला, ज्यामुळे चर्चा सुरू झाली.
एप्रिल २०२५ पासून, आयपीएल सामन्यांचे अधिकारी बॅटच्या आकाराच्या नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी बॅट गेज वापरत आहेत. या तपासण्या लागू करताना आयोजकांनी कोणतेही औपचारिक निवेदन जारी केले नाही.

## पाकिस्तानने पीएसएल मध्ये लागू केला मनोरंजक नियम!

**नवी दिल्ली:** पाकिस्तान सुपर लीगने या हंगामात एक अतिशय मनोरंजक नियम लागू केला आहे. हा नियम नाणेफेक आणि अंतिम अकरा खेळाडूंशी संबंधित आहे. क्रिकेटप्रमाणेच, नाणेफेकीपूर्वी दोन्ही संघांचे कर्णधार त्यांच्या अंतिम अकरा खेळाडूंची यादी सामनाधिकाऱ्याकडे सादर करतात. जर बदली खेळाडूंची तरतूद असेल, तर त्या यादीत बदली खेळाडूंची नावे देखील समाविष्ट असतात. नाणेफेकीनंतर संघ त्या अंतिम अकरा खेळाडूंमध्ये कोणताही बदल करू शकत नाहीत. तथापि, पीएसएलने हे निश्चित केले आहे की नाणेफेकीपूर्वी दोन्ही संघांचे कर्णधार सामनाधिकाऱ्याकडे केवळ एकच नाही, तर दोन अंतिम अकरा खेळाडूंची यादी सादर करतील. त्यानंतर कर्णधार नाणेफेकीच्या निकालाच्या आधारावर एका अंतिम अकरा खेळाडूंची यादी निवडतील. दोन प्लेइंग इलेव्हनच्या या नियमामुळे कर्णधारांना खेळपट्टी आणि दव यांसारख्या घटकांचा विचार करून आपल्या संघाची रचना निवडण्याचे स्वातंत्र्य मिळते.

# जिंकल्यानंतरही श्रेयस अय्यरला बीसीसीआयने ठोठावला दंड

मुंबई : दि.१ वृत्तसंस्था




इंडियन प्रीमियर लीग २०२६ मध्ये पंजाब किंग्सने गुजरात टायटन्सविरुद्ध शेवटच्या षटकात थरारक विजय मिळवत शानदार सुरुवात केली. मात्र, हा सामना कर्णधारासाठी चांगला ठरला नाही. आधी त्याला सामन्यादरम्यान दुखापत झाली आणि आता त्याला दंड ठोठावण्यात आला आहे. आयपीएल समितीने पंजाब किंग्स (पीबीकेएस) चा कर्णधार श्रेयस अय्यरला दंड ठोठावण्याचा निर्णय घेतला आहे.
भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) गुजरात टायटन्स (जीटी) विरुद्ध पंजाब किंग्सच्या (पीबीकेएस) विजयानंतर श्रेयस अय्यरवर १.२ दशलक्ष रुपयांचा मोठा दंड लावला आहे. हा सामना मंगळवारी (३१ मार्च) न्यू चंदीगड येथील महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला, जो २०२६ इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) चा उद्घाटनाचा सामना होता. २०२५ च्या अंतिम फेरीतील संघाने हा थरारक सामना तीन गडी राखून जिंकला. पदार्पण करणाऱ्या कूपर कॉनॉलीने ४४ चेंडूंमध्ये नाबाद ७२ धावा करून सामनावीर पुरस्कार पटकावला.
सामन्याच्या दुसऱ्या दिवशी आयपीएल नियामक परिषदेने भारतीय एकदिवसीय संघाच्या कर्णधारावर आर्थिक दंडाची घोषणा केली. सामन्यात पंजाबच्या संघाने षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल हा दंड आकारण्यात आला. लीगच्या नियामक मंडळाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे, ''नवीन चंदीगड येथील नवीन आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या टाटा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ च्या चौथ्या सामन्यात गुजरात टायटन्स विरुद्ध पंजाब किंग्स संघाने षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरला दंड ठोठावण्यात आला आहे. या हंगामातील हा त्याच्या संघाचा पहिलाच गुन्हा होता. आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.२२ अंतर्गत, जे किमान षटकांच्या वेगाच्या उल्लंघनाशी संबंधित आहे, अय्यरला १.२ दशलक्ष रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

## पंजाब विरुद्ध गुजरात मॅचनंतर गुणतालिकेत बदल

**मुंबई :** २८ मार्चपासून आयपीएलचा थरार सुरू झाला आहे. पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगलोर विरुद्ध सनरायजर्स हैदराबाद यांच्यात सामना पार पडला. कालपर्यंत चार सामने पार पडले आहेत. दरम्यान पंजाब किंग्ज विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यात सामना पार पडल्यावर पॉईंट्स टेबलमध्ये मोठे बदल झाले आहेत.
आयपीएल सुरू झाल्यावर आतापर्यंत चार सामने पार पडले आहेत. काल पंजाब किंग्ज विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यात सामना पार पडला. हातातील सामना गुजरात टायटन्सने गमावला. त्यांतर पॉईंट्स टेबलमध्ये मोठे बदल झाले आहेत. तसेच ऑरेंज कॅप आणि पर्पल कॅपच्या शर्यतीत अनेक खेळाडू समोर आले आहेत. सर्वाधिक विकेट घेऊन सध्या गुजरात टायटन्सचा प्रसिद्ध कृष्णा आहे. त्याने ३ विकेट्स घेतल्या आहेत. तर दुसऱ्या स्थानावर जेकब डफी आहे. त्याने देखील ३ विकेट्स घेतल्या आहेत. याशिवाय शार्दुल ठाकूर, शेफर्ड यांनी देखील ३ विकेट्स पटकावल्या आहेत.

# पंजाबचा किंग ठरला पदार्पण करणारा कॉनॉली; गुजरात टायटन्सवर ३ गडी राखून मात

मुंबई : दि.१ वृत्तसंस्था



इंडियन प्रीमियर लीगमध्ये पदार्पण करणाऱ्या कूपर कॉनॉलीने आपला पहिला सामना अविस्मरणीय बनवला. त्याने आपल्या पंजाब किंग्स संघासाठी एक संस्मरणीय खेळी खेळून संघाला गुजरात टायटन्सविरुद्ध ३ गडी राखून रोमांचक विजय मिळवून दिला. आयपीएल २०२६ च्या चौथ्या सामन्यात, २२ वर्षीय कॉनॉलीने ४४ चेंडूंमध्ये ५ चौकार आणि ५ षटकारांसह नाबाद ७२ धावा केल्या.
आयपीएल २०२६ च्या लिलावात पंजाब किंग्सने कॉनॉलीला ३ कोटी रुपयांना विकत घेतले होते. त्याच्या पहिल्याच आयपीएल सामन्यात कर्णधार श्रेयस अय्यर आणि मुख्य प्रशिक्षक रिकी पाँटिंग यांनी त्याला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवले. प्रियांश आर्याची विकेट पडल्यानंतर, कॉनॉलीने केवळ डावाला आधारच दिला नाही, तर संघाला विजयही मिळवून दिला. शॉन मार्शला आपला आदर्श मानणाऱ्या कॉनॉलीने, धावांचा पाठलाग करताना १६ व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर कागिसो रबाडाच्या गोलंदाजीवर चौकार मारून ३४ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने २० व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर वॉशिंग्टन सुंदरच्या गोलंदाजीवर चौकार मारून पंजाबचा विजय निश्चित केला. ऑस्ट्रेलिया आणि पंजाब किंग्स दोघेही तरुण कॉनॉलीला दिग्गज अष्टपैलू ग्लेन मॅक्सवेलचा संभाव्य पर्याय मानतात. त्याने आपल्या प्रभावी फलंदाजीच्या कामगिरीने स्वतःची योग्यता सिद्ध केली आहे. मॅक्सवेलप्रमाणेच, कॉनॉली एक आक्रमक फलंदाज आहे आणि फिरकी गोलंदाजीनेही योगदान देतो. पंजाब किंग्सकडून पदार्पण करण्यापूर्वी, कॉनॉलीने ५२ टी आंतरराष्ट्रीय सामने खेळून ८७० धावा केल्या होत्या आणि ३० बळी घेतले होते. देशांतर्गत क्रिकेटमध्ये वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कॉनॉलीने ऑस्ट्रेलियासाठी एक कसोटी, आठ एकदिवसीय आणि ११ टी आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याने ७ सप्टेंबर २०२४ रोजी एडिनबर्ग येथे स्कॉटलंडविरुद्ध टी आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. त्याचा एकमेव कसोटी सामना फेब्रुवारी २०२५ मध्ये गॉल येथे श्रीलंकेविरुद्ध स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखाली झाला. त्याने कसोटीत ४ धावा आणि ० बळी, एकदिवसीय सामन्यांमध्ये ९४ धावा आणि ६ बळी, आणि टी आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २८ धावा आणि ३ बळी घेतले आहेत.

## युद्ध संपणार या आशेने शेअर बाजारात उसळी

**मुंबई :** पश्चिम आशियात गेल्या काही महिन्यांपासून संघर्षमय परिस्थिती सुरु आहे. त्याचा परिणाम सगळ्या क्षेत्रांवर दिसून आला. शेअर मार्केटमध्येही बरीच उलथापालथ झाली. पण आता पश्चिम आशियातील संघर्ष संपुष्टात येत असल्याचं चित्र निर्माण होत असल्याने शेअर बाजारात वेगळंच आशेचं किरण उगवताना पाहायला मिळत आहे. त्यामुळे आजच्या दिवसात देशांतर्गत शेअर बाजारांने जोरदार उसळी घेतल्याची पाहायला मिळाली.
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं की, इराणमधील संघर्ष दोन ते तीन आठवड्यांत संपू शकतो. परिणामी, आजच्या व्यवहारादरम्यान सेन्सेक्समध्ये २००० हून अधिक अंकांची वाढ झालेली पाहायला मिळाली. तर नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी ५० निर्देशांक ६०० हून अधिक अंकांनी वधारला. सेन्सेक्स अखेरीस ७३,१३४.३२ अंकांवर बंद झाला; यात १,१८६.७७ अंकांची वाढ नोंदवली गेली. निफ्टी ३४८ अंकांनीकिंवा १.५६% नेवधारून २२,६७९.४० अंकांवर स्थिरावला. मागील दोन व्यवहारांच्या सत्रांमध्ये शेअर बाजारात झालेल्या तीव्र घसरणीनंतर, आज ही तेजी दिसून आली. निफ्टी मिडकॅप निर्देशांक २.२४ टक्क्यांनी वधारला, तर निफ्टी स्मॉलकॅप निर्देशांकात ३.२४ टक्क्यांची वाढ झाली आहे. क्षेत्रांच्या आधारावर पाहता, निफ्टी पीएसयू बँक निर्देशांकात सर्वाधिक वाढ दिसून आली.

# इराण युद्धामुळे आता तिकिटांचे दर गगनाला भिडणार

## हवाई प्रवाशांना मोठा झटका!

नवी दिल्ली: दि.१ वृत्तसंस्था



इराणमधील संघर्षामुळे, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही प्रकारचा हवाई प्रवास अधिक महाग होण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेल्या प्रचंड वाढीमुळे, जेट इंधनाचा खर्च लक्षणीयरीत्या वाढवण्यात आला आहे. सरकारी मालकीच्या तेल विपणन कंपन्यांनी देशांतर्गत विमानसेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या 'एव्हिएशन टर्बाइन फ्युएल'च्या किमतीत ११५ टक्क्यांनी वाढ केली आहे, तर आंतरराष्ट्रीय विमानसेवेसाठी ही वाढ १०७ टक्के इतकी आहे. विमान कंपन्यांसमोरील अडचणींमध्ये रुपयाच्या मूल्यात झालेल्या तीव्र घसरणीमुळे आणखीच भर पडली आहे.
एका वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार, या दरवाढीनंतर दिल्लीमध्ये एक किलोलीटर (१,००० लिटर) किंमत २०७,३४१.२२ वर पोहोचली आहेजी गेल्या महिन्यात ९६,६३८.१४ इतकी होती. ही ११४.५ टक्क्यांची वाढ दर्शवते. दिल्ली, कोलकाता आणि चेन्नई या शहरांमध्ये किमतींनी २,००,००० प्रति किलोलीटरचा टप्पा ओलांडण्याची ही पहिलीच वेळ आहे. मुंबईमध्ये किमतींमध्ये ११५ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे ज्यामुळे सध्याचा दर १९४,९६८.६७ इतका झाला आहे.
आंतरराष्ट्रीय विमानसेवेसाठी, किंमत पहिल्यांदाच १,००० चा टप्पा ओलांडून पुढे गेली आहे. दिल्लीमध्ये, आंतरराष्ट्रीय विमानसेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या एक किलोलीटर किंमत १,६९०.८१ वर पोहोचली आहे. गेल्या महिन्यात हा आकडा ८१६.९१ इतका होता जी १०७ टक्क्यांची दरवाढ दर्शवतो. मुंबईमध्येही जवळपास अशीच वाढ दिसून आली आहे. कोलकातामध्ये, किंमत ८५५.२५ वरून वाढवून १,७२७.३० इतकी करण्यात आली आहे.
एप्रिल आणि मे २०२४ मध्येही, आंतरराष्ट्रीय विमानसेवेसाठीच्या किमती यापूर्वीच ९०० च्या टप्प्यापेक्षा वर होत्या; त्यामुळे डॉलर-रुपया विनिमय दर ८३ ते ८४ च्या दरम्यान होता. आता मात्र, डॉलरच्या तुलनेत रुपया ९५ च्या पातळीच्या जवळ पोहोचला आहे.




# देशव्यापी चाचणीत सिद्ध केलेल्या शुद्धतेच्या मानकांसह टाटा सॉल्ट सर्वोच्च गुणवत्तेचे प्रतीक

मुंबई: दि.१ वृत्तसंस्था

१९८३ पासून भारतातील आयोडाईज्ड मीठ विभागातील आणि बाजारपेठेतील अग्रणी टाटा सॉल्ट आपल्या उत्पादनांमध्ये अतुलनीय शुद्धता आणि सुधारणा सुनिश्चित करण्याची परंपरा कायम ठेवत आहे. प्रयोगशाळेतील चाचणीद्वारे प्रमाणित झाल्यानुसार नमूद केलेल्या १०० मीठांपैकी टाटा सॉल्टने सर्वाधिक शुद्धतेसह आघाडी मिळवली आहे. यामुळे केवळ प्रदेशातच नव्हे तर संपूर्ण भारतात शुद्धता आणि अस्सलतेसाठी टाटा सॉल्ट हे एक मापदंड म्हणून प्रस्थापित झाले आहे.
उत्कृष्टतेप्रती अढळ बांधिलकी असणारे टाटा सॉल्ट हे मीठ उद्योगातील सर्वोच्च गुणवत्तेचे प्रतीक म्हणून उभे आहे. या उपक्रमाद्वारे टाटा सॉल्ट आपल्या उत्पादनांना कठोर अंतर्गत आणि नियामक मानकांनुसार कठोर गुणवत्ता मूल्यमापनातून पार पाडून आपले नेतृत्व अधिक दृढ करत आहे. ब्रँडची गुणवत्तेबाबतची ठाम बांधिलकी आणि नवे मापदंड प्रस्थापित करण्याची प्रेरणा यामुळे अतुलनीय शुद्धता आणि उत्कृष्ट गुणवत्तेचा शोध घेणाऱ्या ग्राहकांसाठी टाटा सॉल्ट हा सर्वोत्तम पर्याय ठरतो. याबाबत बोलताना टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या पॅकेज्ड फूड्स इंडियाच्या अध्यक्ष दीपिका भान म्हणाल्या, टाटा सॉल्टची शुद्धता आणि अस्सलतेबद्दलची ठाम बांधिलकी आमच्या ग्राहकांच्या स्वास्थ्यासाठी असलेल्या आमच्या अतूट समर्पणाचे प्रतिबिंब आहे. शुद्धतेचा दीपस्तंभ म्हणून टाटा सॉल्ट या भागात मिठाच्या गुणवत्तेसाठी सुवर्ण मानक स्थापित करते. कठोर उपाययोजना आणि सतत देखरेख अंमलात आणून मूळ नारंगी पॅकमध्ये पॅक केलेले सर्वोच्च दर्जाचे आयोडाईज्ड मीठ वेगवेगळ्या प्रदेशांतील घरांपर्यंत पोहोचवण्याची आम्ही ग्राहकांना खात्री देतो. टाटा सॉल्टचे हे यश चार दशकांपूर्वी सुरू झालेल्या प्रवासाचा पुढील टप्पा आहे. जो केवळ काळाच्या कसोटीवर उतरलेला नाही तर परिभाषिततेही केला आहे अशा ब्रँडची निवड करून हे ग्राहकांना त्यांच्या आरोग्य आणि स्वास्थ्याला प्राधान्य देण्यासाठी प्रेरित करते. टाटा सॉल्ट हे केवळ एक उत्पादन नसून 'देश का नमक' म्हणून राष्ट्राच्या विश्वासाचे कायम प्रतीक राहिले आहे.

# आयसीआयसीआय प्रू जीपीपी फ्लेक्सीसोबत आयुष्यभरासाठी खात्रीशीर उत्पन्न, चिंतामुक्त निवृत्ती

मुंबई: दि.१ वृत्तसंस्था

यूएनडीपीच्या २०२५ च्या मानव विकास अहवालानुसार, भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान १९९० मध्ये ५८.६ वर्षांवरून २०२३ मध्ये ७२ वर्षांपर्यंत वाढले आहे. विशेष म्हणजे, भारतातील वृद्ध' या सरकारी आकडेवारीनुसार, २०३६ पर्यंत जवळपास प्रत्येक सात भारतीयांपैकी एक व्यक्ती ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाची असेल. हे आकडे भारतातील आरोग्यसेवा सुधारत असल्याचे चांगले संकेत दर्शवतात, पण तरी वाढत्या वयानुसार पुढील काळात येणाऱ्या खर्च आणि अडचणींसाठी प्रत्येक व्यक्तीने आधीच तयारी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.लोकांचे आयुष्य वाढत असताना निवृत्तीनंतर खर्चही वाढतो. दैनंदिन राहणीमानाचा खर्च आणि वैद्यकीय खर्च खूप महाग होत आहेत, त्यामुळे अनेकांना आर्थिक अडचणी येऊ शकतात. ही समस्या लक्षात घेऊन आणि सेवानिवृत्तीचे नियोजन सोपे करण्यासाठी, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफने आयसीआयसीआय प्रू गॅरंटीड पेन्शन प्लॅन फ्लेक्सी तयार केला आहे, जो ग्राहकांना त्यांच्या सेवानिवृत्तीचे प्रभावीपणे नियोजन करण्यास सक्षम करतो. हा प्लॅन व्यक्तींना थोडे-थोडे पैसे नियमितपणे गुंतवून चांगली बचत तयार करण्याची संधी देतो. त्यानंतर त्यांना आयुष्यभरासाठी निश्चित (गारंटीड) नियमित उत्पन्न मिळते, जे निवृत्तीनंतर खूप महत्त्वाचे असते. या प्लॅनची खास गोष्ट म्हणजे, उत्पन्नाचा व्याजदर प्लॅन घेतानाच निश्चित केला जातो. त्यामुळे नंतर बाजारातील व्याजदर बदलले तरी तुमच्या मिळणाऱ्या उत्पन्नावर त्याचा परिणाम होत नाही. या प्लॅनबद्दल बोलताना विकास गुप्ता, चीफ प्रॉडक्ट ऑफिसर, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स म्हणाले, निवृत्ती नियोजनामध्ये सर्वात महत्त्वाची गरज म्हणजे आयुष्यभरासाठी निश्चित उत्पन्न असणे. आयसीआयसीआय प्रू गॅरंटीड पेन्शन प्लॅन फ्लेक्सी हा प्लॅन हीच खात्री देण्यासाठी सोप्या आणि लवचिक पद्धतीने तयार करण्यात आला आहे. या प्लॅनमध्ये ग्राहकांच्या वेगवेगळ्या गरजा लक्षात घेऊन ७ प्रकारचे लवचिक पर्याय देण्यात आले आहेत.

# आगसुरक्षेसंदर्भात विलक्षण दुर्लक्षितपणा

## गांधीबाग परिसरातील कापड बाजारात आकस्मिक आग विझविण्यासाठी यंत्रणा नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १ : उपराजधानीच्या नागपूर शहरात मागील सलग चार दिवसांत आग लागल्याचे प्रकार घडले आहेत यात संबंधितांची मोठी हानी झालेली आहे. यापैकी एका दुर्घटनेच्या गांधीबाग परिसरातील अत्यंत व्यस्ततेच्या आणि अतिशय महत्त्वाच्या कापड बाजार भागात पाहणी केली असता एक अपवाद वगळता कोणत्याही दुकानांबाहेरअग्निशमन यंत्रणा आढळून आली नाही. झपाट्याने विस्तारत असलेल्या उपराजधानीच्या नागपूर शहरातील नागरिक आणि व्यावसायिकांत सुद्धा अग्निसुरक्षाबाबत दुर्लक्षितपणा सातत्याने दिसून आलेला आहे.**





२८ मार्चच्या पहाटे ४.४० वाजताच्या सुमारास बेसा परिसरातील हरिहरनगरमधील संयोग सोसायटीतील हर्षदीप भैसारे यांच्या घरी आग लागली अग्निशमन विभागाने यात ६० लाख रुपयांची हानी झाल्याचे म्हटले आहे. दुसऱ्याच दिवशी २९ मार्चच्या रात्री पावणे अकराच्या सुमारास गांधीबागेतील सिंधी धर्मशाळाजवळील लेडिज गारमेंट दुकानात आग लागली यात ५ ते ७ लाख रुपयांची हानी झाल्याचे वृत्त आहे. याच इमारतीत वरील मजल्यावर काही कुटुंब वास्तव्यास आहेत सुदैवाने आगीच्या झळा त्यांच्यापर्यंत पोहोचल्या नाहीत. तर, ३० मार्चच्या पहाटे ५ वाजता भंडारा मार्गावरील पारडी येथील मेरड नगरात दोन ट्रक वाहनांना आग लागली यातअंदाजे ३० लाख रुपयांची हानी झाल्याचे वर्तविण्यात आले आहे तर, ३० मार्चला रात्री ११ वाजताच्या सुमारास रामदासपेठेतील फिरदोश चेम्बर बिल्डिंगमध्ये आग लागली. यात लाकूड, प्लायवूड, डोअर-विंडो फ्रेम आदींची राख झाली असून, सुमारे १० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

**कमालीचा दुर्लक्षितपणा**

'अजिंक्य भारत'च्या वतीने गांधीबागेतील घटनास्थळ (२९ मार्चची घटना) आणि परिसराची पाहणी केली असता व्यावसायिकात अग्निसुरक्षाबाबत कमालीचा दुर्लक्षितपणा दिसून आला बहुतांश दुकाने कापड विक्रीसंबंधी असून, इमारतीबाहेर वा सार्वजनिक अशी अग्निसुरक्षा यंत्रणा दिसून आली नाही यासंदर्भात काही व्यावसायिकांसोबत संवाद साधला असता धक्कादायक बाबी समोर आल्या. शटर ओढण्याआधी दुकानातील मेन स्विच बंद करण्याची औपचारिकता पार पाडण्यात येत असते अनेक इमारतींचे बांधकाम ५० ते ८० वर्षांआधी झाल्याने 'फायर सिक्युरिटी' उभारण्यात आलेली नाही, असेही सांगण्यात आले. तसेच, प्रत्येक दुकानदार आपल्या व्यवसायांसंबंधी समस्या वा अडचणीत इतका व्यस्त झाला आहे, की अशा महत्त्वाच्या सुरक्षा यंत्रणाकडे दुर्लक्ष होत असल्याचे कबूल केले. अन्य एका व्यावसायिकाने आपल्या दुकानाबाहेरील वीज पुरवठा करणाऱ्या खांबावरील वायरांची गर्दी आणि काही इमारतींजवळ असलेल्या ट्रान्सफार्मरकडे बोट दाखविले. तसेच, या भागातील बऱ्याच इमारती जुन्या असल्याने प्रशासनाने तत्काळ प्रभावासाठी पाण्याचे पॉइंट देण्याची सूचना केली.

# थकबाकीदारांना 'हाय व्होल्टेज' शॉक

## ३६ हजारांपेक्षा अधिक थकबाकीदारांची वीज 'गुल'

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि.१ :** महावितरणने थकबाकी वसुलीसाठी आतापर्यंतची अतिशय कठोर भूमिका घेत १ मार्चपासून आतापर्यंत ३६ हजारांपेक्षा अधिक थकबाकीदारांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. 'बिलाचा भरणा करा अन्यथा अंधारात राहा' असा थेट इशारा देत महावितरणने नागपूरसह जिल्ह्याभरात वसुलीचा एककलमी कार्यक्रम सुरू केला आहे.

नागपूर जिल्ह्यात तब्बल ४३ कोटी रुपयांचा डोंगर उभा राहिल्याने प्रशासनाने अधिक आक्रमक पवित्रा घेतला असून, आता थेट पोलिस बंदोबस्तात थकबाकीदारांचा वीज पुरवठा खंडित करण्याची धडाकेबाज मोहीम सुरू करण्यात आली आहे

**पोलिसांची साथ**

थकबाकी वसुलीसाठी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले आणि विरोध लक्षात घेत महावितरणने आता पोलिस प्रशासनाचे 'सुरक्षा कवच' घेतले आहे. नागपूर शहरातील लष्करीबाग उपविभागांतर्गत मानकापूर आणि नई बस्ती यांसारख्या संवेदनशील भागांमध्ये महावितरणचे पथक पोलिस फौजफाट्यासह धडकले. कोणत्याही दबावाला बळी न पडता वारंवार सूचना देऊनही थकबाकी भरली नाही, अशा शेकडो ग्राहकांचा वीज पुरवठा जागीच खंडित करण्यात आला. विशेष म्हणजे या मोहिमेत राजकीय मध्यस्थी किंवा सामाजिक दबाव झुगारून लावत केवळ वसुलीवर लक्ष केंद्रित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**काटोलमध्ये गुन्हा दाखल**

वसुली मोहिमेदरम्यान कायदा हातात घेणाऱ्यांविरुद्ध महावितरणने आक्रमक पवित्रा घेतला आहे. काटोल शहरातील पेठ बुधवार भागात थकबाकी वसुलीसाठी गेलेल्या महावितरणच्या पथकावर काही इसमांनी हल्ला चढवून शासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रशासनाने याची तत्काळ दखल घेत संबंधित आरोपींविरुद्ध ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि अडथळा आणणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा सज्जड दम प्रशासनाने दिला आहे.

**सरकारी यंत्रणांनाही दम**

केवळ सामान्य ग्राहकच नव्हे, तर सरकारी यंत्रणांनाही दम देण्यात आला आहे. नागपूर जिल्ह्यात पाणीपुरवठा योजनांची तब्बल १० कोटींची थकबाकी आहे. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वत: मैदानात उतरून नगरपंचायत, नगर परिषदा आणि ग्रामपंचायतींच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या आहेत.

## थोडक्यात

### मंत्री प्रकाश आबिटकर यांचा नागपूर दौरा

**नागपूर :** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर नागपूर जिल्हा दौ-यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. २ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था येथील सभागृहात माझं गाव, आरोग्य संपन्न गाव या अभियानाचा उद्घाटन सोहळा व विभागीय कार्यशाळा उद्घाटन समारंभ कार्यक्रमास उपस्थिती. माता कचेरीजवळील राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था येथे आगमन व राखीव. दुपारी ४.५५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून गोव्याकडे प्रस्थान करतील.

### पुरस्कारासाठी प्रस्ताव आवाहन

**नागपूर :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अधिनस्त असलेल्या राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तंत्र शिक्षण विद्यालयांमध्ये अल्पमुदती (तीन महिने)कौशल्य प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत फिटर फेब्रिकेशन, इलेक्ट्रिशियन, डिजिटल मित्र, सीएनसी ऑपरेटर आणि इलेक्ट्रिक व्हेईकल सर्व्हिस टेक्निशियन यांसारख्या विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. कौशल्य आत्मसात करण्यास इच्छुक तरुणासाठी हे प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे.

# आदिवासी समाज नव्या तेजाने उभा : मुख्यमंत्री

## राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार माया इवनाते यांचा नागरी सत्कार समारंभ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १ :** आदिवासी बांधवांना शिक्षण, रोजगाराच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे हा समाज आता नव्या तेजाने उभा राहिला असून आता हा समाज मागे वळून पाहणार नाही,असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



माया चिंतामणराव इवनाते सत्कार समितीच्या वतीने राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार माया इवनाते यांचा नागरी सत्कार करण्यात आला.केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आमदार कृष्णा खोपडे, माजी आमदार देवराव होळी, माजी आमदार सुधाकर देशमुख, महापौर नीता ठाकरे यांची प्रामुख्याने उपस्थित होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की अत्यंत सामान्य कुटुंबात जन्मलेल्या मायाताईंनी अत्यंत संघर्ष करत आपली राजकीय कारकीर्द घडविली आहे. सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी लोकांचा विश्वास संपादन केला. आदिवासी बांधवांच्या प्रश्नांवर त्यांनी मोठे काम केले. अगदी देशपातळीवर फिरून त्यांनी त्यांचे असंख्य प्रश्न सोडवले. त्यामुळेच त्यांना देशाचे सर्वोच्च सभागृह असलेल्या राज्यसभेवर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. आमच्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

**प्रगती शिक्षणातूनच**

समाजात ज्ञानाचा प्रसार होतो, तेव्हाच खऱ्या अर्थान समाजाची प्रगती होते. आदिवासी समाजाची परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. संपूर्ण समाज विकासाच्या या यात्रेत सहभागी होईल, तेव्हा त्या समाजाला दिशा देण्याचे कार्य मायाताईंसारख्या नेतृत्वाला करावे लागेल. समाज आज त्यांच्याकडे अत्यंत आशेने पाहतो आहे, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.

**आदिवासी बांधवांचा सन्मान**

आदिवासी समाजाचे दु:ख आपण जवळून पाहिले आहे. समाजासाठी बरेच काही करायचे आहे. संसदेत त्यांची प्रतिनिधी या नात्याने त्यांचे प्रश्न मांडायचे आहेत. देश बदलत असताना या बदलांमध्ये माझ्या आदिवासी बांधवांचा मोठा वाटा असेल, अशा भावना माया इवनाते यांनी व्यक्त केल्या.

# कुख्यात वरुण ठाकूर गजाआड

**रामटेक, दि. १ :** रामटेक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार वरुण कुलदीपसिंग बिसेन (वरुण) ठाकूर (वय ३१, रा. विटभट्टा, मनसर) याच्यावर नागपूर ग्रामीण पोलिसांनी कडक कारवाई केली आहे. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायांना लगाम घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्याला एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करून नागपूर मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. वरुण ठाकूर याच्यावर खुनाचा प्रयत्न करणे, बेकायदेशीर अग्निशस्त्रे बाळगणे असे अनेक गंभीर गुन्हे नोंदवलेले आहेत. तो सराईत गुन्हेगार असून, त्याच्या परिसरातील सामान्य नागरिकांमध्ये त्याची मोठी दहशत होती. पोलिसांकडे तक्रार करणाऱ्यांना धमकावून समाजात भीतीचे वातावरण निर्माण करण्याचे काम तो करत होता.

## CAPTION संस्कारघोष...



**नागपूर : मानवी संस्कृती फार जुनी संस्काराचा संबंधही संस्कृतीशी जवळचा आपल्या देशात अनेक संस्कृती गुण्यागोविंदाने नांदताहेत... आणि या संस्काराचा जयघोष-जयजयकार होणे क्रमप्राप्त आहे सम्राट अशोक चौकातून इंदोरा चौकाच्या दिशेने निघालेल्या या ९ किमी अंतराच्या 'फ्लायओव्हर पिलर्स'वर राजे शिवाजी महाराज यांच्या कालखंडातील घोषवाक्य लिहिण्यात आले आहेत.**

# बँकेत २३ कोटींचा सुवर्ण कर्ज घोटाळा

## आयसीआयसीआय बँक घोटाळ्यात १५९ खातेदारांचा सहभाग

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १ :** नागपूरमधील आयसीआयसीआय बँकेच्या विविध शाखांमध्ये बनावट सोने तारण ठेवून तब्बल २३ कोटी १९ लाख ४१ हजार ७५१ रुपयांचा गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी धंतोली पोलिसांनी बँकअधिकारी, व्हॅल्युअर आणि खातेदारांवर गुन्हा दाखल केला आहे.हा घोटाळा केवळ खातेदारांनीच नाही, तर बँकेच्या अंतर्गत यंत्रणेच्या मदतीने केल्याचे समोर आले आहे.




बँकेचे झोनल हेड धनंजय रमेश थिटे (४९) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, हा प्रकार जानेवारी २०२३ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत घडला. मनिषनगर शाखेतील सुवर्ण कर्जाचे नियमित ऑडिट सुरू असताना तारण ठेवलेले सोने बनावट असल्याचे काही प्रकरणांत दिसून आले. यानंतर थिटे यांनी सर्व ९ शाखांचे सखोल ऑडिट करण्याचे आदेश दिले. या तपासणीत एकूण १५९ कर्ज खात्यांमध्ये बनावट दागिने असल्याचे निष्पन्न झाले. बँक ग्राहक सचिन राऊत याने बँकेचे व्हॅल्युअर (सोने पारखणारे) नंदू खरवडे, प्रथम ऑडिटर राजेंद्र शिलणकर, प्रमोद टेटे, धनंजय ढोमणे आणि शाखा प्रमुख पंकज केकतपुरे यांच्याशी संगनमत केले होते. व्हॅल्युअरने बनावट सोन्याला 'शुद्ध' असल्याचे प्रमाणपत्र दिले, तर बँक अधिकाऱ्यांनी नियमांकडे दुर्लक्ष करून कोट्यवधींचे कर्ज मंजूर केले. सदर प्रकरणातील फसवणुकीची एकूण रक्कम २३ कोटी १९ लाख ४१ हजार ७५१ रुपये इतकी असून,नागपूरमधील एकूण ९ शाखांमध्ये हा घोटाळा केल्याचे दिसून आले आहे बँकेचे झोनल हेड धनंजय रमेश थिटे धंतोली पोलिसांनी याप्रकरणी विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक शुभम बकाल पुढील तपास करत असून, सदर प्रकरणात आणखी काही आरोपी गळाला लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# साळवा-देवळी कला पांदण रस्त्याचा प्रश्न प्रलंबित

## विद्यार्थी व शेतकऱ्यांची पायपीट; ग्रामपंचायतीचा ठराव धूळखात, आ. संजय मेश्राम यांना साकडे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कुही, दि. १ :** तालुक्यातील साळवा ते देवळी कला या अत्यंत महत्त्वाच्या पांदण रस्त्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून रेंगाळला असून, अनेक वेळा निवेदने देऊनही या रस्त्याच्या कामाला अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय आणि शेतकऱ्यांचे हाल पाहता, 'मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ते योजने' अंतर्गत हे काम तत्काळ मार्गी लावावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विलास घरडे यांच्यासह परिसरातील नागरिकांनी केली आहे.

**ठळक मुद्दे :**
**गेल्या ४ वर्षांपासून निवेदनांचा पाऊस;**
**मात्र रस्ता जैसे थे. ग्रामपंचायतीचा ठराव होऊनही प्रशासकीय स्तरावर दुर्लक्ष. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि शेतमालाच्या वाहतुकीसाठी रस्ता होणे अनिवार्य.शासनाच्या नवीन 'बळीराजा पांदण रस्ते' योजनेत या रस्त्याचा समावेश करण्याची मागणी.**



**विलास विजय घरडे**
**सामाजिक कार्यकर्ता साळवा**

साळवा ते देवळी कला हा रस्ता परिसरातील दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या रस्त्याने दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी शाळेत ये-जा करतात. मात्र, रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून पावसाळ्यात तर हा रस्ता चिखलमय होतो. या संदर्भात साळवा ग्रामपंचायतीने १० फेब्रुवारी २०२६ रोजी ठराव क्र. १३/४ नुसार रस्ता दुरुस्तीचा ठराव मंजूर करून आमदार संजय मेश्राम यांच्याकडे पाठवला आहे. माजी आमदारांचे आश्वासन ठरले पोकळ या रस्त्याबाबत यापूर्वी माजी आमदार राजू पारवे यांना २०२२ आणि २०२३ मध्ये वारंवार निवेदने देण्यात आली होती. तत्कालीन खासदार कृपाल तुमाने यांनाही एप्रिल २०२३ मध्ये साकडे घालण्यात आले होते. त्यावेळी आश्वासन मिळाले, मात्र कामाची पूर्तता झाली नाही. आता विद्यमान आमदार संजय मेश्राम यांनाही २४ फेब्रुवारी २०२५ आणि ७ मार्च २०२६ रोजी पुन्हा निवेदन देऊन या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

**शासनाच्या नवीन योजनेचा लाभ मिळणार का?**

महाराष्ट्र शासनाने नुकतीच 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' सुरू केली आहे. या योजनेनुसार प्रलंबित पांदण रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश आहेत. साळवा ते देवळी कला रस्त्यासाठी ग्रामपंचायतीचा अधिकृत ठराव असूनही शासन स्तरावर कोणत्याही हालचाली होत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. लोकभावनेचा आदर करून आमदारांनी संबंधित विभागाला दिशानिर्देश द्यावेत आणि हा रस्ता तात्काळ दुरुस्त करावा, अशी आर्त हाक विलास घरडे व ग्रामस्थांनी दिली आहे.

## लसीकरण ... पालकांचे समुपदेशन करण्याचे आयुक्तांचे आवाहन

# चौदा वर्षे वयाच्या विद्यार्थिनींसाठी एचपीव्ही विशेष मोहीम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १ : राज्य शासनाच्या निर्देशानुसार गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी एच.पी.व्ही. लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या १४ वर्षे पूर्ण (१५ वा वाढदिवस न झालेल्या) मुलींना लसीकरण करण्यात येणार आहे.**




मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयुक्त डॉ. विपिन यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका शाळा, खाजगी शाळांचे मुख्याध्यापक तसेच झोनल वैद्यकीय अधिकारी यांच्यासोबत नियोजन व आढावा बैठक पार पडली. शाळास्तरावर सविस्तर मायक्रो प्लॅनिंग करून विद्यार्थिनींची अचूक संख्या निश्चित करावी, सर्व शाळांमध्ये सदर लसीकरणाबाबत माहितीपत्रके वितरित करून विद्यार्थिनी व पालकांमध्ये व्यापक जनजागृती करावी. तसेच पालकांची संमती मिळविण्यासाठी योग्य प्रक्रिया पूर्ण कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. यासोबतच दूरध्वनीद्वारे समुपदेशन करण्याबाबत आयुक्त डॉ. विपिन यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. पालकांना विश्वासात घेऊन नागपूर शहरातील १९ हजार विद्यार्थिनींचे लसीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे असून, आतापर्यंत ७२५ मुलींनी लस घेतली आहे.तसेच, सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी आपल्या १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींना लस देऊन किमान १० टक्के उद्दिष्ट पूर्ण करावेत. महिलांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग हा सर्वाधिक आढळणारा आजार असून, मृत्यूदरही जास्त असल्याची माहिती त्यांनी दिली. वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनीषा अतकरे यांनी एच.पी.व्ही. लसीकरणाबाबत जनजागृतीसाठी नाटक, नृत्य, कला आदी माध्यमांचा वापर करून व्यापक स्तरावर अभियान राबविण्याची गरज व्यक्त केली. तसेच, शाळांमध्ये ज्या मुलींनी लस घेतली आहे,अशा विद्यार्थिनींची 'मॉनिटर' म्हणून नेमणूक करून त्यांच्या माध्यमातून इतर विद्यार्थिनींमध्ये जनजागृती करावी, असेही त्यांनी सुचविले.

**'आशा वर्कर'वर जबाबदारी**

अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी 'आशा वर्कर'ने घराघरात जाऊन पालकांना लसीकरणाबाबत माहिती देऊन त्यांना प्रोत्साहित करावे, असे निर्देश दिले. सुरुवातीला महानगरपालिकाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी सादरीकरणाद्वारे लसीकरणाबाबत सविस्तर माहिती दिली. सर्व शाळांचे अधिकारी व झोनल वैद्यकीय अधिकारी यांनी मोहिमेस सक्रिय सहकार्य करून शहरातल्या मुलींचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा व जास्तीत जास्त मुलींना ही लस घेण्यासाठी समुपदेशन करण्याचे आवाहन केले.

# 'जागतिक जल दिन २०२६' निमित्त प्रश्नमंजुषा व जनजागृती

## विद्यार्थ्यांमध्ये "जल है तो कल है" संदेश रुजविण्याचा प्रयत्न

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १ :** "जल है तो कल है" हा संदेश जनमानसात रुजवण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या मेट्रोपॉलिटन सर्व्हेलन्स युनिटतर्फे (MSU) जागतिक जल दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पाणी संवर्धन आणि जलस्रोतांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने आयोजित 'जल प्रश्नमंजुषा' स्पर्धेत जल रक्षक, नीर शक्ती, जल मित्र, अक्वा वॉरियर्स आणि वॉटर गार्डियन्स अशा पाच संघांनी उत्साहात सहभाग नोंदविला. 'वॉटर वीक सेलिब्रेशन' अंतर्गत वाल्मिकी गांधी नगर, येंडावडी, कपिल नगर, शास्त्री नगर, गायत्री कॉन्व्हेंट आणि जयताळा या शाळांमध्ये विशेष जनजागृती सत्रे झाली. यावेळी डॉ. मिथून खेरडे व डॉ. अनुजा मैत्रेय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमाला सभापती मनीषा अतकरे, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत आणि आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.




विजेत्यांना डॉ. सेलोकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशासाठी डॉ. अनुजा मैत्रेय, डॉ. शुशांकी कापसे, डॉ. सोनल संघी, डॉ. सनी मगर, हर्ष चंदेल, अश्विनी पटेल, स्नेहल करंजेकर, हेमाक्षी वानखेडे आणि नाशिक वालोदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

अजिंक्य भारत

आपलं अकोला

अकोला, गुरूवार, दि. २ एप्रिल २०२६ www.ajinkyabharat.com

## अखेरच्या दिवशी पर्यंत आरटीईच्या २०५६ जागांसाठी ५५७४ अर्ज

**अकोला:** आरटीई अंतर्गत जिल्ह्यातील १८५ शाळांमध्ये २५ टक्के प्रवेश कोटा गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. शिक्षण विभागाने आरटीई प्रवेश प्रक्रियेतील १ किलोमीटरच्या मर्यादेत शाळा निवडण्याची अट रद्द केल्यानंतर विद्यार्थ्यांना ३१ मार्चपर्यंत ऑनलाइन नोंदणी करण्याची संधी दिली होती. जिल्ह्यातील १८५ शाळांमधील आरटीईच्या रिक्त २०५६ जागांसाठी शिक्षण विभागाकडे ५५७४ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती मिळाली आहे. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार, अल्पसंख्याक शाळा वगळता मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांमध्ये प्रवेशासाठी वंचित, दुर्बल आणि गरजू विद्यार्थ्यांकरिता इयत्ता पहिली किंवा पूर्व-प्राथमिक वर्गामध्ये २५ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आरटीई अंतर्गत ही प्रवेश प्रक्रिया १७ फेब्रुवारीपासून सुरू झाली. यावर्षी आरटीई नियमावलीत एक नवीन नियम जोडला गेला होता, ज्यानुसार शाळांची निवड ३ किलोमीटरऐवजी १ किलोमीटरच्या अंतरातच करणे बंधनकारक होते.

### महत्त्वाचे

## १३० कोटींची थकबाकी कायम

**अकोला :** चालू आर्थिक वर्षाच्या अखेरच्या दिवशी अकोला महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. ३१ मार्च या वर्षाच्या अंतिम दिवशी सायंकाळपर्यंत तीन कोटी रुपयांहून अधिक कराची वसुली झाली असून, संपूर्ण वर्षभरात एकूण ७५ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला जाण्याचा अंदाज प्रशासनाने व्यक्त केला आहे. महापालिकेसमोर २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात १२७ कोटी ८५ लाख रुपयांची जुनी थकबाकी आणि ८० कोटी ६९ लाख रुपयांचा चालू कर, असे एकूण सुमारे २८३ कोटी रुपयांच्या वसुलीचे मोठे आव्हान होते. थकीत करावर दरमहा दोन टक्के म्हणजेच वर्षाकाठी २४ टक्के या दराने व्याज आकारले जात असल्याने, नागरिकांना या आर्थिक भुर्दंडापासून दिलासा देण्यासाठी प्रशासनाने वर्षभरात वेळोवेळी अभय योजना राबविली. या योजनेचा लाभ घेण्याची अंतिम मुदत ३१ मार्चपर्यंत होती. नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासनाने शनिवार, रविवार आणि इतर सार्वजनिक सुट्यांच्या दिवशीही कर भरणा केंद्र सुरू ठेवली होती.

### वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून चौकशीची धावपळ

# व्हिडिओ लीक प्रकरणी 'आतील हात' शोधण्यावर भर

## अनेकजण येणार चौकशीच्या फेऱ्यात

। विठ्ठल महल्ले ।



**अकोला, दि. १ :** शहरातील सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात मंगळवारी घडलेल्या गंभीर घटनेनंतर पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करत संबंधित सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकावर गुन्हा दाखल करून त्याला निलंबित केले असले, तरी या प्रकरणातील व्हिडिओ क्लिप बाहेर कशी आली याचा तपास आता अधिकाऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. वरिष्ठ पातळीवर या बाबत सखोल चौकशी सुरू असून, अनेक कर्मचारी व संबंधित व्यक्तींना चौकशीला सामोरे जावे लागू शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली.

प्राथमिक माहितीनुसार, सायबर गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या एका महिलेबाबत कोठडीत असताना संबंधित अधिकाऱ्याने अयोग्य वर्तन केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाची माहिती समोर आल्यानंतर पोलीस विभागाने तत्काळ दखल घेत कारवाई केली. घटनेचा निषेध विविध स्तरांतून व्यक्त होत असून, प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही लक्ष केंद्रीत केले आहे.

दरम्यान, घटनेनंतर पोलीस ठाण्यातील काही घडामोडींचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पोलीस विभागाची प्रतिमा मलिन झाल्याची भावना व्यक्त होत आहे. हा व्हिडिओ नेमका कोणी चित्रीत केला आणि बाहेर कसा पोहोचला, याचा तपास सुरू असून, यामध्ये 'आतील हात' असण्याची शक्यता नाकारली जात नाही.

या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पोलीस अधिकारी अकोल्यात दाखल झाले असून, त्यांनी प्रकरणाचा आढावा घेतला. संबंधित घटनेतील आरोपीवर कठोर कारवाई होईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्याचबरोबर व्हिडिओ लीक प्रकरणीही स्वतंत्र तपास सुरू असून, दोषींवर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

एकूणच, ही घटना पोलीस विभागासाठी अत्यंत गंभीर व संवेदनशील ठरली असून, प्रकरणातील सर्व पैलूंचा तपास करून जबाबदारी निश्चित करण्यावर सध्या भर दिला जात आहे.

### महिला ठाणेदार रजेवर; प्रभार अनिल जुमळे यांच्याकडे

जिल्ह्यातील सिव्हिल लाईन पोलीस ठाणे हे एकमेव असे ठाणे आहे जिथे ठाणेदार म्हणून महिला अधिकारी कार्यरत आहेत. ठाणेदार मालती कायटे या सध्या रजेवर असल्याने ठाण्याचा प्रभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल जुमळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. दरम्यान, सायबर पोलीस ठाण्याने फसवणूक प्रकरणात अटक केलेल्या एका महिलेसोबत पोलीस कोठडीत गैरवर्तन झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, संबंधित सायबर पोलीस ठाण्याचे प्रमुखही अनिल जुमळे हेच आहेत. त्यामुळे या प्रकरणात प्रशासकीय जबाबदारी आणि देखरेखीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू असून, पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महिलेसोबत गैरवर्तन करणाऱ्या पोलीस अंमलदारावर गुन्हा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १ :** शहरातील सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेश जाधव यांच्यावर कोठडीत असलेल्या महिलेशी गैरवर्तन केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. या घटनेमुळे पोलीस दलाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत कडक कारवाई केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३१ मार्च २०२६ रोजी फिर्यादी महिलेला सायबर फसवणूक प्रकरणात अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने तिला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. सायंकाळी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यातील लॉकअपमध्ये ठेवण्यात आल्यानंतर, गार्ड ड्युटीवर असलेल्या राजेश जाधव यांनी संबंधित महिलेजवळ जाऊन अश्लील व लैंगिक स्वरूपाच्या टिप्पणी केल्याचा आरोप आहे. तसेच त्यांनी महिलेच्या मुलीसंदर्भात अयोग्य मागणी करत शारीरिक संबंधासाठी पैशांचे प्रलोभन दिल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

या प्रकरणाची माहिती तपासी अधिकारी अनिल जुमळे यांनी तात्काळ वरिष्ठांना दिल्यानंतर, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशावरून सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध अप. क्र. ४१८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता () कलम ७५(१), ७५(२), ७५(३), ३५१(२), ३५१(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कर्तव्यात कसूर आणि पदाचा गैरवापर केल्यामुळे राजेश जाधव यांना १ एप्रिल २०२६ पासून शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

दरम्यान, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून अशा प्रकारचे वर्तन अजिबात सहन केले जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा दिला आहे. पोलीस दलातील शिस्त आणि नैतिकता राखण्यासाठी कठोर पावले उचलली जातील, असेही त्यांनी नमूद केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याकडून सुरू असून, चौकशी अहवालानुसार पुढील कारवाई होणार आहे.

## विकासकामांना ब्रेक; वर्क ऑर्डर मिळूनही कंत्राटदारांची चालढकल!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १ :** शहराच्या विकासासाठी आणि मूलभूत सोयीसुविधांसाठी महापालिका बांधकाम विभागाने कोट्यवधींच्या कामांचे आदेश दिले खरे, मात्र प्रत्यक्षात परिस्थिती काही वेगळीच आहे. रस्ते, नाल्या, ढापे आणि कलव्हर्ट्स यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या कामांच्या वर्क ऑर्डर जारी होऊन बराच काळ लोटला असला, तरी अनेक कंत्राटदारांनी अद्याप कामाचा श्रीगणेशा केलेला नाही. यामुळे शहरातील धूळ आणि खड्ड्यांच्या साम्राज्यात अडकलेल्या नागरिकांना आणखी किती दिवस प्रतीक्षा करावी लागणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

अकोला शहरात मूलभूत सोयीसुविधा अंतर्गत नगरोत्थान आणि दलितेत्तर निधीतून विविध विकासकामे मंजूर करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, या कामांच्या निविदा क्लब टेंडर स्वरूपात काढण्यात आल्या होत्या. प्रशासनाच्या या निर्णयामुळे स्थानिक लहान कंत्राटदारांऐवजी बड्या कंत्राटदारांना ही मोठी कामे मिळाली आहेत. मात्र, हीच मोठी कंत्राटदार मंडळी आता कामाच्या बाबतीत दिरंगाई करत असल्याचे चित्र आहे.

काम सुरू करण्यापूर्वी आवश्यक असलेले मोजमाप अनेक ठिकाणी पूर्ण झाले आहे. काही प्रभागात तर कंत्राटदारांची यंत्रसामग्री आणि वाहने कामाच्या ठिकाणी येऊन उभी आहेत. मात्र, केवळ शोभेच्या वस्तूंसारखी ही वाहने उभी असून प्रत्यक्षात काम सुरू झाले नाही. नागरिक दररोज या बंद पडलेल्या कामांकडे पाहून स्थानिक लोकप्रतिनिधींना जाब विचारत आहेत. साहित्य आले आहे, तर काम का सुरू होत नाही? या प्रश्नाचे उत्तर देताना लोकप्रतिनिधींचीही दमछाक होत आहे.

### अभियंत्यांचे कंत्राटदारांवर नियंत्रण नाही?

वर्क ऑर्डर निघाल्यानंतर ठराविक वेळेत काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या अभियंत्यांची असते. मात्र, सध्याची परिस्थिती पाहता या अभियंत्यांचा कंत्राटदारांवर वचक राहिला नसल्याचे दिसून येते. कंत्राटदार आपल्या मर्जीनुसार कामाच्या वेळा ठरवत असून, प्रशासकीय आदेशांना केराची टोपली दाखवली जात आहे.

### प्रशासनाकडून लोकप्रतिनिधींची उपेक्षा

एकीकडे कंत्राटदार ऐकत नाहीत आणि दुसरीकडे महापालिका प्रशासन स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत आहे. जनतेला उत्तरदायी असलेल्या लोकप्रतिनिधींना प्रशासन साधे उत्तर देण्याचे सौजन्यही दाखवत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. पावसाळा जवळ येण्यापूर्वी ही कामे पूर्ण न झाल्यास शहराची अवस्था अधिकच दयनीय होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आता आयुक्त या प्रकरणात लक्ष घालून संबंधित कंत्राटदारांवर कठोर कारवाई करणार का, याकडे लक्ष लागले आहे.

## माजी सरपंच यांचा मृत्यू गॅसच्या रांगेत उभे राहिल्याने नाही

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

### जिल्हा प्रशासनाचे स्पष्टीकरण

**अकोला, दि. १ :** अन्वी मिर्झापूर (ता. जि. अकोला) येथील माजी सरपंच शंकरराव शिरसाट यांचा मृत्यू गॅसच्या रांगेत उभे राहिल्यामुळे झाला, अशा स्वरूपाचे वृत्त विविध माध्यमांतून प्रसारित झाले होते. मात्र, जिल्हा प्रशासनाने या वृत्ताचे अधिकृतपणे खंडन केले असून, शिरसाट यांचा मृत्यू गॅसच्या रांगेत उभे राहिल्यामुळे झाला नसल्याचे स्पष्ट केले आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेचा सविस्तर अहवाल प्राप्त झाला आहे. गोरक्षण रोडवरील एचपीसीएल यदुराज गॅस एजन्सीमधील २८ मार्च २०२६ रोजीचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, शिरसाट हे दुपारी चालत येताना दिसतात. त्यांनी एजन्सीच्या पायरीजवळ उभे राहून डोक्याचा दुपट्टा काढला आणि कोणाशीही न बोलता तेथून निघून गेले. त्या वेळी तिथे केवळ ४ ते ५ लोक उभे होते. ग्राहकांची कोणतीही गर्दी किंवा लांब रांग नव्हती आणि शिरसाट हे रांगेत उभे असल्याचेही दिसून येत नाही. त्यामुळे रांगेत उभे राहिल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची बाब सीसीटीव्ही फुटेज आणि तहसीलदारांच्या अहवालावरून खोटी ठरली आहे. तपासणीअंती असेही समोर आले की, शिरसाट यांच्या पत्नी भिमाबाई यांच्या नावे उज्वला गॅस कनेक्शन असून, त्यांनी २६ फेब्रुवारी रोजी बुकिंग केले होते आणि २ मार्च २०२६ रोजीच त्यांना सिलेंडर प्राप्त झाले होते. घटनेच्या दिवशी ते गॅस एजन्सीत आले तरी त्यांनी कोणाशीही सिलेंडरबाबत संपर्क केला नव्हता, त्यामुळे ते सिलेंडरसाठीच आले होते हे निश्चितपणे सांगता येत नाही.

## शिक्षिकेची साखळी हिसकावली; २.५ लाखांचा ऐवज लंपास

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १ :** शहरातील सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत पुन्हा एकदा साखळी हिसकावण्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आंबेडकर नगर परिसरात रात्रीच्या सुमारास एका शिक्षिकेच्या गळ्यातील सुमारे २.५ लाख रुपये किंमतीची सोन्याची चैन दोन अज्ञात इसमांनी हिसकावून नेल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सौ. श्रद्धा किरीट मंत्री (वय ४१, व्यवसाय शिक्षिका, रा. कामा प्लॉट, टॉवर चौक परिसर) या मंगळवारी (दि. ३१ मार्च) रात्री सुमारे ७.४५ वाजता घरी जात असताना ही घटना घडली. आंबेडकर नगरमधील बंद पडलेल्या उर्दू शाळेजवळ दोन अज्ञात इसम काळ्या रंगाच्या पल्सर मोटारसायकलवरून आले. त्यांनी अचानक शिक्षिकेच्या गळ्यातील सोन्याची चैन पेंडंटसह जबरदस्तीने हिसकावून तोडली आणि क्षणार्धात घटनास्थळावरून पळ काढला.

या घटनेत सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज लंपास झाला असून, घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे. पीडित शिक्षिकेने तत्काळ सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलीसांनी अप. क्र. ४१७/२०२६ अन्वये कलम ३०४(२), ३(५) बीएनएस अंतर्गत गुन्हा नोंदवला असून, पोलीस उपनिरीक्षक दिनेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून, विशेष पथक तयार करण्यात आले आहे. दरम्यान, शहरात वाढत्या साखळी हिसकावण्याच्या घटनांमुळे नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी एकटे प्रवास करताना दागिने न घालण्याचा सल्लाही देण्यात येत आहे.

### विहंगम रोषणाई...



अकोला: श्री.हनुमान जयंती निमित्त शहरातील राम नगर येथिल श्री.हनुमान मंदिरांवर अशी विहंगम रोषणाई करण्यात आली. ( छाया. संजय ताथुरकर )

## ९.४१० किलो गांजा जप्त, दोघे ताब्यात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १ :** रेल्वे पोलीस स्टेशन अकोला येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाने एनडीपीएस कायद्यांतर्गत मोठी कारवाई करत दोन संशयित इसमांना ताब्यात घेत तब्बल ९ किलो ४१० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थाची किंमत अंदाजे ६७,५०० रुपये आहे.


३१ मार्च २०२६ रोजी पोलीस अंमलदार पोहवा. २४ सतीष जवंजाळ यांना गुप्त माहितीदारामार्फत माहिती मिळाली की, ट्रेन क्रमांक २०८४३ पुरी-अजमेर एक्सप्रेस अकोला रेल्वे स्थानकावर येणार असून प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर दोन संशयित इसम फिरत आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ सापळा रचून संबंधित इसमांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी आपली नावे फारूक खान हफिजउल्ला खान (वय ४३, रा. खदान, अकोला), शेख अजीज शेख महेबुब (वय ४५, रा. सोनटक्के प्लॉट, अकोला) अशी सांगितली.दोघांकडे असलेल्या प्रवासी बॅगची तपासणी केली असता, खाकी रंगाच्या सेलोटेपने गुंडाळलेले संशयास्पद बंडल आढळून आले. या बंडलमध्ये एकूण ९ किलो ४१० किलो गांजा असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी हा संपूर्ण माल जप्त केला. प्राथमिक चौकशीत आरोपींनी हा गांजा परराज्यातून आणल्याची कबुली दिली आहे. याप्रकरणी दोन्ही आरोपींवर एनडीपीएस कायद्याच्या कलम २० (बी) (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे (लोहमार्ग नागपूर), अपर पोलीस अधीक्षक दत्ताराम राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी पांडुरंग सोनवणे (लोहमार्ग अकोला) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा शिंदे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप डोलारे, उपनिरीक्षक प्रशांत मुंडे, तसेच पोलीस कर्मचारी सतीष चव्हाण, सतीष जवंजाळ, गौतम शिरसाट, कपिल गवई, तुषार गोंगे, विजय शेगांवकर व कुणाल साखरे यांनी सहभाग घेतला. या कारवाईमुळे रेल्वे मार्गाने होणाऱ्या अंमली पदार्थांच्या तस्करीवर मोठा आळा बसण्यास मदत होणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

### चौकशी | प्रशासनाचा दुजाभाव; नगर विकासकडे तक्रार

## सामान्यांच्या घरांवर बंदी, बड्या बिल्डरांना बांधकाम परवानगीची खैरात!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १ :** अकोला महानगरपालिका प्रशासनाकडून राबविल्या जाणाऱ्या दुटप्पी धोरणामुळे प्रभाग क्रमांक १९ मधील सामान्य नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. प्रभागातील ड्रीमलंड सिटी, न्यू खेतान नगर आणि कौलखेड परिसरात खरेदी-विक्री व बांधकामावर बंदी असतानाही, विशिष्ट उच्चभ्रू बांधकाम व्यावसायिकांना नियमबाह्य पद्धतीने परवानग्या देण्यात आल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी (पवार) गटाच्या नगरसेविका पूजा पंकज गावंडे यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी नगर विकास खात्याच्या अप्पर मुख्य सचिवांकडे तक्रार करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

जुलै २०२१ मध्ये आलेल्या महापुरामुळे विद्रूपा व मोर्णा नदीकाठच्या परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले होते. त्याची दखल घेत तत्कालीन जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी नदी खोलीकरणासाठी निधी उपलब्ध करून दिला होता आणि सुरक्षिततेच्या कारणास्तव १४ ऑगस्ट २०२१ रोजी या परिसरातील भूखंडांची खरेदी-विक्री, सब-डिव्हिजन व बांधकाम परवानगीवर बंदी घालण्याचे आदेश दिले होते. या आदेशामुळे गेल्या अनेक वर्षांपासून परिसरातील शेकडो नागरिकांचे बांधकाम परवानग्यांचे अर्ज महापालिकेकडे प्रलंबित आहेत. असे असतानाही, महापालिका प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांच्या बंदी आदेशाला केराची टोपली दाखवत शहरातील काही बड्या बांधकाम व्यावसायिकांना झुकते माप दिल्याचे समोर आले आहे. यामध्ये विद्रूपा नदीच्या काठावर असलेल्या नारायणी स्कूलला १७ फेब्रुवारी २०२३ रोजी इमारत बांधकामाची, तर राजेश्वर बिल्डर्सला ११ मार्च २०२५ रोजी अपार्टमेंट बांधकामाची परवानगी देण्यात आली .

जनसामान्यांसाठी वेगळा आणि श्रीमंत बिल्डरांसाठी वेगळा न्याय लावून मनपा प्रशासन भेदभाव करत आहे, असे पूजा गावंडे यांनी पत्रात नमूद केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे बंदी आदेश लागू असताना या दोन व्यावसायिकांना कोणत्या निकषांच्या आधारे परवानग्या मिळाल्या, याची चौकशी करून त्या तत्काळ रद्द करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. अन्यथा ज्या नियमानुसार बिल्डरांना परवानग्या दिल्या, त्याच धर्तीवर प्रभागातील सामान्य रहिवाशांनाही बांधकामासाठी मुभा द्यावी, असा पवित्रा नगरसेविकेने घेतला आहे. या पत्राच्या प्रतिलिपी जिल्हाधिकारी व मनपा आयुक्तांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

DAYASAGAR SAMAJIK AROGYA VA BAHU UDESHIYA SANSTHA, AKOLA

ANGEL OF MERCY INSTITUTE OF NURSING SCIENCE, AKOLA

Eden Garden Campus, Kanheri Sarap, Eranda Road,
Tq. Barshitakli, Dist. Akola, Maharashtra

Mobile: 9921979511 | Email: amins.bscnursing@gmail.com

WANTED

Applications are invited in the prescribed format for the following posts:

| Sr. No | Post | Subject | No. | Category |
|---|---|---|---|---|
| 01 | Principal | Any | 01 | Open |
| 02 | Vice Principal | Any | 01 | Open |
| 03 | Professor | Any | 01 | Open |
| 04 | Associate Professor | Gyne/Obstetric Nursing | 01 | Open |
| | | Mental Health Nursing | 01 | Open |
| 05 | Asst. Professor | Child Health Nursing | 01 | Open |
| | | Community Health Nursing | 01 | Open |
| 06 | Tutor | Nursing | 16 | SC-2,ST-1,VJNT-2,OBC-3, SEBC-2,EWS-2, OPEN-4 |

Qualification: As per INC & MUHS norms. Valid Maharashtra Nursing Council registration mandatory.

Apply with biodata and documents before: 05/04/2026

Secretary
Dayasagar Samajik Arogya Va
Bahu Udeshiya Sanstha, Akola

महत्त्वाचे

## 'स्वस्तिक पॅटर्न' वृक्षलागवड उपक्रम जिल्ह्यात सर्वदूर राबविणार



**अकोला:** वृक्षक्रांती मिशनतर्फे 'स्वस्तिक पॅटर्न'मध्ये संपूर्ण जिल्ह्यात वृक्षलागवडीचा प्रस्ताव असून, त्यांना सर्व यंत्रणांनी सहकार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सर्व यंत्रणांना दिले आहेत.

मिशनचे संस्थापक ए. एस. नाथन यांच्यातर्फे 'स्वस्तिक पॅटर्न'मध्ये वृक्षलागवडीचा उपक्रम अनेक वर्षांपासून राज्यात ठिकठिकाणी राबविण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यातील ६० शासकीय कार्यालये व जागांमध्ये या उपक्रमात वृक्षलागवड झाली. यंदाही हा उपक्रम राबविण्याची इच्छा असून, जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालये, ई-क्लास जमीनीवर, तसेच एमआयडीसीच्या खुल्या जागांवर स्वस्तिक वृक्षलागवडीसाठी नि:स्वार्थ सेवा देण्याची तयारी आहे, असे श्री. नाथन यांनी प्रस्तावात नमूद केले आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील वृक्षलागवडीला चालना मिळण्यासाठी कार्यालयातील जागा, पाण्याची व्यवस्था, रोपे, कुंपण, यंत्रसामग्री आदी बाबींसाठी यंत्रणांनी मिशनला सहकार्य करावे. वृक्षलागवडीसाठी मनरेगाअंतर्गत रोपवाटिकेतून विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण विभागातर्फे विनामूल्य रोपे उपलब्ध करून द्यावी. जिल्ह्यात वृक्षलागवडीला चालना द्यावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले आहेत.

## जिल्हाधिकाऱ्यांची अकोला बसस्थानकाला भेट; सुविधांची पाहणी

**अकोला :** जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अकोला मध्यवर्ती बस स्थानकास भेट देऊन तेथील विविध सुविधांची सविस्तर पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी स्थानक परिसरातील स्वच्छता, प्रवाशांसाठी उपलब्ध असलेल्या सोयीसुविधा, वाहतूक व्यवस्थापन तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा बारकाईने आढावा घेतला. बस स्थानकात येणाऱ्या प्रवाशांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. स्वच्छतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता परिसर स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच प्रवाशांना बस वेळापत्रक, प्रतीक्षालय, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आदी मूलभूत सुविधा व्यवस्थित व सुरळीतपणे उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.वाहतूक व्यवस्थापन अधिक सुकर करण्यासाठी बसांची ये-जा व्यवस्थित नियोजनबद्ध पद्धतीने व्हावी.

## मोफत लाठी-काठी स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे आयोजन

**अकोला :** महाराष्ट्र सिलंबम असोसिएशन व स्वयंसिद्धा असोसिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने अकोल्यात मोफत लाठी-काठी स्वसंरक्षण (सिलंबम) प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे नेतृत्व राज्य प्रमुख डॉ. खुशबू चोपडे यांनी केले आहे. हे प्रशिक्षण शारदा समाज मंदिर, टीडब्ल्यूसी जिमच्या बाजूला, मराठा नगर येथे दररोज सायंकाळी ६:३० ते ७:३० या वेळेत ५ एप्रिल २०२६ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. आजच्या वेगाने बदलणाऱ्या समाजात स्वसंरक्षण ही केवळ एक कला नसून प्रत्येकासाठी आवश्यक जीवनकौशल्य बनले आहे. वाढत्या गुन्हेगारी घटना आणि असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर विशेषतः महिला, मुली आणि विद्यार्थ्यांनी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेणे अत्यंत गरजेचे ठरत आहे.

# शासन निर्णय फक्त कागदावर; अकोट तालुक्यात रोजगार सहाय्यकांचे कामबंद आंदोलन

## वर्षांच्या सेवेनंतरही अन्याय; अंमलबजावणीअभावी शासनावर संताप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. १ :** अकोट तालुक्यात ग्राम रोजगार सहाय्यकांनी शासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त करत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. शासनाने जाहीर केलेले निर्णय केवळ कागदावरच राहिले असून त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत गेल्या १८ वर्षांपासून ग्राम रोजगार सहाय्यक अत्यंत कमी मानधनावर गावपातळीवरील महत्त्वाची कामे पार पाडत आहेत. मात्र, त्यांच्या हक्कांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. शासनाने दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार दरमहा ८,००० रुपये मानधन, २,००० रुपये प्रोत्साहन भत्ता



आणि डेटा पॅक देण्याची घोषणा केली होती. मात्र या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी न झाल्याने राज्यभरातील सुमारे २८ हजार ग्राम रोजगार सहाय्यकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

याच पार्श्वभूमीवर अकोट तालुक्यातील सहाय्यकांनी कामबंद आंदोलन पुकारले असून, आपल्या मागण्यांचे निवेदन गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोट यांच्याकडे सादर केले आहे. या आंदोलनामुळे ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज, रोजगार हमी योजनेची कामे तसेच ग्रामीण विकासाशी संबंधित अनेक प्रकल्प ठप्प होण्याची शक्यता आहे.

या आंदोलनामुळे प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला असून, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी जोर धरत आहे.

- मागण्यांबाबत शासनाला सविस्तर माहिती व भूमिका कळविण्यात येईल,'' असे गटविकास अधिकारी रमाकांत माळी यांनी सांगितले.
- शासनाने घेतलेले निर्णय जर कागदावरच राहणार असतील तर त्यांना अर्थ उरत नाही. आमच्या संयमाचा अंत झाला असून, हक्क मिळेपर्यंत लढा सुरूच राहील. शासनाने तात्काळ अंमलबजावणी करावी. असे तालुका अध्यक्ष उमेश अवारे यांनी स्पष्ट केले.

## जिल्ह्यात अवकाळीचा हाहाकार; फळबागांसह भाजीपाल्याचे अतोनात नुकसान! यंत्रणेने तातडीने पंचनामे करावेत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला , दि. १ :** जिल्ह्यात झालेल्या अचानक अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे ग्रामीण व शहरी भागात जनजीवन विस्कळीत झाले असून शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीची जिल्हा प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी आणि महसूल, कृषी, वीज वितरण व आरोग्य विभागाने समन्वयाने काम करून नागरिकांना दिलासा द्यावा, असे कडक निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे आणि आमदार रणधीर सावरकर यांनी दिले आहेत.

वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी वीज पडण्याच्या घटना घडल्या असून फळबागा आणि भाजीपाल्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. हाताशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या नुकसानीचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करण्याचे आदेश लोकप्रतिनिधींनी महसूल व कृषी विभागाला दिले आहेत.

अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्याने उन्हाळ्याच्या दिवसात नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, महावितरणने देखभाल-दुरुस्तीसाठी तातडीने विशेष पथके नियुक्त करून वीज पुरवठा पूर्ववत करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद प्रशासनानेही सजग राहून आरोग्य व स्वच्छतेच्या कामात हलगर्जीपणा करू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

खासदार अनुप धोत्रे आणि आमदार रणधीर सावरकर यांनी जिल्ह्यातील विविध भागांतील शेतकरी, ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला. प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती घेऊन त्यांनी अधिकाऱ्यांना तातडीने मदतीचे कार्य सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

## सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये ग्रॅज्युएशन डे उत्साहात साजरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. १ :** स्थानिक श्रीजी कॉलनी येथील सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये दि. ३० मार्च २०२६ रोजी ग्रॅज्युएशन डे कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपाध्यक्ष लूणकरन डागा, सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल तसेच व्यवस्थापक प्रभुदास नाथे, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे व वैशाली गावत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमात नर्सरी ते केजी-२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात पहिलीच्या विद्यार्थिनींच्या स्वागत गीताने झाली. अर्चना रायबोले व योगेश चेडे यांनी त्यांना साथ दिली. विशेषतः ग्रॅज्युएशन डे हा केजी-२ च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. केजी-२ च्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केल्यानंतर त्यांना अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते 'डिग्री' प्रदान करण्यात आली.

याशिवाय केजी-१ व केजी-२ च्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्य व गीत सादरीकरण करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. वर्षभरातील विविध उपक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. पालकांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या वेळी केजी-२ मधील वेदश्री सावरकर, विधी महल्ले व रिद्धी पडोळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे भव्य स्वरूप पाहून प्रमोद चांडक व अवनी लखोटिया यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन केजी-१ चे विद्यार्थी ऋत्विका गायकवाड, गौरवी नाथे, प्रिशा चेडे व रजत गावंडे तसेच शिक्षिका भारती बघेले यांनी केले, तर आभार प्रदर्शन निकिता महल्ले यांनी केले.

## श्री गोविंदबुवा टाकळीकर महाराज पुण्यतिथी सोहळा व श्री खोलेश्वर यात्रा महोत्सव ३ व ४ एप्रिलला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शीटाकळी, दि. १ :** बार्शीटाकळी येथे संत परंपरेतील महत्त्वपूर्ण संत श्री गोविंदबुवा टाकळीकर महाराज यांचा १३९ वा पुण्यतिथी सोहळा तसेच श्री खोलेश्वर यात्रा महोत्सव दि. ३ व ४ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने ह.भ.प. श्री अनिरुद्ध गोपाल कृष्ण क्षीरसागर महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

संत गजानन महाराजांच्या समकालीन असलेले गोविंदबुवा टाकळीकर हे या परिसरातील एक थोर संत मानले जातात. त्यांच्या कार्याची महती दर्शविणारे ग्रंथ आजही उपलब्ध असून, त्यांच्या कार्याची साक्ष देतात. बार्शीटाकळी हे त्यांचे मूळ गाव असून येथेच त्यांच्या पूर्वजांनी प्राचीन मठ उभारला आहे. गोविंदबुवा महाराज यांचा जन्म सुमारे इ.स. १८०० च्या सुमारास झाला असून त्यांचे निधन इ.स. १८८८ मध्ये झाले. ते एकनाथ महाराजांचा अवतार असल्याचीही मान्यता आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पुण्यतिथीनिमित्त मोठा समाधी सोहळा, कीर्तन, प्रवचन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. दि. ३ एप्रिल रोजी कीर्तन, पूजन व दहीहंडीचा कार्यक्रम सायंकाळी होणार आहे. तर दि. ४ एप्रिल रोजी सकाळी पालखी मिरवणूक काढण्यात येणार असून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास दरवर्षी हजारो भाविक उपस्थित राहतात. यावर्षीही भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ह.भ.प. श्री अनिरुद्ध महाराज तसेच खोलेश्वर संस्थानचे अध्यक्ष श्रीरामजी तुळशीराम येळवणकार (माजी पोलीस पाटील), उपाध्यक्ष मदनलाल अग्रवाल, शेषराव राजुरकर, चंद्रकांत वाटमारे, आकाश धात्रक, प्रशांत देशमुख, अशोक म्हस्के, प्रफुलचंद्र माणीकराव व समस्त ग्रामस्थांनी केले आहे.

खोलेश्वर मंदिर परिसरातच गोविंदबुवा महाराजांची समाधी असून, या सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

## अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी २ ते ८ एप्रिलदरम्यान 'महा-साधना सप्ताह'

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १:** भारत सरकारच्या क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत 'साधना सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी त्यांना सज्ज करणे आणि तंत्रज्ञानाचा वापर कामकाजात वाढवून त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

केंद्र शासनाने 'साधना सप्ताह' राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्यानंतर राज्यातही 'महा-साधना सप्ताह' २ ते ८ एप्रिलदरम्यान आयोजित करण्यात येत आहे. 'टेक लर्निंग वीक' अंतर्गत सुमारे ८ लाख ८० हजार अधिकारी व कर्मचारी ७ दिवसांत किमान ४ तासांचे अभ्यासक्रम 'आयगॉट कर्मयोगी भारत' पोर्टलवर लॉग-इन करून पूर्ण करणार आहेत. यामुळे एकूण सुमारे ३५ लाख तासांचे प्रशिक्षण पूर्ण होणार आहे.

'साधना सप्ताह' हा 'आयगॉट कर्मयोगी भारत' अंतर्गत राबविण्यात येणारा एक विशेष प्रशिक्षण उपक्रम असून तो 'मिशन कर्मयोगी'चा भाग आहे. शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी तसेच त्यांना तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम करण्यासाठी हा उपक्रम आयोजित केला जातो. आठवडाभर चालणारा हा पूर्णपणे ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम असून यात विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी आपल्या कामाशी संबंधित नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आणि कार्यालयीन कामकाज सुलभ करण्याच्या पद्धती आत्मसात करतात. शासकीय कामकाजाची कार्यक्षमता वाढविणे, डिजिटल गव्हर्नन्सला चालना देणे, नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, सातत्याने शिक्षण घेण्याची सवय निर्माण करणे आणि वेळ व्यवस्थापन सुधारणे ही या सप्ताहामागील प्रमुख उद्दिष्टे आहेत. त्यामुळे या उपक्रमात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी केले आहे.

## येळवण येथे महिलांना आत्मनिर्भर व कौशल्य विकास प्रशिक्षणाची सुरुवात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**येळवण, दि. १ :** ग्रामपंचायत येथे अदानी फाउंडेशन यांच्याकडून त्यांच्या सीएसआर फंडातून ग्रामपंचायत येळवण येथील महिला वर्गासाठी त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी कौशल्य विकास म्हणून रोजगाराची संधी व स्वतःच्या पायावर उभे करून व्यवसाय करण्याची संधी देण्यासाठी गावातील गरजू महिलांना शिलाई मशीन शिवणकामाचे प्रशिक्षणाची सुरुवात आज करण्यात आली.



यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे कापड शिवून सदर महिलांना प्रशिक्षित केल्या जाईल हे प्रशिक्षण एक महिन्याचे कालावधी असून या प्रशिक्षणामध्ये ज्या महिला यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करतील अशा महिलांना अदानी फाउंडेशन कडून एक शिलाई मशीन आणि त्या संबंधित किट मोफत वाटप करण्यात येईल सोबतच प्रशिक्षणामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे मास्टर ट्रेनर द्वारा महिलांना प्रशिक्षित केल्या जाईल या प्रशिक्षणामध्ये महिलांना एक महिन्यासाठी आपला वेळ द्यावा लागेल, सदर प्रशिक्षणामध्ये अदानी फाउंडेशन कडून चहा, नाश्ता, जेवणाची सोय केलेली आहे. सदर प्रशिक्षण उत्तीर्ण होऊन महिलांनी आत्मनिर्भर होऊन आपला व्यवसाय चांगल्या प्रकारे चालू करावा असा या उपक्रमाद्वारे गावातील महिलांना तसेच इतर गावातील महिलांना असा संदेश दिला आहे. यामध्ये येळवण गावचे सरपंच काजल दिनेश मडावी, उपसरपंच आम्रपाली अनिल वाहूरवाघ, ग्रामपंचायत सदस्य नंदा कुंबरे, नंदा सोनवणे, वेणूताई चोरपगार, अनिल मोहिते, शेषराव शेंद्रे, निरंजन गडलिंग तसेच आदरणीय फौंडेशन करून आलेले अधिकारी कर्मचारी व त्यांचे सहकारी यांनी दिलेल्या मदतीमुळे ग्राम पंचायत येळवण सदैव त्यांचे आभारी राहील असे आभार गावातील ग्रामस्थ व महिला मंडळींनी त्यांचे केले. या संबंधित येळवण गावचे ग्रामपंचायत अधिकारी गणेश शिरसाट, ग्रामपंचायत कर्मचारी संजय वाळसे, किसन चव्हाण या कार्यक्रमासाठी हजर होते.

नयुक्त्या | महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या नियुक्त्या जाहीर

# अमरावती विभागप्रमुख डॉ. चंद्रकांत अवचार तर जिल्हाध्यक्षपदी डॉ. उल्हास मोकळकर यांची निवड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १:** महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्यासाठी महत्त्वपूर्ण नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून अमरावती विभाग प्रमुखपदी डॉ चंद्रकांत अवचार तर अकोला जिल्हाध्यक्षपदी अकोला पंचायत समितीचे पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी डॉ. उल्हास मोकळकर यांची निवड करण्यात आली आहे.

संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार यांच्या प्रेरणेने या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. तसेच सुभाष तायडे यांची राज्य मार्गदर्शक मंडळ





सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीमागे डॉ. कृणाल महाजन व प्रसाद कुलकर्णी यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगण्यात आले. नियुक्ती झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून योग क्षेत्रात सकारात्मक कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे. नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी योग शिक्षणाची माहिती घराघरात पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला. ''योग ही केवळ साधना नसून निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत योग पोहोचवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू,'' असे त्यांनी सांगितले. या नियुक्त्यांमुळे जिल्हा व विभाग स्तरावर योग चळवळीला नवे बळ मिळणार असून आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## डॉ.राठोड महाविद्यालयात आर्थिक साक्षरता व ग्राहक जनजागृती प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १ :** श्री. डॉ. आर. जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय, मूर्तिजापूर येथे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलतर्फे फायनान्शिअल अवेअरनेस अँड कंजूमर ट्रेनिंग प्रोग्राम या विषयावर एक दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एस. एस. धांडे सर होते. नॅशनल सेंटर फॉर फायनान्शियल एज्युकेशन येथील तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. अतुल खराड यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज घेताना आवश्यक कागदपत्रे, परतफेडीची पद्धत व व्याजदर याबाबत मार्गदर्शन केले. तसेच क्रेडिट कार्डचा योग्य वापर, त्याचे फायदे-तोटे आणि कर्जाच्या सापळ्यात अडकू नये यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती दिली. त्यांनी एस. आय. पी. द्वारे लहान रकमेपासून गुंतवणूक करून भविष्यासाठी आर्थिक नियोजन कसे करावे, याचे महत्त्व स्पष्ट केले. याशिवाय टर्म प्लॅन व आरोग्य विमा यांचे महत्त्व सांगत अनपेक्षित परिस्थितीत आर्थिक सुरक्षितता कशी मिळू शकते, याविषयीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. एस. एस. धांडे यांनी आर्थिक साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले. प्रास्ताविक प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलच्या प्रभारी डॉ. टी. आर. तट्टे यांनी केले, तर अतिथींची ओळख श्री. शुभम सावळे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. तन्वी देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. दिशा इंगोले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा मा. श्रीमती दमयंतीबाई राठोड, सचिव मा. डॉ. ए. आर. राठोड तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. ए. पी. चर्जन यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

अकोला, गुरूवार, दि. २ एप्रिल २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### रिसोड पोलिसांकडून १५ दिवसांत १० जणांचा शोध

**रिसोड:** जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनात राबविलेल्या ऑपरेशन मुस्कान अंतर्गत रिसोड पोलिसांनी मोठी कामगिरी केली आहे. अवघ्या १५ दिवसांत अपहरणाच्या ४ गुन्ह्यांचा उलगडा करत १० जणांना सुखरूप नातेवाईकांच्या स्वाधीन केले. या मोहिमेत तांत्रिक तपास आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी कर्नाटक राज्यातील बेळगाव येथून एका १७ वर्षीय मुलीला, तर मध्य प्रदेशातील हरदा येथून दुसऱ्या अल्पवयीन मुलीला शोधून काढले. तसेच सुलतानपूर आणि मालेगाव येथून दोन मुलांचा शोध घेण्यात आला. याव्यतिरिक्त ६ बेपत्ता महिला व पुरुषांनाही शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने ही धडाकेबाज कामगिरी केली.

### वाशिम जिल्ह्यात अवकाळीची हजेरी; हळद उत्पादक शेतकरी चिंतेत

**वाशिम:** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून असलेल्या ढगाळ वातावरणानंतर सोमवारी (३० मार्च) सायंकाळी अवकाळी पावसाने हजेरी लावली. वाशिम शहरासह रिसोड, मालेगाव, कारंजा आणि मानोरा तालुक्यात झालेल्या या पावसामुळे हळद उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. सध्या जिल्ह्यात हळद काढणीचा हंगाम ऐन भरात आहे. अनेक शेतकऱ्यांनी काढलेली हळद शेतात किंवा मोकळ्या जागेत वाळवण्यासाठी ठेवली आहे. अचानक आलेल्या पावसामुळे हळद भिजून तिच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस ढगाळ वातावरणाचा अंदाज वर्तवल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकाची सुरक्षित साठवणूक करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### रिसोडमध्ये आंतरजिल्हा लुटारू टोळी जेरबंद

**रिसोड:** परिसरात दहशत माजवणाऱ्या सशस्त्र आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश करण्यात रिसोड पोलिसांना यश आले आहे. बिबखेडा, मोठेगाव आणि चाकोली परिसरात चाकूचा धाक दाखवून लूटमार करणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून ३ लाख ५७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जप्त केलेल्या साहित्यात सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल, एक जिवंत काडतूस, खंजीर आणि गुन्ह्यात वापरलेल्या मोटारसायकलचा समावेश आहे. पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण आणि डीबी पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे ही कारवाई केली. अन्य एका कारवाईत, किराणा दुकानासमोरून तेलाचे कॅन चोरणाऱ्या आरोपीलाही पोलिसांनी अवघ्या दोन तासांत अटक केली.

# जिल्हा बँकेच्या निकालाने राजकीय समीकरणे बदलली

## देशमुखांच्या वर्चस्वाला धक्का ; झनक-मापारी-ठाकरे त्रिकुटाची सरशी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**वाशिम, दि. १ :** अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या निकालाने वाशिम जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली आहे. ३० मार्च रोजी जाहीर झालेले हे निकाल केवळ एका बँकेपुरते मर्यादित नसून, आगामी जिल्हा परिषद निवडणुकीची ही जणू रंगीत तालीमच ठरली आहे. विशेषतः रिसोड तालुक्यात अनेक दशकांपासून असलेल्या प्रस्थापित सत्तेला मतदारांनी नाकारत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत परिवर्तनाचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

रिसोड तालुक्यात गेल्या अनेक दशकांपासून सर्वसमावेशक राजकारणात अनंतराव देशमुख आणि सहकार क्षेत्रात वामनराव देशमुख यांचे निर्विवाद वर्चस्व होते. अकोला जिल्हा बँकेत अनेक वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या वामनराव देशमुखांनी माजी खासदार देशमुख यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांना सोबत घेऊन विठ्ठल पाचरणे यांच्या विजयासाठी प्रतिष्ठा पणाला लावली होती. मात्र, प्रस्थापितांची ही तटबंदी तोडण्यात झनक गट यशस्वी ठरला. माजी राज्यमंत्री दिवंगत सुभाषराव झनक यांच्या पत्नी शोभाताई झनक यांनी ५९ मते मिळवून विठ्ठल पाचरणे यांचा ४६ मतांनी धुव्वा उडवला.

हा निकाल म्हणजे प्रस्थापितांविरुद्ध असलेली अँटी इन्कमबन्सी असल्याचे मानले जात आहे. काँग्रेसशी पिढ्यानपिढ्या एकनिष्ठ राहिलेल्या झनक घराण्यावर मतदारांनी पुन्हा एकदा मोहर उमटवली आहे. विद्यमान आमदार अमित झनक यांनी आखलेली धुरंधर रणनीती आणि निर्माण केलेली विश्वासार्हता यापुढे देशमुखांची शक्ती निष्प्रभ ठरली. हा विजय आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी झनक समर्थकांमध्ये प्रचंड उत्साह भरणारा आहे.

वाशिम तालुक्यातील निकालाने जिल्हा परिषदेच्या सत्तेची सर्व गणिते बदलली आहेत. अनुभवी नेते चक्रधर गोटे यांचा पराभव करत अल्पभूधारक उमेदवार धनंजय गोरे यांनी ऐतिहासिक बाजी मारली. या विजयामागे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख सुरेश मापारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते चंद्रकांत ठाकरे यांची चाणक्यनीती निर्णायक ठरली. जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती राहिलेले सुरेश मापारी यांनी आपल्या दांडग्या अनुभवाच्या जोरावर गोरे यांच्यासाठी अशी काही व्युहरचना केली की, राजकीय वजन असलेल्या नेत्यांनाही पराभवाचा धक्का सहन करावा लागला. मापारी यांनी बाजार समिती आणि नगर परिषदेतील आपल्या प्रभावाचा कौशल्याने वापर करत चंद्रकांत ठाकरे यांच्या मदतीने आगामी जिल्हा परिषद निवडणुकीचा मार्ग मोकळा केला आहे.

**जिल्हा बँकेच्या या निवडणुकीने हे स्पष्ट केले आहे की, आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत अमित झनक, सुरेश मापारी आणि चंद्रकांत ठाकरे हे त्रिकूट किंगमेकरच्या भूमिकेत असेल. प्रस्थापितांच्या अहंकाराला आणि दशकांपासून असलेल्या सत्तेला छेद देणारी ही निवडणूक जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात मैलाचा दगड ठरणार, हे आता निश्चित झाले आहे.**

मालेगाव तालुक्यात राष्ट्रवादीचे दिलीपराव जाधव यांचे चिरंजीव नितीन जाधव यांनी विजय मिळवून जाधवांची राजकीय पकड पुन्हा एकदा सिद्ध केली. अमित झनक आणि दिलीपराव जाधव यांची जुळून आलेली ही सांगड आगामी निवडणुकांत विरोधकांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे. दुसरीकडे, मंगरुळपीरमध्ये चंद्रकांत ठाकरेंचे बंधू रामेश्वर ठाकरे यांनी एकतर्फी विजय मिळवून आगामी जिल्हा परिषदेत ठाकरेंचेच वर्चस्व असेल, हे अधोरेखित केले.

## महावीर जयंती निमित्त महावीर उद्यान विकास कामाचा शुभारंभ

### जैन समाज बांधवांकडून लोकप्रतिनिधींचा सत्कार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा (लाड), दि. १ :** जैन संस्कृतीसाठी प्रसिद्ध असलेल्या कारंजा शहरातील नगरपरिषद अंतर्गत १९८३ साली स्थापन करण्यात आलेल्या महावीर गार्डनच्या विकासासाठी महावीर जयंतीच्या निमित्ताने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. 'नमो उद्यान' योजनेअंतर्गत या उद्यानाच्या विकासासाठी ८४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, या कामाचा उद्घाटन समारंभ ३१ मार्च रोजी उत्साहात पार पडला.

कारंजा-मानोरा मतदारसंघाच्या आमदार सईताई प्रकाश डहाके यांच्या शुभहस्ते या विकासकामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नगरपरिषद उपाध्यक्ष ॲड. फिरोज शेकुवाले, गटनेते बिलाल पुंजाजी, माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, भाजप गटनेत्या शालिनीताई ठाकरे, महावीर जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष नितीन बोरसे, राजाभाऊ डोणगावकर, सुहास चवरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सकल जैन समाज बांधवांच्या वतीने उपस्थित लोकप्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. या उद्यानाच्या विकासामध्ये बालकांसाठी खेळण्याची आधुनिक साधने, ज्येष्ठ नागरिकांसाठी चालण्याची सुविधा, आकर्षक स्विमिंग कारंजे तसेच उद्यानाच्या भिंतींवर आकर्षक नक्षीकाम करण्यात येणार आहे. या कामामुळे महावीर उद्यान अधिक सुंदर व नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या वेळी शिक्षण सभापती जाकीर शेख ,आरोग्य सभापती अनिस खान नियोजन सभापती नदीम अहमद, ॲड. सुभान खेतीवाले, नगर सेवक इम्रान पारेख, सलमान विराणी, शोएब शेख, नितीन गढवाले, सचानंद थद्दानी, अजय श्रीवास, सागर अंभोरे, ज्योतीताई राठोड, कुसुमताई अघम, रहमत ठेकेदार, अब्दुल नईम, अमोल गढवाले, मुन्ना ठेकेदार, अमन शाह, प्रमोद गायकवाड, अतुल चिमेगावे, नगरसेविका वैशाली गुल्हाने, कांचन डेंडुळे, वर्षा मनीष भेलांडे, वंदना घार्डीकर, सत्यजित गाडगे, महावीर जयंती महोत्सव समितीचे नितीन बोरसे, ॲड. संदेश जिंतूरकर, प्रज्वल गुलालकरी, पपीस कहाते, सुदेश गुलालकरी, प्रवीण फुरसुले, अनिता खंडारे आदी जैन समाज बांधवांची उपस्थिती होती.

## सोळंके दांपत्याला बेंगळुरू येथे 'जल योद्धा सन्मान' प्रदान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १ :** जलसंधारण आणि जलव्यवस्थापन क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल वाशिम येथील 'युनिव्हर्सल व्हर्साटाईल सोसायटी'चे अध्यक्ष नारायण सोळंके व त्यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी सोळंके यांना प्रतिष्ठित 'जल योद्धा सन्मान २०२५' ने गौरविण्यात आले. बेंगळुरू येथील आर्ट ऑफ लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित सोहळ्यात श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सरकारीटेल.कॉम तर्फे आयोजित या उपक्रमाला भारत सरकारचा नीती आयोग, जलशक्ती मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाचे सहकार्य लाभले. देशभरातील निवडक ३३ जल योद्ध्यांमध्ये सोळंके दांपत्याचा समावेश करण्यात आला. युनिव्हर्सल व्हर्साटाईल सोसायटीने गेल्या २१ वर्षांत कृषी, पर्यावरण आणि पाणीटंचाई निवारणात मोलाचे योगदान दिले आहे. संस्थेला संयुक्त राष्ट्रांचा विशेष दर्जा प्राप्त असून, त्यांनी ब्राझील, न्यूयॉर्क आणि बँकॉक येथील आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये जलसंधारणाचे प्रतिनिधित्व केले आहे. स्थानिक पातळीवर वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविलेल्या 'जलतारा' प्रकल्पात संस्थेचा सक्रिय सहभाग राहिला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल यापूर्वी पालकमंत्री व केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांनीही सोळंके यांचे कौतुक केले आहे. या सोहळ्याला पाच पद्मश्री पुरस्कार विजेत्यांसह नीती आयोग आणि विविध मंत्रालयांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. हा सन्मान वाशिम जिल्ह्यासाठी आणि जलसंधारण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

## भिला माता मंदिरात सुवर्ण सिंहासन अर्पण; भजनी मंडळांचा गौरव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा, दि. १ :** येथील आदिशक्ती श्री भिला माता संस्थानच्या १९ व्या वर्धापन दिनाचे आणि चैत्र नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून मंदिराला भव्य सोनेरी सिंहासन अर्पण करण्यात आले. तसेच, विविध महिला भजनी मंडळांचा 'आदिशक्ती पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला.

सोमवार, ३० मार्च रोजी कारंजाच्या आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते हे सिंहासन देवीला अर्पण करण्यात आले. कारंजातील प्रसिद्ध कारागीर प्रदीप गुगळे यांनी शेकडो भाविकांच्या देणगीतून हे कलाकुसरयुक्त सिंहासन साकारले आहे. यावेळी आमदार डहाके म्हणाल्या की, "भिला माता ही विश्वाची शक्ती असून येथील नवरात्रोत्सवात भाविकांना मोठी सकारात्मक ऊर्जा मिळते. भाविकांच्या सोयीसाठी लवकरच आमदार निधीतून भव्य सभागृह उपलब्ध करून दिले जाईल."

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष संजय काकडे होते. यावेळी निलेश सोमाणी, देवमनराव मोरे, नगरसेविका कुसूमताई अघम, चंदाताई कोळकर, कांचनताई डेंडूळे, रवींद्र गुल्हाने, किशोर बावणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. गजाननराव साटोटे गुरुजी यांनी प्रास्ताविक केले, तर सूत्रसंचालन संजय कडोळे यांनी केले.

## कारंजाच्या गोयनका महाविद्यालयात पदवीदान समारंभ संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**कारंजा (लाड), दि. १ :** श्री किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालयात २५ मार्च रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पदवी प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला.

दि बेरार एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अड .मोतीसिंह मोहता, सचिव पवनजी माहेश्वरी, कार्यकारिणी सदस्य डॉ. अजय कांत, प्रा. राहूल महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप येवले हे होते. तर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून कारंजा शहराचे उपनगराध्यक्ष तसेच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी ॲड फिरोज शेकुवाले उपस्थित होते. यावेळी मंचावर मानव्य विद्या शाखा समन्वयक डॉ. मेघनाद भावे व वाणिज्य विभाग समन्वयक प्रा. डॉ. बलजितकौर ओबेरॉय उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते एम. ए. इतिहास व गृह अर्थशास्त्र तसेच बी.ए. व बी.कॉम. च्या पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी ॲड फिरोज शेकुवाले यांनी पदवीधरांना वास्तवाचे भान असावे त्यांनी उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, सोशल मिडीयापासून दूर राहून आपल्या पदवीचा उपयोग रोजगार प्राप्तीसाठी करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय मनोगतातून डॉ. प्रदीप येवले यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या बदलांना विद्यार्थ्यांनी आत्मसात करुन विविधकौशल्ये प्राप्त करावी असा मोलाचा सल्ला याप्रसंगी विद्यार्थ्यांना दिला. पदवीकांक्षीना आपल्या जीवनात पदवीची मूल्ये कशी रूजवावीत याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मिनल राऊळ यांनी तर आभार प्रा. पल्लवी पवार यांनी केले याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापकवृंद तसेच महाविद्यालयाचे अधिक्षक . मनोज राठोड आणि इतर शिक्षकेतर उपस्थित होते.

**भव्य शोभायात्रा** | **जैन मुनींच्या विसाव्यासाठी नागपूर हायवे लगतची जागा दान**

# कारंजात महावीर जयंती उत्साहात साजरी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा(लाड), दि. १ :** जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. शहरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी कीर्तिस्तंभ येथून प्रभातफेरी काढून कार्यक्रमांची सुरुवात झाली. यानंतर ध्वजारोहण, ध्वजवंदन व ध्वजगीताचे कार्यक्रम संपन्न झाले. गायक पाटणी व डॉ. गोमटेश्वर सातमोंडा पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाला अतुल अरुण नांदगावकर, पियुष जगदीश डोणगावकर, नवनीत डांगुर, सुदर्शनजी राळेकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सकाळी जन्मसोहळ्याची सामग्री वाजतगाजत मिरवणुकीतून आणण्यात आली. श्री सेनगण मंदिर येथे भगवान महावीरांचा जन्माभिषेक सोहळा भक्तिभावात पार पडला. त्यानंतर महावीर चौक येथून मोटरसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत युवक, महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

सायंकाळी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत आकर्षक देखावे, सजवलेले रथ, धार्मिक संदेश देणारे फलक तसेच भजन-कीर्तनाचा गजर यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून शोभायात्रेचे स्वागत केले.

रात्री आयोजित व्याख्यानात डॉ. गोमटेश्वर सातमोंडा पाटील यांनी भगवान महावीरांच्या जीवनातील संदेश, अहिंसा व सत्य यांचे महत्त्व स्पष्ट केले.

**जैन मुनींच्या विसाव्यासाठी नागपूर हायवे लगत २००० चौ.फुट जागा दान करणारे दानशूर विनोद मारुती ठाकरे यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या या उदात्त कार्याबद्दल सकल जैन समाज बांधवांकडून आभार व्यक्त करण्यात आले.**

संपूर्ण दिवस विविध कार्यक्रमांनी सजलेला हा उत्सव उत्साहात पार पडला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सकल जैन समाज महावीर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन बोरसे, सचिव संदेश जिंतूरकर, कोषाध्यक्ष स्वप्निल गुलाल, सहसचिव नवीन रांगोळी, प्रज्वल गुलालकरी , प्रफुल चनके, के. शिरीष कस्तुरीवाले, मनीष भेलांडे आदींनी सहकार्य केले.

## धानोरा येथील भागवत सप्ताहात समुद्रमंथन कथेचे भावपूर्ण निरूपण




**मानोरा:** तालुक्यातील धानोरा येथील महादेव संस्थानात आयोजित श्रीमद् भागवत कथा सप्ताहात चौथ्या दिवसाचे पुष्प ह.भ.प. श्रीराम महाराज चिखलीकर यांनी गुंफले. यावेळी त्यांनी समुद्रमंथनाच्या कथेवर प्रकाश टाकत भाविकांना जीवनातील विकारांचे मंथन करण्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला. महाराजांनी समुद्रमंथन म्हणजे असत्यातून सत्याकडे जाण्याची प्रक्रिया असल्याचे सांगताना दुधाचे उदाहरण दिले. दूध तापवून त्याचे दही, लोणी आणि शेवटी साजूक तूप तयार होते; या प्रक्रियेत जशी वस्तू अधिक शुद्ध आणि मौल्यवान होत जाते, तसेच माणसानेही आपल्या मनातील काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकाराचे मंथन करून आत्म्याला सत्याच्या मार्गावर नेले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

समुद्रमंथनातून अनेक रत्ने बाहेर पडली, मात्र देवांनी कशाचाही हव्यास धरला नाही. शेवटी प्रगट झालेला अमृत कलश हे सत्याचे प्रतीक असून, चांगल्या विचारांच्या मंथनातूनच ही प्राप्ती होते, असे त्यांनी नमूद केले. चिखलीकर महाराजांच्या ओघवत्या शैलीतील निरूपणामुळे श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. या कथा श्रवणासाठी धानोरा परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### पणज येथील शिक्षक सुहेल अहमद यांचा गौरव



**अकोट :** अकोट तालुक्यातील पणज येथील जिल्हा परिषद उर्दू माध्यमिक शाळेचे शिक्षक सुहेल अहमद यांनी सीटीइटी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत संपूर्ण अकोला जिल्ह्यात सर्वाधिक गुण मिळवण्याचा मान पटकावला आहे. त्यांनी या परीक्षेत ११२ गुण मिळवून आपल्या शाळेचे व जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे.

सुहेल अहमद हे केवळ एक उत्तम शिक्षकच नव्हे, तर जबाबदार, प्रामाणिक आणि सक्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. ते शैक्षणिक उपक्रमांबरोबरच शाळेतील विविध उपक्रमांमध्येही उत्साहाने सहभाग घेतात. त्यांच्या मेहनत, जिद्द, चिकाटी आणि समर्पणामुळेच त्यांना हे यश मिळाले असून, ते सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांच्या या यशामुळे शाळेचा तसेच संपूर्ण परिसराचा अभिमान उंचावला आहे. अशी भावना मुख्याध्यापक व शिक्षक-कर्मचारी वर्गाने व्यक्त केली आहे.

### हनुमान जन्मोत्सवानिमित्त कीर्तन सोहळ्याचे आयोजन

**बार्शीटाकळी :** तालुक्यातील महान (वाई महान) येथे नवसाला पावणारे व जागृत देवस्थान श्री जागृत महादेव मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार तथा 'आवाजाचे जादूगार' ह.भ.प. श्री पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या जाहीर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कीर्तन सोहळा शुक्रवार, दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन श्री जागृत महादेव मंदिर, वाई महान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### महादेवराव महल्ले



**बाळापुर :** तालुक्यातील खंडाळा येथील प्रतिष्ठित नागरिक महादेवराव महल्ले यांचे १ /४ /२०२६ रोजी वयाच्या ७७ वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी ३ मुलं १ मुलगी असा बराच मोठा आप्त परिवार आहे. महादेवराव महल्ले स्वभावाने खूप शांत संयमी आणि मनमिळाऊ स्वभावाचे होते.

# केवायसीच्या नावाखाली ग्राहकांची लूट; वाडेगावातील गॅस एजन्सीवर गंभीर आरोप

## केवायसीसाठी १०० रुपयांची वसुली, चौकशी करून कारवाईचे अधिकाऱ्यांचे आश्वासन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी





**बाळापूर, दि. १ :** वाडेगाव येथील गॅस एजन्सीकडून केवायसीच्या नावाखाली ग्राहकांची लूट होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. विशेषतः बाहेरगावाहून येणाऱ्या नागरिकांना यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिपळखुटा येथील राऊत यांना गॅस अनुदान बँकेत जमा झाले असून त्यांना ग्राहक डीएसी क्रमांकही प्राप्त झाला आहे. तरीही वाडेगाव येथील पंकज इंडियन गॅस एजन्सीकडून त्यांना गॅस सिलिंडर देण्यात टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

वाडेगाव व परिसरातील अनेक ग्राहकांनी इंडियन गॅस कंपनीचे कनेक्शन घेतले असून, त्याचा गैरफायदा घेत एजन्सीकडून केवायसीच्या नावाखाली वसुली केली जात असल्याचे सांगितले जाते.

ग्राहकांना दुकानात बोलावून एजन्सीतील एका कर्मचाऱ्यामार्फत खाजगी मोबाईलवर केवायसी केली जाते आणि त्यासाठी प्रत्येकी १०० रुपये घेतले जात असल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्यक्षात केवायसी प्रक्रिया कंपनीमार्फत विनामूल्य केली जाते. या प्रकाराबाबत संबंधित एजन्सीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

> ❑ गॅस एजन्सीकडून केवायसीसाठी पैसे घेणे चुकीचे आहे. केवायसी संदर्भात कुठला आहे त्रास ग्राहकांना होता कामा नये यासंदर्भात आम्ही चौकशी करून संबंधितांवर कारवाई प्रस्तावित करू.
>
> **- रविंद्र येणावर,** जिल्हा पुरवठा अधिकारी

> ❑ केवायसी बाबत कोणीही पैसे घेत असेल तर हा प्रकार गंभीर असून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात येईल, या संदर्भात कोणी पैसे घेत असतील तर त्यांनी तक्रार करावी असे आवाहन करण्यात येत आहे.
>
> **- विनीत ताले,** बाळापूर तालुका अन्न पुरवठा अधिकारी

## दुचाकीची विद्युत खांबाला धडक; एक ठार तर एक जखमी



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १ :** मूर्तिजापूर शहरातील छत्रपती शिवाजीनगर परिसरात झालेल्या भीषण अपघाताने परिसर हादरला आहे. भरधाव वेगामुळे दुचाकीचा ताबा सुटून ती थेट विद्युत खांबावर आदळल्याने एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा जण गंभीर जखमी झाला आहे.

मृत व्यक्तीचे नाव शरद डोंगरे (वय ४०) असे असून रमेश जामनिक (वय ६०) हे गंभीर जखमी झाले आहेत. दोघेही टीपटाळा येथील रहिवासी असून, वाई येथे सोयरिक कार्यक्रम आटोपून परत येत असताना हा अपघात घडला.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, शिवाजीनगर परिसरात आठवडी बाजाराकडून बायपासकडे वाहतुकीची वर्दळ सुरू होती. याचदरम्यान डोंगरे व जामनिक हे दुचाकीने येत असताना अचानक वाहनाचा ताबा सुटला आणि दुचाकी थेट विद्युत खांबावर धडकली. धडकेचा आवाज मोठा असल्याने परिसरातील नागरिक तत्काळ घटनास्थळी धावले.

अपघातानंतर दोघांनाही तातडीने उपजिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांनी शरद डोंगरे यांना मृत घोषित केले, तर रमेश जामनिक यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक परंतु स्थिर असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## अकोट पालिका सफाई कर्मचाऱ्यांचा कामबंद आंदोलनाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. १ :** राष्ट्रीय सफाई कर्मचारी मजदूर युनियनच्या वतीने विविध मागण्यांसाठी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडण्यात आले असून, त्यावर तातडीने कारवाई न झाल्यास कामबंद आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनानुसार, नगरपरिषदेत सुमारे २० ते २५ सफाई कामगार गेल्या काही वर्षांपासून प्रत्यक्ष सफाई कामाऐवजी कार्यालयीन काम करत आहेत. तसेच वारसाहक्काने नोकऱ्या दिल्या जात असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. प्रत्यक्ष काम करणाऱ्या सफाई कामगारांना पदोन्नती देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. मोठ्या नाल्यांची साफसफाई केवळ काहीच कामगारांकडून करून घेतली जात असल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली.

काही कर्मचारी सफाई कामगार म्हणून नियुक्त असूनही प्रत्यक्षात नाल्यांची साफसफाई किंवा मृत जनावरांची विल्हेवाट लावण्याचे काम करत नाहीत, असा आरोप करण्यात आला आहे. नोकरी लागल्यानंतर काही दिवसांतच संबंधित कर्मचारी विभागीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने कार्यालयीन कामावर बदली करून घेतात. त्यामुळे प्रत्यक्ष सफाई कामाचा ताण इतर कामगारांवर पडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, काही लोकप्रतिनिधी व राजकीय व्यक्तींच्या पाठबळामुळे आपल्या जवळच्या व्यक्तींना कार्यालयीन कामावर लावले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यामुळे शहराच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

वरील सर्व मागण्यांवर मुख्याधिकारी व प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास कामबंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युनियनच्या वतीने देण्यात आला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी शासन व प्रशासनावर राहील, असेही स्पष्ट करण्यात आले.

निवेदन देताना तालुका अध्यक्ष अमित बैंडवाल, जिल्हाध्यक्ष प्रमोद राधेश्याम मदनि, प्रदेश सचिव करण माहातो, तालुका सचिव राहुल सत्याल, अ. सलीम, पाचुराम चावरे, संतोष गोहर, निलेश बागळे, रोहित बागळे, कुंदन मदनि, करण नकवाल, युवराज सारवान, भरत गिगणे, कुंदन सारवान, अमित छापरवाल, दीपक मदनि, शेख इमदान, नितीन चावरे, मिथुन छापरवाल, चंद्रकांत मलिक आदी सफाई कामगार उपस्थित होते.

## जगाला वाचविण्याचे सामर्थ्य भारतीय विचारात – ज्ञानेश देशपांडे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. १ :** तालुक्यातील विराहीत येथे निंभा मंडळ सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित विशाल हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. यावेळी अकोला जिल्हा धर्मजागरण संयोजक ज्ञानेश देशपांडे यांनी "मध्यपूर्वेत सुरू असलेला संघर्ष ही वर्चस्वाची लढाई असून, या विध्वंसक परिस्थितीतून जगाला वाचविण्याचे सामर्थ्य 'वसुधैव कुटुंबकम' या भारतीय विचारात आहे," असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश देशपांडे होते. यावेळी मंचावर ह.भ.प. नागेश महाराज आगलावे (शेगाव), महिला वक्त्या रा. से. समितीच्या सहकार्यवाहिका डॉ. कोमल चिमणकर (अकोला), परमहंस सागर बाबा कानडी, रामभाऊ राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतमातेच्या पूजनाने करण्यात आली. तुळजा भवानी संस्थानच्या वतीने मान्यवरांचा शाल, श्रीफळ व भवानी मातेस प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

ह.भ.प. नागेश महाराज आगलावे यांनी आपल्या आशीर्वचनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचे कौतुक करताना, "असंस्कृतीचा वणवा संस्कारातूनच विझवावा लागेल," असे सांगितले. डॉ. कोमल चिमणकर यांनी महिलांना उद्देशून मार्गदर्शन करताना, "प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा हात असतो; मात्र आजच्या काळात हा वेळ सोशल मीडियावर खर्च होत आहे," अशी खंत व्यक्त केली. तसेच, "घराघरात शिवबा घडण्यासाठी जिजाऊंसारखी आई बनणे आवश्यक आहे," असे आवाहन त्यांनी केले. अर्चना राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अमित राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन रामभाऊ राऊत यांनी केले. प्रबोध बापट यांच्या वंदे मातरम गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. संमेलनाला मोठ्या संख्येने ग्रामस्थ महिला व पुरुष उपस्थित होते.

## अकोटच्या दोन कार्यकर्त्यांचा राज्यस्तरीय गौरव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. १ :** 'संघर्षातूनच नेतृत्वाची जडणघडण होते आणि प्रामाणिक समाजसेवेची पावती कधीतरी नक्कीच मिळते,'' याचा प्रत्यय अहिल्यानगर येथे पाहायला मिळाला. दि. ३० मार्च २०२६ रोजी अहिल्यानगर येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यकर्ता कार्यशाळेत अकोट तालुक्यातील दोन कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.

अकोट तालुका संघटक शुभम नारे यांना त्यांच्या उत्कृष्ट संघटनात्मक कार्याबद्दल वंदनीय बच्चू भाऊ कडू यांच्या हस्ते 'जनसेवा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. तसेच आरोग्य क्षेत्रातील निस्वार्थ सेवेसाठी गणेश गावंडे यांना 'रुग्णसेवक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

शुभम नारे यांनी अकोट तालुक्यात जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी व संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत राज्यस्तरीय व्यासपीठावर त्यांचा सन्मान करण्यात आला. दुसरीकडे, गणेश गावंडे यांनी 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून अनेक गरजू रुग्णांना मदत केली असून, त्यांच्या या कार्यासाठी त्यांना गौरविण्यात आले. या दोन्ही कार्यकर्त्यांच्या नावांची शिफारस जिल्हाध्यक्ष कुलदीप वसु यांनी केली होती. कार्यकर्त्यांची निष्ठा, समाजसेवा आणि सेवाभाव पाहून त्यांनी ही नावे सुचवली. आपल्या कार्याची दखल घेतल्याबद्दल शुभम नारे यांनी जिल्हाध्यक्षांचे आभार मानले.बच्चू भाऊ कडू यांच्या हस्ते मिळालेल्या या सन्मानामुळे अकोट तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. "हा सन्मान केवळ आमचा नसून अकोटमधील प्रत्येक कष्टकरी कार्यकर्त्याचा आहे. हा पुरस्कार स्व. उमेश वाघ यांना समर्पित आहे,'' अशी भावना शुभम नारे यांनी व्यक्त केली. या गौरवामुळे समाजसेवेच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## राष्ट्रीय रग्बीसाठी अकोल्यात रणधुमाळी; १७ वर्षांखालील खेळाडूंची तयारी जोमात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. १ :** अकोला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय शालेय रग्बी स्पर्धेसाठी पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. ३० मार्च ते ४ एप्रिल दरम्यान होत असून, जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचे रग्बी प्रशिक्षण शिबिर भरविण्यात येत आहे.

अहिल्यानगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय रग्बी स्पर्धेतून १७ वर्षांखालील मुला-मुलींची निवड करण्यात आली होती. या निवडलेल्या खेळाडूंना राष्ट्रीय स्तरासाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने अकोल्यात हे विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

रग्बी हा वेग, ताकद आणि संघभावना यांचा संगम असलेला खेळ आहे. या खेळात चेंडू पुढे नेण्यासाठी पास मागे दिला जातो, तर टॅकलिंगद्वारे प्रतिस्पर्ध्याला रोखले जाते. शालेय स्तरावर 'रग्बी सेव्हन्स (७)' हा प्रकार अधिक खेळला जातो, ज्यामध्ये प्रत्येकी ७ खेळाडूंचा संघ आणि कमी कालावधीचे सामने असतात. त्यामुळे खेळ अधिक जलद आणि रोमांचक बनतो. याउलट 'रग्बी १५' प्रकारात १५ खेळाडूंचा संघ आणि अधिक कालावधीचे सामने खेळले जातात. अशा प्रशिक्षण शिबिरांमुळे खेळाडूंची तांत्रिक कौशल्ये, फिटनेस आणि रणनीती विकसित होण्यास मदत होते.

या शिबिरात रग्बी असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या माध्यमातून तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण दिले जात आहे. मुंबईचे अनुभवी प्रशिक्षक महेश राठोड खेळाडूंना मार्गदर्शन करत असून, महाराष्ट्रातील विविध भागांतून १७ वर्षांखालील मुला-मुली मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश भट, क्रीडा अधिकारी राजेश गावंडे, निशांत वानखडे तसेच इतर क्रीडा अधिकाऱ्यांचे सहकार्य लाभत आहे. अकोला जिल्हा रग्बी असोसिएशनचे अध्यक्ष प्रेमराज शर्मा, सचिव ज्ञानेश्वर टाले आणि सहसचिव अमित मनवर यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन पार पडले.

दरम्यान, या प्रशिक्षणानंतर दोन्ही संघ दि. ४ एप्रिल २०२६ रोजी ओडिशा राज्यातील भुवनेश्वर येथील कलिंगा स्टेडियमवर होणाऱ्या राष्ट्रीय शालेय रग्बी स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

## ज्वारीचे पीक जोमात | उन्हाळी हंगामात शेतकऱ्यांचा ज्वारीकडे वाढता कल

# उन्हाळी ज्वारी बहरली,पोषक हवामानामुळे उत्पादन वाढणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. १ :** यंदाच्या उन्हाळी हंगामात तालुक्यात ज्वारी लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल दिसून आला आहे. अकोट तालुक्यात उन्हाळ्यात मका, ज्वारी, मूग, भुईमूग, तीळ, कांदा, भाजीपाल्याची लागवड होत असते.मागील काही वर्षांत भुईमूग पिकावर अनेक संकटे आलेली आहेत. प्रामुख्याने पिकात शेंगांची धारणा कमी होत असल्याने उत्पादन घटीला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागले. तसेच या पिकाला लागणारा खर्चही निघत नसल्याने लागवडीकडील कल कमी होत चालला आहे. अकोट तालुक्यात मुबलक प्रमाणात पाणी साठा उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांनी यंदा उन्हाळी ज्वारीची पेरणी केली. सध्या अकोट परिसरात उन्हाळी ज्वारीचे पीक जोमात आले आहे. अकोट तालुक्यात सध्या उन्हाळी ज्वारीचे पीक जोमात आले असून, उत्पादनात मोठी वाढ होण्याची शक्यता बळीराजाकडून वर्तविली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त केले जात आहे.यंदा सुरुवातीपासून पावसाचे प्रमाण अधिक असल्यामुळे ज्वारीचे पीक हिरवेगार असून, त्यात आता दाणे भरायला सुरुवात झाली आहे,तर काही ठिकाणी मका,सोयाबीनच्या शेतात पेरणी केलेल्या ज्वारीचे पीक काढणीला आले असून,शेतकरी सुखावला आहे. यंदा रब्बी हंगामात पावसाचे प्रमाण अधिक असल्याने अनेक शेतकऱ्यांनी ज्वारीची पेरणी केली आहे. आता हे पीकही जोमात आले असून, काही ठिकाणी सोंगणीला आले असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

> ### उन्हाळ्यात शाळू ज्वारी पेरणीवर भर
>
> यंदा सुरुवातीपासून पावसाचे प्रमाण अधिक असल्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांनीदेखील रब्बी हंगामात शाळू ज्वारीच्या पेरणीवर मोठा भर दिला होता. त्यामुळे अकोट तालुक्यात मोठ्या प्रमाणात शाळू ज्वारी आणि उन्हाळी ज्वारीची पेरणी करण्यात आली. आता ही पिके हुरड्यात आली आहे.
>
> ### रात्र जागलीवर
>
> काही भागांत या उन्हाळी ज्वारीच्या शेतात जंगली प्राणीही मोठ्या प्रमाणात पिकाचे नुकसान करत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. परिणामी, काही शेतकऱ्यांना रात्री जागलीवर जावे लागत आहे.

## भरतीपूर्व प्रशिक्षण व भीमा कोरेगाव शौर्य स्तंभाचे भूमिपूजन उत्साहात



**जानोरी मेळ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान, संघभूमी नया अंदुरा (हाता फाटा) येथे भरतीपूर्व प्रशिक्षण अकॅडमी तसेच भीमा कोरेगाव शौर्य स्तंभाचे भूमिपूजन पूज्य महाथेरो भंते ज्ञानज्योती यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना धूप-दीप अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी नया अंदुरा व कारंजा (राम) येथील महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मेजर दिलीप सरदार, सचिव रवींद्र तायडे, सल्लागार शशीभाऊ दामोदर, सदस्य देवमन वानखडे, विनोद घारे, दादाराव वानखडे, गजानन दामोदर, दादाराव तायडे, ज्ञानदेव प्रधान, राहुल सरदार, यश डिगे तसेच कारंजा येथील सरपंच संघपाल इंगळे, युवा प्रवक्ते शुभनिल तायडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

बुलडाणा, गुरूवार, दि. २ एप्रिल २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### परशूराम जन्मोत्सवा निमित्त सभेचे आयोजन

**मोताळा :** दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा भगवान श्री.परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा मानस असून, त्या अनुषंगाने कार्यक्रमाची रूपरेषा व नियोजन करण्याच्या दृष्टीने दि.०४ ऐप्रील शनीवार रोजी स्थानिक मुक्तेश्वर आश्रम येथे, रात्री. ८.०० वा. सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या सभेला सर्व ब्रह्मवृंदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भ.श्री.परशुराम जन्मोत्सव समिती चे अध्यक्ष चंद्रशेखर पुरोहित यांनी केले आहे.

### आजाराला कंटाळून वृध्दाची आत्महत्या

**खामगाव :** तालुक्यातील गोंधनापुर येथील रहिवासी शंकर मारोती करांगळे (८२) यांना बऱ्याच वर्षापासुन पोटाचा व दम्याचा आजार होता. या आजाराला कंटाळून त्यांनी वाघळी येथील पाझर तलावाच्या काठावरील निंबाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना काल ३१ मार्च २६ रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास उघडकीस आली होती. त्वरीत रूरूमाई फाऊंडेशनच्या टिमला पाचारण करण्यात आले होते. संजय खंडेराव यांच्या मार्गदर्शनाखाली टीमने शव झाडावरून खाली उतरविले होते. याप्रकरणी विजय शालिग्राम खंडारे यांनी खामगाव ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये कलम १९४ भानासुसं नुसार मर्ग दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एएसआय भगवान काळयाने करीत आहे.

### खंडोबा यात्रा निमित्त कैरी पन्ह्याचे वाटप

**खामगाव :** स्थानिक शिवाजी वेस भागातील श्री शिव खंडोबा संस्थान येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही श्री खंडोबा यात्रेनिमीत्त ३ एप्रिल २६ रोजी दुपारी ५ ते आगमनापर्यंत कैरी पन्ह्याचे वाटप करण्यात येणार आहे. भाविकांनी दर्शन व यात्रेचा लाभ घ्यावा. तसेच दुकानदारांनी दुकाने थाटुन यात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन श्री शिव खंडोबा भक्त, श्री शिव खंडोबा महिला भजनी मंडळ व श्री शिव खंडोबा भजनी मंडळ यांनी केले आहे.

### घरगुती वादातून पतीवर विळ्याने हल्ला

**नांदुरा :** पतीने कामावर जावे, या साध्या कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान रक्तापातात झाल्याची धक्कादायक घटना वडनेर भोलजी येथे घडली आहे. संशयी पतीने आपल्या पतीवर लोखंडी हल्ला केल्याने परिसरात खळबळ उडाली असून, नांदुरा पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. वडनेर भोलजी येथील रहिवासी सलमाबी नसरुद्दीन शाह (३०) यांनी त्यांचे पती नसरुद्दीन शाह हमीद शाह यांना ३१ मार्च रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास कामावर जाण्यास सांगितले. मात्र, पतीने कामावर जाण्याऐवजी पतीवर चारित्र्याचा संशय घेत वाद घालण्यास सुरुवात केली. मी कामावर गेल्यावर तू कोणासोबत बोलते? असे म्हणत पतीने सलमाबी यांना शिवीगाळ केली. हा वाद इतका विकोपाला गेला की, रागाच्या भराल नसरुद्दीन शाह याने घरातील लोखंडी विळा उचलून सलमाबी यांच्या डोक्यावर मारला. यावेळी स्वतःचा बचाव करण्यासाठी सलमाबी यांनी हात आडवा केला असता, त्यांच्या उजव्या हातावर आणि डोक्याला जखम झाली आहे .

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २००० - २१२५ |
| गहू | १६०० -२२०० |
| तुर | ६१०० - ८९५० |
| हरभरा | ३९००- ५२२५ |
| सोयाबीन | ४५००- ५४०० |
| उडीद | ५६०० - ६७०० |
| मुग | ४८०० - ४८०० |
| मका | ११०० - १६०० |

# तहसील कार्यालयात आढावा बैठक
# शिवकालीन अस्मितेचा जागर व्हावा - आ. श्वेता महाले

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**चिखली दि.१ :** चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.श्वेता महाले पाटील यांच्या पुढाकाराने ऐतिहासिक करवंड महोत्सवाच्या तयारीला वेग आला असून आज दिनांक १ एप्रिल रोज सोमवारला तहसील कार्यालय, चिखली येथे आयोजित तयारीसंदर्भात बैठकीत महोत्सवाच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.यावेळी मोहोत्सव समितीचे अध्यक्ष अरविंद देशमुख, नगराध्यक्ष पंडितराव देशमुख, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसीलदार विजय सवडे, नायब तहसीलदार मुरलीधर गायकवाड यांचेसह विविध विभागाचे अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

करवंडची भूमी ही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने आणि पदस्पर्शाने पावन झालेली ऐतिहासिक भूमी आहे. या भूमीतील प्रत्येक कणात शिवकालीन परंपरा, शौर्य आणि स्वाभिमान दडलेला आहे. याच अस्मितेला उजाळा देत महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असून, स्थानिक कलावंतांना प्रमुख स्थान देत महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे जतन करण्याचा संकल्प आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी व्यक्त केला. त्यांनी स्पष्ट केले की, ''करवंड महोत्सव हा केवळ उत्सव नसून शिवरायांच्या विचारांचा जागर आहे.



स्थानिक कलावंत, शाहीर, मावळे यांच्या सहभागातून इतिहास जिवंत ठेवण्याचा हा प्रयत आहे.'' महोत्सवाचे दोन दिवसीय नियोजन राहणार असून भव्य शोभायात्रा घोडे, रथ, पालखी, शिवकालीन वेषभूषा, मावळे, लेझीम, ढोल-ताशे, आतिषबाजी, चित्ररथ, शस्त्र व नाणे प्रदर्शन, शाहीर यांचा कार्यक्रम, आणी अन्य सांस्कृतिक कार्यक्रम दोन दिवस भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम व छत्रपतींच्या विचार जागरणाने करवंड महोत्सव फुलणार आहे. आमदार सौ.श्वेता महाले पाटील यांनी नागरिकांना आवाहन केले की, ''ही शिवभक्तीची आणि संस्कृतीची पर्वणी आहे. करवंडची पावन भूमी आणि स्थानिक कलाकारांच्या कलेतून शिवकालीन इतिहास पुन्हा अनुभवण्याची संधी सर्वांनी घ्यावी. बैठकीस गटविकास अधिकारी समाधान वाघ, अस्मिता पवार, ठाणेदार जयसिंग राजपूत, प्राचार्य अण्णासाहेब म्हळासने, प्रा. विजय घ्याळ, सुनील जवंजाळ, संग्रामभैय्या देशमुख, दिलीप इंगळे, मुकेश पडघान, सुधीर पडघान, अमोल साठे, एकनाथ राजे जाधव,भास्कर आडळकर, प्रकाश चव्हाण, विठ्ठल पिवळ, सुनील करंडे, जगन तारगे, देविदास जाधव, विनोद जाधव, सचिन गरड, रवी इंगळे, विजय देशमुख, श्याम देशमुख शिवा जाधव, रामेश्वर शेडगे, प्रा.सतीश काळे, अच्युतराव रिंढे, देविदास रिंढे कैलास मोरे, भगवान हिवराळे, शेख इसाख तसेच विविध राजकीय व सामाजिक पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्याचे सुपुत्र संतोष मोरे यांना 'शौर्य पदक'

## ऑपरेशन सिंदुरमध्ये गाजविले शौर्य, जिल्हाधिकाऱ्यांकडून सत्कार

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**बुलडाणा दि.१ :** सिंदखेड राजा तालुक्यातील सवडद येथील सुपुत्र व भारतीय लष्कराच्या ३४ मराठा मैदानी तोफखाना बटालियनचे हवालदार संतोष मोरे यांना 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये गाजविलेल्या अतुलनीय शौर्याबद्दल 'शौर्य पदक' प्रदान करण्यात आले आहे. याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते त्यांचा आज सत्कार करण्यात आला.

जिल्हाधिकारी दालनात आयोजित सत्कार समारंभात जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, हवालदार संतोष मोरे यांनी आपल्या शौर्याने जिल्ह्याचे नाव उंचावले असून त्यांच्या कार्यामुळे जिल्ह्याच्या मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांचे धैर्य, समर्पण आणि कर्तव्यनिष्ठा युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. हवालदार संतोष मोरे हे गेल्या १२



वर्षांपासून भारतीय सैन्यदलात कार्यरत असून जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा (तंगधार) भागात सेवा बजावत असताना त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये महतत्वपूर्ण भूमिका बजावली. मे २०२५ मध्ये पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने हे ऑपरेशन राबवले होते. ९ मे २०२५ रोजी रात्री पाकिस्तानकडून झालेल्या तोफगोळ्यांच्या माऱ्यात मोरे यांच्या उजव्या हाताला छर्रे लागून ते जखमी झाले. मात्र, प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी पहाटे ५ वाजेपर्यंत शत्रूवर तोफगोळ्यांचा मारा सुरू ठेवत कर्तव्य बजावले. त्यांच्या या अद्वितीय धैर्याची दखल घेत केंद्र शासनाने १५ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांना 'शौर्य पदक' जाहीर केले होते. या पदकाचे वितरण २८ मार्च २०२६ रोजी उधमपूर येथील सेना उत्तरी कमांड मुख्यालयात आयोजित एका विशेष समारंभात पदक प्रदान करण्यात आले.

## अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी २ ते ८ एप्रिलदरम्यान 'महा-साधना सप्ताह'

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**बुलडाणा दि.१ :** भारत सरकार, क्षमता विकास आयोग आणि सिबीसी कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करुन त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

केंद्र शासनाने साधना सप्ताह उपक्रम राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्यानंतर आता राज्यातही महा-साधना सप्ताह २ ते ८ एप्रिल या काळात आयोजित करण्यात आला आहे. टेक लर्निंग वीक अंतर्गत ८ लाख ८० हजारांहून अधिकारी आणि कर्मचारी ७ दिवसांत किमान ४ तासांचे अभ्यासक्रम कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करणार आहेत. यामुळे जवळपास ३५ लाखांहून अधिक वेळ अधिकारी आणि कर्मचारी कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये राज्यातील ३६ जिल्हे, ३२ विभाग, आणि ६ विभागीय कार्यालये यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महासाधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे असेल.

## भगवद्‌गीता मुखोद्‌गार करणाऱ्या रेणुका जोशी यांचा सत्कार

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**शेगाव दि.१ :** संत गजानन महाराजांच्या निस्सीम भक्त सौ. रेणुका प्रमोद जोशी यांनी श्रीमद् भगवद्‌गीतेचे मुखोद्‌गार (पठण) सिद्ध केल्याबद्दल त्यांचा शेगाव येथे सन्मान करण्यात आला. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हरियाणातील कुरुक्षेत्र येथे गीता पारायणासाठी विशेष आमंत्रण देण्यात आले होते. तेथे जाऊन त्यांनी सामूहिक सहस्त्रावधी गीता पठणात सहभाग नोंदविला. या यशस्वी कार्याबद्दल सुधा क्वार्टर रहिवासी तसेच अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.



यावेळी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष नंदुभाऊ कुळकर्णी, ज्येष्ठ पत्रकार विजय कुळकर्णी, जिल्हाध्यक्ष किशोरजी मिश्रा, सचिव भूषण महाजन, दीपक शर्मा, शेगाव शहराध्यक्ष विजय जगधन, महिला आघाडी अध्यक्षा अंजली जोशी, तसेच रविदादा थोडगे, विवेक घोडेराव, पंकज तापी, सागर आमले, अशोक गडकर, रामेश्वर राखोंडे, मनीष कायंदे, मालती जगधन, मंजुषा कुळकर्णी, शुभांगी कुळकर्णी, राघव जोशी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्रात एसआयआर कामाला लवकरच सुरुवात

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**शेदूर्जन दि.१ :** महाराष्ट्रामध्ये लवकरच एसआयआर च्या कामाला सुरुवात होणार आहे. या प्रक्रियेसाठी नागरिकांना आपली माहिती २००२ च्या मतदार यादीशी लिंक करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या संदर्भात शेदूरजन येथील मराठी पूर्व माध्यमिक शाळा सहाय्यक मुख्याध्यापक बोर्डे सर यांनी पत्रकाद्वारे नागरिकांना आवाहन केले असून महतत्वाची माहिती दिली आहे. नागरिकांनी काय शोधणे आवश्यक आहे? ज्या नागरिकांची नावे २००२ च्या मतदार यादीत होती, त्यांनी खालील तीन बाबी शोधून तयार ठेवाव्यात: १. मतदारसंघाचे नाव व क्रमांक २. मतदारसंघातील यादी भाग क्रमांक ३.मतदार यादीतील अनुक्रमांक विवाहित महिलांसाठी विशेष सूचना ज्या महिलांचा विवाह २००२ नंतर झाला आहे किंवा ज्यांची नावे त्यावेळी सासरच्या यादीत नव्हती, त्याांनी आपल्या माहेरची माहिती (आई, वडील, आजी किंवा आजोबा यांच्या नावे असलेली यादी) शोधणे गरजेचे आहे. माहिती कशी शोधायची? नागरिक खालील अधिकृत लिंकचा वापर करून आपली माहिती मिळवू शकतात: वेळेवर होणारी धावपळ टाळण्यासाठी खालील गोष्टी जवळ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे: २००२ चा अनुक्रमांक (स्वतःचा किंवा आई/वडिलांचा) आधार कार्ड क्रमांक, मोबाईल क्रमांक, नुकताच काढलेला पासपोर्ट साईज फोटो प्रशासकीय कामात सुसूत्रता येण्यासाठी सर्व नागरिकांनी हे सहकार्य करावे,

## लाखनवाडा येथे घडले हिंदू मुस्लिम बौद्ध एकतेचे दर्शन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**लाखानवाडा दि.१:** ईद मिलन निमित्ताने लाखनवाडा बु येथील मक्का मजीद ट्रस्टच्या वतीने बंधूभाव आणि सामाजिक सलोखा जपणारा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गणी गाजी सर यांनी भूषविले. प्रमुख उपस्थितीमध्ये हिवरखेड ठाणेदार संदीप पाटील, सोहेल फुकरान, शिवाजी पाटील, रमेश बंड, डॉ. सतीश खडसे, अजीम खान, अशोक तायडे, नामदेव सरदार, कैलास वाकोडे, तसेच एजाज सर, युसुफ सर, शफिक टेलर, डॉ. शाकिर, प्रल्हाद हटकर, विलास पाटील, वैजनाथ पांढरे, सदाशिव राऊत आदी मान्यवरांची उपस्थिती होती. मक्का मजीद ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. गुफरान खान व एजाज सर यांच्या पुढाकाराने छोटेखानी शिरखुर्मा कार्यक्रमाचे



आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास हिंदू, बौद्ध आणि मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष गणी गाजी यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय एकता, सामाजिक सलोखा आणि बंधूभाव जपण्याचे महत्व अधोरेखित केले. सर्व सण-उत्सव एकोप्याने साजरे करून समाजात ऐक्य टिकवावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमामुळे विविध समाजातील नागरिकांमध्ये एकोप्याचा आणि सौहार्दाचा संदेश देण्यात आला.

## मोताळा पंचायत समितीच्या आमसभेत तळणी ग्रामपंचायतीचा गौरव

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**मोताळा दि.१ :** पंचायत समितीची सन २०२५-२६ ची वार्षिक आमसभा आणि सरपंच मेळावा बुलडाणा विधानसभा मतदारसंघाचे आ संजय गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आणि गट विकास अधिकारी अशोक काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात झाला. याप्रसंगी तळणी ग्रामपंचायतीने आर. आर. आबा पाटील सुंदर गाव योजनेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आणि ग्रामस्थांनी लोकसहभागातून प्लास्टिक मुक्तीसाठी उचललेल्या ऐतिहासिक पावलाबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

तळणी ग्रामस्थांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी एक आदर्श वस्तुपाठ समोर ठेवला आहे. गावातील श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आयोजित



महाप्रसाद पंगतीसाठी गावकऱ्यांनी लोकसहभागातून ६०० स्टीलच्या ताटांची खरेदी केली. यामुळे पंगतीमध्ये होणारा प्लास्टिक पत्रावळ्यांचा वापर पूर्णपणे थांबला असून, यातून पर्यावरणाचे रक्षण होणार आहे. भविष्यातील सर्व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी ही ताटे उपलब्ध करून देऊन गावाने प्लास्टिक मुक्तीचा संकल्प केला आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करताना आमदार गायकवाड यांनी सांगितले की, तळणी गावाने लोकसहभागातून उभा केलेला हा उपक्रम आदर्शवत आहे. तो खऱ्या अर्थाने सुंदर गाव संकल्पनेचा आत्मा आहे. गावाचा विकास करताना शासकीय योजना बरोबर लोकसहभाग सुद्धा महत्वाचा आहे. तळणी गावाच्या अशा विधायक कार्यासाठी आणि गावाच्या विकासासाठी आपण सदैव खंबीरपणे पाठीशी राहू अशी ग्वाही आमदार संजय गायकवाड यांनी दिली. तळणीच्या सरपंच सौ. वत्सलाबाई बोदडे आणि ग्रामसेवक एस.एम. राऊत यांनी ग्रामस्थांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात हा सन्मान स्वीकारला. तालुक्यातील इतर ग्रामपंचायतींनाही यातून प्रेरणा मिळाली असून, तळणीच्या या उपक्रमाचे आणि ग्रामस्थांच्या एकजुटीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

**कौतुक** — वास्तववादी पत्रकारिता आणि सामाजिक कार्याचा सन्मान

# सत्यशोधक लेखणीचा शिलेदार पुरस्काराने कैलास राऊत सन्मानित

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**मेहकर दि.१ :** मेहकर तालुक्यातील घाटबोरी येथे आयोजित करण्यात आलेल्या जातीय सलोखा कार्यक्रमात दैनिक बातमी जगतचे मुख्य संपादक कैलास राऊत यांना त्यांच्या १५ वर्षांच्या वास्तववादी पत्रकारिता आणि सामाजिक कार्याची दखल घेत २०२६ च्या सत्यशोधक लेखणीचा शिलेदार या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव करण्यात आला.

पत्रकारिता हे केवळ माहिती प्रसाराचे साधन नसून ते समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी माध्यम आहे, हे कैलास राऊत यांनी आपल्या निस्पृह लेखणीतून नेहमीच सिद्ध केले आहे. मागील पंधरा वर्षांपासून पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी आपल्या उत्कृष्ट कतृत्वाचा




ठसा उमटवला आहे. समाजातील उपेक्षित आणि वंचितांच्या प्रश्नांना वाचा फोडतानाच, त्यांनी अनेक विधायक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या याच वास्तववादी आणि निर्भीड पत्रकारितेची दखल घेत प्रशासकीय अधिकारी आणि मान्यवरांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार त्याांना प्रदान करण्यात आला. एका सच्च्या पत्ाकाराच्या लेखणीचा झालेला हा सन्मान म्हणजे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर विश्वास ठेवणाऱ्या सामान्य माणसाचा गौरव असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. अन्यायाविरुद्ध शब्दांची धार कायम ठेवत, राऊत यांनी नेहमीच लोकहिताला प्राधान्य दिले आहे. बुलढाणा जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, मेहकरचे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे, डोणगावचे ठाणेदार अमरनाथ नागरे, मेहकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी खरात आणि पत्रकार सिद्धेश्वर पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी

**गेल्या पंधरा वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत**

कैलास राऊत यांनी कायम उपेक्षित आणि वंचित घटकांच्या समस्यांना अग्रस्थानी ठेवले. पत्रकारितेच्या माध्यमातून केवळ प्रश्न न मांडता, तरुणाई फाऊंडेशन या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी अनेक विधायक आणि समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. तळागाळातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी दाखवलेली ही बांधिलकी या पुरस्काराच्या माध्यमातून अधोरेखित झाली आहे.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक तथा घाटबोरीचे माजी सरपंच गजानन चनेवार, पत्रकार संतोष अवसरमोल यांच्यासह महसूल, पोलीस प्रशासन व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कैलास राऊत यांच्या या यशाबद्दल संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकारिता आणि सामाजिक वर्तुळातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## विविध प्रलंबीत मागण्यांसाठी पत्रकारांचे तहसील कार्यालयासमोर धरणे

### मोताळा तहसीलदारामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**मोताळा दि.१ :** पत्रकारांवरील अन्याय थांबविण्यासाठी पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, यासह विविध मागण्यांसाठी व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या वतीने आज बुधवार १ एप्रिल रोजी मोताळा तहसिल कार्यालयासमोर धरणे आंदोलन करुन तहसिलदार सरिता पाटील खटाळ यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असणारा वृत्तपत्र उद्योगावर आर्थिक ताण निर्माण झाला आहे. २०१९ पासून आजतागायत कागद, प्रिंटिंग मटेरियल, केमिकल्स, वीज, मनुष्यबळ या सारख्या मूलभूत खर्चात १५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. मात्र जाहिरात दरात वाढ झाली नाही. त्यामुळे जाहिरात



दरात किमान १५० टक्के दरवाढ तातडीने मंजूर करण्यात यावी. गेल्या काही दिवसांपासून राज्यात पत्रकारांना लक्ष्य करण्याचे सत्र सुरू आहे. अनेक ठिकाणी पत्रकारांवर अन्याय झाला. लोकशाहीच्या चौथा स्तंभाची गळचेपी करण्याचा प्रयत होत आहे. सदर प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी, यासह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवेदनावर जिल्हाध्यक्ष वैभवराजे मोहिते, तालुकाध्यक्ष हमीद कुरेशी, पप्पू राठी, शाहीद कुरेशी, विष्णू शिराळ, श्रीधर राजनकर, गणेश झंवर, अर्चना फाटे, सविता शिराळ, दिलीप चहाकर, पंकज थिगळे, प्रकाश गणगे, गणेश वाघ, जावेद खान, तानाजी ठोंबरे, पी.एम. सरकटे, अकिल कुरेशी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**महत्त्वाचे**

## नवोदय परीक्षेत वेदश्री देशमुख जिल्ह्यात प्रथम



**अमडापूर :** बुलढाणा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा ओढा सध्या नवोदय विद्यालयातील प्रवेशाकडे मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे चित्र आहे. आपल्या पाल्याला दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी पालक प्रयतांची पराकाष्ठा करत आहेत. येथील कु. वेदश्री सुरज देशमुख हिने शेगाव नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. वेदश्रीने या परीक्षेत ९८.७५ टक्के गुण मिळवत जिल्ह्यातून ग्रामीण भागातुन खुल्या प्रवर्गात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशासह तिने शेगाव नवोदय विद्यालयातील आपला प्रवेश निश्चित केला आहे. वेदश्रीला मार्गदर्शन करणारे योगेश देशमुख सर आणि विशाल घारोड सर यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी हिवरा आश्रम येथील नवोदय कोचिंग क्लासेसचे एकूण ३१ विद्यार्थी नवोदय प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. या यशाबद्दल अमडापूर परिसरात तसेच संपूर्ण जिल्ह्यात वेदश्रीचे आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

## मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा

**बुलडाणा :** भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज चमकणे, गारपीट आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हवामान विभागाने दिलेल्या सूचनांनुसार, विजेचा कडकडाट ऐकू आल्यास तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोनचा वापर करू नये. तसेच निवाऱ्यापासून दूर असल्यास जमिनीवर न पडता पाय एकत्र करून बसून राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे ग्रामपंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत तातडीने जनजागृती करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. रुग्णवाहिका व अग्निशमन दल सतर्क ठेवण्यात यावेत, तसेच शाळा, सभागृहे व सार्वजनिक इमारती सुरक्षित आश्रयस्थळ म्हणून खुले ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हवामान खात्याचे अद्ययावत संदेश गावपातळीपर्यंत पोहोचवण्यावरही भर देण्यात आला आहे.

## चौथा गावासाठी टँकर मंजूर

**बुलडाणा :** दि. ३० : पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील चौथा गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली. चौथा येथे ४३० पशुधन व २ हजार ४०० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ७२ हजार १०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वारित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# उल्कापाताच्या खाणाखुणा आता नव्या रूपात झळकणार

## विभागीय आयुक्तांचा प्रस्ताव, ९.८८ कोटींच्या निधी वितरणास मंजुरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि.१ :** जागतिक वारसा स्थळ असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराचे जतन, संवर्धन आणि विकास करण्यासाठी राज्य सरकारने आता गती दिली आहे. लोणार सरोवर विकास आराखड्यांतर्गत वर्ष २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ९ कोटी ८८ लाख १० हजार रुपयांचा निधी वितरित करण्यास नियोजन विभागाने मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे, अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाने केलेल्या विनंतीची दखल घेत शासनाने हा निधी तातडीने उपलब्ध करून दिला आहे.

लोणार सरोवराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची आवश्यकता असल्याचे नमूद करत अमरावती विभागीय आयुक्तांनी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्य शासनाकडे पत्राद्वारे मागणी केली होती. सरोवराचे जतन आणि विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या कामांना गती देण्यासाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करून देण्याची विनंती त्यांनी केली होती. या विनंतीचा सकारात्मक विचार करून शासनाने आता हा महत्वपूर्ण निधी प्रशासकीय नियंत्रक म्हणून विभागीय आयुक्तांकडे सुपूर्द केला आहे. आराखड्याचे स्वरूप आणि विकासकामे लोणार सरोवराच्या जतन आणि संवर्धनासाठी एकूण ४३४.६१ कोटी रुपयांच्या सुधारित प्रशासकीय आराखड्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या आराखड्यांतर्गत सरोवराचे नैसर्गिक सौंदर्य अबाधित राखणे, परिसरातील जैवविविधतेचे रक्षण करणे आणि पर्यटकांसाठी जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा निर्माण करणे ही मुख्य उद्दिष्टे आहेत. यामध्ये प्रामुख्याने सरोवराच्या ३ काठावरील प्राचीन मंदिरांचे जतन, पर्यटकांसाठी पदपथ (पायवाटा), संरक्षक भिंतींचे बांधकाम, सांडपाणी व्यवस्थापन आणि निसर्ग पर्यटन केंद्र विकसित करणे यांसारख्या मोठ्या बांधकामांचा समावेश आहे. आतापर्यंत १२३.२४ कोटींचा निधी खर्च या भव्य विकास प्रकल्पासाठी आतापर्यंत एकूण १२३.२४ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. ताज्या शासन निर्णयानुसार मिळालेला ९.८८ कोटींचा निधी हा मोठ्या बांधकामावर खर्च केला जाणार आहे. हा निधी मिळाल्यामुळे आराखड्यातील प्रलंबित कामे पूर्ण होण्यास मदत होणार असून, लोणार सरोवराचा कायापालट होण्याच्या प्रक्रियेला वेग येणार आहे. या कामांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याची आणि उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी अमरावती विभागीय आयुक्तांवर सोपवण्यात आली.

# अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविण्यासाठी भाजपाचा जाहीर पाठिंबा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि. १ :** लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा भव्य दिव्य पुतळा दर्शनीय स्थानी बसविण्यासाठी भारतीय जनता पार्टी खामगाव शहराच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला.

गेल्या आठवड्यात स्थानिक रेल्वे स्टेशनच्या गेट समोर लोखंडी रोडवर समाज बांधवांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा अर्धाकृती पुतळा बसविला. त्यानंतर आपण तुला हटविण्यासाठी प्रशासनाने कारवाई करण्यास सुरुवात केली. पुतळा काढू नये यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या वतीने नगरपालिकेच्या समोर साखळी उपोषण सुरू करण्यात आले. या साखळी उपोषणाला काल ३१ मार्च रोजी भारतीय जनता पार्टी च्या पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. व त्यांना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा वसविण्यासाठी लेखी जाहीर पाठिंबा दिला. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा त्यांच्या कार्याशी साधक सुंदर असा असावा व शहरातील दर्शनीय भागात असावा यासाठी भाजपा प्रयत्न करेल असे या पाठिंबा पत्रात नमूद करण्यात आले तसेच शहरातील विकसित चौक, गांधी उद्यान व शहर पोलीस स्टेशन समोरील नगरपालिका कॉम्प्लेक्स समोर बसविण्यात येण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक समिती सोबत सदैव सोबत राहू असे आश्वासन देण्यात आले. भाजपा जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर पुरोहित, संजय शिनगारे, शहराध्यक्ष राजेंद्र धनोकार नगरपालिका गटनेते नगरसेवक विजय उगले, पाणीपुरवठा सभापती प्रवीण नायसे नगरसेवक विजय शर्मा, सत्यनारायण थानवी, कृष्ण ठाकूर, वैभव डवरे, शेखर कुलकर्णी, पवन गरड, रवी गायगोळ, मयूर घाडगे, नंदकिशोर कांडेकर, रोहन जयस्वाल,रमेश इंगळे, गोलू आळशी, सोनू निभेवानी, पवन ठाकूर, आशिष सुरेका, हितेश पदमगिरीवार, रुपेश शर्मा आदी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांना पाठिंबा पत्र सुपूर्द केले.

# आजचा आठवडी बाजार रद्द

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१ :** शहरात आयोजित करण्यात येणाऱ्या खंडोबा १२ गाड्या यात्रा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिनांक २ एप्रिल २०२६ (गुरुवार) रोजी भरणारा आठवडी बाजार रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाकडून घेण्यात आला आहे.

खंडोबा यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष श्री. रविकांत दिनकर भोसले यांनी सादर केलेल्या अर्जानुसार, सदर यात्रा पुरात खंडोबा मंदिर येथे पार पडणार असून यात्रेचा मार्ग जगदंबा रोड, आठवडी बाजार मार्ग व कमलसिंग गौतमसिंग चौक असा आहे. या काळात मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थिती अपेक्षित असल्याने वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. यासंदर्भात उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक (खामगाव शहर) तसेच नगर परिषद मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच वाहतुकीतील अडथळे टाळण्यासाठी आठवडी बाजार रद्द करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. मा. जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्या आदेशानुसार, उपविभागीय दंडाधिकारी, खामगाव यांनी बाजार आणि यात्रा कायदा १८६२ च्या कलम ५ अन्वये अधिकार वापरून दिनांक २ एप्रिल २०२६ रोजीचा आठवडी बाजार रद्द करण्याचे आदेश जारी केले आहेत. तसेच रद्द करण्यात आलेला आठवडी बाजार पुढील दिवशी भरण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

# युवा पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित; १५ एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१:** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत राज्याचे युवा धोरण २०१२ अन्वये जिल्ह्यातील युवक-युवती व संस्थांच्या समाजहिताच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. इच्छुकांनी आपले प्रस्ताव १५ एप्रिल २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

दरवर्षी दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारांतर्गत जिल्ह्यातील एक युवक, एक युवती आणि एक नोंदणीकृत संस्था यांचा सन्मान करण्यात येणार आहे. समाजाभिमुख कार्य करणाऱ्या युवकांना प्रोत्साहन देणे व युवा विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**पात्रता निकष (युवक/युवती):** अर्जदाराचे वय १ एप्रिल रोजी किमान १३ वर्षे पूर्ण व ३१ मार्च रोजी कमाल ३५ वर्षांपर्यंत असावे. संबंधित जिल्ह्यात सलग किमान पाच वर्ष वास्तव्य आवश्यक आहे. अर्जदाराने केलेल्या कार्याचे सबळ पुरावे (वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, फोटो, व्हिडिओ) जोडणे बंधनकारक आहे. तसेच पोलीस चारित्या प्रमाणपत्र आणि विविध हमीपत्रे सादर करणे आवश्यक राहील. पात्रता निकष (संस्था): संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८६० किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० नुसार नोंदणीकृत असावी व किमान पाच वर्षे कार्यरत असावी. संस्थेच्या कार्याचे पुरावे तसेच सर्व सदस्यांचे पोलीस चारित्य प्रमाणपत्र आवश्यक आहे. मूल्यांकनाचे निकष: गत तीन वर्षांतील (१ एप्रिल ते ३१ मार्च) कार्याचा आढावा घेऊन पुरस्कारासाठी निवड केली जाईल. ग्रामीण व शहरी भागातील सामाजिक कार्य, पर्यावरण संवर्धन, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, विज्ञान-तंत्रज्ञान, क्रीडा, राष्ट्रीय एकात्मता, आपत्ती व्यवस्थापन आदी क्षेत्रांतील योगदान विचारात घेतले जाणार आहे. इच्छुक युवक, युवती व संस्थांनी अर्जाचे नमुने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, जांभरुन रोड, बुलढाणा येथून प्राप्त करून घ्यावेत. आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव दोन प्रतींमध्ये १५ एप्रिल २०२६ पर्यंत कार्यालयात सादर करावेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# भोनगाव येथे ना. प्रतापराव जाधव यांची सदिच्छा भेट



**शेगाव दि.२ :** शेगाव तालुक्यातील मौजे भोनगाव येथे युवासेना तालुका प्रमुख उमेश शेळके यांच्या निवासस्थानी केंद्रीय मंत्री नामदार प्रतापराव जाधव यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी शेळके परिवारातील सदस्यांशी कौटुंबिक संवाद साधत गावातील नागरिकांशीही विविध विषयांवर चर्चा केली.

या भेटीदरम्यान ग्रामस्थांनी पाणीटंचाईचा गंभीर प्रश्न उपस्थित करत ३८ गाव पाणीपुरवठा योजना केव्हा सुरू होणार, असा जाब विचारला. यावर केंद्रीय मंत्री जाधव यांनी लवकरच संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन ३८ गाव पाणीपुरवठा योजना सुरू करण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात येतील, असे आश्वासन दिले. यावेळी शिवसेना सहसंपर्क प्रमुख शांताराम दाणे, संतोषराव डिवरे, माधवराव आरसोडे, चेतन पाटील घिवे, कपिल चोपडे, चेतन देशमुख तसेच लक्ष्मण गवई, अनंता पाटील शेळके, संजय अप्तुरकार आदींची उपस्थिती होती.

# एसटी चालक-वाहकांनी मुख्याध्यापकांचा हरवलेला मोबाईल केला परत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेंदुर्जन दि.१ :** आाजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी युगातही माणुसकी आणि प्रामाणिकपणाचे दर्शन घडविणारी एक अत्यांत सकारात्मक घटना शेंदुर्जन येथे घडली आहे. एसटी महामंडळाच्या एका चालक आणि वाहकाने आपला प्रामाणिकपणा सिद्ध करत एका प्रवाशाचा हरवलेला मौल्यवान मोबाईल शोधून त्यांना सुखरूप परत केला आहे.

शेंदुर्जन येथील रहिवासी व माजी मुख्याध्यापक विष्णू शिंगणे हे काल दुसरबीड येथून परतूर-शेगाव बसने प्रवास करत होते. आपल्या राहत्या गावी म्हणजेच शेंदुर्जन बस स्थानकावर ते उतरले. मात्र, घरी पोहोचल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, आपला मोबाईल बसमध्येच कुठेतरी गहाळ झाला आहे. मोबाईलमध्ये महत्वाचे संपर्क आणि माहिती असल्याने शिंगणे परिवार चिंतेत होता. दुसऱ्या दिवशी झाला शोध पूर्ण तीच बस (परतूर-शेगाव) दुसऱ्या दिवशी म्हणजेच आज, ३१ मार्च रोजी पुन्हा शेंदुर्जन बस स्थानकावर आली. यावेळी बसचे चालक सी. एम. वाकोडे आणि वाहक ए. एम. जोशी यांनी अत्यंत जबाबदारीने वागत काल बसमध्ये सापडलेल्या मोबाईलबाबत चौकशी केली. त्यांनी विष्णू शिंगणे यांचा शोध घेऊन, खात्री पटल्यानंतर तो मोबाईल सन्मानपूर्वक त्यांच्या स्वाधीन केला. सर्वत्र होतेय अभिनंदन आपला हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने विष्णू शिंगणे यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आणि चालक-वाहकांचे आभार मानले. एसटी कर्मचाऱ्यांच्या या तत्परतेमुळे आणि इमानदारीमुळे प्रवाशांचा राज्य परिवहन महामंडळावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. ''माणुसकी अजूनही शिल्लक आहे'' अशी भावना या घटनेनंतर व्यक्त होत असून, चालक वाकोडे आणि वाहक जोशी यांच्यावर सध्या अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# श्री शिवाजी व्यायाम शाळेच्या माध्यमातून गजानन इंगळे यांनी लावले पाणवटे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**साखरखेर्डा दि.१ :** सध्या सर्वत्र उष्णतेची लाट पसरलेली असून, मानवी देहासह पशुपक्षी, प्राण्यांवर या उष्णतेचा विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. उष्णतेमुळे तहान लागण्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे तहान भागवण्यासाठी मानव जातीला पर्याय आहे. मात्र, पक्षी , प्राणी यांची देखील तहान भागविल्या गेली पाहिजे , या उदात्त हेतूने श्री शिवाजी व्यायाम शाळेच्या माध्यमातून गजानन इंगळे यांनी जय संताजी नगर व श्री शिवाजी व्यायाम शाळेच्या परिसरामध्ये ठीक ठिकाणी पानवठे लावून, पक्षांना पाणी पिण्याची व्यवस्था केली आहे.

सध्या उन्हाळा ऋतूला सुरुवात झाली आहे. दरम्यान उष्णतेत प्रचंड वाढ झाली आहे. या उष्णतेमुळे तहान लागण्याचे प्रमाण अधिक झाल्याने कितीही पाणी पिल्यास मनुष्याचा घसा कोरडा पडत आहे. तहान भागवण्यासाठी मनुष्य पिण्याचे पाणी पर्यायी मार्गाने उपलब्ध करू शकतो. मात्र, पक्षी प्राणी यांचे पाणी अभावी हाल होतात. परमेश्वराने केलेल्या निसर्ग रचनेनुसार, मानवासह पक्षी , प्राणी यांची नदी, तलाव व इतर पानवठे अशी व्यवस्था केलेली असते. परंतु, सद्यस्थितीमध्ये अनेक ठिकाणी नदी तलाव व इतर पानवठे आटले आहे. त्यामुळे पक्षी प्राणी पाण्याच्या शोधात इतरत्र भटकंती करतात. मानवी कर्तव्य म्हणून आपल्याला जशी तहान भागवण्यासाठी पिण्याच्या पाण्याची गरज भासते असाच एका जीवाने दुसऱ्या जीवांसाठी प्रयत करणे अपेक्षित असते. याच उदात्त भावनेने श्री शिवाजी व्यायाम शाळेच्या माध्यमातून गजानन इंगळे यांनी साखरखेर्डा येथील जय संताजी नगर व श्री शिवाजी व्यायाम शाळा परिसरामध्ये पक्षांना तहान भागवण्यासाठी ठीक ठिकाणी जलपात्र लावले आहे. या छोट्याश्या उपक्रमातून आपल्याला आत्मिक समाधान लाभल्याची भावना गजानन इंगळे यांनी व्यक्त केली.

**आध्यात्मिक** | **विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन**

# महावीर भगवान जन्मकल्याणिक महामहोत्सव साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.१ :** श्री.१००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर अतिशय क्षेत्र डोणगाव येथे सर्व श्रावक श्राविकांनी वर्तमान जीन शासन नायक महावीर भगवान जन्म कल्याणिक महामहोत्सव दिनांक ते२८३० मार्च २०२६ रोज चार दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये २८ मार्च सकाळी सहा वाजता प्रभातफे रीकाढल्यानंतरअभिषेक करण्यात आला. २८ मार्चला दुपारी पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर सांस्कृतिक भवनामध्ये महिला व बालक बालिकांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

यामध्ये विद्याधर से विद्यासागर. विविध वेशभूषा स्पर्धा उत्साहाने करण्यात आलेन२९ मार्च सकाळी सहा वाजता प्रभात फेरी भोला सागर परिसरात काढण्यात आली. त्यानंतर अभिषेक दीप प्रज्वलन कल्याण मंदिर विधान पार पडले दुपारी विविध संस्कृतीक कार्यक्रम पार पडले. यामध्ये जैन धर्मातील विविध परंपरेवर आधारित नाटके. गीते नाटिकानृत्य तसेच जैन इतिहासावर आधारित हे नाटक करण्यात आले तीर्थंकर मातेची सोळा स्वप्न या कार्यक्रमाच्या मार्फत उभी करण्यात आली. ३० मार्चला सकाळी ६. ३० ला नगर प्रभात फेरी काढण्यात आली त्यानंतर वर्धमान विधान महावीराचा पाळणा महावीराची जन्म कल्याणक पार पडली सायंकाळी महिलांची सांस्कृतिक कार्यक्रम व विविध मनोवेधक नृत्य व नाटिका सादर करण्यात आल्या . ३१ मार्च २०२६ ला सकाळी अभिषेक नित्य पूजा व भक्तामर विधान पार पडले त्यानंतर श्रीजी मिरवणूक प्रभात फेरी मार्गे पार पडली बारा ते तीन या दरम्यान महाप्रसादेचे आयोजन दानशूर धर्मप्रेमी प्रवीण सुभाष धोंगडे व सचिन सुभाष धोंगडे यांनी अत्यांत विनयतेने केले घोडा गाडीच्या बग्गी मधून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. भगवान महावीराची पालखी मधून शोभायात्रा सुद्धा काढण्यात आली. जैन व अजैन लोकांनीही या शोभा यात्रेमधून आपला सहभाग नोंदवला . यानंतर पुन्हा मंदिरामध्ये येऊन अभिषेक , पाळणा व महावीर जन्म कल्याण साजरे करण्यात आले .महावीरांनी दिलेला संदेश या सर्व कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी होता ..अभिषेक जन्म कल्याणक साजरे झाल्याचे नंतर आरती व महाप्रसादाचे आयोजन केलेले होते .अत्यंत उत्साहात महावीर जयंतीची मिरवणूक डोंणगाव वाशीयांनी यादरम्यान अनुभवली. शोभा यात्रच्या दरम्यान विविध ठिकाणी शरबत शीतपेय कुल्फी व इतर गोष्टींचे आयोजन सुद्धा करण्यात आलेले होते शोभायात्रेच्या दरम्यान विविध महिलांनी परिधान केलेले आकर्षक व शिस्तबद्ध पोशाख व त्यांनी शिस्तबद्ध रीतीने बसवलेले विविध मनोवेदक नृत्य उपस्थित त्यांचे लक्ष शोभायात्रकडे आकर्षित करीत होते.

# शहिदांमुळेच भारतीयांना स्वातंत्र्याचा शहद चाखायला मिळाला - प्रा.मधुकर जाधव

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**देऊळगाव राजा दि.१ :** आपल्या देशाला थोर समाज सुधारकांची आणि क्रांतीकारकांची उज्ज्वल परंपरा लाभली असून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी शहिद झालेल्यांमुळे आपल्याला स्वातंत्र्याचा शहद चाखायला मिळाला, असे प्रतिपादन देऊळगाव राजा येथील श्री व्यंकटेश महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात शहिदांच्या स्वप्नातील भारत या विषयावर आयोजित अतिथी व्याख्यानात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे अधिसभा सदस्य नितीन टाले कैलास चव्हाण विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू उपस्थित होते. स्वातंत्र्याचा जाज्वल्य इतिहास हा प्रत्येक भारतीयांच्या काळजावर कोरलेला आहे त्यामुळे तो कधीच पुसला जाऊ शकत नाही, असे मतही प्रा.मधुकर जाधव यांनी व्यक्त केले. याप्रसंगी नितीन टाले आणि कैलास चव्हाण यांनी देखील मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्र कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी शहिदांचे स्मरण हे फक्त एका दिवसापुरते नसावे तसेच त्यांचे विचार सातत्याने आत्मसात करावे, असे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ.राजीव बोरकर, आभार डॉ.निलेश कडू तर संचलन भगवान किनाके यांनी केले. कार्यक्रमाला विविध महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### समृद्धीवरील अपघातप्रकरणी पालकमंत्र्यांकडून दु:ख व्यक्त

**जालना :** समृध्दी महामार्गावर झालेल्या भीषण अपघाताच्या घटनेवर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी हळहळ व्यक्त केली आहे. मृत्यूमुखी पडलेल्या परिवारा विषयी त्यांनी संवेदना व्यक्त केल्या असून मृत व जखमी व्यक्तीच्या परिवाराला शासनाकडून मदत मिळवून देणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. भीषण अपघाताची घटना आज समृध्दी महामार्गावर घडली. भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने रस्त्यात थांबलेल्या पिक अप व्हॅनला जोराची धडक दिल्याने पिक अप मधील सात महिला मजुर जागीच ठार झाल्या तर अन्य पाच ते सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.हे सर्व जण बदनापूर तालुक्यातील कडवंची व केळीगव्हाण येथील आहेत. घटना समजताच पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांकडून अपघाताची माहिती जाणून घेतली व मृतांच्या कुटुंबियांप्रती शोक संवेदना व्यक्त करत हळहळ व्यक्त केली. मृत व जखमींना शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू करू असे त्या म्हणाल्या. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांना फोन करून त्यांनी जखमींवर तातडीने आवश्यक ते सर्व उपचार करण्याच्या सूचना दिल्या.

### जिल्हाधिकारी यांनी केली जिल्हा रुग्णालयाची पाहणी

**जालना :** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जिल्हा सामान्य रुग्णालयाला अचानक भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांना भेटी देऊन तेथील कामकाजाचा आणि आरोग्य सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रामुख्याने बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), अपघात विभाग, एक्स रे विभाग आणि स्वच्छता व्यवस्थेची बारकाईने पाहणी केली. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांशी तसेच रुग्णांशी थेट संवाद साधून त्यांना मिळणारे उपचार, औषध उपलब्धता आणि भोजनाचा दर्जा याबाबत विचारपूस केली. रुग्णालयातील सुविधा व स्वच्छतेबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले, मात्र काही त्रुटी दूर करण्याचे निर्देशही दिले. यावेळी त्यांनी डॉक्टरांना व कर्मचाऱ्यांना सूचना देताना सांगितले की, रुग्णांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि वेळेवर उपचार मिळवून द्यावेत. रुग्णांच्या सेवेसाठी प्रशासन तत्पर असून आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे, असेही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी स्पष्ट केले.

### बुधवारी मनपाची सर्वसाधारण सभा

**जालना :** महापालिकेची सर्वसाधारण सभा २ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली होती; परंतु काही अपरिहार्य कारणास्तव ही सर्वसाधारण आता ६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता जालना शहर महानगरपालीकेच्या नवीन सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी आयुक्त आशिमा मित्तल यांच्यासह महापालिकेच्या नगरसेवकांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव नगरसचिव विभागामध्ये पाहण्यासाठी उपलब्ध राहणार आहेत.

# ...आणि मोती तलावात बुद्ध हसणार!



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. १ :** आज बुधवार रोजी जालना शहरातील मोती तलावात तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीसाठी १५ वर्षानंतर विसर्जन कुंडाच्या बाजूच्या साईडने जागा निश्चित करण्यात आली आहे. या प्रसंगी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, आर्किटेक्ट बनसोडे, तथागत गौतम बुद्ध स्मारक समितीचे सुधाकर निकाळजे, रमेश देहेडकर, धर्मा खिल्लारे, अभियंता सय्यद सऊद, अंभोरे आदी उपस्थित होते.



**मी उपमहापौर पदाचा प्रभारी चार्ज दुसऱ्यांदा घेतलेला असतांना जालना शहरातील मोती तलावात तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीची स्थापना करण्यासाठी पुढाकार घेतला होता. मला आनंद आहे की, मी पुन्हा एकदा उपमहापौर झालेलो असतांना हे कार्य पूर्णत्वास जात असल्याचे वेगळे समाधान मिळत आहे. यामध्ये जिल्हा प्रशासनाकडून सकारात्मक सहकार्य मिळत आहे ही बाबही आमच्यासाठी खूप महत्वाची आहे.**

**- राजेश राऊत, उपमहापौर, महानगर पालिका, जालना.**

# आरोपींना मदत करणाऱ्या 'नारायण'ची जालन्यात मुजोरी वाढली

। सुशीलकुमार वाठोरे ।

**जालना, दि. १ :** बदनापूर तालुक्यातील काजळा येथील शेतकरी घनश्याम पिराजी देवकाते यांच्यावर २ गुंड प्रवृत्तीच्या त्याच गावातील तरुणांनी दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी सशस्त्र जीवघेणा हल्ला करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेत बदनापूर पोलिस ठाण्याचे पोहेकॉ दासर यांनी त्याच दिवशी संध्याकाळी आरोपींची एनसी दाखल करून घेवून देवकाते यांच्या विरूद्ध क्रॉस कम्प्लेंट घेवून क्रॉस गुन्हा नोंदविला. विशेष म्हणजे एनसी दाखल करून घेण्याचा प्रोटोकॉल असलातरी क्रॉस कम्प्लेंट नोंदवताना अगोदर संबंधित घटनेची चाचपणी करणे आवश्यक होते. यात मात्र, पोहेकॉ दासर यांनी हल्ला करणाऱ्या गुंडांची बाजू घेवून एनसी दाखल केली. विशेष म्हणजे आरोपी श्रीकांत खांडेकर हा वाळू माफिया असून त्याची मोठी टोळी आहे. तो गावात कर्कश आवाजाची बुलेट फिरवून नेहमी दहशत पसरवत असतो. त्याने एका वर्षात २ हायवा, २ ट्रॅक्टर, बुलेट, चारचाकी गाडी एव्हढी संपत्ती कमावली असून त्याची चौकशी होणे गरजेची आहे.

दुसरा आरोपी सुरज पांढरे हा मटका व्यवसायाशी संबंधित असून तो त्याच्या मामाकडे मटका घेण्याचा काम करत होता. त्याचा एक मामा पोलिसमध्ये असून पूर्वी दुसरा मामा मटका बुकीचा धंदा करत होता. त्याच्यावर तसे पोलिस ठाण्यात गुन्हेही नोंद आहे. त्याचाच एक मेव्हणा पीएसआय आहे त्यामुळे सुरज पांढरे त्याचे नातेवाईक पोलिस दलात असल्यामुळे तो कायद्याला जुमानत नाही. याच बळावर तो गावात गुंडागर्दी करत असतो. पांढरे परिवार पूर्वी अंबड तालुक्यातील रामगव्हाण बु. या खेडेगावात राहत होता. मात्र तेथे पारधी समाजातील एका व्यक्तीच्या हत्येच्या गुन्ह्यात सुरज पांढरे याचे वडील भाऊसाहेब पांढरे याचा सहभाग असल्याच्या कारणावरून ते काजळा येथे स्थायिक झालेले आहे आणि येथेही त्यांची तीच गुन्हेगारीवृत्ती कायम आहे.

या प्रकरणातील तपास अधिकारी पोहेकॉ दासर हे काजळा गावाचे बीट जमादार असून वाळू माफिया अवैध धंद्यावाल्यांचे ते पाठीराखे आहेत त्यांना त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात हप्ते मिळतात. देवकाते यांनी अशा स्वरुपाच्या तक्रारी पोलिस अधिक्षकांकडे केल्याने दासर यांचे बीट बदलण्यात आले आहे, असे असले तरी या वाळू माफिया आरोपींना एका राजकीय व्यक्तीमत्त्वाची साथ मिळत असल्याचा आरोप घनश्याम देवकाते यांनी केला असून बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे आमदार नारायण कुचे यांच्या संपर्कात हे दोन्ही आरोपी असल्यामुळे त्यांना घटना घडून दीड महिना होत आला असला तरी पोलिस प्रशासनाकडून अभय मिळत असल्याचा आरोपही देवकाते यांनी केला आहे. नारायण, नारायण म्हणत मतदारसंघाचा विकास करण्याच्याऐवजी गुन्हेगारांना अभय देण्यात धन्यता मानणाऱ्या आमदार नारायण कुचेंना ज्यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला आहे त्यांचा फोन रिसिव्ह करण्यासही वेळ मिळत नाही यावरूनच या घटनेचे गांभीर्य जिल्हा पोलिस प्रशासनाने घेवून घनश्याम देवकाते यांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र जालना येथे कर्मचारी सेवानिवृत्त समारोह संपन्न



**जालना :** येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र येथील के.एम.गंगावणे, के.के.खांडेभराड हे कर्मचारी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या ह्या सेवानिवृत्ती निमित्त समारोह ठेवण्यात आला होता. ह्या कार्यक्रमास ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य धुनाबज सर, सेवानिवृत्त प्राचार्य शेरखानी सर व सेवानिवृत्त व विकास अधिकारी भुतेकर सर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

या कार्यक्रमानिमित्तने सावंत सर व भोजन सर, महेश सर, सतीश शंकर पिल्ली यांची भाषणे झाली व सेवानिवृत्त कर्मचारी यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन निरोप देण्यात आला. या कार्यक्रमास माऊली मागडे, सचिन जाधव, राजू बुदेले पाटील,गोपाल ठाकूर, प्रभुदास भालेराव उपस्थित होते.

# खा.डॉ.काळे यांची कृषी विपणन योजनेला तातडीने निधी देण्याची केंद्रीय कृषिमंत्र्यांकडे मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. १ :** जालना लोकसभेचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी शिवराज सिंह चौहान (केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री) यांची भेट घेऊन एकीकृत कृषी विपणन योजना अंतर्गत कृषी विपणन अधोसंरचना उप-योजना तातडीने पुन्हा सुरू करण्याची आणि त्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, उप-योजना ही देशातील शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था, सहकारी संस्था तसेच ग्रामीण उद्योजकांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना ठरली आहे. मात्र, १० जून २०२५ रोजी केंद्र सरकारने या योजनेचा निधी संपल्यामुळे ती तात्पुरती स्थगित केली आहे, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

या योजनेअंतर्गत देशातील विविध राज्यांमध्ये ग्रामीण गोदामे, कोल्ड स्टोरेज, राईस मिल्स, ग्रेडिंग युनिट, वेट ब्रिज आदी आधुनिक कृषी अधोसंरचना उभारण्यात आली असून, आतापर्यंत सुमारे ₹५०० कोटींपेक्षा अधिक अनुदान ३,५०० हून अधिक लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले आहे. यामुळे पिकांनंतरचे नुकसान कमी होऊन शेतकऱ्यांना चांगल्या बाजारपेठेच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

डॉ. काळे यांनी याकडेही लक्ष वेधले की, योजना अचानक थांबल्यामुळे अनेक प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत. अनेक शेतकरी व उद्योजकांनी अनुदानाच्या अपेक्षेने बँक कर्ज घेऊन प्रकल्प सुरू केले आहेत. त्यामुळे या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि शेतकऱ्यांच्या विश्वासावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर त्यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत : उप-योजनेसाठी तातडीने अतिरिक्त निधी मंजूर करावा, प्रलंबित प्रस्तावांची प्रक्रिया आणि नवीन प्रकल्पांना मंजुरी त्वरित सुरू करावी, आवश्यक असल्यास पूरक अर्थसंकल्प अथवा आकस्मिक निधीतून आर्थिक तरतूद करावी डॉ. कल्याण काळे यांनी विश्वास व्यक्त केला की, मंत्री महोदयांच्या सकारात्मक हस्तक्षेपामुळे ही महत्त्वपूर्ण योजना पुन्हा सुरू होऊन देशातील शेतकऱ्यांना आणि ग्रामीण उद्योजकांना मोठा दिलासा मिळेल.

# बुधवारपासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला

## कन्हैयाकुमार, नितिन चंदनशिवे, डॉ.रतनलाल, मनीषा तोकले, शमिभा पाटील विचार मांडणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**जालना, दि. १ :** सुवर्णमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेस ८ एप्रिल २०२६ पासून जालना शहरात सुरूवात होणार असून देशपातळीवरील विद्यार्थी चळवळीचे नेते कन्हैयाकुमार, विचारवंत नितीन चंदनशिवे, डॉ. रतनलाल, सामाजिक कार्यकर्त्या मनिषा तोकले, शमिभा पाटील या व्याख्यानमालेत उपस्थित राहून आपले विचार मांडणार आहेत, अशी माहिती व्याख्यान मालेचे अध्यक्ष प्रा.डॉ. शांताराम रायपुरे यांनी एका हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

अंबड रोडवरील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या मैदानावर ८ ते १३ एप्रिल दरम्यान या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या व्याख्यानमालेचे ४९ वे वर्ष आहे. देशभरातील विचारवंत, लेखक, इतिहासकार व पुरोगामी चळवळीतील ज्येष्ठ मंडळींनी या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत उपस्थित राहून आपले विचार मांडले आहेत. महापुरुषांचे परिवर्तनवादी विचार तळागाळापर्यंत पोहचले पाहिजेत त्यांच्या विचारांचा जागर व्हावा, या उद्देशाने ४८ वर्षापासून जालना शहरात या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत आहे.

बुधवार दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता आमदार अर्जुनराव खोतकर व उद्योजक घनश्यामदास गोयल यांच्या हस्ते या व्याख्यानमालेचे उदघाटन होणार आहे. कोल्हापूर येथील विचारवंत नितीन चंदनशिवे हे आंबेडकरी चळवळ व आजचा तरुण या विषयावर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफणार आहेत. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे हे यावेळी अध्यक्षस्थानी राहणार आहेत. माजी आमदार राजेश टोपे, विलास डोळसे, राजकुमार सावंत, प्राचार्य डॉ. दयानंद भक्त, सुनील साळवे, प्रा. रमेश भुतेकर आदी यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

९ एप्रिल रोजी देशपातळीवर विद्यार्थी चळवळीचे नेते कन्हैयाकुमार हे भारतीय लोकतंत्र के सामने की चुनौतिया या विषयावर व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी अ‍ॅड. ब्रम्हानंद चव्हाण हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. सुधाकर निकाळजे, अशोक पांगारकर, प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी आदी यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

१० एप्रिल रोजी नवी दिल्ली येथील प्रसिद्ध इतिहासतज्ञ व विचारवंत डॉ. रामलाल हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती केमायने या विषयावर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी संविधान जागर अभियानाचे अध्यक्ष अ‍ॅड. शिवाजी आदमाने हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. माजी आमदार कैलास गोरंट्याल, माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, डॉ. भगवानसिंग डोभाळ, डॉ. कालिदास सूर्यवंशी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. ११ एप्रिल रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मनिषा तोकले ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांसाठी योगदान या विषयावर व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी महापौर वंदना मगरे ह्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. वैशाली सरदार, नगरसेविका अ‍ॅड. रीमा खरात, दर्शना झोल, नूतन मघाडे, कुसुम रगडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

१२ एप्रिल रोजी जळगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या शमिभा पाटील ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व आपली जबाबदारी या विषयावर व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी सुधाकरराव रत्नपारखे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. जालना जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुदामराव सदाशिवे, माजी उपनगराध्यक्ष भारकर दानवे सुनील आर्दड, डॉ. संजय लाखे पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. १३ एप्रिल रोजी पुणे येथील राखी चौरे यांचा भीमाची वाघीण हा भीमगितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ सामाजिक नेते अ‍ॅड. बी. एम. साळवे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राजेश राऊत, डॉ. राजेंद्र पाटील, अनंत कुलकर्णी, नंदूभय्या जांगडे, अरुण अग्रवाल, डॉ. प्रदिप हुसे, डॉ. आशिष राठोड, कल्याण दळे, प्रा. सत्संग मुंढे, विनोद रत्नपारखे, महेंद्र रत्नपारखे, राजेंद्र राख, निखिल पगारे, महावीर ढक्का, संदीप खरात, सचिन कांबळे, कपील खरात, संदीप साबळे, दिनकर घेवंदे, किशोर मधाडे, डॉ. रविंद्र काकडे, हर्षकुमार गायकवाड, बंडू डोईफोडे, अरूण जाधव, अमोल ठाकूर, शरद मांगधरे, मधुकर सिनगारे, अ‍ॅड. योगेश गाडगे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या पत्रकार परिषदेस व्याख्यान मालेचे अध्यक्ष प्रा.डॉ. शांताराम रायपुरे, सचिव सुधाकरभाई रत्नपारखे, कार्याध्यक्ष साईनाथ चिन्नादोरे, सचिन कांबळे, कोषाध्यक्ष प्रा.डॉ. प्रियदर्शन भवरे, स्वप्निल गायकवाड, उपाध्यक्ष डॉ. विजय कुमठेकर, संजय हेरकर आदींची उपस्थिती होती.

**प्रेरणादायी** राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनीची उत्तुंग झेप

# तायक्वांदो खेळाडू विशाखा दवंडेचा पोलीस दलातील निवडीबद्दल सन्मान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. १ :** तायक्वांदो या खेळात जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणारी जालन्याची विद्यार्थिनी विशाखा विलास दवंडे हिची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला.

जालना येथील रहिवासी असलेल्या विशाखा दवंडे हिने जालना जिल्हा तायक्वांदो असोसिएशनच्या माध्यमातून तायक्वांदो या खेळात सातत्याने मेहनत घेत अनेक स्पर्धांमध्ये यश मिळवले आहे. जिल्हा, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर तिने आपले कौशल्य सिद्ध करत क्रीडा क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली. विशाखाने नागपूर येथे प्रशिक्षण पूर्ण करून शिस्त, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर मुंबई येथे पोलीस भरतीत यश मिळवत पोलीस दलात स्थान मिळवले. तिच्या या यशामुळे जालना



शहरासह क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर जालना येथील कामगार मंडळ तायक्वांदो हॉलमध्ये तिचा सन्मान करण्यात आला. यावेळी जालना जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद देशमुख, प्रशिक्षक सय्यद निसार, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शेख महेमूद, पोलीस दलातील शिवाजी जमदाडे, प्रवीण पाचफुले, बचाटे,तसेच असोसिएशनचे खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी विशाखाच्या यशाचे कौतुक करत, तिचा प्रवास हा जिद्द, परिश्रम आणि क्रीडाशिस्तीचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगितले. ग्रामीण व निमशहरी भागातील मुलींनीही क्रीडा क्षेत्रात पुढे येऊन स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी, असा संदेशही या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमात नवनियुक्त पोलीस कर्मचारी विशाखा दवंडे हिच्यासह तिचे आई-वडीलही उपस्थित होते. या यशाचे श्रेय तीने प्रशिक्षक सय्यद निसार व आई-वडील यांना दिले. आपल्या मुलीने पोलीस दलात स्थान मिळवल्यामुळे आई-वडिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणि अभिमान स्पष्ट दिसून येत होता.

### खेळामुळे शिस्त आणि करिअर दोन्ही शक्य-अरविंद देशमुख

**याप्रसंगी बोलताना क्रीडा मार्गदर्शक अरविंद देशमुख यांनी विशाखाच्या यशाचे कौतुक केले. ते म्हणाले की, विशाखाची पोलीस दलात झालेली निवड ही केवळ तिचे यश नसून जालन्यातील तायक्वांदो क्षेत्रासाठी अभिमानास्पद बाब आहे. खेळ केवळ मैदानापुरता मर्यादित नसून, त्यातून मिळणारी शिस्त आणि जिद्द जीवनात मोठे यश मिळवून देते. विशाखाचा हा प्रवास ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायी ठरेल. खेळात सातत्य ठेवल्यास करिअरच्या अनेक वाटा खुल्या होतात, हेच तिने सिद्ध केले आहे. ती भविष्यात निश्चितच फौजदार, पोलीस निरीक्षक पदापर्यंत झेप घेईल, असा विश्वास अरविंद देशमुख यांनी व्यक्त केला.**

### विशाखाची जिद्द उदयोन्मुख खेळाडूंसाठी नवी पहाट-सय्यद निसार

**विशाखाच्या यशावर आनंद व्यक्त करताना प्रशिक्षक सय्यद निसार म्हणाले की, विशाखा अत्यंत मेहनती आणि आज्ञाधारक खेळाडू आहे. तायक्वांदो सरावातील तिचे सातत्य आणि कधीही हार न मानण्याची वृत्ती यामुळेच तिला हे यश मिळाले आहे. मैदानावर गाळलेला घाम तिला पोलीस गणवेश मिळवून देण्यात यशस्वी ठरला, याचा मला एक प्रशिक्षक म्हणून सार्थ अभिमान आहे. जालना जिल्ह्यातील इतर तायक्वांदो खेळाडूंनी विशाखाचा आदर्श घेऊन क्रीडा क्षेत्रात आणि करिअरमध्ये यश मिळवावे, हीच इच्छा आहे. प्रतिकूल परिस्थितीतही डगमगून न जाता तिने मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील उदयोन्मुख खेळाडूंसाठी नवी पहाट ठरेल, असा विश्वास सय्यद निसार यांनी व्यक्त केला.**

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, गुरूवार,२ एप्रिल २०२६

## थोडक्यात

### एडतकरांचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सरचिटणीस पदाचा राजीनामा



अमरावती : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस दिलीप एडतकर यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला असून तशा अर्थाचा ई-मेल प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, वरिष्ठ नेत्या यशोमती ठाकूर व वरिष्ठ नेते डॉ.सुनील देशमुख यांना पाठविला आहे.

### जिल्ह्यात दोन दुचाकींची चोरी

अमरावती : जिल्ह्यात मागील चार दिवसात दोन दुचाकी चोरीला गेल्याची त्याची नोंद २९ मार्च रोजी अचलपूर व नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. अचलपूर ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, फिर्यादी जुनेद खान युसूफ खान (२८, रा. हिरापूर) यांनी दुचाकी घटरासमोर उभी केली. काही वेळात ते परत आले असता, त्यांना दुचाकी दिसून आली नाही. तिची अंदाजे किंमत ७५ हजार आहे, तर दुसऱ्या घटनेत एकपाळा येथे अज्ञाताने घरासमोरून उभी दुचाकी (एमएच २७-बीडब्ल्यू २३२८) चोरून नेली. तिची अंदाजे किंमत ६० हजार रुपये आहे. नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी अतुल पुंडलीकराव चांदणे (४३, रा. एकपाळा) यांच्या तक्रारीवरून दुचाकी चोरीचा गुन्हा नोंदवला.

### भरधाव टिप्परची कारला धडक

अमरावती : ही घटना राजपुत ढाब्याच्या चौफुलीजवळ घडली. या संदर्भात संतोष त्र्यंबकराव काबडे (६१, रा. देशमुख लॉनजवळ) यांनी गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली. घटनेच्या वेळी फिर्यादी त्यांच्या बोलेरो कारने (एमएच २७-बीझेड ६४१७) कुटुंबासह त्यांच्या नातेवाईकाकडे जात होते. त्याच वेळी मागून आलेल्या भरधाव टिप्परने (एमच २०-सीजी ७४९५) कारला धडक दिली. त्यात त्यांच्या चारचाकीचे नुकसान झाले असून पोलिसांनी टिप्परच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### ऑटो भर रस्त्यात उभा करणाऱ्यावर गुन्हा दाखल

अमरावती : नवाथे चौकाकडून राजकमल चौकाकडे जाताना गद्रे चौकात चालकाने त्याच्या ताब्यातील चार चाकी ऑटो (एमएच २७-बीडब्ल्यू ८१९०) रस्त्याच्यामध्ये उभा केला. धोकादायक स्थितीत उभ्या केलेल्या या ऑटोमुळे रहदारीला अडथळा निर्माण होवून अपघाताचा धोका निर्माण झाला होता. ही बाब पेट्रोलिंगदरम्यान राजापेठ पोलिसांच्या निदर्शनास आली. त्यांनी ऑटो चालक पंकज नारायणराव खडसे (२६, रा. वडाळी) याच्यावर रहदारीला अडथळा केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहे.

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

अमरावती : कुटुंबिय नातेवाईकाकडे गेले असताना, युवकाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली.

ही घटना संरक्षण कॉलनी, अकोली येथे घडली. गणेश किसनराव अवघाते (३४) असे मृतकाचे नाव आहे. बडनेरा पोलिसांनी या प्रकरणी मर्ग नोंदवला.

### अकरा वर्षीय बालिकेचा विनयभंग

अमरावती : जिल्ह्यात गेल्या दोन दिवसात एका १२ वर्षीय मुलीला अज्ञाताने पळवून नेले, तर ११ वर्षीय चिमुकलीचा विनयभंग केला.

या घटना अनुक्रमे चांदूर रेल्वे व अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यांतर्गत घडल्यात. चांदूर रेल्वे पोलिसांनी अज्ञातावर, तर अंजनगाव पोलिसांनी पवन प्रभाकर अनासने यांच्यावर गुन्हा नोंदवला.

# सह-अस्तित्वावर राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाचे शिक्कामोर्तब : सक्तीचे पुनर्वसन थांबणार!

## व्याघ्र प्रकल्पातील वनवासींना मोठा दिलासा; स्वैच्छिक स्थलांतरासाठी आता १५ लाखांचे पॅकेज

अजिंक्य भारत| भारत वरठे



**मेळघाट, दि.१ :** व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रात पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असलेल्या वनवासी बांधवांसाठी केंद्र सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाच्या (एनबीडब्ल्यूएल) स्थायी समितीने व्याघ्र प्रकल्पांमध्ये मानव आणि वन्यजीव यांच्या सह-अस्तित्वाला सक्रियपणे प्रोत्साहन देण्याची शिफारस केली आहे. या निर्णयामुळे आता वनगावांचे सक्तीने पुनर्वसन करण्याऐवजी, त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात राहण्याचा अधिकार मिळण्याचे मार्ग मोकळे झाले आहेत.

आतापर्यंत राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (एनटीसीए) केवळ पुनर्वसन या एकाच मुद्द्यावर ठाम होते. मात्र, बोर्डाच्या २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तानुसार या जुन्या धोरणात मोठा बदल करण्यात आला आहे. ज्या समुदायांची जंगलाबाहेर जाण्याची इच्छा नाही, त्यांना तिथेच राहून वन्यजीवांचे रक्षण करण्याची संधी दिली जावी, असा पवित्रा बोर्डाने घेतला आहे. बैठकीत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, देशात अजूनही ७३० गावे (सुमारे ७६,०३२ कुटुंबे) व्याघ्र प्रकल्पांच्या कोअर क्षेत्रात वास्तव्यास आहेत.

बिबट्यांचा जंगलाबाहेर वाढता वावर आणि मानवी संघर्ष रोखण्यासाठी इम्युनोकॉन्ट्रासेप्टिव्ह (प्रजनन क्षमता नियंत्रित करण्याचे तंत्रज्ञान) वापरण्याबाबत वैज्ञानिक अभ्यास करण्याचे बोर्डाने सुचवले आहे. तसेच, संघर्षग्रस्त बिबट्यांसाठी विशेष रेस्क्यू सेंटर्स आणि प्राणिसंग्रहालयांचा विस्तार करण्यावरही भर दिला जाणार आहे. संख्या नियंत्रित करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणार आहे.अनेकदा वैज्ञानिक अभ्यासाअभावी बफर झोनला कोअर घोषित केल्यामुळे अनेक गाये संकटात आली होती. समितीने आता वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला सामाजिक आणि आर्थिक अभ्यास करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे कोअर, बफर आणि इको-सेन्सिटिव्ह झोनच्या सीमांचे अचूक निर्धारण होणार आहे, जेणेकरून स्थानिक समुदायांना तिथेच राहायचे की स्थलांतर करायचे, याचा निर्णय घेता येईल.मेळघाटातील चिखलदरा व धारणी या आदिवासीबहुल तालुक्यांमधील अनेक गावांचे स्थलांतर झाले आहे. तथापि, या निर्णयाने मेळघाटात राहणाऱ्या आदिवासींना दिलासा मिळणार आहे.चूक सीमांकनासाठी कोअर आणि बफर क्षेत्राचा पुन्हा नव्याने वैज्ञानिक अभ्यास होणार आहे. वन हक्क कायदा २००६ नुसार ग्रामसभांच्या अधिकारांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे.

> केंद्र शासनाच्या निर्णयाचे स्वागत करतो. राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाच्या स्थायी समितीने कोरक्षेत्रामध्ये राहणाऱ्या कोरकु आणि अन्य जमातीच्या लोकांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. समितीने टायगर रिझर्व्हमधील वनवासी आणि वन्यजिवांच्या अस्तित्वाचे समर्थन केले आहे आणि स्थलांतर हे ऐच्छिक होणार आहे, जबरदस्तीने नव्हे. त्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे.
>
> **रामलाल काळे,**
> **आदिवासी प्रतिनिधी, मेळघाट**

## सेंट्रल बँकेत कोट्यवधी रूपयांचा घोळ उघड

### १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल

अजिंक्य भारत| प्रतिनिधी




**अमरावती, दि.१ :** बँकिंग क्षेत्रात खळबळ उडवून देणारी एक मोठी फसवणुकीची घटना येथे उघडकीस आली आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अमरावती विभागीय कार्यालयात तब्बल २ कोटी ९५ लाख ४९ हजार ४२१ रुपये आणि ४९ पैशांचा आर्थिक घोटाळा झाल्याचे समोर आले असून, याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी रविवारी दुपारी एकुण १० आरोपींविरुद्ध फसवणूक व गुन्हेगारी स्वरूपाचा कट रचल्याचा गुन्हा दाखल केला आहे. एफआयआरनुसार, अमरावती येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या क्षेत्रिय कार्यालयात हा प्रकार घडला. या प्रकरणी सहाय्यक महाप्रबंधक सुनील देवस्वरूप पांडेय (वय ४९ वर्ष), यांनी तक्रार नोंदविली. त्या तक्रारीनुसार आरोपींनी संगनमत करून बँकेच्या निधीचा अपहार केला. आरोपींनी बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून खोटे दस्तऐवज तयार केले. हे दस्तऐवज खरे असल्याचे भासवून त्यांनी बँकेच्या सरकारी निधीतून कोट्यवधी रुपये लाटले. ही रक्कम आरोपींनी स्वत:च्या खासगी आर्थिक फायद्यासाठी वापरून बँकेची मोठी फसवणूक केली आहे. आरोपींनी संगणमत करून गुन्हेगारी स्वरूपाचा कट रचला. तथा बँकेच्या सरकारी निधीवर डल्ला मारल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या आर्थिक घोळामुळे बँकिंग क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत असा घडला गुन्हाहा घोटाळा २३ फेब्रुवारी २०२२ ते ११ फेब्रुवारी २०२५ च्या दरम्यान घडल्याचे अहवालात नमूद आहे. या प्रदीर्घ कालावधीत आरोपींनी पद्धतशीरपणे बँकेच्या व्यवहारांत फेरफार केले. या प्रकरणात पोलिसांनी अंकित ए. वर्मा, स्वप्नील डोले, राजेश भेडीराम डोंगरे, अतुल व्यंकटराव लांगे, कार्तिक कल्याण लांगे, अमोल लांगे, अभिजीत भनग आणि इतर तीन महिला यांच्यासह एकूण १० जणांवर गुन्हा नोंदवला आहे.

## देहव्यापाराचा पर्दाफाश, पाच आरोपींना अटक

### गुन्हे शाखेची कारवाई



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.१ :** अवैध कृत्यांविरुद्धची आपली कारवाई सुरू ठेवत, शहर गुन्हे शाखेने पुन्हा एकदा मोठे यश मिळवले आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील, सातुर्णा एमआयडीसी, शिलांगन रोड येथील भव्यदीप अपार्टमेंटवर छापा टाकून वेश्याव्यवसाय रॅकेटचा पर्दाफाश केला. पोलिसांना अशी माहिती मिळाली होती की, या आलिशान अपार्टमेंटमधील एका फ्लॅटमध्ये काही काळापासून अवैध वेश्याव्यवसाय सुरू होता. या माहितीची खात्री झाल्यावर, पोलीस पथकाने नियोजित आणि अचानक छापा टाकला, जिथे संशयास्पद परिस्थितीत अनैतिक कृत्ये सुरू असल्याचे आढळून आले. छाप्यादरम्यान, पोलिसांनी वेश्याव्यवसाय रॅकेट चालवणाऱ्या मुख्य महिला आरोपीला अटक केली. घटनास्थळी उपस्थित असलेल्या दोन पीडित आणि दोन ग्राहकांनाही ताब्यात घेण्यात आले. निवासी परिसरात चालणाऱ्या या अनैतिक व्यवसायाचा पर्दाफाश झाल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांनी पोलिसांच्या तत्पर कारवाईचे कौतुक केले आहे. पोलिसांनी सर्व आरोपींविरुद्ध संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. गुन्हे शाखा आता या नेटवर्कच्या संबंधांची आणि अपार्टमेंटमधील इतर लोक या अनैतिक कृत्यात सामील होते का? याची चौकशी करत आहे. प्रशासनाने हे स्पष्ट केले आहे की, शहराची शांतता आणि शिस्त बिघडवणारी कोणतीही कृती खपवून घेतली जाणार नाही.

## शेतकऱ्याच्या परवानगीविना शेतातच उभारली पाण्याची टाकी

### उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले नुकसानभरपाईचे आदेश

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**परतवाडा, दि.१ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या पाणीपुरवठा योजनांमध्ये प्रशासकीय दिरंगाई आणि बेजबाबदारपणाचा नमुना समोर आला आहे. धारणी तालुक्यातील मौजा भुलोरी येथे एका शेतकऱ्याच्या शेतात पूर्वसंमती न घेता पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यात आल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणाची शेत मालकाकडून तक्रार देखील करण्यात आली होती. गंभीर दखल घेत सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी संबंधित शेतकऱ्याला तत्काळ नुकसानभरपाई देण्याचे आदेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला दिले आहेत. राणामालूर ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या मौजा भुलोरी येथील शेत सर्व्हे क्र. ९५ मध्ये पार्वती बाबू आणि इतर ३ व्यक्तींची मालकीची जमीन आहे. या शेतात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कोणत्याही प्रकारची परवानगी किंवा संमती न घेता एमबीआर (मास्टर बॅलेन्सिंग रिझर्व्हयर) आणि ईएसआर (एलेव्हेटेड सर्व्हिस रिझर्व्हयर) या पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम सुरू केले. आपल्या हक्काच्या शेतात विनापरवाना बांधकाम होत असल्याचे पाहून संबंधित शेत मालकांनी प्रशासनाकडे तक्रार केली होती प्रशासनाच्या या भूमिकेमुळे जीवन प्राधिकरण काय पावले उचलते आणि पीडित शेतकऱ्याला कधीपर्यंत न्याय मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर महसूल विभागा आणि जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता यांनी संयुक्तपणे या जागेची पाहणी केली. २९ जानेवारी रोजी झालेल्या पाहणीत, ज्या ठिकाणी बांधकाम सुरू आहे, ती जमीन खासगी असून, ७/१२ वर पार्वती बाबू आणि इतरांची नावे आहेत. तरीही याठिकाणी २० मीटर उंचीच्या टाकीचे काम स्लॅब लेव्हलपर्यंत पूर्ण केले. विनापरवाना बांधकाम केल्यामुळे शेत मालकाचे मोठे नुकसान झाले आहे. यावर उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी कडक भूमिका घेत अचलपूर मजिप्रा उपअभियंता यांना पत्र पाठवून तत्काळ योग्य कार्यवाही करून शेतकऱ्याला नुकसानभरपाई देण्याचे आणि त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## आईस्क्रिम पार्लरमध्ये प्रेमीयुगल आक्षेपार्ह स्थितीत

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.१ :** स्थानिक कठोरा रोडवरील ' फ्रोजन डिलाईट' या कॅफेमध्ये चालणाऱ्या या अवैध धंद्याचा महिला सेलने पर्दाफाश केला. धक्कादायक बाब म्हणजे, एका तरूण प्रेमी युगुलाला आत सोडून मालक बाहेरून चक्क कुलूप लावून घरी निघून गेला होता. महिला सेलच्या प्रमुख दीप्ती ब्राह्मणे आणि दामिनी पथकाने सोमवारी दुपारी टाकलेल्या छाप्यात हे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, महिला सेलचे पथक जेव्हा 'फ्रोजन डिलाईट'वर पोहोचले, तेव्हा बाहेरून कुलूप असल्याने कॅफे बंद असल्याचा भास होत होता. मात्र, संशय आल्याने पोलिसांनी बारकाईने पाहणी केली असता, दरवाजाच्या फटीतून आत माणसे असल्याचे निदर्शनास आले. तातडीने मालक दीप वितोंडे याला घटनास्थळी बोलावण्यात आले. कुलूप उघडताच आतमध्ये प्रेमी युगुल आक्षेपार्ह स्थितीत आढळले. त्यांना समज देऊन सोडण्यात आले. तर मालक संचालक दिप वितोंडेविरूद्ध प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार असल्याची माहिती ब्राम्हणे यांनी दिली. अशा अनैतिक धंद्यांविरुद्धची मोहीम अधिक तीव्र केली जाईल, असेही त्या म्हणाल्या. दिप वितोंडे याच्या मालकीच्या हॉटेल निमंत्रणवर देखील गुन्हे शाखेने अलिकडेच धाड घालून काही जोडप्यांना आक्षेपार्ह स्थितीत ताब्यात घेतले होते. तर यापुर्वीदेखील 'फ्रोजन डिलाईट'वर गुन्हे शाखा, महिला सेल व सीआययू पथकाने धाड टाकली होती. हे विशेष.

## वृद्धेच्या घरातून सोन्याचे दागिने व रोख लंपास

अमरावती : लघुवेतन कॉलनी परिसरात अज्ञात चोरट्याने वृद्ध महिलेच्या घरातून सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी फेजरपुरा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखलकरण्यात आला आहे. ६९ वर्षीय महिला (रा. लघुवेतन कॉलनी) या २७ मार्च रोजी त्यांच्या मुलीकडे नंदनवन कॉलनी येथे घरखर्चासाठी पैसे आणण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी (किंमत सुमारे १०,५०० रुपये), १५ ग्रॅम वजनाचा जुना वापरातील सोन्याचा गोफ तसेच ५००० रुपये रोख असा एकूण ३६,२०० रुपयांचा मुद्देमाल एका छोट्या पर्समध्ये ठेवून ती पर्स कपड्यांच्या बॅगमध्ये ठेवली.

**मागणी** — प्राथमिक शिक्षक समितीचे शिक्षण संचालकांना निवेदन

## विदर्भातील शाळा उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ३० जुनला सुरु करा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.१ :** उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि. ८ जून २०२६ रोजी आदेश निर्गत केल्यानंतर-दरवर्षी विदर्भातील २६ जून पासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मा. न्यायालयाचा निर्णय अजूनही कायम असून त्याबाबत घेतलेले शासन निर्णय अजूनही अधिक्रमित झालेले नाही. मात्र दि.२८ मार्च रोजी शिक्षण संचालनालयाने विदर्भातील शाळा सुद्धा १५ जून पासून सुरू करण्याचे आदेश निर्गत केले आहे.

जून महिन्यात सुद्धा विदर्भात उन्हाच्या तीव्र झळा असतात व असह्य उकाडा असतो. त्यामुळे मा. न्यायालयाच्या आदेशास अनुसरून विदर्भातील शाळा सुरू करण्याचे बाबतीत पुनर्विचार व्हावा. (विदर्भात उशिराने शाळा सुरू होत असल्याने उर्वरित महाराष्ट्रापेक्षा विदर्भात दिवाळीच्या सुट्ट्या कमी असतात. त्यामुळे शैक्षणिक कामकाजाच्या दिवसांवर कोणताही फरक पडत नाही.)याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने शिक्षण संचालनालयाकडे पत्र पाठविले आहे. तसेच सदर पत्राच्या प्रती मा. मंत्री, मा. राज्य मंत्री (शालेय शिक्षण), मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण), मा. राज्य आयुक्त (शिक्षण), मा. उपसचिव (शालेय शिक्षण) यांच्याकडे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी पाठविल्या आहेत.असे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावकर यांनी सांगीतले आहे. विदर्भातील उष्णतामान कमी झाले नसून उलट मागील काही वर्षात उष्णतामानात प्रचंड वाढ झाली आहे. लहान बालकेच नव्हे तर प्रौढांना सुद्धा जून-जुलै पर्यंत तीव्र उन्हाचा मोठा त्रास होतो, जीवाची लाही-लाही होते. वातावरणातील उष्मा आणि उकाड्यामुळे अत्यंत असह्य असा त्रास होतो. ग्रामीण भागातील विजेचे भारनियमन, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष; त्यामुळे शाळेत विद्यार्थ्यांना सुविधा देणे शक्यच होत नाही. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून विदर्भातील शाळांचे शैक्षणिक वर्ष सुरु करण्याच्या बाबतीत मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन कायम राहण्याच्या दृष्टीने आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून याबाबतचा अलीकडील शासन निर्णय दि. २० एप्रिल २०२३ नुसार दरवर्षी दि. ३० जून पासून सुरु करण्याचा उल्लेख लक्षात घेऊन २०२६-२७ मध्ये विदर्भातील शाळा दि. ३० जून २०२७ रोजी सुरु करण्याचे पत्र निर्गत करावे अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून मागणी आहे.

शिक्षकांच्या सुट्टीबाबत- दि. १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत दशवार्षिक जनगणनेचा पहिला टप्पा सुरु होत आहे. त्यासाठी जवळपास सर्वच प्राथमिक शिक्षकांना नियुक्त केले जात आहे. त्यामुळे मे-जून महिन्याच्या दीर्घ सुटीपासून शिक्षक वंचित राहणार आहे.दुसरीकडे शिक्षक दीर्घ सुटी उपभोगत असल्याने ग्रीष्मकालीन सुटी कालावधीत शिक्षकांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय केला जात नाही. दीर्घ सुटी उपभोगत असल्याने शिक्षकेत्तर कर्मचारी-अधिकाऱ्यांप्रमाणे दरवर्षी ३० दिवसांच्या दीर्घ रजा लागू नाहीत. तसेच याच कारणामुळे रजा रोखीकरणाचा लाभ सुद्धा (जो शिक्षकेत्तर कर्मचारी-अधिकाऱ्यांना लागू आहे) दिला जात नाही.

## दर्यापूर-आसेगाव रस्त्याची अवस्था दयनीय; लोकप्रतिनिधींचे डोळे अद्यापही बंदच!



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.१ :** दर्यापूर ते खल्लार ,आसेगाव या महत्त्वाच्या मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांचे हाल होत आहेत.

अनेक ठिकाणी रस्ता पूर्णपणे उखडून गेला असून, वाहन चालवणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे झाले आहे. मात्र याकडे संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे.दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषत दुचाकीस्वारांना कमरेचा व पाठीचा त्रास वाढत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. रुग्णवाहिका, शालेय वाहने तसेच शेतीसाठी जाणाऱ्या वाहनांनाही या खराब रस्त्याचा फटका बसत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार अनेक वेळा या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

पावसाळयात तर परिस्थिती अधिकच बिकट होते खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने अपघातांचा धोका वाढतो.

## थोडक्यात

### साठ लीटर डिझेलची चोरी

वरुड : अज्ञात चोरट्याने डिझल टाकीचा खालील नट खोलून सुमारे ६० लीटर डिझेल चोरून नेली. त्याची अंदाजे किंमत ५ हजार ५२० रुपये आहे. ही घटना शेंदूरजनाघाट शहरातील बालापेठ येथे घडली. या संदर्भात मोहम्मद शाहीद मोहम्मद युसूफ (४८, रा. शेंदूरजनाघाट) यांनी शेंदूरजनाघाट ठाण्यात तक्रार नोंदवली. या संदर्भात अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला.

### केबलची चोरी करणाऱ्याला अटक

मोर्शी : दापोरी शिवारातील शेतातून केबलची चोरी करून पळून जाणाऱ्या वृद्धाला काही जणांनी पकडून ठेवले. त्याला पोलिसांच्या ताब्यात सोपवले. त्याच्याजवळून एकूण ५३ फूट केबल ताब्यात घेतला. त्याची अंदाजे किंमत साडे सहा हजार रुपये आहे. प्रवीण नागोराव नवघरे (३६, रा. दापोरी) यांच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी उत्तम आनंदराव ब्राह्मणे (६६, रा. मोर्शी) याच्यावर गुन्हा नोंदवला.

### मुलाची आई व बहिणीस मारहाण

चांदूर बाजार : पती-पत्नी जेवण करीत असताना साळा घरी आला. त्याने त्याच्या आईला शिवीगाळ करणे सुरू केले. दरम्यान बहिण त्याला समजवायला गेली असता, त्याने तिला लोटालोट करीत मारहाण केली. तो आईला शिवीगाळ करीत असताना जावई समजावण्यास गेला, तर त्यालाही मारहाण केली. माझ्या घरातून निघून जा म्हणून त्यांना सांगीतले. बहिण व जावई घरातून जात असताना युवकाने जावयाच्या डोक्यावर विळ्याने वार करीत जखमी केले. ही घटना कारंजा बहिरण येथे घडली. जखमी अवस्थेत जावई अभिजित प्रमोद गिरी (४०, रा. दर्यापूर) यांनी शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात साळ्याविरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी दिनेश अशोक मोहोड (३०, रा. कारंजा बहिरम) याच्याविरुद्ध दुखापतीचा गुन्हा नोंदवला.

### किस्त भरण्याच्या कारणावरून मारहाण

तिवसा : ऑटोच्या फायनान्सची किस्त भरण्यासाठी वडिलांनी मुलाला म्हटले. त्याचा राग आल्याने मुलाने कंबरेच्या पट्ट्याने वडिलांना मारहाण केली. त्यात त्यांच्या पाठीवर वळ उमटले, तर डोळ्याला दुखापत झाली. ही घटना निंबोरा देलवाडी येथे घडली. जखमी वडील जगदीश शंकरराव तिखाडे (५२) यांच्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी श्रेयस जगदीश तिखाडे (२१) याच्यावर गुन्हा दाखल केला.

### जुन्या वादातून एकाची दुसऱ्याला मारहाण

वरुड : जुन्या वादातून एका शेजाऱ्याने दुसऱ्याला मारहाण केली. त्यात फिर्याद धिरज प्रल्हादराव पाचघरे (४३) यांच्या कानाला दुखापत झाली. ही घटना लोणी येथे घडली. जखमीच्या तक्रारीवरून बेनोडा पोलिसांनी निलेश रमेशराव डहाके (३५) याच्यावर गुन्हा दाखल केला.

### पतीची पत्नीला जीवे मारण्याची धमकी

चिखलदरा : राशन दुकानात भेटलेला माल न विचारता कसा विकला म्हणत पतीने पत्नीला शिवीगाळ करीत वाद घालता. तिला मारण्याची धमकी देत काठीने मारहाण करीत जखमी केले. ही घटना मोझरी येथे घडली. पत्नीच्या तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी पती काशिराम मतींग भास्कर (४२) याच्यावर गुन्हा नोंदवला.

### अल्पवयीन मुलींना पळविले

अमरावती : जिल्ह्यात एका १४ वर्षीय मुलीसह १७ वर्षीय मुलीला अज्ञाताने फूस लावून पळवून नेले. या घटना मोर्शी व चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यांतर्गत घडल्यात.

# ५० टक्केपेक्षा कमी काम असलेल्या बीएलओला नोटीस द्या

■ आ.सुलभा खोडके यांचे निर्देश ■ बीएलओ पर्यवेक्षकांची सभा

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**अमरावती, दि.१ :** मतदाराचे एकच ओळखपत्र असणे व त्याने एकाच मतदान केंद्रात नियमानुसार मतदान करणे अभिप्रेत आहे. त्यापार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर ) प्रत्येक मतदार संघामध्ये राबविला जात आहे. त्याअनुषंगाने अमरावतीमध्ये निवडणूक विभागाकडून मतदार यादीच्या पडताळणी संदर्भातील कामकाजाबाबत अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी बीएलओ पर्यवेक्षकांची सभा घेऊन विस्तृत माहिती जाणून घेतली.

अमरावती नवीन तहसील कार्यालय येथे झालेल्या निवडणूक विभागातील बीएलओ पर्यवेक्षकांच्या सभेला आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या समवेत महाराष्ट्र विधान परिषद सदस्य - संजय खोडके , अमरावतीचे उपविभागीय अधिकारी - अनिल भटकर , अमरावती तहसीलदार - विजय लोखंडे, नायब तहसीलदार (निवडणूक )- राजेश धवणे, नायब तहसीलदार- सुनील रासेकर, निवासी नायब तहसीलदार -डॉ. क्रिष्णा गाडेकर, नायब तहसीलदार (महसूल )- टिना चव्हाण आदींसह निवडणूक विभागातील जवळपास ३१ बीएलओ पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचा विशेष



सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर ) अंतर्गत अमरावती मध्ये वर्ष २००२ च्या मतदार यादी सोबत सद्याची वर्ष २०२४ च्या मतदार यादीची पडताळणी करून मॅपिंग करण्यात येत आहे. यामध्ये मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मार्फत ऑनलाईन पद्धतीने अथवा मतदारांच्या घरी जाऊन मॅपिंग केले जात आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात मतदारांचे जास्तीत जास्त मॅपिंग करण्याकरिता ३२२ बीएलओ कार्यरत असून त्यांच्या कडून सदरचे काम पूर्ण करून घेण्यासाठी ३१ बीएलओ पर्यवेक्षक नेमण्यात आले आहे. अमरावतीमध्ये निवडणूक विभागाकडून मतदार यादीच्या पडताळणीचे काम जवळपास ५३ टक्के झाले असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी दिली.

तसेच मतदाराचे नाव २००२ च्या मतदार यादीत नसेल तर त्याचे आई-वडील, आजी-आजोबा यांचे नाव इसीनेट अपद्वारे शोधून यांचे २०२२ मधील मतदार संघ क्रमांक, मतदान केंद्र क्रमांक व अनुक्रमांक असा हा तपशील तपासून मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे. असेही यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान सभेला उपस्थित सर्व बीएलओ पर्यवेक्षकांनी आपल्या अधिनस्त येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व त्यांनी मतदार यादी भाग प्रमाणे बुथवाईज केलेले मतदार मॅपिंग बाबत माहिती दिली. बहुतांश मतदार यादी भाग मध्ये ५० टक्के हुन कमी मॅपिंग झाले असल्याचे समोर आले असता आमदार महोदयांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या संदर्भात बीएलओकडून अपेक्षित काम होत नाही, ऑनलाईन नावे मिळत नाही तसेच घरोघरी गेल्यास मतदारांकडून प्रतिसाद मिळत नाही. अशा अनेक अडचणी येत असल्याबाबत पर्यवेक्षकांनी आमदार महोदयांना अवगत गेले. यावर आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सुचित केले कि, मतदार यादी पडताळणी करण्याचे काम हे संबंधित मतदान केंद्रस्तर अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पूर्ण होणे अपेक्षित आहे.

निवडणुकांदरम्यान फेक मतदान व बोगस मतदान सारखे प्रकार होऊ नये म्हणून मतदाराचे एकच ओळखपत्र असणे व त्याने एकाच मतदान केंद्रात नियमानुसार मतदान करणे अभिप्रेत आहे. यासाठीच निवडणूक आयोगाने मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर ) राबविला आहे. त्याअनुषंगाने निवडणूक विभागाकडून मतदार यादीच्या पडताळणी संदर्भातील प्रक्रिया तातडीने व गतीने पूर्ण करण्यात यावी. अशी सूचना आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली. बैठकीला श्री. यश खोडके, यांच्यासमवेत अमरावती तहसील कार्यालय निवडणूक विभागातील कर्मचारी तसेच बीएलओ पर्यवेक्षक उपस्थित होते.

यासाठी संबंधित पर्यवेक्षकांनी बीएलओ कडून सदरचे काम जास्तीत जास्त पणे पूर्ण करण्यात यावे, याबाबत प्रचार - प्रसारावर सुद्धा लक्ष देऊन मतदारांमध्ये जागृती करावी, तसेच ज्या बीएलओ चे मॅपिंगचे काम ५० टक्क्यापेक्षा कमी आहे, त्यांना नोटीस बजावून सदर प्रक्रिया गतीने पूर्ण करण्यासंदर्भात सुचना करावी, अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याबाबत सुद्धा बीएलओ यांना कळविण्यात यावे. अशा सुचना आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी बैठकीतून दिल्या.

# आकाशवाणी अमरावतीवर ४ एप्रिलला आ. संजय खोडके यांची मुलाखत

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.१ :** अमरावती आकाशवाणी केंद्राला दिनांक २६ मार्च २०२६ रोजी माननीय आमदार संजयभाऊ खोडके यांनी सदिच्छा भेट देत, महाराष्ट्र राज्याच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पासह अमरावती च्या सर्वांगीण विकासदृष्टीवर सविस्तर आणि विचारप्रवर्तक संवाद साधला.



आकाशवाणी अमरावती केंद्राच्या आमंत्रणास प्रतिसाद देत दिलेल्या या भेटीत, केंद्रप्रमुख श्री. भैय्यालाल टेकाम, कार्यक्रम अधिकारी - श्री.आशिष गावंडे तसेच अभियांत्रिकी विभागाचे प्रतिनिधी श्री. गणेश देशमुख यांनी आमदार संजय खोडके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी केंद्रातील वातावरण उत्साही आणि संवादप्रधान झाले होते.यानंतर कार्यक्रम अधिकारी- आशिष गावंडे यांनी आमदार संजय भाऊ खोडके यांची सखोल मुलाखत घेतली. या संवादात त्यांनी राज्याच्या अर्थसंकल्पातील प्रमुख तरतुदींचे विश्लेषण करतांना, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, जलव्यवस्थापन, शेती आणि उद्योग या क्षेत्रांतील अमरावतीसाठी उपलब्ध होणाऱ्या संधींचा वेध घेतला. विशेषत: विदर्भाच्या विकासासाठी शासनाने आखलेल्या योजनांची स्थानिक पातळीवर प्रभावी अंमलबजावणी कशी होऊ शकते, यावर त्यांनी स्पष्ट आणि ठोस भूमिका मांडली.


अमरावतीच्या विकासाचा दीर्घकालीन रोडमॅप मांडताना शहरातील पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, जलसंधारण आणि युवकांसाठी रोजगारनिर्मिती या मुद्द्यांवर त्यांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले. आगामी १० ते १५ वर्षांत अमरावतीचा चेहरामोहरा बदलण्यासाठी सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि लोकसहभाग यांची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.सदर भेटीदरम्यान आमदार खोडके यांनी आकाशवाणी केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या कार्याची माहिती घेतली आणि सर्वांची आपुलकीने विचारपूस केली. या भेटीमुळे केंद्रातील कार्यसंस्कृतीला नवी ऊर्जा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन व नियोजनासाठी श्री. नितीन दातीर, श्री. बाळासाहेब दिघडे, श्री. गुड्डू राठी, श्री. अनिल गोएनका,श्री. अटलकर, श्री. जीवन माहुरे तसेच श्रीहरी दिघडे यांनी विशेष परिश्रम घेतले.ही विशेष मुलाखत दोन भागांत प्रसारित करण्यात येणार असून, पहिला भाग शनिवार दिनांक ४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता, तर दुसरा भाग ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता अमरावती केंद्रावर प्रसारित होणार आहे.

# वाढत्या तापमानामुळे वरुडातील रस्ते निर्मनुष्य !

शीतपेयांच्या दुकानांवर नागरिकांची गर्दी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बेनोडा, दि.१ :** रणरणत्या उन्हाच्या तीव्र झळांनी जनजीवन विस्कळीत होऊ लागले आहे. सकाळपासूनच चटके देऊ लागलेला सूर्य मध्यान्हीनंतर अक्षरश: आग ओकू लागला असून तापमानाचा पारा दिवसागणिक वर सरकत चालल्याने सर्वच हैराण झाले आहेत. अनेकजण दुपारच्या वेळी घराबाहेर पडण्याचे टाळू लागल्याने एरवी चांगलेच गजबजणारे गावोगावचे रस्ते निर्मनुष्य होऊ लागले आहेत. शहर आणि तालुक्याच्या ग्रामीण भागातदेखील दोन ते तीन दिवसांपासून हेच चित्र पाहायला मिळत आहे.



घामाघूम करणाऱ्या झळांनी जनजीवन अक्षरश: विस्कळीत झाले आहे. शहरातून जाणारे अमरावती ,काटोल नागपूर आणि पांढूर्णा,छिंदवाडा ,आर्वी, वर्धा, मुलताई ,बैतुल ,भोपाल हे राष्ट्रीय महामार्ग म्हणजे नेहमीच गजबजणारे मार्ग. मात्र गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हामुळे दुपारच्या सुमारास या मार्गावरील वाहतूकदेखील कमी झाल्याचे दिसत आहे.

### टरबूज, डांगर खरेदीकडेही वाढला कल

उन्हाच्या तडाख्यात अंगाची लाही लाही होतानाच होणारी जीवाची काहिली काही प्रमाणात का होईना शमली जावी यासाठी सर्वांचीच पावले शीतपेयांच्या दुकानाकडे वळत आहेत. विविध प्रकारचे फळांचे ज्यूस, थंडगार श्रीखंड, आईस्क्रीम, लस्सी आदी शीतपेयांच्या दुकानात गर्दी दिसत असली तरी शरीरासाठी पाचक समजल्या जाणाऱ्या उसाच्या रसाकडे सर्वांचाच मोठा ओढा दिसत आहे. गरिबांचा फ्रीज अशी ओळख असलेला हा माठ, रांजण यंदाच्या उन्हाळ्यात पुन्हा एकवार चर्चेत आला आहे. तसेच टरबूज व डांगर खरेदीकडेही कल वाढला आहे.

**- पुरुषोत्तम पोटोडे**

# सुकळीच्या जि.प. शाळेत व्यावसायिक मार्गदर्शन व समुपदेशन कार्यशाळा

श्री.श्रीकांत मानकर यांचे मार्गदर्शन; विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती,दि.१ :** अमरावती पंचायत समिती अंतर्गत सुकळी येथील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत व्यावसायिक मार्गदर्शन, विद्यार्थी समस्या व समुपदेशन कार्यशाळा सोमवारी ( दि. ३०) उत्साहात झाली. आंतरराष्ट्रीय तज्ञ मार्गदर्शक श्री.श्रीकांत मानकर यांनी यावेळी विद्यार्थी व्यवसाय,करियर तसेच एकाग्रता व अभ्यास कसा करावा या विषयावर विस्तृत व सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला सुकळी येथील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता ५ ते ७ वीचे तसेच खारकर विद्यालयातील





इयत्ता ८ ते १० वीचे विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्री. मानकर यांनी विद्यार्थ्यांना बुद्धिमतेचे विविध प्रकार सांगून जीवनात अपयश आले तर खचून न जाता त्या अपयशातून काहीतरी चांगल निर्माण होण्याची संधी कशाप्रकारे येते, हे मिसाईल मॅन डॉक्टर ए.पीजे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातील उदाहरण देऊन पटवून दिले. यावेळी त्यांनी एकाग्रता वाढविण्यासाठी दररोज म्युझिक मेडिटेशन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

आपली आवड ओळखून त्या क्षेत्रात खूप मेहनत केल्यास आपण नक्की यशस्वी व्हाल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. विद्यार्थी जीवनात मोबाईल चा वापर टाळण्याचे आवाहन देखील श्री. मानकर यांनी यावेळी केले. या कार्यशाळेला विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक, खारकर विद्यालयातील शिक्षकवृंद यांच्यासह मुख्याध्यापक निखिल सवाई, गणेश ठाकरे, विनायक लकडे, संजय थोरात, सविता शिरभाते, रुपाली काळे, ज्योत्स्ना गुल्हाने, रश्मी खाडे, मिनाक्षी बाहेकर यांच्यासह शापोआच्या जया राऊत, शिला बाहेकर, आशा बोरकर यांची उपस्थिती होती.

### बेनोडा ( शहीद ) येथे अवकाळी पावसाची हजेरी !

**बेनोडा ( शहीद ), दि.१ :** येथे सोमवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह रिमझिम पावसाला सुरुवात झाली. अचानक झालेल्या बदलामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. दिवसभर कडक उन्हामुळे तापमानात मोठी वाढ होऊन उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. मात्र सायंकाळनंतर वातावरणात अचानक बदल झाला. आकाशात ढग दाटून आले आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून उकाड्यापासून काही प्रमाणात दिलासा मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. रस्त्यांवर काही काळासाठी वाहतुकीचा वेग मंदावला होता, मात्र कोणत्याही प्रकारची मोठी अडचण निर्माण झाल्याचे वृत्त नाही. हवामान विभागाने यापूर्वीच शहरात पावसाची शक्यता वर्तवली होती. तो अंदाज आज खरा ठरला आहे. पुढील काही दिवस वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता असून अधूनमधून सरी कोसळू शकतात, असेही सांगितले आहे.

# खोलापूर येथे महावीर जन्मोत्सव निमित्त भव्य मिरवणूक

**खोलापूर, दि.१ :** अहिंसा व करुणा सागर भगवान महावीर जन्मोत्सव निमित्ताने श्री १००८ सुपार्श्वनाथ दिगंबर मंदिर येथे सकाळी साडेपाच वाजता मूर्ती अभिषेक, पूजा व आरती करून स्थानिक जैन मंदिर इथून सकाळी साडेसात वाजता भव्य रथयात्रा काढण्यात आली. जैन परिसर ते राम मंदिर परिसर व मुख्य बाजारपेठेतून बालक तरुणाईसह महिला पुरुष व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने शोभायात्रेत सामील होऊन महावीरांचा जय



घोष करत शांततेने उत्साहात मिरवणूक काढण्यात आली.मिरवणुकीच्या अंतिम टप्प्यात दिगंबरजैन मंदिर येथे येथील प्रतिष्ठित नागरिक रमेशचंद्र सराफ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर समारोपीय कार्यक्रम शेतांबर जैन मंदिर येथे करण्यात आला यावेळी सतीश चंद्र सराफ, डॉ.चंद्रकांत वल्ली डॉ. अमोल राऊळ, डॉ. सूर्यकांत वल्ली. शैलेश राऊळ, रुपेश राऊळ, प्रेमता राऊळ, मनोज वालचाळे, दिनेश रोकडे, दलाल, ऋषिकेश राजने, निलेश काळे, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जैन महिला मंडळ तसेच सकल जैन समाज बांधव यांनी परिश्रम घेतले.यावेळी ठाणेदार वैभव महांगरे यांनी पोलिसांचा चोक बंदोबस्त ठेवून मिरवणूक शांततेत पार पडली.

सक्ती

## अमरावती जिल्ह्यातील शेतकरी संभ्रमात; जिल्हाधिकाऱ्याने हस्तक्षेप करण्याची गरज

# शासनाच्या स्थगितीनंतरही ग्रामीण भागात कर्जवसूलीचा तगादा कायम

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.१ :** मागील वर्षी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली कर्जवसुली स्थगिती प्रत्यक्षात ग्रामीण भागात प्रभावी ठरत नसल्याचे चिंताजनक चित्र दिसत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून बँकांनी कर्ज वसुली न करणे, थकबाकी नोटीस न पाठवणे आणि खाते हक्कमध्ये न टाकणे असे स्पष्ट निर्देश असूनही अनेक प्राथमिक सहकारी संस्था बँका तगादा लावत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.




गतवर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर, भाजीपाला तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले. राज्य सरकारने नुकतीच या शेतकऱ्यांसाठी कर्जवसुलीवरील स्थगिती जाहीर केली असली, तरी अनेक खातेदारांना अद्याप वसुली नोटीस, व्याज भरण्याची मागणी आणि जबरदस्तीचा तगादा सहन करावा लागत आहे. बँक कर्मचाऱ्यांकडून मुख्यालयाकडून आदेश नाहीत, सिस्टीम अपडेट नाही, स्थगिती फक्त काही खात्यांना लागू आहे अशा कारणांवर वसुलीचा दबाव आणला जात असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच केलेल्या कर्जमाफी घोषणेत ३० जून २०२६ पर्यंत समग्र कर्जमुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्याचे लक्ष्य जाहीर केले आहे. सरकारने अर्थसंकल्पात २ लाखांपर्यंतची कर्जमाफी आणि नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजार पर्यंत प्रोत्साहन जाहीर केले आहे.दरम्यान, शासनाकडून अद्याप बँकांचा एकत्रित डेटा मागवण्यात येत असून पात्रतेचे अंतिम निकष एका उच्चस्तरीय समितीद्वारे निश्चित करण्यात येणार आहेत. यामुळे प्रत्यक्ष लाभ मिळण्यास विलंब होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

शेतकरी संभ्रमात आहेत. त्यांच्या मते— सरकार स्थगिती सांगते, पण बँकांचे फोन, नोटिसा सुरूच आहेत. आम्ही कोणावर विश्वास ठेवायचा? नुकसान भरून निघाले नाही, त्यात बँकेचा तगादाज आम्ही कुठे जाणार? काही शेतकऱ्यांवर व्याज जमा करण्याची सक्ती, खाते बंद करण्याचा दबाव, तर काहींना नवीन कर्ज नाकारल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.अनेक शाखांना शासन निर्णयाची अधिकृत प्रत वेळेवर मिळाली नसल्याचे बँक अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. स्थगितीची अंमलबजावणी स्पष्ट नसल्याने काही शाखा जोखीम टाळण्यासाठी सर्व ग्राहकांना तगादा लावत असल्याचेही उघड झाले आहे.शेतकरी संघटना, ग्रामपंचायतींचे पदाधिकारी व इतर संस्थांनी या कारवाईचा जोरदार निषेध नोंदवला आहे. तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी आणि विभागीय निबंधकांकडे तक्रारी दाखल करण्यात येत असून स्थगिती सर्व बँकांना सक्तीने लागू करावी तगादा लावणाऱ्या शाखांवर कारवाई करावी.व्याज आणि वसुलीचा दबाव तात्काळ थांबवावा अशा मागण्या करण्यात येत आहेत. काही संघटनांनी पुढील आठवड्यात मोर्चाचा इशाराही दिला आहे.

जिल्हा प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. तज्ज्ञांचे मत आहे की स्थगितीची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व बँकांना बंधनकारक असे सविस्तर शासन परिपत्रक तातडीने जारी होणे अत्यावश्यक आहे.शासनाने जाहीर केलेल्या स्थगिती आणि कर्जमाफीच्या आश्वासनांनंतरही बँकांचा तगादा कायम राहिल्याने प्रत्यक्ष दिलासा शेतकऱ्यांच्या हातात पोहोचत नाही. कर्जमाफीची प्रक्रिया सुरू असताना वसुलीचा दबाव कायम राहिल्यास शेतकऱ्यांचा त्रास वाढण्याची भीती असून शासनाने सुस्पष्ट आणि कठोर आदेश जारी करून तात्काळ हस्तक्षेप करण्याची गरज आहे.

अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ www.ajinkyabharat.com


## थोडक्यात



### कायदेविषयक व श्रमदान शिबीर उत्साहात

**यवतमाळ :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय आणि सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक व श्रमदान शिबीर पार पडले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव दीपक दाभाडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पाणी संवर्धन आणि दूषित पाण्याच्या दुष्परिणामांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा दिवाणी न्यायाधीश दीपक दाभाडे यांनी कायद्यांच्या अंमलबजावणीसह नैसर्गिक स्रोतांच्या जतनावर भर दिला. माती व पाणी अडवल्यास भविष्यातील टंचाई दूर होईल, असे त्यांनी नमूद केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य सीमा शेठे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक कल्पना राऊत यांनी केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जलसंधारणाची शपथ घेतली. दूषित पाण्याचे स्रोत टाळून पर्यायी व्यवस्था उभी करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक असल्याचे याप्रसंगी तज्ज्ञांनी स्पष्ट केले.



### नवनिर्वाचित डॉक्टरचा दराटी पोलिसांतर्फे सत्कार

**टाकळी ई. :** उमरखेड तालुक्यातील कुरळी येथील वृत्तपत्र विक्रेते नंदकिशोर जाधव यांचा मुलगा गोपाल जाधव याने फिजिओथेरपीची पदवी प्राप्त केली. या यशाबद्दल दराटी पोलिस स्टेशनचे ठाणेदार प्रेसनजित जाधव यांनी महावीर जयंतीनिमित्त पोलिस ठाण्यात गोपालचा सत्कार करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बंदी भागातील मुले-मुली शिक्षण घेऊन डॉक्टर, इंजिनिअर आणि पोलिस होऊन प्रगती करीत आहेत. कुरळीचा गोपाल जाधव याने फिजिओथेरपीमध्ये यश मिळविले, तर आमडापूरचा सूरज झांबरे एमबीबीएस झाला असून दराटीची सोनू जाधव हिची गोंदिया पोलिस दलात निवड झाली आहे. ध्येय, कष्ट आणि प्रबळ इच्छाशक्ती हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे या विद्यार्थ्यांनी सिद्ध केले. ठाणेदार प्रेसनजित जाधव यांनी विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे कौतुक करताना सांगितले की, आत्मविश्वास आणि पालकांचे मार्गदर्शन लाभल्यास सामान्य परिस्थितीतूनही यश नक्की मिळते. जो माणूस कष्टाला लाजत नाही, त्याला यशस्वी होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. डॉ. गोपाल जाधव याने आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय आई-वडिलांच्या कष्टाला दिले आहे. ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्वांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.




### प्रा. ज्योती काळबांडे यांना 'आंतरराष्ट्रीय बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' प्रदान

**उमरखेड :** व्हिएतनाम येथील अ-२५ लक्झरी हॉटेलमध्ये आयोजित सहाव्या विश्व आंबेडकरी साहित्य संमेलनात मिलिंद महाविद्यालय मुळावाच्या राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. ज्योती काळबांडे यांना 'आंतरराष्ट्रीय बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला. जागतिक आंबेडकरी साहित्य महामंडळाच्यावतीने त्यांच्या ३० वर्षांच्या उल्लेखनीय सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी हा सोहळा पार पडला. पुरस्कार वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी नाटककार डॉ. सुनील रामटेके होते. उद्घाटक प्राचार्य डॉ. नागनाथ पाटील, स्वागताध्यक्ष डॉ. जगन कराडे, महामंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपककुमार खोब्रागडे, उपाध्यक्ष डॉ. अनिल काळबांडे, प्राचार्य डॉ. राहुल मस्के, डॉ. राजेश गायकवाड, प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान, एडव्होकेट भूपेश पाटील आणि डॉ. गुरुस्वामी यांच्या हस्ते प्रा. ज्योती काळबांडे यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. गेल्या तीन दशकांपासून अध्यापन क्षेत्रात कार्यरत असलेल्या काळबांडे यांनी सामाजिक जाणीवेतून अनेक युवक-युवतींना प्रेरित केले आहे. महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपत वंचित घटकांना न्याय देणाऱ्या व्यक्तींना हा जागतिक सन्मान दिला जातो. यापूर्वी दुबई, बँकॉक आणि श्रीलंका येथे अशी संमेलने झाली आहेत.

# चारित्र्य प्रमाणपत्राचे पोर्टल 'हँग'

## महागाव तालुक्यातील शेकडो तरुणांची स्वप्ने टांगणीला; तांत्रिक बिघाडाचा फटका

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**फुलसावंगी, दि. १ :** एकीकडे 'डिजिटल इंडिया'चा उदोउदो होत असताना, दुसरीकडे पोलिस चारित्र्य प्रमाणपत्राचे ऑनलाईन पोर्टल सलग तीन दिवसांपासून ठप्प असल्याने महागाव तालुक्यातील शेकडो सुशिक्षित बेरोजगारांचे भविष्य टांगणीला लागले आहे. तांत्रिक बिघाडामुळे अर्ज अपलोड होत नसल्याने कागदपत्रे सादर करण्याची मुदत संपत आली असून, प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे संतप्त तरुणांमध्ये तीव्र नैराश्य पसरले आहे. आता प्रशासनाने तातडीने पर्यायी ऑफलाईन व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.




महागाव तालुक्यातील शेकडो तरुण सध्या शासकीय आणि खाजगी नोकरीच्या संधी शोधत आहेत. अनेक तरुणांची निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, त्यांना चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. मात्र, ३० मार्चपासून १ एप्रिलपर्यंत संबंधित ऑनलाईन पोर्टल पूर्णपणे बंद असल्याने एकाही तरुणाचा अर्ज प्रणालीत स्वीकारला जात नाहीये. 'दुभत्या गाईच्या लाथा सोसणे' एकवेळ परवडले, पण ऐन नोकरीच्या वेळी प्रशासकीय यंत्रणेने हात वर केल्यामुळे तरुणांची मोठी 'परवड' होत आहे. नोकरीची संधी असो वा एखादे छोटेखानी शासकीय कंत्राट, पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र हा आजच्या काळात सर्वात महत्वाचा आधार मानला जातो. यासाठी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. परंतु, गेल्या तीन दिवसांपासून सर्व्हर डाऊन असल्याने महा-ई-सेवा केंद्रांवर तरुणांच्या रांगा लागल्या आहेत. अनेक कंपन्यांनी कागदपत्रे जमा करण्यासाठी दिलेली अंतिम मुदत आता जवळ आली आहे. अशा परिस्थितीत 'गरज सरो आणि वैद्य मरो' या उक्तीप्रमाणे प्रशासन केवळ तांत्रिक कारणांचे दाखले देऊन शांत बसले आहे. या तांत्रिक बिघाडामुळे केवळ वेळच जात नाही, तर अनेकांच्या हातची आलेली नोकरी जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील मुलांनी कष्ट करून मिळविलेल्या संधीवर या तांत्रिक अडचणींमुळे विरजण पडले आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे युद्धपातळीवर लक्ष देऊन पोर्टल पूर्ववत करावे किंवा तातडीने पोलिस ठाण्यांमार्फत ऑफलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारून प्रमाणपत्र वाटप करावे. डिजिटल युगात तांत्रिक अडथळ्यांमुळे तरुणांचे करिअर उद्ध्वस्त होणार असेल, तर या व्यवस्थेचा उपयोग काय, असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

> 'आम्ही गेल्या तीन दिवसांपासून महा-ई-सेवा केंद्राच्या चकरा मारत आहोत. सर्व्हर डाऊन असल्यामुळे अर्ज भरता येत नाहीये. जर वेळेत प्रमाणपत्र मिळाले नाही, तर आमच्या मेहनतीवर पाणी फिरेल आणि करिअरचे मोठे नुकसान होईल. याला जबाबदार कोण?'
>
> **- अजय पाचंगे**
> (रा. फुलसावंगी, ता. महागाव)

### महा-ई-सेवा केंद्रांवर हतबलता

**तालुक्यातील फुलसावंगीसह विविध गावांमधील महा-ई-सेवा केंद्रांवर सध्या अर्जांचा मोठा ढीग साचला आहे. केंद्र चालकही हतबल झाले असून, पोर्टल उघडत नसल्याने ते ग्राहकांना सेवा देऊ शकत नाहीत. दिवसाकाठी शेकडो तरुण चौकशीसाठी येत असून, रिकाम्या हाताने परतत आहेत. इंटरनेट स्पीड असूनही मुख्य सर्व्हरकडून प्रतिसाद मिळत नसल्याने डिजिटल सेवा केंद्रांची विश्वासार्हताही धोक्यात आली आहे.**

## सम्राट अशोक यांची जयंती

**यवतमाळ, दि. १ :** येथील आठवले ले-आऊटमधील तक्षशीला बुद्ध विहारात नुकतीच सम्राट अशोक जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी महामानवांना अभिवादन करून सामूहिक बुद्धवंदना व त्रिशरण पंचशील ग्रहण केले. दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष धर्मपाल माने आणि कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष देवानंद बेले यांची प्रमुख उपस्थिती होती. तक्षशीला महिला मंडळाच्या अध्यक्ष अरुणा पखाले, सचिव सुमती खंडारे, सुजाता बेले, संतोष वानखडे, संजय खोब्रागडे, सुवर्णा वानखडे, सुप्रिया जवादे, अनिता खोब्रागडे आणि कुसुम माने यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. उपस्थितांनी सम्राट अशोकांच्या धम्मविजयाचा वारसा जपण्याचा संकल्प केला. विहारातील या धार्मिक कार्यक्रमात बुद्धवंदनेने परिसरातील वातावरण मंगलमय झाले होते. सामाजिक ऐक्य आणि महापुरुषांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते.

## CAPTION — प्रतीक्षा संपली, पण गती कासवाचीच!...



**मुकुटबन:** तब्बल दोन वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर वणी-कायरा-मुकुटबन-पाटण बोरी-आदिलाबाद या महत्वपूर्ण राज्य मार्गाच्या रुंदीकरणाला अखेर मुहूर्त मिळाला आहे. मात्र, मागील पंधरा दिवसांपासून सुरू असलेले हे रस्ता रुंदीकरणाचे काम अत्यंत कासवगतीने सुरू आहे. कामाचा हा संथ वेग पाहता, हा रस्ता पूर्ण होण्यासाठी आणखी किती काळ प्रतीक्षा करावी लागेल, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. ( छाया : मुजफ्फर बेग)

## पुसद येथील विजय राठोड यांना राज्यस्तरीय 'आदर्श कलाध्यापक' पुरस्कार प्रदान

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**पुसद,दि. १ :** स्थानिक वसंतराव नाईक विद्यालयातील कलाध्यापक विजय जीवा राठोड यांना सातारा येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात 'आदर्श कलाध्यापक' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाच्या वतीने त्यांच्या कला क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ ही राज्यातील कला शिक्षकांसाठीची सर्वोच्च संघटना असून, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (पुणे) यांच्या मान्यतेने ही संस्था कार्यरत आहे. महामंडळाच्या सातारा शाखेच्या वतीने दि. २८ व २९ मार्च २०२६ रोजी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण बहुउद्देशीय सभागृह, सातारा येथे ४४ वी राज्यस्तरीय कला शिक्षण परिषद संपन्न झाली. या परिषदेत राज्य अध्यक्ष नरेंद्र बारई आणि राज्य सरचिटणीस दिगंबर बिडाळे यांच्या हस्ते विजय राठोड यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विजय राठोड यांच्या या यशाबद्दल युवक मंडळ पुसदचे सचिव विजयभाऊ जाधव यांनी आनंद व्यक्त केला. 'राठोड यांनी कला क्षेत्रात अविरतपणे केलेले काम कौतुकास्पद असून, त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळत आहे, ही गौरवाची बाब आहे,' असे म्हणत त्यांनी राठोड यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी मुख्याध्यापिका कु. वंदना पोले मॅडम, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, तसेच पत्रकार बांधवांनी विजय राठोड यांचे अभिनंदन केले आहे. या पुरस्कारामुळे त्यांच्यावर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## मुस्लिम समाज सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

### १७ मे रोजी होणार कार्यक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. १ :** अंजुमन फिदांयाने मुस्तफा व गुलशन बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्यावतीने १७ मे २०२६ रोजी दिग्रस येथील अंजुमन उर्दू हायस्कूलच्या प्रांगणात मुस्लिम समाज सामुदायिक विवाह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संध्याकाळी ७ वाजता होणाऱ्या या १९ व्या वर्षाच्या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वधू-वरांना संसारोपयोगी साहित्याचे आयोजकांतर्फे निःशुल्क वितरण करण्यात येईल.

या मेळाव्यात विवाहबद्ध होणाऱ्यांना पलंग, कपाट, कुलर, भांडी आणि अंथरुणासह संसारोपयोगी साहित्य विनामूल्य दिले जाणार आहे. वऱ्हाडींच्या निवासाची व जेवणाची मोफत सोय असून, नाव नोंदणीसाठी दिग्रसमध्ये अतीक सेठ, आर्णीत आरीफ भाई व अनसार शेख इंजिनिअर, पुसदमध्ये सै. इस्तीयाक व डॉ. राजीक अहेमद, काळी येथे अ. शारीक अ. वहाब, दारव्हा येथे वसीम खान व महेमुद खान, यवतमाळमध्ये जाकीर मास्तर आणि नेर येथे तन्वीर अहेमद खान व अनवर अली इंजिनिअर यांच्याकडे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त इच्छुकांनी नोंदणी करावी, अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख अफजल खान यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

## ग्रंथदिंडीने यवतमाळनगरी झाली साहित्यमय

### पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते उद्घाटन; ग्रंथदिंडी अन सांस्कृतिक कार्यक्रमांनी वेधले लक्ष

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १ :** ग्रामीण व शहरी भागांत वाचन संस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय 'यवतमाळ ग्रंथोत्सव २०२६' उत्साहात पार पडला. ग्रंथप्रेमींना दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देणे आणि प्रकाशकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या या उपक्रमाला जिल्ह्यातील वाचक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



दिमाखदार ग्रंथदिंडीने प्रारंभ, २७ मार्च रोजी सकाळी नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन करण्यात आले. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या शालेय विद्यार्थ्यांनी आणि मान्यवरांच्या उपस्थितीने ही दिंडी लक्षवेधी ठरली. यावेळी अमरावतीचे सहायक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, शिक्षणाधिकारी किशोर पागोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महोत्सवाचे अधिकृत उद्घाटन पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अशोक उईके, आमदार राजू तोडसाम, आमदार बाळासाहेब मांगुळकर, आमदार संजय देरकर, आमदार किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता आदींची प्रमुख उपस्थिती होती. पिंपळगाव रोडवरील कृषी विज्ञान केंद्र मैदानावर हा वाचनसोहळा रंगला. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी 'शाश्वत ग्रामीण शेती आणि साहित्य' या विषयावर अभ्यासपूर्ण परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. डॉ. सूर्यप्रकाश जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चेत प्रा. अरविंद राठोड व प्रा. तोष्णा मोकडे यांनी विचार मांडले. तसेच, सेवा समर्पण प्रतिष्ठानच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या ऑर्केस्ट्राने सादर केलेल्या पोवाडा आणि गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून शासकीय सेवेत निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब धांदे होते. विनोद देशपांडे, कविता महाजन, प्रशांत पंचभाई, संजय कोल्हे, मनोज रनखाम आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवल कव्हळे यांनी केले तर आभार जिल्हा ग्रंथालय अधिकारी कविता महाजन यांनी मानले. या दोन दिवसीय ग्रंथोत्सवासाठी नवल कव्हळे, शहूराज भोरे, प्रशांत पंचभाई, मनोज रनखाम, अनिल रामटेके, रमेश शेंडे, संजय कोल्हे, साहेबराव पवार, आरती कुमरे तसेच जिल्ह्यातील सर्व शासनमान्य ग्रंथालयांचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# रातचांदण्याच्या शेतकऱ्याला गोठ्यातून १९ लाखांचा नफा

## पशुप्रदर्शनात नंदकिशोर हेमने यांचा सन्मान : पारंपारिक शेतीला दिली आधुनिक दुग्ध व्यवसायाची जोड

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १ :** आजची तरुण पिढी टाय-बूट घालून नोकरीच्या मागे धावत असताना, रातचांदण्याच्या एका जिद्दी शेतकऱ्याने मात्र गोठ्यातूनच यशाची 'दूधगंगा' वाहवली आहे! पारंपरिक शेतीला आधुनिक दुग्ध व्यवसायाची जोड देत वार्षिक १९ लाखांची उलाढाल करणाऱ्या नंदकिशोर हेमने यांनी साऱ्यांचे डोळे दिपवले आहेत. पशुप्रदर्शनात मानाचा पुरस्कार पटकाविणाऱ्या या आधुनिक 'गोपाळा'ने सुशिक्षित बेरोजगारांना आरसा दाखवित, कष्टाच्या जोरावर शेतीतून नंदनवन कसे फुलवावे, याचाच वस्तुपाठ घालून दिला आहे.



स्थानिक वाघापूर नाका येथील कृषी विज्ञान केंद्रात आयोजित तालुकास्तरीय पशुप्रदर्शनात रातचांदणा येथील नंदकिशोर हेमने यांच्या जनावरांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या गोठ्यातील देशी आणि संकरित जनावरांच्या उत्कृष्ट संगोपनाबद्दल त्यांना आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्याहस्ते द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हेमने यांची ही झेप पाहून 'मुंगी होऊन साखर खाणे' या उक्तीप्रमाणे, त्यांनी शांतपणे पण सातत्याने आपला व्यवसाय शिखरावर नेला आहे. वडिलोपार्जित १४ एकर शेतीला त्यांनी दुग्ध व्यवसायाची जोड दिली आहे. सध्या त्यांच्या गोठ्यात गीर, गावरान गाई आणि नागपुरी म्हशींसह एकूण ६४ जनावरे आहेत. विशेष म्हणजे, ते दुध कोणत्याही डेअरीला न विकता स्वतः यवतमाळ शहरात ६० रुपये दराने घरोघरी जाऊन विकतात. दररोज ९० लिटर दुध विक्रीतून त्यांना दिवसाला पाच हजार ४०० रुपये, तर महिन्याला एक लाख ६२ हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. सर्व खर्च वजा जाता त्यांना दरमहा ६० हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळतो. आजच्या काळात शेती तोट्याची आहे, असे म्हणणाऱ्यांना हेमने यांनी कृतीतून उत्तर दिले आहे. त्यांच्या गोठ्यात ११ वासरे आणि ३५ दुभती जनावरे असून, वार्षिक १९ लाख ४४ हजार रुपयांची उलाढाल ते यशस्वीपणे सांभाळत आहेत. 'कष्टाचे फळ गोड असते' हेच त्यांच्या या यशातून अधोरेखित होते. त्यांच्या या जिद्दीचे आणि नियोजनाचे कौतुक संपूर्ण जिल्ह्यात होत आहे.

### शेतकऱ्याचा 'सक्सेस मंत्र'

**'अनेक तरुण शेती सोडून शहराकडे नोकरीसाठी धावतात, पण शेतीला पशुपालनाची जोड दिली तर कुणाकडेही हात पसरण्याची गरज उरणार नाही,' असे मत हेमने व्यक्त करतात. आधुनिक सोयींनी युक्त गोठा आणि जनावरांच्या आरोग्याची स्वतः घेतलेली काळजी, हेच त्यांच्या प्रगतीचे मुख्य सूत्र आहे. त्यांच्याकडे असलेल्या ६४ जनावरांच्या संगोपनातून त्यांनी खऱ्या अर्थाने 'उत्तम शेती'चा नवा आदर्श सुशिक्षित बेरोजगारांपुढे ठेवला आहे.**

## राळेगाव येथे क्रांतिकारी समशेरसिंह पारधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**राळेगाव, दि. १ :** येथील वीर बाबुराव शेडमाके स्मृती स्मारक परिसरात बुधवारी (दि. १) सकाळी १० वाजता क्रांतिकारी समशेरसिंह पारधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. वसंत पुरके मित्र परिवारातर्फे आयोजित या कार्यक्रमात माजी शिक्षणमंत्री वसंत पुरके यांच्या प्रमुख उपस्थितीत क्रांतिकारकांच्या सामाजिक व प्रेरणादायी कार्याला उजाळा देण्यात आला.



क्रांतिकारी समशेरसिंह पारधी यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी आयोजित या सभेत माजी शिक्षणमंत्री तथा प्रदेशाध्यक्ष आदिवासी काँग्रेस कमिटी वसंत पुरके यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी पारधी यांच्या लढ्याचा गौरव करीत त्यांचे विचार समाजासाठी दिशादर्शक असल्याचे सांगितले. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष ओबीसी सेल अरविंद वाढोणकर, राळेगाव तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष राजेंद्र तेलंगे, शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रदीप ठुने आणि कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अंकुश मुनेश्वर उपस्थित होते. सभेला मंगेश राऊत, शंकरराव कोयचाडे, महेश काडोपे, नानाजी कोवे, शुभम चिडाम, वनिष भोसले, स्वाती मेश्राम, शितल कुडसंगे, अशोक पिपरे, राजेंद्र काळे, अफसर अली सैयद, किशोर धामंदे, मधुकर राजुरकर, पुरूषोत्तम चिडे, धवल घुगरुड, मनोज पेंन्दोर, मधुकर पावले, संदिप पेन्दोर, राजेश्वर पीसे आणि मनोज पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी क्रांतिकारकांच्या बलिदानाचा इतिहास मांडत त्यांच्या विचारांवर चालण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला आदिवासी बांधवांसह सर्वधर्मीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाडखेड महसूल मंडळात वाळूमाफियांचा धुमाकूळ

## 'मंडळ अधिकारी आणि तलाठ्यांचे दुर्लक्ष; दिवसाढवळ्या राजरोसपणे वाळू उपसा सुरू

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी
✦ चेतन पवार

### भरारी पथकाची गरज!

**उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांनी जर खरोखरच कडक पावले उचलली आणि लाडखेड मंडळात स्वतंत्र भरारी पथकाची नेमणूक केली, तर दररोज किमान १० ते १५ ट्रॅक्टर रंगेहाथ पकडले जाऊ शकतात. केवळ कागदोपत्री कारवाईचा देखावा न करता प्रत्यक्ष मैदानात उतरून या तस्करांच्या मुसक्या आवळाव्यात, अशी मागणी लाडखेड सर्कलमधील नागरिकांनी केली आहे.**

### पाणीटंचाईचे संकट ओढवण्याची भीती

**नदीपात्रातून बेसुमार वाळू उपसा झाल्यामुळे पाण्याची पातळी खालावली असून, परिसरात तीव्र पाणीटंचाईची समस्या निर्माण होऊ लागली आहे. पर्यावरणाचा हा ऱ्हास थांबवण्याऐवजी जबाबदार अधिकारीच तस्करांना पाठबळ देत असल्याने सर्वसामान्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

**दारव्हा, दि.१ :** तालुक्यातील लाडखेड महसूल मंडळात सध्या अवैध वाळू उत्खननाने सीमा ओलांडली आहे. पाथ्रड देवी येथील तलाठी आणि लाडखेडचे मंडळ अधिकारी यांच्या मूकसंमतीमुळे वाळू तस्कर पर्यावरणाची अक्षरशः लूट करत आहेत. सावळद, सावंगी, वडगाव, गाढवे आणि पाथ्रड देवी या गावांमधील नद्यांचे पात्र वाळू तस्करांनी पोखरले असून, २०२१ पासून या परिसरात एकाही वाहनावर कडक कारवाई न झाल्याने महसूल विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लाडखेडचे मंडळ अधिकारी आणि पाथ्रड देवी येथील तलाठी यांचे याकडे सोईस्कर दुर्लक्ष होत आहे. कोणतीही कारवाई होण्यापूर्वीच तस्करांना माहिती मिळते. विना क्रमांकाचे ट्रॅक्टर आणि ट्रॉली या अधिकाऱ्यांच्या डोळ्यासमोरून वाळूभरून जात असतानाही, त्याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला जातो. दिवसा नद्यांमधून वाळू गाळून तिचे ढिगारे लावले जातात आणि रात्रभर ट्रॅक्टर व ट्रकच्या साहाय्याने तिची वाहतूक केली जाते.

जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी या गंभीर विषयाची दखल घेऊन, लाडखेडचे मंडळ अधिकारी आणि संबंधित तलाठी यांची सखोल चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## महत्वाचे

### अज्ञात चोरट्याकडून दुचाकीची चोरी

**यवतमाळ:** अवधुतवाडी पोलिस स्टेशन अंतर्गत राणा प्रताप गेट परिसरात २६ मार्च रोजी रात्री १० ते १२.३० वाजेच्या दरम्यान योगेश यांची २०००० रुपये किमतीची टीव्हीएस कंपनीची पांढऱ्या रंगाची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. योगेश हे राणा प्रताप गेट जवळ आर्णी रोड यवतमाळ येथील रहिवासी असून त्यांनी आपली दुचाकी एमएच २९ बीबी ६०५९ घरासमोर उभी केली होती. मात्र अज्ञात व्यक्तीने संधी साधून त्यांच्या या वाहनाची चोरी केली. या घटनेमुळे परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. योगेश यांनी ३१ मार्च रोजी रात्री ८.१५ वाजता अवधुतवाडी पोलिस ठाण्यात जाऊन या चोरीच्या घटनेची सविस्तर आणि रीतसर तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून आता या घटनेचा पुढील तपास सुरू केला आहे.

### चाकूचा धाक दाखवून चोरी

**यवतमाळ:** लोहारा पोलिस स्टेशन अंतर्गत एमआयडीसी वेअर हाऊस समोर २६ मार्च रोजी रात्री ९.३० ते २७ मार्चच्या पहाटे ३.३० वाजेच्या दरम्यान दोन अनोळखी व्यक्तींनी २२ लाख रुपयांची तूर चोरून नेल्याची भयानक घटना घडली आहे. प्रमोद नवरंगे यांच्या मालकीच्या एमएच २४ बीझेड २७१४ या ट्रकवर आरोपींनी चढून राखनदार शुभम मोरे याच्या गळ्यावर चाकू ठेवला. त्याचे हातपाय बांधून त्याला जीवे मारण्याची गंभीर धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी २५० क्विंटल तूर दुसऱ्या वाहनात भरून पळवून नेली आणि मोकळा ट्रक सोडून दिला. प्रमोद नवरंगे यांनी ३१ मार्च रोजी सायंकाळी ५.१५ वाजता लोहारा पोलिस ठाण्यात जाऊन या संपूर्ण घटनेची सविस्तर आणि कायदेशीर तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून स्थानिक पोलिसांनी दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल केला असून आता त्यांचा वेगाने शोध घेणे सुरू करण्यात आले आहे.

# आशा स्वयंसेविकांचे काळे कपडे घालून आंदोलन

## प्रलंबित मानधनासाठी सिटूची जिल्हा परिषदेवर धडक, काम बंदचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १ :** जिल्हा आशा-गटप्रवर्तक कर्मचारी युनियनच्या (सिटू) वतीने बुधवारी (दि. १) जिल्हा परिषद कार्यालयासमोर काळे कपडे घालून तीव्र निदर्शने करण्यात आली. प्रलंबित मोबदला आणि शासनाच्या उदासीन धोरणांच्या निषेधार्थ जिल्हाध्यक्ष कॉ. कुमार मोहरमपुरी आणि जिल्हासचिव कॉ. उषा मुरखे यांच्या नेतृत्वाखाली मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांच्या न्याय्य मागण्यांकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. गेल्या तीन वर्षांपासून केलेल्या सर्वेक्षणाचा मोबदला अद्याप मिळालेला नाही. तसेच केंद्र शासनाचा मागील सहा महिन्यांचा आणि राज्य शासनाचा दोन महिन्यांचा वाढीव मोबदला खात्यात जमा झाला नसल्याने महिलांमध्ये तीव्र संताप आहे. विशेष म्हणजे बुधवारी (दि. १) 'यवतमाळ तालुका आशा डे' असतानाही प्रशासनाच्या धोरणामुळे महिलांना उत्सवाऐवजी रस्त्यावर उतरून काळे कपडे घालून निषेध व्यक्त करावा लागला. निवेदनात प्रामुख्याने राज्य व केंद्र शासनाचा थकीत मोबदला फरकासह तातडीने देणे, दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मोबदला व पे-स्लिप देणे, कोरोना काळातील कामाचा थकीत मोबदला देणे आणि पुणे जिल्ह्याप्रमाणे यवतमाळमध्येही हायकोर्टाच्या नियमानुसार 'ग्रॅच्युइटी' लागू करणे अशा मागण्या मांडण्यात आल्या आहेत. सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत चाललेल्या या आंदोलनादरम्यान जिल्हा आरोग्य अधिकारी आणि पोलिस प्रशासनालाही निवेदने देण्यात आली. शासन आणि प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास संपूर्ण जिल्ह्यात काम बंद आंदोलन करण्यात येईल आणि होणाऱ्या परिणामांना सर्वस्वी शासन जबाबदार राहील, असा इशारा सिटू युनियनने दिला आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलून थकीत मानधन जमा करावे, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

# ऑटिझम व्याधी नसून मुलांच्या विकासाचा एक वेगळा पैलू!

## डॉ. दीपक घरझोडे; आज 'जागतिक ऑटिझम' जागरूकता दिन






✦ राजकुमार भीतकर

**आज 'जागतिक ऑटिझम'जागरूकता दिन आहे. यानिमित्ताने ऑटिझम नेमका कोणता आजार आहे, त्याबद्दलची लोकमान्यता काय आणि कोणते उपचार करावेत, याबाबत येथील प्रसिद्ध बाल मानसोपचारतज्ज्ञ डॉ. दीपक घरझोडे यांच्याशी साधलेला संवाद.**

- **प्रश्न: 'ऑटिझम' म्हणजे नक्की काय?**
- डॉ. घरझोडे: ऑटिझम, ज्याला तांत्रिक भाषेत 'ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर' म्हणतात, हा कोणताही आजार नाही. हा मेंदूच्या विकासाशी संबंधित एक बदल आहे. यात मुलांची संवाद साधण्याची पद्धत आणि सामाजिक वागणूक इतरांपेक्षा थोडी वेगळी असते.
- **प्रश्न: याची लक्षणे पालकांनी कशी ओळखावीत?**
- डॉ. घरझोडे: याची काही प्रमुख लक्षणे म्हणजे: मुले वेळेवर बोलायला शिकत नाहीत किंवा त्यांचा संवाद मर्यादित असतो. इतर मुलांमध्ये मिसळायला त्यांना अडचण येते. एकच कृती वारंवार करण्याची प्रवृत्ती दिसते. नजरेला नजर देऊन बोलणे टाळतात.
- **प्रश्न: ऑटिझम होण्यामागे नेमकी कारणे काय आहेत?**
- डॉ. घरझोडे: याचे एकच ठराविक कारण सांगता येत नाही. प्रामुख्याने अनुवंशिकता आणि गर्भावस्थेतील काही बदल कारणीभूत ठरू शकतात. पालकांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी की, हे त्यांच्या कोणत्याही चुकीमुळेहोत नाही. तसेच मोबाईल किंवा टीव्हीमुळे 'ऑटिझम'होत नाही, मात्र त्याचा अतिवापर केल्याचे लक्षणे नक्कीच वाढवू शकतो.
- **प्रश्न: भारतात याचे प्रमाण किती आहे आणि निदान कसे केले जाते?**
- डॉ. घरझोडे: भारतात अंदाजे ६० मुलांमागे एका मुलामध्ये ही स्थिती आढळते. याचे निदान करण्यासाठी कोणतीही रक्तचाचणी नसते. आम्ही 'कार्स' आणि 'ॲडोस'सारख्या क्लिनिकल पद्धतींचा वापर करून मुलांच्या वागणुकीचे निरीक्षण करतो. वयाच्या २ ते ३ वर्षांत निदान झाले, तर उपचार अधिक प्रभावी ठरतात.
- **प्रश्न: यावर उपचार काय आहेत? ही मुले पूर्णपणे बरी होतात का?**
- डॉ. घरझोडे: 'बरे होणे'यापेक्षा 'सुधारणा होणे'हा शब्द अधिक योग्य आहे. 'स्पीच थेरपी', 'बिहेवियर थेरपी' आणि 'ऑक्युपेशनल थेरपी'च्या माध्यमातून मुलांमध्ये मोठे सकारात्मक बदल घडवता येतात. जितक्या लवकर थेरपी सुरू होईल, तितका फायदा जास्त होतो.
- **प्रश्न: पालकांसाठी तुमचा खास सल्ला काय असेल?**
- डॉ. घरझोडे: सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'स्वीकार' करणे. आपल्या मुलाची तुलना इतरांशी करू नका. त्यांच्यासाठी एक ठराविक दिनचर्या तयार करा. त्यांचा 'स्क्रीन टाइम' कमी करा आणि त्यांना लोकांमध्ये मिसळू द्या. त्यांच्या लहान-लहान यशाचे कौतुक करा.
- **प्रश्न: या वर्षीच्या जागतिक संकल्पनेबद्दल काय सांगाल?**
- डॉ. घरझोडे: यावर्षीची संकल्पना 'प्रत्येक जीव मौल्यवान आहे'ही आहे. ऑटिझम असलेली मुले 'कमकुवत'नसून 'विशेष'असतात. जर त्यांना योग्य पाठबळ आणि प्रेम मिळाले, तर ती स्वावलंबी आणि यशस्वी जीवन जगू शकतात. समाजाचा दृष्टिकोन बदलणे हीच काळाची गरज आहे.

# युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी कौस्तुभ शिर्के यांची निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.१ :** महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून, यामध्ये यवतमाळचे धडाडीचे युवा नेतृत्व कौस्तुभ शिर्के यांची प्रदेश सचिवपदी निवड करण्यात आली आहे. शिर्के यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील युवक काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून संघटनेला नवी ऊर्जा मिळाली आहे.

कौस्तुभ शिर्के यांनी यापूर्वी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्याआधी 'एनएसयूआय' या विद्यार्थी संघटनेतही त्यांनी आपल्या संघटन कौशल्याचा ठसा उमटवला होता. युवकांचे प्रश्न आक्रमकपणे मांडणे आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालण्याचे त्यांचे कसब पाहूनच पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे. आपल्या निवडीचे श्रेय देताना कौस्तुभ शिर्के यांनी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांचे आभार मानले आहेत. यामध्ये माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी मंत्री वसंतराव पुरके, आमदार बाळासाहेब मांगूळकर, माजी आमदार वजाहत मिर्झा, महिला प्रदेशाध्यक्षा संध्या सव्वालाखे तसेच माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे व जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल मानकर यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

# गाय चोरण्याचा अयशस्वी प्रयत्न

**पांढरकवडा, दि. १ :** मोमीनाबाद कॉलनी परिसरात ३० मार्च रोजी सकाळी ८.१५ वाजता एका अज्ञात वाहन चालकाने चक्क १७००० रुपये किमतीची गाय चोरून नेण्याचा गंभीर प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विकास भुसरे हे पांढरकवडा शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधील इंदिरानगर येथील रहिवासी आहेत. त्यांच्या मालकीची १० वर्षे वयाची धामण्या रंगाची गाय घरासमोर होती. एमएच २९ बीडी २३७१ या क्रमांकाच्या ॲपे वाहनाच्या चालकाने ही गाय वाहनात टाकून चोरण्याचा प्रयत्न केला. परंतु वेळीच हा प्रकार लक्षात आल्याने सदर चालकाचा हा चोरीचा प्रयत्न पूर्णपणे फसला. विकास भुसरे यांनी ३१ मार्च रोजी रात्री ११.३३ वाजता पांढरकवडा पोलिस ठाण्यात जाऊन या घटनेची रीतसर सविस्तर तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित ॲपे वाहन चालकाविरुद्ध चोरीच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असून पुढील सखोल तपास वेगाने सुरू केला आहे.

# यवतमाळ नगरपरिषद प्रशासन देवाला तरी घाबरेल का?

## डॉ. नीरज वाघमारे यांचा सवाल; प्रशासनाविरोधात वंचितचे 'यज्ञ-याग' आंदोलन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.१ :** यवतमाळ नगरपरिषदेने शहरातील रस्ते स्वच्छ व्हावेत या हेतूने कोट्यवधी रुपये खर्च करून 'रोड व्हॅक्यूम स्वीपर मशीन' खरेदी केली आहे. मात्र, हे बहुमुल्य वाहन सध्या प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धूळ खात पडले आहे. वारंवार मागणी करूनही हे वाहन प्रभागांच्या स्वच्छतेसाठी उपलब्ध करून दिले जात नसल्याने, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वात नगरपरिषदेच्या विरोधात अनोखे 'प्रतीकात्मक पूजा आणि यज्ञ-याग' आंदोलन करण्यात आले.

प्रशासकीय दिरंगाईवर टीका करताना डॉ. वाघमारे म्हणाले की, नगरपरिषद प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे. हे प्रशासन संविधानाच्या निर्देशानुसार काम करीत नसून मनूवादी विचारसरणीने चालत आहे, असा आरोप त्यांनी केला. त्यामुळेच, याच विचारसरणीला मान्य असलेल्या पद्धतीने पुरोहितांच्या हस्ते या मशीनची प्रतीकात्मक पूजा आणि यज्ञ करून प्रशासनाचा निषेध नोंदवण्यात आला. हनुमान जयंतीचे औचित्य साधून नगरपरिषदेची तक्रार थेट 'हनुमानजीं'कडे करत साकडे घालण्यात आले. या आंदोलनानंतर तरी प्रशासनाला जाग येईल का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे, सरचिटणीस संजय इंगळे, शहराध्यक्ष प्रसन्नजित भवरे, शहर सरचिटणीस प्रमोद पाटील, नितेश पाटील, शैलेश भानवे, देवानंद लोणारे, केशव भागवत, गजानन कोकाटे, उत्तम कांबळे, रामदास वीर, अरविंद दिवे, संजय तेलतुंबडे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कष्टाचे फळ आणि भक्तीचे बळ 'आनंद' देतात!

## पंडित प्रदीप मिश्रा (शिवमहापुराण कथा); आर्णीतील सिद्धेश्वरनगरीत शिवभक्तांचा महाकुंभ!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी
✦ सचिन शिंदे



### कलियुगातील नात्यांचे वास्तव

**'जगत मे सब मतलब के यार, जिसके पास रहे धन-दौलत उसके मित्र हजार...' या भजनाच्या माध्यमातून पंडित मिश्रा यांनी कलियुगातील स्वार्थी जगावर भाष्य केले. 'जेव्हा तुमच्याकडे संपत्ती असते, तेव्हा हजारो मित्र सोबतीला असतात, पण अडचणीच्या काळा कोणीही मदतीला धावत नाही. अशा वेळी केवळ देवाचाच आधार उरतो. स्वतःची ओळख निर्माण करायची असेल, तर महादेवाची आराधना करा,' असे आवाहन त्यांनी केले.**

**यवतमाळ, दि.१ :** 'मानवी जीवनात दुःख, निंदा आणि चिंता यांसारख्या खडतर वाटेवरून प्रत्येकाला प्रवास करावाच लागतो. या अग्निदिव्यातून जो यशस्वीपणे बाहेर पडतो, त्यालाच जगात मान-प्रतिष्ठा आणि सुख-समृद्धी मिळते. जग तुमचे कष्ट पाहत नाही, तर कष्टाचा 'निकाल' पाहते. त्यामुळे संकटात डगमगू नका,' असे प्रेरणादायी प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांनी केले.

सिद्धेश्वर नगरी आर्णी येथे १ एप्रिल रोजी कथेच्या तिसऱ्या दिवसाची सुरुवात संगीतमय वातावरणात झाली. बुधवारच्या आरतीचा मान शहरातील संतोष जयस्वाल, शंकर मारबते, राजू जयस्वाल यांच्या कुटुंबीयांना मिळाला. यावेळी सावरिया महाराज, राजुराचे आमदार देवराव भोंगळे, आर्णीचे आमदार राजू तोडसाम, प्रिया तोडसाम यांसह लाखो शिवभक्तांची उपस्थिती होती. जीवनाचे सार सांगताना पंडित मिश्रा म्हणाले की, 'आपल्याला वेदना देणारी गोष्ट खूप छोटी असते. माणसाच्या पायाला छोट्या दगडाचीच ठेच लागते, डोंगराची नाही. जीवनातील छोट्या-छोट्या समस्याच आपल्याला जास्त कष्ट देतात. अशा वेळी विचलित न होता, शिवमहापुराणात सांगितल्याप्रमाणे रोज शिवलिंगावर 'एक लोटा जल' अर्पण करा. यामुळे केवळ मनःशांतीच मिळणार नाही, तर तुमचे संपूर्ण आयुष्य आनंदी होईल.' कथेचा तिसरा दिवसही अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. बहिरमदेव शिवमहापुराण सेवा समिती ट्रस्टचे कार्यकर्ते अहोरात्र मेहनत घेत आहेत. पोलिस प्रशासन, महसूल विभाग आणि नगर परिषद प्रशासन चोख बंदोबस्त ठेवून भाविकांच्या सोयीसाठी सज्ज आहे. 'कदाचित फळ मिळायला उशीर होईल, पण परिणाम नक्कीच सकारात्मक होईल,' असा विश्वास पंडित मिश्रा यांनी भाविकांना दिला.

# पुसद नगर परिषदेत कर्मचाऱ्यांना शिवीगाळ

## नगरसेविकेच्या पतीकडून शिवीगाळीचा आरोप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पुसद, दि. १ :** पुसद नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक ११ मधील नगरसेविका देशमुख यांचे पती सुधीर देशमुख यांनी बुधवारी (दि. १) सकाळी सफाई कर्मचाऱ्यांना फोनवरून अशोभनीय भाषा वापरत शिवीगाळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे नगर परिषद परिसरात तणाव निर्माण झाला असून, संतप्त कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांच्याकडे कारवाईसाठी निवेदन दिले आहे.

नगर परिषद कर्मचाऱ्यांनी सुधीर देशमुख यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी लावून धरली आहे. या घटनेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप असून, प्रशासकीय कामात हस्तक्षेप करणाऱ्यांविरोधात मुख्याधिकाऱ्यांनी पावले उचलावीत, असे निवेदनात नमूद आहे. पुसद नगर परिषदेत निवडून आलेल्या महिला नगरसेविकांऐवजी त्यांचे पतीच सर्व कारभार पाहत असल्याची बाब या निमित्ताने उघडकीस आली असून, अशा अयोग्य हस्तक्षेपावरही कारवाई करण्याची मागणी जनतेकडून होत आहे. शासकीय कर्मचाऱ्यांचा सन्मान राखला जावा, अन्यथा व्यवस्था कोलमडेल असा इशारा यावेळी देण्यात आला. आता नगराध्यक्ष मोहिनी नाईक आणि मुख्याधिकारी या प्रकरणावर काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.